# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.२१/२०१५** **दिनांक २८.११.२०१५**

**स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर** **वेळ- सायंकाळी ०५.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक २८.११.२०१५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ४८२५/२०१५, दिनांक २८ नोव्हेंबर, २०१५ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा शनिवार दिनांक २८.११.२०१५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे मा.अध्यक्ष श्री.श्रीकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.श्रीकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. मा.श्री.बाजीराव शिंदे, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत येऊन, मा.अध्यक्ष श्री.श्रीकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक २७.१०.२०१५ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.५१९** दिनांक २७.१०.२०१५ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविणेत आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करणेत आले.

---

**विषय नं.०२** **दिनांक ०५.११.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.५२०** दिनांक ०५.११.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

०१ **साईटेक प्रकल्पाचे ऑनलाईन सेवेसाठी Secondory 10 MBPS Internet Link सुविधा घेणेसाठी ई-निविदामधील पात्र निविदाधारकांच्या Commercial निविदा उघडणेबाबत.**

**अधिनियम 2004 मधील तरतुद:** 17 (1) नुसार भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:** 1) दिनांक 07/11/2009 रोजीचे सभेतील निर्णय क्र.799. 2) मा.व्यवस्थापन समितीचे दि. 05/06/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 401.

**प्रास्ताविक:** माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत साईटेक प्रकल्प उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली आहे. त्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना प्रकल्प उभारणीसाठीचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदर प्रकल्पाअंतर्गत श्री साईभक्तांसाठी ऑनलाईन रुम बुकिंग, दर्शनपास व देणगी या सुविधा online.sai.org.in या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) सुरु करण्यात आलेल्या आहेत. सदरकामी BSNL यांची 10 Mbps सेवा दिनांक 13/02/2014 पासुन कार्यान्वीत करण्यात आलेली आहे.

BSNL यांची सेवा काही तांत्रिक कारणास्तव खंडीत झाल्यास पुर्वी Airtel यांच्या 512 Kbps या Secondary Internet Link वर उपरोक्त ऑनलाईन सुविधा अहोरात्र श्री साईभक्तांच्या सेवेसाठी कार्यान्वीत होती. परंतु सदर लिंकचे स्पिड हे अत्यंत कमी असुन याकामी 10 Mbps ही इंटरनेट लिंक दुसऱ्या Internet Service Provider कडुन कार्यान्वित करणे अपेक्षित होते.

परंतु, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता मिळणेस उशीर होत असल्याचे निदर्शनास आल्याने पुर्वीची Airtel 512 Kbps लिंक ही 10 Mbps मध्ये Upgrade करणेकामी येणारा खर्च पावती क्रं.32542 दि.24/11/2014 अन्वये मा. के.व्ही. रमणी सो., यांनी एका वर्षाच्या कालावधीसाठी देणगी म्हणुन दिलेला होता.

त्यानुसार श्री.के.व्ही.रमणी यांनी देणगी दिलेल्या Airtel 10 Mbps Secondary Internet Link चा कालावधी दि. 28/10/2015 रोजी संपुष्टात आला आहे.

सदरकामी दि. 05/12/2013 रोजी विधी विभागाकडे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची दि.14/03/2015 रोजीचे पत्रान्वये मान्यता मिळालेबाबतची प्रत इकडील विभागास प्राप्त झालेली आहे.

माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत श्री साईभक्तांसाठी ऑनलाईन रुम बुकिंग, दर्शनपास व देणगी या सुविधा online.sai.org.in या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) सुरु करण्यात आलेल्या आहेत. सदरकामी दि. 14/09/2015 रोजीची मंजुर टिपणी अन्वये विविध कंपन्याचे ISP पुरवठाधारकांकडुन ई-निविदा मागवुन तसेच जनसंपर्क

विभागामार्फत महाराष्ट्रातील 05 शहरामधील वर्तमानपत्रात शासकीय दराप्रमाणे तसेच संस्थानचे वेबसाईटवरही जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती.

त्यानुसार दि.07/10/2015 रोजीचे परिपत्रकान्वये प्री-बीड मिटींग आयोजीत करण्यात येऊन तांत्रिक सल्लागार श्री.विजय नायडु यांचे उपस्थित निविदाधारकांशी दि. 08/10/2015 रोजीचे मंजुर टिपणीतील मुद्यांवर चर्चा करण्यात आलेली आहे. विविध कंपन्याचे ISP प्रोव्हायडरकडुन मागविण्यात आलेल्या प्राप्त ई-निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.न. | कंपनीचे नाव | आवक नंबर दिनांक |
|---|---|---|
| 1 | Gozon communication India Ltd. | आ.नं. 14578 दि. 19/10/2015 |
| 2 | JPR Digital Pvt. Ltd. Mumbai | आ.नं. 14682 दि. 21/10/2015 |
| 3 | Tata Teleservices (Maharasgtra) Limited | आ.नं. 14720 दि. 21/10/2015 |
| 4 | Railtel Corporation of India Ltd. | आ.नं. 14837 दि. 24/10/2015 |
| 5 | Vodafone Cellular Limited, Pune | आ.नं. 15080 दि. 28/10/2015 |

उपरोक्त प्राप्त पुरवठाधारकांच्या तांत्रिक ई-निविदा दि. 21/10/2015 रोजीचे परिपत्रकान्वये दि. 23/10/2015 रोजी उघडण्यात आले आहेत. त्यावेळी खालील अधिकारी/कर्मचारी उपस्थितीत होते.

| अ.नं. | नाव | पदनाम / कंपनी |
|---|---|---|
| 1 | श्री सुर्यभान गमे | प्रशासकीय अधिकारी |
| 2 | श्री दिलीप उगले | प्रशासकीय अधिकारी |
| 3 | श्री उत्तमराव गोंदकर | प्रशासकीय अधिकारी |
| 4 | श्री विजय नायडु | तांत्रिक सल्लागार |
| 5 | श्री किशोर गवळी | प्र. माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख |
| 6 | श्री विनोद कोते | ज्यु.ईडीपी मॅनेजर |
| 7 | श्री साईप्रसाद जोरी | तांत्रिक सहाय्यक |
| 8 | श्री प्रविण गायकर | कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनिधी |
| 9 | श्री धनंजय कुमार | कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनिधी |
| 10 | श्री साहेबराव लंके | लेखाधिकारी |
| 11 | श्री अनिल भोरकडे | लिपीक, माहिती तंत्रज्ञान विभाग |
| 12 | श्री एच एस गवारे | उपविभागीय अभियंता बीएसएनएल शिरडी |
| 13 | श्री सचिन कोतकर | टाटा टेलि सर्व्हिसेस् |
| 14 | श्री रविशंकर गोंदकर | गॅझॉन इंडीया लि. |

वरीलप्रमाणे उपस्थितांसमोर उघडण्यात आलेल्या तांत्रिक ई-निविदेमधील पुरवठाधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा तपशिल खालीलप्रमाणे.

| Description | ISP Vendor | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | Gazon communication India Ltd. | JPR Digital Pvt. Ltd. Mumbai | Tata Teleservices (Maharasgtra) Limited | Railtel Corporation of India Ltd. | Vodafone |
| ISP Licence Class A/B | Class-B | Class-B | Class- A | Class- A | Class- A |
| ISP Licence Agreement Issued by Govt. of India | Yes | Yes | Yes | Yes | Yes |
| Income Tax Return and balance sheet certified by CA | Yes | Yes | Yes | Yes | No |
| List of Organization where the service are implemented | Yes | Yes | Yes | Yes | No |
| VAT TIN Number/ Service Tax Certificate, Pan Card | Yes | Yes | Yes | Yes | Yes |

| Tender Fee DD Amount of Rs. 500/- and EMD DD Amount of Rs. 11,500/- | EMD | Tender Fee | EMD | Tender Fee | EMD | Tender Fee | EMD | Tender Fee | EMD | Tender Fee |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | No |
| Remark | Accepted | | Accepted | | Accepted | | Accepted | | Rejected | |

सदरच्या तांत्रिक ई-निविदा संस्थानचे तांत्रिक सल्लागार श्री विजय नायडु यांनी तपासल्या असुन उपरोक्त प्राप्त निविदाधारक/ पुरवठाधारकांच्या Commercial ई-निविदा ई-निविदेमधील तांत्रिकदृष्टया पात्र निविदा/ पुरवठाधारकांच्या Commercial ई-निविदा दि.22/10/2015 रोजीची मंजुर टिपणी अन्वये दि. 23/10/2015 रोजी दुपारी 03.00 वा. उघडणेस व संबधीतांना कळविणेस मान्यता घेण्यात आलेली होती. परंतु सदर Commercial ई-निविदा उघडणेचे अधिकार मा.उप-समितीस असलेमुळे, मा.प्रशासकीय अधिकारी यांनी सदर Commercial ई-निविदा मा.उप-समितीचे सभेत उघडणेबाबत सुचित केले आहे.

त्यानुसार सदर Commercial ई-निविदा मा. उप-समितीचे सभेपुढे उघडुन त्यातील न्युन्नतम निविदाधारक/ पुरवठाधारकास पुढील एक वर्षाकरीता कार्यादेश देता येईल.

**मागणी:** प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे दि. 05/06/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 401 अन्वये साईटेक प्रकल्पाचे ऑनलाईन सेवेसाठी Secondary 10 Mbps Internet Link सुविधा घेणेसाठी प्राप्त झालेल्या तांत्रिक ई-निविदा उपस्थितांसमोर उघडण्यात आल्या आहेत. सदरच्या प्राप्त तांत्रिक ई-निविदा संस्थानचे तांत्रिक सल्लागार श्री.विजय नायडु यांनी तपासल्या असुन उपरोक्त प्राप्त निविदाधारक/ पुरवठाधारकांच्या Commercial ई-निविदा मा.उप-समितीचे सभेपुढे उघडुन त्यातील न्युन्नतम निविदाधारक/पुरवठाधारकास पुढील एक वर्षाकरीता कार्यादेश देणेस व संबधीत कंपनीशी याकामी करारनामा करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** आर्थिक व तांत्रिक

प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे दि.05/06/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.401 अन्वये साईटेक प्रकल्पाचे ऑनलाईन सेवेसाठी Secondary 10 Mbps Internet Link सुविधा घेणेसाठी प्राप्त झालेल्या तांत्रिक ई-निविदा उपस्थितांसमोर उघडण्यात आल्या आहेत.

सदरच्या प्राप्त तांत्रिक ई-निविदा संस्थानचे तांत्रिक सल्लागार श्री विजय नायडु यांनी तपासल्या असुन उपरोक्त प्राप्त निविदाधारक/ पुरवठाधारकांच्या Commercial ई-निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्याचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदेमधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| ०१ | Gazon Communication India Ltd. | २,४०,२००/- |
| ०२ | JPR Digital Pvt. Ltd. Mumbai | १४,८२,०००/- |
| ०३ | Railtel Corporation of India Ltd. | ६,३७,८३०/- |
| ०४ | Tata Teleservices (Maharasgtra) Limited | ६,२१,३००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे साईटेक प्रकल्पाचे ऑनलाईन सेवेसाठी Secondory 10 MBPS Internet Link सुविधा घेणेसाठी Gazon Communication India Ltd. यांचे एक वर्ष कालावधीसाठी रु.२,४०,२००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

०२ **कॅन्टीन, नाष्टा, लाडू काऊंटर संगणकीकृत करणेकामी संगणकासाठी इलेक्ट्रीक पॉईंटच्या वायरींगचे काम करणेकामी प्राप्त झालेली टेंडर्स उघडून निर्णय होणेबाबत.**

मा.व्यवस्थापन त्रीसदस्य समितीचे दि.२३-०७-२०१५ चे सभेतील विषय नं.०४ निर्णय क्र.२०४ (११) अन्वये कॅन्टीन, नाष्टा, लाडू काऊंटर संगणकीकृत करणेसाठी संगणकासाठी इलेक्ट्रीक पॉईंटचे वायरींगचे काम करणेकामी येणा-या खर्चास, कामास व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन टेंडर मागविणेकामी येणारे रक्कम रुपये २,८०,१३४/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाली होती.

त्यानुसार टेंडर विक्रीसाठी दिनांक ३०-०९-२०१५ रोजी दै.मालेगावचा बालेकिल्ला, मालेगांव व दिनांक ०२-१०-२०१५ रोजी साप्ताहिक शितल टाईम्स, श्रीरामपूर या वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात देण्यात आलेली होती. टेंडर विक्रीची तारीख दि.२९-०९-२०१५ ते दि.०८-१०-२०१५ अखेर ठेवण्यात आलेली होती.व टेंडर जमा करण्याची शेवटची तारीख दि.१०-१०-२०१५ अशी देण्यात आलेली होती. त्यानुसार तीन टेंडरची विक्री झालेली असून सिलबंद टेंडर जमा करणेचे मुदतीत खालीलप्रमाणे तीन टेंडर प्राप्त झाले आहेत. जमा झालेल्या टेंडरचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | टेंडरधारकाचे नांव | प्रशासन आवक क्र / दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१) | मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | १३९३६ / १०-१०-२०१५ | ०१ बंद टेंडर पाकीट + ०१ ईएमडी पाकीट |
| ०२) | मे.गुरु इंजिनिअरींग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, नाशिक | १३९३९ / १०-१०-२०१५ | ०१ बंद टेंडर पाकीट + ०१ ईएमडी पाकीट |
| ०३) | मे.श्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | १३९४० / १०-१०-२०१५ | ०१ बंद टेंडर पाकीट + ०१ ईएमडी पाकीट |

कॅन्टीन, नाष्टा, लाडू काऊंटर संगणकीकृत करणेसाठी संगणकासाठी इलेक्ट्रीक पॉईंटचे वायरींगचे काम करणेकामी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले ०३ टेंडर्स आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित टेंडरधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

(टेंडरमधील इस्टीमेट दर रु.२,८०,१३४/-)

| अ.क्र. | टेंडरधारकाचे नांव | टेंडरधारकांनी देऊ केलेला दर | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| ०१ | मे.आदिती इलेक्ट्रीकल्स् नाशिक | टेंडरदरामध्ये १% कमी | २,७७,३३३/- |
| ०२ | मे.गुरु इंजिनिअरींग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, नाशिक | टेंडरदरामध्ये ५% कमी | <u>२,६६,१२७/-</u> |
| ०३ | मे.श्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | टेंडरदरामध्ये ५% कमी | <u>२,६६,१२७/-</u> |

प्रस्तावितकामी अ.नं.०२ व ०३ या दोन टेंडरधारकांचे समान निम्नतम दर आलेले असल्यामुळे त्या दोन्ही टेंडरधारकांना सभेसमोर चर्चेसाठी बोलविणेत येऊन, दोघांचे दर समान आलेले आहेत करीता उपसमिती सभेसमोर पुन्हा नवीन दर देणेबाबत सांगितले असता, अ.नं.०२ चे मे.गुरु इंजिनिअरींग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, नाशिक यांनी दरामध्ये बदल करणेस असमर्थता दर्शविली तसेच अ.नं.०३ चे मे.श्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांनी टेंडरमध्ये दिलेल्या दरामध्ये आणखी १% कमी (रु.२,६३,३२६/-) दर देऊ केले.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, कॅन्टीन, नाष्टा, लाडू काऊंटर संगणकीकृत करणेकामी संगणकासाठी इलेक्ट्रीक पॉईंटच्या वायरींगचे काम करणेकामी मे.श्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांचे अंतीम निम्नतम दर रु.२,६३,३२६/- मात्र स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- उपकार्यकारी अभियंता, विद्युत विभाग)

---

०३ **सन २०१५-२०१६ करीता पाणी शुध्दीकरणांसाठी क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेकामी प्राप्त निविदेतील मुळ निविदांचे लिफाफे उघडणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः-** १७ (२) (झ) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद आहे.

**प्रस्ताविकः-** पाणी पुरवठा विभागास पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेसाठी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२४/०६/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १६२-११ नुसार खालीलप्रमाणे निर्णय संमत झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होवून, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे पाणी पुरवठा विभागास सन २०१५-२०१६ करीता पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक असलेले क्लोरीन गॅस सिलेंडर शासनाकडील रेट कॉन्ट्रॅक्ट यादीमध्ये समावेश असल्यास रेट कॉन्ट्रॅक्ट नुसार खरेदी करण्यात यावे. रेट कॉन्ट्रॅक्ट मध्ये समावेश नसल्यास ते खरेदीकामी विहीत पध्दतीने निविदांची मागणी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु. १,६०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली. „

**प्रस्तावनाः-** सदर क्लोरीन गॅस सिलेंडरचा रेट कॉन्ट्रॅक्टमध्ये समावेश असल्याचे आढळुन येत नाही, असे माहिती तंत्रज्ञान विभागाकडुन दि.१२/०८/२०१५ रोजीचे पत्राने कळविलेले आहे. पाणी पुरवठा विभागास पाणी शुध्दीकरणांसाठी क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणे आवश्यक असल्याने, दि.१७/०८/२०१५ रोजीचे मंजुर टिपणी अन्वये दि. ०१/०९/२०१५ रोजीचे वर्तमानपत्रात जनसंपर्क विभागामार्फत जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. निविदा भरण्याचा कालावधी दि. ०२/०९/२०१५ ते दि. ०७/०९/२०१५ असा ठेवण्यात आलेला होता.

उपरोक्त कामी विहीत मुदतीत खालील ०३ निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झालेल्या होत्या.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | आवक नंबर | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | रंग रसायन, पुणे. | ११४४२ | ०७/०९/२०१५. |
| ०२ | जी.एस.कमर्सियल कार्पोरेशन, मुंबई. | ११४४४ | ०७/०९/२०१५. |
| ०३ | ॲक्वॉमेक एंटरप्रायजेस, मुंबई. | ११४४६ | ०७/०९/२०१५ |

पाणी पुरवठा विभागास पाणी शुध्दीकरणांसाठी क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेकामी प्राप्त निविदांचे तांत्रिक लिफाफे दि. १९/०९/२०१५ रोजी मा.प्रशासकिय अधिकारी व मा.मुख्यलेखाधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आले.

उपरोक्तकामी प्राप्त ०३ निविदांचे कागदपत्रांची तपासणी लेखाशाखेमार्फत करण्यात आली. प्राप्त तीनही निविदाधारकांनी कागदपत्रांची पुर्तता केल्याचे आढळुन आल्याने तीनही निविदा पात्र ठरविण्यात आल्याने पात्र निविदाधारकांच्या मुळ निविदा पुढील मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेत उघडून योग्य निर्णय घेता येईल.

प्रस्तावित केल्याप्रमाणे पाणी पुरवठा विभागास पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेकरीता प्राप्त झालेल्या ०३ निविदाधारकांच्या मुळ दरांचे लिफाफे आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत आले येऊन, त्याचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | निविदेमधील मुळ दर (प्रति १०० किलोसाठी) व्हॅटसह रु. |
|---|---|---|
| ०१ | रंग रसायन, पुणे | ४,७५०/- |
| ०२ | जी.एस.कमर्सियल कार्पोरेशन, मुंबई | ४,०००/- |
| ०३ | अॅक्वॉमेक एंटरप्रायजेस, मुंबई | ४,५००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे सन २०१५- २०१६ मध्ये पाणी शुध्दीकरणासाठी क्लोरीन गॅस सिलेंडर्स खरेदीकामी जी.एस.कमर्सियल कार्पोरेशन, मुंबई यांचे उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

०४ **श्री साईनिवास अतिथीगृहामधील व्ही.आय.पी सुटचे जुने २.० टन स्प्लिट ए.सी. बायबॅक करुन नवीन ए.सी. खरेदी करुन बसविणेकामी तिसरे व अंतीम वेळेस प्राप्त ई-निविदा उघडणेबाबत.**

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 27/04/2013 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 384 अन्वये श्री साईनिवास अतिथीगृहमधील व्ही.आय.पी. सुटचे जुने 2.0 टनाचे स्प्लिट ए.सी. 30 नग बायबॅक करुन नविन 33 नग स्पिलट ए.सी. खरेदी करणेकामी वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये 11,22,000/- खर्चास मान्यता मिळालेली आहे.

उपरोक्त मान्यतेनुसार वर्तमानपत्रात व महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर जाहीरात अपलोड करण्यात आली असता, चार तांत्रिक ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या. या तांत्रिक ई-निविदा संस्थानचे आय.टी. विभागाने कळविलेनुसार, तांत्रिक अडचणीमुळे उघडण्यात आल्या नाहीत. त्यामुळे पुन्हा विहीत पध्दतीने ई-निविदा मागविण्यात आल्या. मुदतीअंती तांत्रिक फेर ई-निविदेचे 2 लिफाफे (Technical Bid) शिर्डी कार्यालयात प्राप्त झाले होते. या निविदेसंदर्भात मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 12/06/2014 रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. यामध्ये प्राप्त झालेल्या 2 फेर ई-निविदा सदरचे सभेत उघडणेत येऊन निविदाधारकांना समक्ष चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले:

| अ. नं. | निविदाधारकाचे नांव | निविदेमधील मुळ दर रुपये | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| 1. | मे. आदर्श एअरकॉन, घाटकोपर, मुंबई | 16,31,780/- | अनुपस्थित |
| 2. | मे. श्री व्यंकटेश्वरा एच.व्ही.ए.सी. अॅण्ड आर. पुणे | 17,79,735/- | 17,79,735/- |

यावर सविस्तर चर्चा होऊन सभेतील निर्णय क्र. 465 नुसार "प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी". असे ठरले.

वरील निर्णयानुसार मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात संस्थानतर्फे सिव्हील अॅप्लीकेशन सादर करण्यात आले होते. मा.खंडपीठाने त्यांचे CIVIL APPLICATION NO. 10428 of 2014 IN PIL/18/2011 ने पुढीलप्रमाणे आदेशित केले आहे: "According, the Sansthan to invite fresh tender's both with condition of buy-back and without any buy-back i.e. for supply of new machines"

या मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे आदेशानुसार श्री साईनिवास अतिथीगृहमधील व्ही.आय.पी. सुटचे स्प्लिट ए.सी. खरेदी करणेकामी तिस-या व अंतिम वेळेस ***buy-back and without any buy-back*** पध्दतीने ई-निविदा मागविणे आवश्यक होते.

उपरोक्तप्रमाणे तिस-या व अंतिम वेळेस ई-निविदा मागविणेकामी इकडील विभागाच्या दिनांक 9 जुलै, 2015 चे मंजूर टिपणीन्वये वर्तमानपत्रात संस्थानचे वेबसाईटवर तसेच महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in अपलोड करण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार वेबसाईटवर जाहीरात दिनांक 15/09/2015 रोजी अपलोड करण्यात आली होती. ई-निविदा ऑनलाईन डाऊन लोडींगसाठी 15/09/2015 रोजी सायंकाळी 5.30 वाजेपासून उपलब्ध करण्यात आली होती. तसेच निविदा ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मुदत दिनांक 21/09/2015 रोजी दुपारी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत ठेवण्यात आलेली होती. ई-निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेल्या तांत्रिक कागदपत्रांच्या मुळ प्रती दिनांक 23/09/2015 रोजी सायंकाळी 5.00 पर्यंत शिर्डी

कार्यालयात सादर करणेकामी अपलोड करण्यात आलेल्या ई-निविदा व जाहिरातमध्ये कळविण्यात आले होते. त्यानुसार खालील 4 पुरवठादारांच्या तांत्रिक ई-निविदांच्या हार्ड कॉफी बंद पाकीटामध्ये प्राप्त झालेल्या आहेत :

| अ.नं. | ई-निविदाधारकांचे नांव | अ.नं. | ई-निविदाधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| 1. | Classic Cool Airconditioning, Mumbai | 3. | Kailash Refrigeration Works, Mumbai |
| 2. | A.J. Enterprises, Panvel | 4. | Shree Venkateshwara Turnkey Project Soluation Pvt. Ltd., Pune |
| 5. | Blue Star Limited, Pune | | |

उपरोक्त प्राप्त 5 ई-निविदेतील तांत्रिक निविदा (Technical Bid) उघडणे आवश्यक आहे. जेणेकरुन त्यातील VAT, TIN, PAN नंबर, कंपनीचा वार्षिक उलाढाल, सध्या काम करत असलेल्या कामाची यादी पुरवठा आदेशासह, कंपनी रजिस्टेशन सर्टिफिकेटस, टेडर फी व ई.एम.डी. रकमेचा डि.डी., अंडर टेकींग सर्टिफिकेट व सर्व्हे रिपोर्ट इत्यादी बाबी चेक करणे आवश्यक आहे. तांत्रिक निविदा उघडतांना निविदाधारकांना बोलाविणेबाबत निविदेमध्ये नमूद केलेले नाही.

तरी मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे आदेशानुसार (1) श्री साईनिवास अतिथीगृहमधील व्ही.आय.पी. सुटचे जुने 2.0 टन स्प्लिट ए.सी. बायबॅक (buy-back) करुन नविन बसविणे. तसेच (2) श्री साईनिवास अतिथीगृहमधील व्ही.आय.पी. सुटसाठी नविन (without any buy-back) ए.सी. बसविणे यासाठी प्राप्त 5 तांत्रिक (Technical Bid) व कमर्शिअल (Commercial Bid) निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | ईनिविदा-धारकांचे नांव | नवीन ३३ नग ए.सी. खरेदीकामी देऊ केलेले एकत्रित दर रु. | जुने ३० नग ए.सी. बायबॅक करणेकामी देऊ केलेले एकत्रित दर रु. | निविदाधारकास अदा करावी लागणारी रक्कम रु. (३-४) |
|---|---|---|---|---|
| 1. | Shree Venkateshwara Turnkey Project Soluation Pvt. Ltd., Pune | १४,८५,०००/- | ६,००,०००/- | ८,८५,०००/- |
| 2. | Kailash Refrigeration Works, Mumbai | १६,१०,४००/- | ९,००,०००/- | ७,१०,४००/- |
| 3. | A.J. Enterprises, Panvel | १६,८३,०००/- | ८७,०००/- | १५,९६,०००/- |
| 4. | Classic Cool Airconditioning, Mumbai | १६,३६,८००/- | ८४,०००/- | १५,५२,८००/- |
| .5 | Blue Star Limited, Pune | १०,७२,५००/- | ६०,०००/- | १०,१२,५००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनिवास अतिथीगृहामधील व्ही.आय.पी सुटचे ३० नग जुने २.० टन क्षमतेचे जुने स्प्लिट ए.सी. बायबॅकसह नवीन ३३ नग ए.सी. खरेदी करुन बसविणेकामी मे.कैलास रेफ्रिजरेशन वर्कस्, मुंबई यांचे दर निम्नतम असून सदरहूकामी त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

०५ **श्री साईप्रसादालयातील सोलर स्टीम कुकींग प्रकल्पाचे केमिकल सर्क्युलेशन करणेकामी प्राप्त निविदा उघडणेबाबत.**

श्री साईप्रसादालयातील अन्न शिजविणेकामी इंधन खर्चात बचत होणेसाठी भारतातील सर्वात मोठा सोलर स्टीम कुकींग प्रकल्प दिनांक 30 जुलै 2009 रोजी कार्यान्वित करणेत आलेला आहे. 2014 मध्ये नविन IBR कायाद्यानुसार प्रकल्पाचे मॉडीफिकेशनचे काम केलेले असून दर वर्षी बॉयलर इन्स्पेक्टर, बॉयलर कार्यालय, अहमदनगर महाराष्ट्र शासन यांचेमार्फत तपासणी केली जाते. तत्पुर्वी त्यांनी केमिकल सक्युलेशन करुन घेणेस व त्यानंतर हायड्रो टेस्ट करणेबाबत सांगितले आहे. त्यानुसार केमिकल सर्क्युलेशन व हायड्रो टेस्ट करणेकरीता येणाऱ्या रक्कम रु. 2,49,000/- चे खर्चास, कामास व वर्तमानपत्रात जाहीरात देऊन IBR मान्यता प्राप्त एजन्सीकडून निविदा बोलविणेस त्रिसदस्य समिती दिनांक 23/7/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 204 (43) नुसार मान्यता मिळालेली आहे.

उपरोक्त कामी निविदा विक्रीसाठी स्थानिक वृत्तपत्रात जाहीरता देऊन दिनांक 11/9/2015 ते 17/9/2015 निविदा विक्री करण्यात आली. या कालावधीत तीन निविदाधारकांनी निविदा विकत घेतल्या होत्या. परंतु सबमिशन तारीख 19/9/2015 मुदतीत खालील दोन निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव |
|---|---|
| 1. | आदर्श इंजिनिअरींग वर्क्स, आंबेजोगाई, बीड |
| 2. | केयुजे इंडस्ट्रीज, चिखली पुणे |

विहीत मुदतीत दोनच निविदाधारकांनी निविदा जमा केलेली असलेने लेखापरिक्षणाचे दुष्टीने कमीत कमी तीन निविदांची आवश्यकता होती. त्यामुळे वृत्त पत्रात जाहीरात देऊन फेर निविदा विक्री करणेकामी जाहीरात देणेत आलेली होती. फेर निविदा विक्री दिनांक 19/10/2015 ते 26/10/2015 अशी होती. या कालावधीत डॉल्फीन इंजिनिअरींग, अहमदनगर यांनी निविदा विकत घेऊन विहीत मुदतीत जमा केलेली आहे. तसेच यापुर्वी जमा झालेल्या सिलबंध दोन निविदा ग्राहय धरता येतील. तरी पुढिलप्रमाणे तीन सिलबंध निविदा मा. उपसमिती सभेसमोर उघडता येतील.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | अ.नं. | निविदाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| 1. | आदर्श इंजिनिअरींग वर्क्य, आंबेजोगाई, बीड | 3 | डॉल्फीन इंजिनिअरींग, अहमदनगर |
| 2. | केयुजे इंडस्ट्रीज, चिखली पुणे | | |

सोलर स्टीम कुकींग प्रकल्पाचे केमिकल सर्क्युलेशन करणेकामी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०३ निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | निविदेमधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| 1. | केयुजे इंडस्ट्रीज, चिखली पुणे | २,७५,८८०/- |
| 2. | आदर्श इंजिनिअरींग वर्कस्, आंबेजोगाई, बीड | २,६१,९२०/- |
| 3. | डॉल्फीन इंजिनिअरींग, अहमदनगर | २,९३,०००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील सोलर स्टीम कुकींग प्रकल्पाचे केमिकल सर्क्युलेशन करणेकामी आदर्श इंजिनिअरींग वर्कस्, आंबेजोगाई, बीड यांचे उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील रु.२,६१,९२०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.०३** **दिनांक ०९.११.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.५२१** दिनांक ०९.११.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

**०१ दिपावली सुट्टीच्या कालावधीत तसेच डिसेंबर- २०१५ मधील नाताळ सुट्टी व नववर्षानिमित्ताने होणा-या गर्दीचे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदा (Commercial Bid) उघडणेबाबत.**

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय-** दि.२७/१०/२०१५ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेत दिपावली सुट्टीच्या कालावधीत तसेच डिसेंबर– २०१५ मधिल नाताळ सुट्टी व नववर्षा निमित्ताने होणारे गर्दीचे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी येणारे रक्कम रु.४,१६,६२६/- मात्रचे खर्चास तसेच याकामी विहीत पध्दतीने ई– निविदा मागविणेस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

**प्रस्तावना:** दि.११/११/२०१५ ते दि.२५/११/२०१५ अखेर १५ दिवस दिपावली सणानिमित्त तसेच दि.२५/१२/२०१५ ते ०२/०१/२०१६ अखेर ०९ दिवस शैक्षणिक व इतर कार्यालयांना सुट्टया आहेत. या कालावधीत साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्याने साईभक्तांचे सोयीसाठी तात्पुरते व्यवस्थेकरीता खालील ठिकाणी एम.एस. पाईपचे स्ट्रक्चर असलेले ताडपत्रीचे छतासह मंडप टाकणे आवश्यक असल्याने, त्यानुसार याकामी दि.०९/१०/२०१५ रोजीचे मंजूर टिपणीअन्वये वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. त्यानुसार प्राप्त झालेल्या ई – निविदांमधील टेक्नीकल बीड दि.०६/११/२०१५ रोजी उघण्यात आले आहेत. त्यावेळी खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.नं | नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. डी. टी. उगले | प्रशासकीय अधिकारी |
| २ | श्री. एस.व्ही.गमे | प्रशासकीय अधिकारी |
| ३ | श्री.यु.पी.गोंदकर | प्रशासकीय अधिकारी |
| ४ | श्री.ए.आर.औटी | प्रशासकीय अधिकारी |
| ५ | श्री. आर.बी. आहेर | उप कार्यकारी अभियंता |
| ६ | श्री. एस. एम. जोरी | उप अभियंता |
| ७ | श्री. व्ही.एल. जेजुरकर | वरिष्ठ लेखापाल |
| ८ | श्री. एम.पी. गव्हाणे | कनिष्ठ अभियंता |
| ९ | श्री. गनन सुर्वे | ज्यु. ई डी पी विभाग, प्रतिनिधी |

उघडण्यात आलेल्या ई– निविदांचे टेक्नीकल बीडमधील ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | ठेकेदाराचे नांव | कागदपत्रांचा तपशिल | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | बयाना रक्कमेचा डी.डी व को-या निविदेची किंमत | पॅन कार्डची छायांकीत प्रत | सर्व्हीस टॅक्स रजिस्ट्रेशन | रु.१००/- मात्रचे मुद्रांकावर हमीपत्र. | मंडप उभारणीच्या उलब्ध साहित्याच तपशिल | |
| १ | साईकृपा टेंन्ट हाऊस, बेलापूर ता. श्रीरामपूर | SBH – Dt.26/10/2015 D.D. No.503194 Rs.4,500/- SBH – Dt.26/10/2015 D.D. No.503195 Rs.500/- | जोडली आहे | जोडले आहे | जोडले आहे. | जोडला आहे. | पात्र |
| २ | न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर ता. राहूरी | Andhra Bank– Dt.28/10/2015 D.D. No.172952 Rs.4,500/- Andhra Bank – Dt.28/10/2015 D.D. No.172953 Rs.500/- | जोडली आहे | जोडले आहे | जोडले आहे. | जोडला आहे. | पात्र |
| ३ | बालाजी मंडप डेकोरेटर्स, मनमाड | SBH – Dt.02/11/2015 D.D. No.523338 Rs.4,500/- SBH – Dt.02/11/2015 D.D. No.523337 Rs.500/- | जोडली आहे | जोडले आहे | जोडले आहे. | जोडला आहे. | पात्र |
| ४ | राजेश मंडप डेकोरेटर्स, औ.बाद | Axis Bank – Dt.30/10/2015 D.D. No.597001 Rs.4,500/- Axis Bank – Dt.30/10/2015 D.D. No.596000 Rs.500/- | जोडली आहे | जोडले आहे | जोडले आहे. | जोडला आहे. | पात्र |
| ५ | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अ.नगर | SBI – Dt.31/10/2015 D.D. No.966797 Rs.4,500/- SBI– Dt.31/10/2015 D.D. No.966798 Rs.500/- | जोडली आहे | जोडले आहे | जोडले आहे. | जोडला आहे. | पात्र |

वरील प्रमाणे अ.नं. १ ते ५ चे ठेकेदार यांनी सादर केलेले तांत्रिक लिफाफ्यामध्ये सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता, सर्व ठेकेदार तांत्रिक दृष्टया पात्र असल्याचे आढळून आले आहे.

दिपावली सणाच्या तसेच डिसेंबर- २०१५ मधिल नाताळ सुट्टी व नववर्षा निमित्ताने होणारे गर्दीचे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी उपरोक्तप्रमाणे पात्र ०५ ठेकेदारांच्या दरांबाबतच्या ई-निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| ठेकेदाराचे नांव | दिपावली मंडप व्यवस्था ८६७१ चौ. फुट (१५दिवसाकरीता) | | नाताळ सुट्टी व नववर्षानिमित्त मंडप व इतर व्यवस्था | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मंडप व्यवस्था १४८५३ चौ. फुट (९ दिवसाकरीता) | | बॅरेकेडींग व्यवस्था ६५१ र. फुट (९ दिवसाकरीता) | | स्वागत कमान उभारणी - ०१ नग (१ दिवसाकरीता) | | स्टेज व्यवस्था ६०० चौ.फुट (१ दिवसाकरीता) | |
| | १ | | २ | | ३ | | ४ | | ५ | |
| | दर | रक्कम | दर | रक्कम | दर | रक्कम | दर | रक्कम | दर | रक्कम |
| साईकृपा टेन्ट हाऊस, | ३० | २६०१३०/- | १६ | २३७६४८/- | ५० | ३२५५०/- | ३५०० | ३५००/- | १५० | ९००००/- |
| कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स | ३० | २६०१३०/- | २० | २९७०६०/- | ५४ | ३५१५४/- | ५००० | ५०००/- | ५८ | ३४८००/- |
| राजेश मंडप डेकोरेटर्स | २० | १७३४२०/- | १० | १४८५३०/- | ७० | ४५५७०/- | ३००० | ३०००/- | ६० | ३६०००/- |
| न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, | १८.७५ | १६२५८१/- | १२ | १७८२३६/- | ७५ | ४८८२५/- | २८०० | २८००/- | ६६ | ३९६००/- |
| महेंद्र शांतीलाल चोरडीया | १६.६५ | १४४३७२/- | ११ | १६३३८३/- | ८१ | ५२७३१/- | ४००० | ४०००/- | ७५ | ४५०००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, दिपावली सुट्टीच्या कालावधीत तसेच डिसेंबर- २०१५ मधील नाताळ सुट्टी व नववर्षानिमित्ताने होणा-या गर्दीचे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामध्ये गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत यावेत. तथापी खालील ठिकाणी मंडप उभारणेची आवश्यकता नसल्याने सदर मंडपाचा कार्यादेशात समावेश करणेत येऊ नये.**

१. लाडू विक्री काऊंटर समोर
२. उदी काऊंटर समोरील रेलींगवर
३. गेट नं.३ चे बाहेरील बाजूस
४. नगर– मनमाड रोड पूर्व बाजू फूटपाथ
५. पिंपळवाडी रोड उत्तर बाजू फूटपाथ

**उपरोक्त ठिकाणांचे मंडप वगळता उर्वरीत मंडपांचे निम्नतम दरधारक ठेकेदार यांना कार्यादेश देणेत यावा तसेच दिपावली, नाताळ सुट्टया व शिर्डी महोत्सव कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी आवश्यकतेनुसार ऐनवेळी वाढीव मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करावयाची झाल्यास ती याच मंजूर दराने त्यांचेकडून करुन घेणेस व त्यासाठी येणारे सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०२ **कनकुरी साठवण तलाव येथील पंपरुमकरीता नविन केबल टाकणेकामी दुसरे वेळेस प्राप्त झालेल्या ऑनलाईन फेर निविदा (कमर्शियल बीड) उघडून निर्णय होणेबाबत.**

कनकुरी साठवण तलाव येथील पंपरुमकरीता नविन केबल टाकणेकरीता विद्युत ठेकेदार यांचेकडुन काम करुन घेणेसाठी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहीरात प्रसिद्ध करुन टेंडर मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ९,८३,७६८/- मात्रचे खर्चास मा.व्यवस्थापन त्रीसदस्य समितीचे दि.०५-०५-२०१५ चे सभेतील विषय नं.०१ निर्णय क्र.१४३(१२) अन्वये मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदर कामाचे ऑनलाईन निविदा मागविणेकामी दि.२७-०७-२०१५ रोजी दै.नगर टाईम्स, अहमदनगर व शितल टाईम्स, अहमदनगर या वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gon.in या संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा मागविणेकामी टेंडर नोटीस व टेंडर डाक्युमेंट दि.२५-०७-२०१५ रोजी अपलोड करण्यात आले होते. निविदा ऑनलाईन डाऊन लोडींगसाठी दि.२८-०७-२०१५ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून उपलब्ध करण्यात आली होती. तसेच निविदा ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मुदत दि. १०-०८-२०१५ रोजी सायं ०५.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आली होती. ऑनलाईन निविदेसोबत तांत्रिक लिफाफामध्ये सादर करावयाच्या सर्व कागदपत्रांच्या स्कॅन कॉपी जोडण्यास व दि.१२-०८-२०१५ रोजी सायं ०५.०० या अखेर किंवा त्यापुर्वी (रविवार खेरीज) निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेले तांत्रिक (Technical Bid) कागदपत्रांच्या मुळप्रती शिर्डी कार्यालयात सादर करणेकामी ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये कळविण्यात आले होते. त्यानुसार दोनच तांत्रिक निविदेच्या हार्ड कॉपी व दोनच तांत्रिक ई- निविदा प्राप्त झालेल्या असलेमुळे दिनांक १७-०८-२०१५ रोजी सदर कामाच्या ई-तांत्रिक उघडण्यात आलेल्या नाही. लेखापरिक्षणाच्या दृष्टीने कमीत कमी ०३ निविदेची आवश्यकता असते. त्यामुळे कनकुरी साठवण तलाव येथील पंपरुमकरीता नविन केबल टाकणेकरीता पुन्हा दुस-यांदा वर्तमानपत्रात जाहिरात देऊन पुन्हा फेर ई-निविदा बोलविणेस व प्राप्त दोन तांत्रिक निविदेचे बंद पाकीट निविदाधारकांना परत करणेस दिनांक १३-०८-२०१५ चे विद्युत विभागाचे टिपणी अन्वये मान्यता मिळालेली होती. तांत्रिक निविदेचे दोन बंद पाकीट निविदाधारकांना परत करणेत आलेले आहे. व सदर कामाचे ऑनलाईन फेर निविदा मागविणेकामी दिनांक ०८-१०-२०१५ रोजी, आजचा दिनकर, मालेगांव या वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gon.in या संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा मागविणेकामी टेंडर नोटीस व टेंडर डाक्युमेंट दि.०८-१०-२०१५ रोजी अपलोड करण्यात आली होती. निविदा ऑनलाईन डाऊन लोडींगसाठी दि. १०-१०-२०१५ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून उपलब्ध करण्यात आली होती. तसेच निविदा ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मुदत दि.२१-१०-२०१५ रोजी सायं ०५.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आली होती. प्री-बीड मिटींग दि.१६-१०-२०१५ रोजी मा.प्रशासकीय अधिकारी-श्री.गमे साहेब, श्री.उगले साहेब यांचे उपस्थित ठेवण्यात आलेली होती. प्री-बीड मिटींगला ०३ निविदाधारक हजर होते. ऑनलाईन निविदेसोबत तांत्रिक लिफाफामध्ये सादर करावयाच्या सर्व कागदपत्रांच्या स्कॅन कॉपी जोडण्यास व दि.२३-१०-२०१५ रोजी सायं. ०५.०० या अखेर किंवा त्यापुर्वी (रविवार खेरीज) निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेले तांत्रिक (Technical Bid) कागदपत्रांच्या मुळप्रती शिर्डी कार्यालयात सादर करणेकामी ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये कळविण्यात आले होते. तसेच तांत्रिक निविदा उघडण्याची तारीख २८-१०-२०१५ अशी होती. निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेल्या तांत्रिक (Technical Bid) कागदपत्रांच्या शिर्डी कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदेसोबत ०३ हार्ड कॉपी (बंद पाकिट) व ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या तीन निविदाधारकांचे तांत्रिक फेर ई-निविदा लिफाफे दि.२८-१०-२०१५ रोजी मा.प्रशासकीय अधिकारी- श्री.गमे साहेब, श्री.उगले साहेब यांचे उपस्थित समक्ष उघडून निविदाधाराकांचे बयाणा रक्कम तसेच कागदपत्रांची तपासणी लेखाधिकारी यांचेमार्फत करण्यात आलेली आहे. तीनही निविदाधारक पात्र ठरलेले आहेत.

कनकुरी साठवण तलाव येथील पंपरुमकरीता नविन केबल टाकणेकामी तांत्रिक निविदा उघडण्याची तारीख २८-१०-२०१५ अशी होती. निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेल्या तांत्रिक (Technical Bid) कागदपत्रांच्या शिर्डी कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदेच्या ०३ हार्ड कॉपी (बंद पाकीट) व ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या तीन निविदाधारकांचे तांत्रिक फेर ई-निविदा लिफाफे दि.२८-१०-२०१५ रोजी मा.प्रशासकीय अधिकारी-श्री.गमे साहेब, श्री.उगले साहेब यांचे उपस्थित समक्ष उघडून निविदाधाराकांचे बयाणा रक्कम तसेच कागदपत्रांची तपासणी लेखाधिकारी यांचेमार्फत करण्यात आलेली असून सर्व निविदाधारक तांत्रिक निविदेमध्ये पात्र झालेले आहे. तरी दि.२९-१०-२०१५ रोजी सायं.०५.०० वा.पावेतो ऑनलाईन फेर ई-निविदा Upload केलेले निविदाधारकाचे ई-निविदा (कमर्शियल बीड) उघडावे लागणार आहे. फेर ई-निविदा Upload केलेले निविदाधारक तपशील खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | शेरा |
|---|---|---|
| ०१) | मे.गुरु इंजिनिअरींग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, नाशिक | बंद पाकीट |
| ०२) | मे.श्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स, नाशिक | बंद पाकीट |
| ०३) | मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक | बंद पाकीट |

उपरोक्तप्रमाणे कनकुरी साठवण तलाव येथील पंपरुमकरीता नविन केबल टाकणेकामी दुसरे वेळेस प्राप्त झालेल्या ०३ ऑनलाईन फेर ई-निविदा (कमर्शियल बीड) आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदेमधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| ०१) | मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक | ८,९६,६२५.५१ |
| ०२) | मे.श्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स, नाशिक | ८,८५,३९०.८९ |
| ०३) | मे.गुरु इंजिनिअरींग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, नाशिक | ९,२४,७४१.५९ |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, कनकुरी साठवण तलाव येथील पंपरुमकरीता नविन केबल टाकणेकामी मे.श्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स, नाशिक यांचे रु.८,८५,३९०.८९ मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, सदरहूकामी त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- उपकार्यकारी अभियंता, विद्युत विभाग)

---

०३ **श्री साईबाबा हॉस्पिटलच्या मेन पॅनेलमधील सिमेन्स कंपनीचे एअर सर्कीट ब्रेकर खरेदी करणेकामी दुसरे वेळेस प्राप्त झालेल्या ऑनलाईन फेर निविदा (कमर्शियल बीड) उघडून निर्णय होणेबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पीटल मेन पॅनेलमधील सिमेन्स कंपनीचे एअर सर्कीट ब्रेकर खरेदी करणेकरीता वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहीरात प्रसिद्ध करुन ई-टेंडर मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ९,८७,३४५/- मात्रचे खर्चास मा.व्यवस्थापन त्रीसदस्य समितीचे दि.२८-०५-२०१५ चे सभेतील विषय नं.०२ निर्णय क्र.१५१ (०८) अन्वये मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदर कामाचे ऑनलाईन निविदा मागविणेकामी दि.१०-०८-२०१५ रोजी दै.सार्वमत, अहमदनगर या वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gon.in या संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा मागविणेकामी टेंडर नोटीस व टेंडर डाक्युमेंट दि.०८-०८-२०१५ रोजी अपलोड करण्यात आले होते. निविदा ऑनलाईन डाऊन लोडींगसाठी दि.११-०८-२०१५ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून उपलब्ध करण्यात आली होती. तसेच निविदा ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मुदत दि. २२-०८-२०१५ रोजी सायं ०५.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आली होती. ऑनलाईन निविदेसोबत तांत्रिक लिफाफामध्ये सादर करावयाच्या सर्व कागदपत्रांच्या स्कॅन कॉपी जोडण्यास व दि.२५-०८-२०१५ रोजी सायं ०५.०० या अखेर किंवा त्यापुर्वी (रविवार खेरीज) निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेले तांत्रिक (Technical Bid) कागदपत्रांच्या मुळप्रती शिर्डी कार्यालयात सादर करणेकामी ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये कळविण्यात आले होते. त्यानुसार दोनच तांत्रिक निविदेच्या हार्ड कॉपी व दोनच तांत्रिक ई- निविदा प्राप्त झालेल्या असलेमुळे दि.३१-०८-२०१५ रोजी सदर कामाच्या ई-तांत्रिक उघडण्यात आलेल्या नाही. लेखापरिक्षणाच्या दृष्टीने कमीत कमी ०३ निविदेची आवश्यकता असते. त्यामुळे एअर सर्कीट ब्रेकर खरेदीकामी पुन्हा दुस-यांदा वर्तमानपत्रात जाहिरात देऊन पुन्हा फेर ई-निविदा बोलविणेस व प्राप्त दोन तांत्रिक निविदेचे बंद पाकीट निविदाधारकांना परत करणेस दि.०२-०९-२०१५ चे विद्युत विभागाचे टिपणी अन्वये मान्यता मिळालेली होती. तांत्रिक निविदेचे दोन बंद पाकीट निविदाधारकांना परत करणेत आलेले आहे. व सदर कामाचे ऑनलाईन फेर निविदा मागविणेकामी दि.०८-१०-२०१५ रोजी, आजचा दिनकर, मालेगांव या वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gon.in या संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा मागविणेकामी टेंडर नोटीस व टेंडर डाक्युमेंट दि.०८-१०-२०१५ रोजी अपलोड करण्यात आली होती. निविदा ऑनलाईन डाऊन लोडींगसाठी दि.१०-१०-२०१५ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून उपलब्ध करण्यात आली होती. तसेच निविदा ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मुदत दि.२१-१०-२०१५ रोजी सायं ०५.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आली होती.प्री-बीड मिटींग दि.१६-१०-२०१५ रोजी मा.प्रशासकीय अधिकारी-श्री.गमे साहेब, श्री.उगले साहेब यांचे उपस्थित ठेवण्यात आलेली होती. प्री-बीड मिटींगला ०३ निविदाधारक हजर होते. ऑनलाईन निविदेसोबत तांत्रिक

लिफाफामध्ये सादर करावयाच्या सर्व कागदपत्रांच्या स्कॅन कॉपी जोडण्यास व दि.२३-१०-२०१५ रोजी सायं. ०५.०० या अखेर किंवा त्यापुर्वी (रविवार खेरीज) निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेले तांत्रिक (Technical Bid) कागदपत्रांच्या मुळप्रती शिर्डी कार्यालयात सादर करणेकामी ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये कळविण्यात आले होते. तसेच तांत्रिक निविदा उघडण्याची तारीख २८-१०-२०१५ अशी होती. निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेल्या तांत्रिक (Technical Bid) कागदपत्रांच्या शिर्डी कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदेसोबत ०४ हार्ड कॉपी (बंद पाकिट) व ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या चार निविदाधारकांचे तांत्रिक फेर ई-निविदा लिफाफे दि.२८-०८-२०१५ रोजी मा.प्रशासकीय अधिकारी-श्री.गमे साहेब, श्री.उगले साहेब यांचे उपस्थित समक्ष उघडून निविदाधाराकांचे बयाणा रक्कम तसेच कागदपत्रांची तपासणी लेखाधिकारी यांचेमार्फत करण्यात आलेली आहे. चारही निविदाधारक पात्र ठरलेले आहेत.

एअर सर्कीट ब्रेकर खरेदीकामी तांत्रिक निविदा उघडण्याची तारीख २८-१०-२०१५ अशी होती. निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेल्या तांत्रिक (Technical Bid) कागदपत्रांच्या शिर्डी कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदेच्या ०४ हार्ड कॉपी (बंद पाकीट) व ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या चार निविदाधारकांचे तांत्रिक फेर ई-निविदा लिफापे दि.२८-०८-२०१५ रोजी मा.प्रशासकीय अधिकारी- श्री.गमे साहेब, श्री.उगले साहेब यांचे उपस्थित समक्ष उघडून निविदाधाराकांचे बयाणा रक्कम तसेच कागदपत्रांची

तपासणी लेखाधिकारी यांचेमार्फत करण्यात आलेली असून सर्व निविदाधारक तांत्रिक निविदेमध्ये पात्र झालेले आहे. तरी दि.२१-१०-२०१५ रोजी सायं.०५.०० वा.पावेतो ऑनलाईन फेर ई-निविदा Upload केलेले निविदाधारकाचे ई-निविदा (कमर्शियल बीड) उघडावे लागणार आहे. फेर ई-निविदा Upload केलेले निविदाधारक तपशील खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | शेरा |
|---|---|---|
| ०१) | मे.दिपज्योत ट्रान्सफॉर्मर इंडस्ट्री, जालना | बंद पाकीट |
| ०२) | मे.गुरु इंजिनिअरींग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, नाशिक | बंद पाकीट |
| ०३) | मे.वक्रतुंड इलेक्ट्रीकल इंस्टॉलेशन, मालेगांव, जि. नाशिक | बंद पाकीट |
| ०४) | मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक | बंद पाकीट |

उपरोक्तप्रमाणे एअर सर्कीट ब्रेकर खरेदीकामी दुसरे वेळेस प्राप्त झालेल्या ०४ ऑनलाईन फेर ई-निविदा (कमर्शियल बीड) आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदेमधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| ०१) | मे.दिपज्योत ट्रान्सफॉर्मर इंडस्ट्री, जालना | ८,२६,८०२.७० |
| ०२) | मे.गुरु इंजिनिअरींग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, नाशिक | ९,७७,४७१.५५ |
| ०३) | मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक | ८,४७,२४०.७४ |
| ०४) | मे.वक्रतुंड इलेक्ट्रीकल इंस्टॉलेशन, मालेगांव, जि. नाशिक | ८,७५,७७५.०२ |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलच्या मेन पॅनेलमधील सिमेन्स कंपनीचे एअर सर्कीट ब्रेकर खरेदी मे.दिपज्योत ट्रान्सफॉर्मर इंडस्ट्री, जालना यांचे रु.८,२६,८०२.७० मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, सदरहूकामी त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- उपकार्यकारी अभियंता, विद्युत विभाग)

---

**विषय नं.०४** **दिनांक १०.११.२०१५ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.५२२** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

---

**विषय नं.०५** **दिनांक २८.११.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ३२३७/ २०१५, दि.२७ नोव्हेंबर, २०१५ अन्वये शनिवार दि.२८.११.२०१५ रोजी दुपारी ०३.०० वाजता संस्थानचे साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित करणेत आली होती. परंतु दि.२७.११.२०१५ ते दि.२९.११.२०१५ पर्यंत महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या वेबसाईटच्या दुरुस्तीचे काम चालू असल्यामुळे या ई-निविदा उघडणे शक्य नव्हते. तुयामुळे सदरहू उपसमितीची सभा दि.२८.११.२०१५ रोजी दुपारी ०३.०० वाजता ऐवजी सोमवार दि.३०.११.२०१५ रोजी दुपारी ०३.०० वाजता आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ३२५१/ २०१५, दि.२८ नोव्हेंबर, २०१५ रोजीचे पत्राने कळविणेत आले होते.

**निर्णय क्र.५२३** **नोंद घेण्यात येऊन, मान्यता देण्यात आली.**

---

**विषय नं.०६** **सन- २०१५ सालाकरीता सार्वजनिक सुट्टया बाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासनाचे दि.२७ नोव्हेंबर २०१४ रोजीचे शासन निर्णय/अधिसुचनेव्दारे प्रसिध्द/जाहीर केलेल्या, सार्वजनिक सुट्टयां पैकी जा. नं.एसएसएस/वशी-७ए/४६६३/२०१५ दि.०१.०१.२०१५ अन्वये ११ ऐच्छिक सार्वजनिक सुट्टया संस्थान कर्मचा-यांना मा. कार्यकारी अधिकारी यांचे पुर्व परवानगीने घेता येतील असा आदेश पारीत करणेत आला आहे.

संदर्भ क्र.०३ मधील शासन निर्णय सासंवि-२०१२/प्र.क्र.१९/ पुनर्बांधणी-७/का.सोळा विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दि.२८ ऑक्टोंबर २०१३ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेले सेवा रजा विनीयम-२०१३ कलम (०४) मधील सुटया:- (०१) अन्वये समितीने वेळोवेळी संस्थानच्या कर्मचा-यांसाठी घोषीत केलेल्या सुट्टया त्यांच्यासाठी अनुज्ञेय असतील असे नमुद केलेले आहे. सन-२०१५ सालाकरीता महाराष्ट्र शासनाने दि. २७ नोव्हेंबर २०१४ रोजीचे शासन निर्णय/अधिसुचनेव्दारे २५ सार्वजनिक सुट्टया प्रसिध्द (जाहीर) केल्या आहे.

संदर्भ क्र.२ जा.नं.एसएसएस/वशी-७ए/ ४६६३/२०१५ दि.०१-०१-२०१५ रोजीचा आदेश रद्द करुन, उपरोक्त संदर्भ क्र.०३ चे सेवा रजा विनीयम-२०१३ अन्वये महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या २५ सार्वजनिक सुट्टया संस्थान कर्मचा-यांना वेळोवेळी मा.कार्यकारी अधिकारी यांचे पूर्व परवानगीने घेता येतील, तसेच दर वर्षी महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या सार्वजनिक सुट्टया संस्थान आस्थापनेवरील कायम कर्मचा-यांना मंजुर करण्याचे अधिकार मा.कार्यकारी अधिकारी यांना देणेस मान्यता असावी.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.५२४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासन निर्णय सासंवि-२०१२/प्र.क्र.१९/ पुनर्बांधणी-७/का.सोळा विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दि.२८ ऑक्टोंबर २०१३ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेले सेवा रजा विनीयम- २०१३ यास अधीन राहून महाराष्ट्र शासनाने दर वर्षी जाहीर केलेल्या सार्वजनिक सुट्टया कार्यकारी अधिकारी यांच्या पूर्व परवानगीने संस्थान आस्थापनेवरील कायम कर्मचा-यांना लागू करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच, सदरहू सार्वजनिक सुट्टया संस्थान कर्मचा-यांनी एकाच दिवशी घेतल्यास कामकाजावर परीणाम होईल, याकरीता या सुट्टयांच्या दिवशी कर्मचारी कामावर असल्यास त्यास यापुर्वीचे प्रचलीत पध्दतीप्रमाणे भरपाई सार्वजनिक सुट्टी देणेबाबत आदेश पारीत करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**विषय नं.०७** **डॉ.प्रभाकर राव, प्र.वैद्यकिय संचालक व इतर ०३ यांचेविरुध्द डॉ.प्रिती देसाई यांनी केलेल्या तक्रार अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ.प्रिती देसाई, क्लिनीकल असिस्टंट, श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी डॉ. प्रभाकरराव, प्र. वैद्यकीय संचालक, डॉ. अनिल घरटे, डॉ.स्वाधीन गाडेकर व श्रीमती थोरात, इनचार्ज सिस्टर, अपघात विभाग यांचेविरुध्द दि. २५.०९.२०१५ रोजीचा स्वाक्षरी नसलेला तक्रार अर्ज सादर केलेला आहे. त्याचा आशय पुढीलप्रमाणे आहे की, complaint against Dr. Prabhakar Rao, Dr. Gharte, Dr. Savadhin Ghadekar, Sister-in-charge causality Ms. Thorat for having committed the offence of gender victimization, harassment, threatening to get me suspended, and criminal intimidation by issuing me threat of inflicting violence on me leading to death on 24.09.2015 the above mentioned accused and their known and unknown accomplices are liable to be suspended on immediate basis in accordance with rules and regulations of the Sansthan, as otherwise my life and liberty is in grave dengar.

सदरच्या तक्रार अर्जावर मा. कार्यकारी अधिकारी सो. यांनी दि. २५.०९.२०१५ रोजी आदेश दिला आहे "श्री.नवले प्रत्यक्ष हॉस्पिटलमध्ये जाऊन चौकशी करुन अहवाल सादर करावे."

त्याप्रमाणे श्री. नवले, प्र. कामगार अधिकारी यांनी सदर तक्रार अर्जावर दि. २५.०९.२०१५ रोजी चौकशीचे कामकाज सुरु केले त्यात श्रीमती संगिता थोरात, परिसेविका, श्री साईबाबा हॉस्पिटल यांना जबाब नोंदविणेकामी बोलविण्यात आले होते त्यांनी त्यांचे जबाबात असे नमूद केले की, मी एक स्त्री कर्मचारी आहे. या पूर्ण चौकशीमध्ये व चौकशीकामी स्त्री कर्मचारी/ अधिकारी यांचा पूर्ण चौकशीमध्ये सहभाग घ्यावा. त्यानंतर सौ. थोरात, परिसेविका यांचे म्हणने विचारात घेता डॉ. प्रितीदेसाई यांचा तक्रार अर्जाबाबत चौकशी कामी साईबाबा हॉस्पिटल यांचे जा. नं. एसएसएस/ एसएसबीएच/ १८४/२०१५ दि. ०७.०८.२०१५ अन्वये नेमण्यात आलेल्या इंटरनल कंम्प्लेंट कमिटीकडे देण्याचा निर्णय झाला.

त्यानुसार अंतर्गत तक्रार समितीने दि. २५.०९.२०१५ रोजी चौकशीचे कामकाज सुरु करुन दि. २६.०९.२०१५ रोजी चौकशीचे कामकाज पूर्ण केले आहे. सदरच्या चौकशीत समितीने एकूण १२ साक्षीदार तपासले असून त्यांचे जबाब नोंदविलेले आहेत तर काहींचे लेखी म्हणने घेतलेले आहे.

अंतर्गत चौकशी समितीचे सदरची चौकशी करुन दि. २८.०९.२०१५ रोजीचा अहवाल व निष्कर्ष सादर केला आहे. तो खालील प्रमाणे

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, श्री साईबाबा हॉस्पिटलचे कर्मचारी डॉ. प्रिती दिपक देसाई, क्लिनीकल असिस्टंट (मेडीसीन) यांनी दिलेला दि. २५.०९.२०१५ च्या तक्रार अर्जाचा चौकशी अहवाल व निष्कर्ष:-

(१) दि. २५.०९.२०१५ रोजी डॉ. प्रिती देसाई यांनी दि. २४.०९.२०१५ रोजी सायं. ०५.३० ते ६०० वा. चे दरम्याने घडलेल्या घटनेबाबत तक्रार अर्ज मा. कार्यकारी अधिकारी सो. यांचेकडे सादर केलेला होता. सदरचे अर्जावर मा. कार्यकारी अधिकारी यांनी प्र. कामगार अधिकारी, श्री.रविंद्र बा. नवले यांना प्रत्यक्ष हॉस्पिटलमध्ये जावुन चौकशी करुन अहवाल सादर करणेचे निर्देश देण्यात आलेले होते.

(२) त्यास अनुसरुन श्री.नवले यांनी श्रीसाईबाबा हॉस्पिटल येथे प्र. वैद्यकीय प्रशासक कक्षात दि. २५.०९.२०१५ रोजी दुपारी १२.३० वा. चौकशी करणेस सुरुवात केली होती. तथापी, सदर घटनेतील व्यक्ती सौ. संगिता संजय थोरात, सिस्टर इन्चार्ज, श्री साईबाबा हॉस्पिटल यांना चौकशीसाठी बोलाविले असता त्यांनी, मी एक स्त्री कर्मचारी आहे, या पुर्ण चौकशीमध्ये व चौकशीसाठी स्त्री कर्मचारी /अधिकारी यांचा पूर्ण चौकशीमध्ये सहभाग घ्यावा याबाबत विनंती केलेली होती. त्यांचे विनंती विचारात घेवुन श्री. नवले यांनी सदरचा चौकशी अर्ज पुढील चौकशीकामी जा. क्र. एसएसएस/एसएसबीएच/१८४/२०१५ दि. ०७.०८.२०१५ अन्वये विशाखा गाईडलाईन्स नुसार रुग्णालयांकरीता स्थापन करणेत आलेल्या अंतर्गत तक्रार समितीकडे सदरचे तक्रार अर्जाचे प्रकरण वर्ग करणेचे ठरवले.

(३) सदर प्रकरणी डॉ. प्रिती देसाई यांनी दि. २५.०९.२०१५ रोजी दिलेल्या अर्जाची गंभीर दखल घेवून समितीचे अध्यक्षा, डॉ. मैथिली पितांबरे यांनी तत्काळ त्याच दिवशी सायंकाळी ०४.०० वा. सर्व सदस्यांना बोलावून सदरचे तक्रार अर्जाबाबत प्रत्यक्ष चौकशी करणेचे ठरविले. चौकशी प्रामुख्याने डॉ. प्रिती देसाई यांनी तक्रार अर्जात दि. २४.०९.२०१५ रोजी घडलेल्या घटने संदर्भात नमुद केलेल्या आरोप विचारात घेवून करण्याचे ठरविले. डॉ. देसाई यांनी मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांचेकडे सादर केलेल्या तक्रार अर्जावर त्यांची स्वाक्षरी नाही. डॉ. प्रिती देसाई यांनी केलेले आरोप प्रामुख्याने खालीलप्रमाणे–

१) डॉ.घरटे व डॉ.गाडेकर यांनी आम्ही काहीही करणार नाही, आपले पेशंट तुम्हीच पहा आणि तुम्हीच उपचार करा, असे डॉ. देसाई यांना म्हटले होते का?

देसाई यांनी सौ. संगिता थोरात, सिस्टर इनचार्ज यांना पेशंट पाहणी करणेकरिता मला मदत करा असे म्हटले. परंतु सौ. थोरात यांनी डॉ. देसाई यांचे सुचनांचे पालन केले नाही, रुग्ण सिरीयस आहे हे खरे आहे का?

२) डॉ. घरटे, डॉ. गाडेकर व सौ. थोरात यांना तुम्ही माझेशी अशा प्रकारे वर्तुणुक करु नका. रुग्णाची अवस्था सिरीयस आहे. त्यानंतर डॉ. घरटे व डॉ. गाडेकर म्हणाले तुमची आमच्याशी अशाप्रकारे बोलण्याची हिम्मत कशी झाली? थांबा आम्ही तुम्हाला निलंबित कराते असे म्हणाले का?

३) डॉ. घरटे व डॉ. गाडेकर यांनी झाशी राणी प्रतिष्ठाण, शिर्डी प्रमुख सौ. शबाना दुरध्वनीव्दारे फोन करुन श्री साईबाबा हॉस्पिटल येथे ८-१० महिलांना घेऊन डॉ. देसाई यांना दुखापत करुन जनतेमध्ये त्यांची अब्रु काढा, आम्ही तुमचा काही खर्च असेल तो देऊ. असा दुरध्वनी तुमच्या समोरुन केला होता का?

प्रश्नः- सदर घटनेच्या वेळी डॉ. देसाई अपघात विभागात आल्यापासून तेथून जाईपर्यंत मी अपघात विभागातच होता का?

४) सौ. शबाना, झाशी राणी प्रतिष्ठाण प्रमुख, शिर्डी अपघात विभागात मोर्चा घेऊन आल्या होत्या का? त्यांनी तेथे येऊन काही तोडफोड केली का? अशा व इतर आणखी काही डॉ.देसाई यांनी केलेल्या आरोपाबाबत चौकशी केली.

(४) सदर प्रकरणी डॉ. देसाई दि. २५.०९.२०१५ रोजी दिलेल्या तक्रार अर्जातील नमुद/ ज्यांच्याविषयी तक्रार केली त्या सर्व कर्मचा-यांना १) डॉ. प्रिती देसाई हयांना फोन केला असता, "मी माझे वकीलाचा सल्ला घेतल्याशिवाय चौकशीकरीता येऊ शकत नाही. मला कमिटीने लेखी पत्र दिले तर मी हजर राहिल मी दिलेल्या तक्रार अर्जाचा लेखी खुलासा करेन अन्यथा तशी मी येणार नाही. Victim can not give any remark once it has gone into court or police station" असे सांगीतलेले आहे. त्यामुळे विरुध्द पार्टीचे म्हणणे ऐकुण घेण्यासाठी चौकशी करण्याचे ठरविले २) डॉ. अनिल विठ्ठलराव घरटे, सी.एम.ओ. ३)श्रीमती संगिता संजय थोरात, सिस्टर इन्चार्ज, ४) डॉ. स्वाधीन किसन गाडेकर, कंत्राटी आर. एम. ओ. जय भवानी एन्टरप्रायजेस व ५)डॉ. आर. व्ही. प्रभाकरराव,प्र. वैद्यकीय संचालक,रुग्णालये यांना चौकशीकामी बोलाविणेत आलेले होते. त्यांनी त्यांचे लेखी म्हणणे दिलेले आहे. त्याचप्रमाणे सदर घटनेचे वेळी जे कर्मचारी तेथे उपस्थित होते व त्यावेळी जे कर्मचारी कॅज्युयल्टी विभागात डयुटीवर होते. १. सोनल भिमराज नागपुरे, सोशल वर्कर २.श्री. विलास राजाबापु जोंधळे, स्टाफ नर्स ३. कु. ज्योती पावलस येवले, परिचारीका, श्री साईबाबा हॉस्पिटल ४. सौ. राजश्री दत्तु घोडके,परिचारीका, श्री साईबाबा हॉस्पिटल ५. श्री.अनिल जनार्धन गायकवाड, एक्स रे अटेंडंट, श्री साईबाबा हॉस्पिटल ६. प्रशांत प्रभाकर धनवटे, कंत्राटी परिचारीका, जय भवानी एन्टरप्रायजेस, ७. चंद्रकांत चांगदेव काटकर, मदतनिस, श्री साईबाबा हॉस्पिटल ८. राजू भिमराज जाधव, कंत्राटी सुरक्षा गार्ड, मॉर्डन सेक्युरेटी फोर्स यांपैकी १ व २ यांनी लेखीव उर्वरीत साक्षीदार यांनी तोंडी जाब जबाब दिलेले आहेत. पाने १ ते ३५ कर्मचा-यांचे चौकशीचे वेळी घेतलेले जाब जबाब व त्यांनी दिलेले लेखी म्हणणे सोबत जोडलेले आहे. निदर्शनास आलेले मुद्देखालीलप्रमाणे.

(५) डॉ. राव यांनी डॉ. घरटे, डॉ. गाडेकर व सिस्टर इन्चार्ज श्रीमती थोरात यांनी सौ. शबाना यांचा रुग्णालयावर मोर्चा घेऊन येण्यास प्रवृत्त केले का? आणि रुग्णालयाची शांतता भंग करण्यासाठी प्रयत्न केले का?

उत्तर –

१) तक्रार अर्जातील नमुद केलेली वेळ व ज्याच्यावर तक्रार केली आहे त्यांची सांगीतलेली वेळ तफावत आहे.

२) डॉ. देसाई यांना ज्या पेशंटला तपासणीकरीता बोलाविणेत आले होते ते पेशंट त्यांनी तपासलेच नाही.

३) कोणत्या पेशंटबद्दल त्यांना चेकअप करावयाचे हे कॅज्युयल्टीतील डॉक्टरांशी चर्चा करणेऐवजी कोणतीही बाब लक्षात न येता प्रसंगावधान समजुन घेवुन चर्चा करणे आवश्यक असतांना देखील केवळ मी वरिष्ठ अधिकारी असल्याने त्यांनी हाताखालील स्टाफशी अरेरावीची भाषा केलेली असल्याचे दिसून येते.

४) पेशंटच्या इतर नातेवाईकांना दुरध्वनी करुन बोलाविलेले नसुन सुध्दा त्यात त्यांनी गंभीर आरोप केलेले आहेत.

५) तक्रार अर्जातील कथनावरुन फक्त मी म्हणते तेच खरे बाकी सर्व खोटे असे भासविण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

त्यांनी दिलेले लेखी व तोंडी जाब जबाबाचे अवलोकन केले असता डॉ. प्रिती देसाई यांनी दि. २५.०९.२०१५ रोजीचे अर्जान्वये केलेले तक्रार अर्जातील सर्व आरोप नाकारलेले असुन साक्षीदारांनीही देखील घटनेबाबत दिलेले जाब जबाब व डॉ. देसाई यांनी केलेले तक्रार अर्जातील कथन पुर्णतः विभिन्न असल्याचे निदर्शनास आले. त्याआधारे खालीलप्रमाणे निष्कर्ष देत आहोत.

**निष्कर्षः-**

आम्ही केलेल्या चौकशीमध्ये असे दिसून येते की, तक्रारदार यांनी केलेल्या अर्जात तथ्य दिसत नाही असे आमचे समितीचे स्पष्ट मत आहे.

सदरच्या चौकशी समितीमध्ये खालील अधिकारी / कर्मचारी यांचा सहभाग होता.

१. डॉ. मैथिली पितांबरे, प्र. वैद्यकीय प्रशासक, श्री साईबाबा हॉस्पिटल-अध्यक्ष
२. डॉ. विजयकुमार बाकलीवाल, वैद्यकीय अधिकारी, श्री साईनाथ रुग्णालय-सदस्य
३. श्री. राजेश वाकडे, सि. बायो. इंजिनियर, श्री साईबाबा हॉस्पिटल-सदस्य
४. सौ. कांचन जाधव, परिसेविका, श्री साईबाबा हॉस्पिटल-सदस्य
५. सौ. अंजली कोटस्थाने, सामाजिक कार्यकर्त्या, शिर्डी- सदस्य

डॉ. प्रिती देसाई यांचा तक्रार अर्ज व त्यावर अंतर्गत तक्रार समिती यांचा निष्कर्ष अहवाल विचारात घेता सदरच्या तक्रार अर्जात तथ्य दिसून येत नाही.

सोबत डॉ. प्रिती देसाई यांचा दि. २५.०९.२०१५ रोजीचा तक्रार अर्ज अवलोकनार्थ सादर.

निर्णय क्र.५२५ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, अंतर्गत तक्रार समितीच्या अहवालावरुन प्रथमदर्शनी डॉ.प्रिती देसाई यांच्या तक्रारीमध्ये तथ्य दिसून येत नाही. तसेच डॉ.प्रिती देसाई यांनी सदर समितीसमोर उपस्थित रहाण्यास नकार दिलेला होता. तरीही न्यायाच्या दृष्टीकोनातून शासन निर्णय मकचौ- २०१३/ प्र.क्र.६३/ मकक दि.१९ जून २०१४ अन्वये अंतर्गत तक्रार निवारण समिती नव्याने गठीत करणेत येत असून डॉ.प्रिती देसाई यांचे प्रकरण त्या समितीकडे वर्ग करणेत यावे.** (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

विषय नं.०८ **श्री.प्राणेश श्रीपाद कुलकर्णी, तब्बलजी, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

प्रस्ताव- श्री.प्राणेश श्रीपाद कुलकर्णी हे संस्थानचे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर येथे तबलजी या पदावर कार्यरत आहेत. त्यांना दि.०१.०२.२०१५ पासून संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा निलंबीत करण्यात आले आहे.

**या घटनेबाबत पूर्व इतिहास पुढील प्रमाणे-**

या प्रकरणी प्राचार्या, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर यांनी त्यांचेकडील जा. क्र. ४६/२०१५ दि. १२.०२.२०१५ अन्वये पोलीस निरीक्षक, शिर्डी पोलीस स्टेशन शिर्डी यांना पत्र पाठवून माहिती मागविली होती. पोलीस निरीक्षक, शिर्डी पोलीस स्टेशन यांनी त्यांचेकडील जा. क्र. ३८४/२०१५ दि. ११.०२.२०१५ अन्वये असे कळविले आहे की, "श्री. प्राणेश श्रीपाद कुलकर्णी, रा. काळेनगर, निघोज ता. राहाता यांचेविरुध्द शिर्डी पोलीस स्टेशन येथे श्री. संजय पांडुरंग कारंजे, काळेनगर, निघोज, ता. राहाता यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन शिर्डी पोलीस स्टेशनला गुन्हा रजिष्टर नं. १८/२०१५ भारतीय दंड विधान कलम ३५४(अ) बालकांचे लैगिंक गुन्हया पासुन संरक्षण कायदा २०१२ चे कलम ११(१) प्रमाणे दि. ३१.०१.२०१५ रोजी गुन्हा दाखल आहे. व त्यानंतर दि. ०३.०२.२०१५ पासुन न्यायालयीन कोठडी रिमांड घेण्यात आलेली आहे. ते दि. ०६.०२.२०१५ रोजी मा. न्यायालयातून जामीनावर सुटलेले आहेत."

श्री. प्राणेश श्रीपाद कुलकर्णी यांनी दि. ११.०२.२०१५ रोजीचा विनंती अर्ज सादर करुन मा. न्यायालयाचे आदेशास अधिन राहून कामावर हजर करुन घ्यावे अशी विनंती केली होती. सदरच्या अर्जासोबत त्यांनी मा. जिल्हा व सत्र न्यायाधिश, कोपरगाव यांचे समोर सादर केलेला विनंती अर्ज तसेच त्या अर्जावर मा.न्यायालयाने दि. ०४.०२.२०१५ रोजी दिलेल्या आदेशाची छायांकीत प्रत सादर केली होती. त्यानुसार मा.न्यायालयाने दि. ०४.०२.२०१५ रोजी श्री. प्राणेश श्रीपाद कुलकर्णी यांना रु. एक लाखाच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केलेला आहे. परंतू यासाठी मा. न्यायालयाने अशी अट घातली आहे की, श्री. कुलकर्णी यांनी प्रत्येक शनिवारी सकाळी १० ते ११ या कालावधीत तपासणी अधिकारी यांचे समोर चार्जशिट दाखल होईपर्यंत उपस्थित रहावे. दरम्यानच्या काळात त्यांनी साक्षीदारासकुठल्याही प्रकारचे धमकावणे, प्रलोभणे सादर करु नये.

मा. पोलीस निरीक्षक, शिर्डी यांचे पत्रावरुन असे दिसून येते की, श्री. प्राणेश श्रीपाद कुलकर्णी यांना सदर गुन्हयासाठी दि. ३१.०१.२०१५ रोजी अटक झाली असून दि. ०१.०२.२०१५ ते ०३.०२.२०१५ या कालावधीत पोलीस कोठडी तर दि. ०३.०२.२०१५ ते ०५.०२.२०१५ या कालावधीत न्यायालयीन कोठडी रिमांड घेण्यात आले होते.

श्री साईबाबा संस्थान कर्मचा-यांसाठी लागू असलेले सेवा विनीयमातील श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) सेवा (शिस्त व अपिल) विनीयम २०१३ मधील प्रकरण २ नियम क्र. ४ (२) (अ) नुसार जर कर्मचा-याला फौजदारी दोषारोपाबद्दल किंवा इतर कारणांसाठी ४८ तासांपेक्षा जास्त पोलीस किंवा न्यायालयीन कोठडीत स्थानबध्द केले असेल तर त्या कालावधीत त्याला निलंबीत ठेवला आहे. असे म्हटले जाईल. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) सेवा (पदग्रहण अवधी आणि निलंबन, सेवेतून बडतर्फी आणि काढून टाकणे या कालखंडातील प्रधाने) विनीयम २०१३ मधील प्रकरण ४ चे नियम क्र. १७(अ) मध्ये असे म्हटले आहे की, ज्या कर्मचा-यास निलंबीत आहे असे मानले गेले त्या कर्मचा-यास कर्मचारी निम्या वेतनावर रजेवर असतांना त्याला जेवढे रजा वेतन मिळाले असते तेवढे वेतन अधिक अशा रजा वेतनावरील महागाई भत्ता, एवढी रक्कम निर्वाह भत्ता म्हणून प्रदान केली जाईल.

त्याप्रमाणे श्री. कुलकर्णी यांना जा. नं. एसएसएस/वशी ७बी/६६९/२०१५ दि. २८.०२.२०१५ अन्वये श्री. प्राणेश श्रीपाद कुलकर्णी, तबलजी, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर यांचे विरुध्द भारतीय दंड विधान कलम ३५४ (अ) बालकांचे लैंगिक गुन्हयापासुन संरक्षण कायदा २०१२ चे कलम ११ (१) अंतर्गत शिर्डी पोलीस स्टेशन शिर्डी येथे गुन्हा रजिष्टर नं. १८/२०१५ अन्वये गुन्हा दाखल आहे. त्याबद्दल त्यांना दि. ३१.०१.२०१५ रोजी अटक झाली असून दि. ०१.०२.२०१५ ते ०३.०२.२०१५ या कालावधीत पोलीस कोठडी तर दि. ०३.०२.२०१५ ते ०५.०२.२०१५ या कालावधीत न्यायालयीन कोठडी रिमांड घेण्यात आले होते. सदरच्या घटनेमुळे संस्थानचे नावलौकीकास बाधा पोहचली आहे. त्यांच्या गैरवर्तनाचे गांभीर्य लक्षात घेवून त्यांना संदर्भ नं. २ चे प्रकरण २ नियम क्र. ४ (२) (अ) नुसार दि. ०१.०२.२०१५ पासून संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा निलंबीत ठेवले आहे असे मानण्यात येत आहे.

श्री. कुलकर्णी यांना सेवा निलंबन कालावधीत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) सेवा (पदग्रहण अवधी आणि निलंबन, सेवेतून बडतर्फी आणि काढून टाकणे या कालखंडातील प्रधाने) विनीयम २०१३ मधील प्रकरण ४ चे नियम क्र. १७ (अ) नुसार ५०% वेतन निर्वाह भत्ता म्हणून अदा केला जाईल. असा आदेश पारित करण्यात आला आहे.

त्यानंतर मा. त्रीसदस्य समितीचे दि. १२.०३.२०१५ रोजीचे झालेल्या सभेत विषय नं. २५ अन्वये प्रस्ताव सादर केला होता त्यावर निर्णय क्र. ९७ अन्वये 'श्री. प्राणेश श्रीपाद कुलकर्णी, तबलजी, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत त्यांचेवर केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली' असा निर्णय झाला आहे.

याबाबत संस्थान कामगार कायदा सल्लागार ॲड. अशोकराव पाटील, अहमदनगर यांना जा. नं. एसएसएस/ वशी ७ए/२४७/२०१५ दि. २८.०४.२०१५ अन्वये पत्र देवून "श्री. प्राणेश श्रीपाद कुलकर्णी यांना किती तारखे पर्यंत (कोणत्या कालावधीत) निलंबीत ठेवणे व कधी कामावर हजर करुन घ्यावे" याबाबत कायदेशिर सल्ला मागविण्यात आला होता. त्यावर अद्यापपर्यंत कायदेशिर सल्ला मिळालेला नाही.

आता श्री. कुलकर्णी यांनी दि. ०७.११.२०१५ रोजीचा कामावर पूर्ववत हजर करुन घेणेबाबत अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी असे नमूद केले आहे की, "माझे विरुध्द काही हितशत्रुंनी शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी येथे खोटा गुन्हा दाखल केल्यामुळे माझे विरुध्द अति. न्यायाधिश, कोपरगाव यांचेसमोर केस नं. १६/२०१५ दाखल झाली होती. सदर केसमध्ये गुणवत्तेच्या आधारे माझेवरिल तथाकथित आरोप सिध्द न झाल्याने मा. न्यायालयाने दि. ०४.११.२०१५ रोजीच्या आदेशान्वये मला निर्दोष मुक्त केले आहे.

याकामी दरम्यानच्या काळात मला दि. २८.०२.२०१५ रोजीच्या आदेशान्वये दि. ०१.०२.२०१५ पासून तात्पुरते सेवा निलंबीत केले आहे. मा. न्यायालयाने माझी निर्दोष मुक्तता केली असल्याने माझा दि. २८.०२.२०१५ रोजीचा निलंबन आदेश दि. ०१.०२.२०१५ पासून रद्द करुन मला पूर्ववत कामावर हजर करुन घ्यावेव श्रींच्या सेवेची संधी दयावी ही नम्र विनंती." असे नमूद केले आहे. तसेच अर्जासोबत मा. न्यायालयाचा दि. ०४.११.२०१५ रोजीचा आदेश सोबत अवलोकनार्थ जोडला आहे.

मा. अति.दिवाणी न्यायालय, कोपरगाव यांनी दिवाणी केस नं. १६/२०१५ मध्ये दि. ०४.११.२०१५ रोजीचे आदेशात असे नमूद केले आहे की,

(1) The accused Pranesh Shripad Kulkarni is hereby acquitted under section 235 (1) of Code of Criminal Procedure for offence under section 354(A) Indian Penal Code and under section 11 (1) of the Protection of Children from Sexual Offences Act, 2012

(2) His bail bond shall stands cancelled.

(3) The accused are directed to furnish PR Bond of Rs. 15,000/- with surety of like amount along with usual undertaking in compliance of Section 437-A of Cr. P.C.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) सेवा (शिस्त व अपिल) विनीयम २०१३ मधील प्रकरण २ (निलंबन) कलम ०४ (०५) (क) नुसार निलंबनाचा आदेश पारित करणारे प्राधिकारी किंवा त्यांनी असा आदेश पारित केला असे मानले गेले किंवा असे प्राधिकारी ज्या कोणत्याही दुस-या प्राधिका-याच्या अधिपत्याखाली असतील असे प्राधिकारी कोणत्याही वेळेस सदर आदेशात फेरबदल करु शकतात किंवा तो रद्द करु शकतात. असे नमूद आहे.

तक्रारदाराने श्री.कुलकर्णी यांचेवर ठेवलेले आरोपाबाबत मा. अति. दिवाणी न्यायालय, कोपरगाव यांनी श्री. कुलकर्णी यांना निर्दोष असल्याचे आदेश दिलेले असल्याने त्यांचे सेवा निलंबन रद्द करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.५२६ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री.प्राणेश श्रीपाद कुलकर्णी, तब्बलजी, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर हे निर्दोष असल्याचे आदेश मा.अति. दिवाणी न्यायालय, कोपरगाव यांनी दिलेले आहेत, परंतु श्री.कुलकर्णी यांची खातेनिहाय चौकशी झालेली नाही, तरी त्यांची खातेनिहाय चौकशी करणेत येऊन, त्या चौकशीच्या अहवालासह सदरहू प्रस्ताव निर्णयार्थ सादर करणेत यावा. तसेच सेवा निलंबीत केलेल्या सर्व कर्मचा-यांची खातेचौकशी चालू करणेत यावी.** (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

विषय नं.०९ **संस्थानचे उपकार्यकारी अधिकारी व प्रशासकीय अधिकारी यांचे सन २०१४- १५ चे गोपनीय अहवालाबाबत.**

प्रस्ताव- शासकीय अधिका-यांचे/ कर्मचा-यांचे गोपनीय अहवाल लिहिणे व जतन करणेबाबतचा शासन निर्णय क्र.सी.एफ.आर./ १२१०/प्र.क्र.४७/२०१०/तेरा, मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक ०१ नोव्हेंबर, २०११ नुसार इकडील जा.नं.एसएसएस/ साप्रशा/आस्था/५८५८/२०१५, दिनांक २१ मार्च, २०१५ चे परिपत्रकान्वये संस्थान आस्थापनेवर कार्यरत असणा-या कायम कर्मचा-यांचे सन २०१४-२०१५ वर्षाचे गोपनीय अहवाल भरुन घेणेची कार्यवाही वेळेत पूर्ण झालेली आहे. यामध्ये केवळ प्रशासकीय अधिकारी तसेच उपकार्यकारी अधिकारी यांचे गोपनीय अहवाल भरण्याची कार्यवाही पूर्ण झालेली नाही.

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयातील सहपत्र-२ (गोपनीय अहवाल लिहिण्याबाबतचे वेळापत्रक) नुसार शासकीय अधिकारी/ कर्मचा-याने दिनांक १५ एप्रिल पर्यंत स्वयंमुल्यनिर्धारण अहवालासह गोपनीय अहवाल प्रतिवेदन अधिका-याकडे सादर करणे, प्रतिवेदन अधिका-यांनी दि.३० एप्रिल पर्यंत पूर्ण करुन अहवाल पुनर्विलोकन अधिका-यांकडे पाठविणे, पुनर्विलोकन अधिका-यांनी दि.१५ मे पर्यंत पूर्ण करुन अहवाल संस्करण अधिका-यांकडे पाठविणे व त्यानंतर संस्करण अधिका-याने सर्व गोपनीय अहवालांचे संस्करण करुन अशा गोपनीय अहवालाच्या झेरॉक्स प्रती सर्व संबंधीत अधिकारी/ कर्मचारी यांना देऊन त्याची पोहच घेणेबाबतची कार्यवाही दिनांक ३० जून पर्यंत करावी, असे नमुद करणेत आलेले आहेत.

त्यानुसार मा.उपकार्यकारी अधिकारी यांनी दि.२२/०५/२०१५ रोजी त्यांचा वैयक्तिक गोपनीय अहवाल तसेच प्रशासकीय अधिकारी १) श्री.भाऊसाहेब दाजीबा साबळे २) श्री.सुर्यभान विठ्ठलराव गमे ३) श्री.सुभाष नारायण गर्कळ ४) श्री.उत्तम पंढरीनाथ गोंदकर ५) श्री.दिलीप त्र्यंबकराव उगले यांचे गोपनीय अहवाल प्रतिवेदन करुन बंद लिफाफ्यामध्ये पुनर्विलोकनार्थ तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी श्री.राजेंद्र जाधव साहेब यांचेकडे सादर केलेले आहेत.

तथापी, उपरोक्त प्रशासकीय अधिकारी तसेच मा.उपकार्यकारी अधिकारी यांचे गोपनीय अहवाल अद्यापपर्यंत इकडील कार्यालयास प्राप्त झालेले नाहीत. याबाबत तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक यांना विचारणा केली असता त्यांनी, "श्री.जाधव साहेब यांना दुरध्वनीव्दारे विचारले असता त्यांनी सदरचे गोपनीय अहवाल पुढे पाठविले आहे," असे सांगितले. परंतु सदरचे गोपनीय अहवाल आज अखेर इकडील कार्यालयास प्राप्त झालेले नसल्याने याबाबत तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी यांना जा.नं.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/३७७१/२०१५, दि.०७ ऑक्टोबर, २०१५ अन्वये पत्र पाठवून मा.उपकार्यकारी अधिकारी व प्रशासकीय अधिकारी यांचे सन २०१४-२०१५ या वर्षाचे गोपनीय अहवाल अनुक्रमे प्रतिवेदन व पुनर्विलोकन करुन इकडील कार्यालयास पाठविणेबाबत कळविले आहे. परंतु अद्यापपर्यंत मा.उपकार्यकारी अधिकारी व प्रशासकीय अधिकारी यांचे गोपनीय अहवाल इकडील कार्यालयास प्राप्त झालेले नाहीत.

सन २०१४-२०१५ या कालावधीतील गोपनीय अहवालाच्या छायांकीत प्रती मिळणेबाबत सर्व प्रशासकीय अधिकारी यांनी दिनांक ०६/१०/२०१५ रोजीच्या अर्जान्वये विनंती केली आहे. सदर अर्जावर मा.उपकार्यकारी अधिकारी यांनी, "तत्कालिन कार्यकारी अधिकारी यांनी सर्व प्रशासकीय अधिकारी यांचे गोपनीय अहवालाचे प्रतिवेदन करणे व उपकार्यकारी अधिकारी यांचा गोपनीय अहवाल लिहिणे विहित मुदतीत सदरचे काम केलेले नाही म्हणून सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीपुढे ठेवून नंतर विधी व न्याय विभागास पत्रव्यवहार करावा," असा शेरा नोंदविला आहे.

तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी श्री.राजेंद्र जाधव साहेब यांनी सर्व प्रशासकीय अधिकारी यांचे गोपनीय अहवालाचे पुनर्विलोकन करणे व मा.उपकार्यकारी अधिकारी यांच्या गोपनीय अहवालाचे प्रतिवेदन करणेची कार्यवाही विहित मुदतीत पूर्ण केलेले नाही. गोपनीय अहवाल लिहिणे व जतन करणेबाबतच्या शासन निर्णयात गोपनीय अहवालाचे संस्करण करणे या सदरात अ.नं.३३ मध्ये, "गोपनीय अहवालांचे संस्करण करण्याची कार्यवाही वेळीच न केल्यास संबंधित आस्थापना अधिका-यास किंवा वेळीच कार्यवाही पूर्ण न होण्यास कारणीभूत ठरलेल्या अधिका-यास/ कर्मचा-यास त्याबाबत जबाबदार धरुन त्यांचे विरुध्द योग्य ती कारवाई करण्यात यावी," असे नमुद करणेत आलेले आहे.

उपरोक्त तरतुदीस अनुसरुन सदरच्या विषयावर मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेत चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५२७** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, सर्व प्रशासकीय अधिकारी यांचे गोपनीय अहवालाचे पुनर्विलोकन करणे व मा.उपकार्यकारी अधिकारी यांच्या गोपनीय अहवालाचे प्रतिवेदन करणेची कार्यवाही विहित मुदतीत पूर्ण केलेली नसल्यामुळे तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांना याबाबत स्मरणपत्र देण्यात यावे. तसेच गोपनीय अहवाल लिहिणे व जतन करणेबाबतच्या शासन निर्णयात गोपनीय अहवालाचे संस्करण करणे या सदरात अ.नं.३३ मध्ये नमुद केलेप्रमाणे कारवाई करणेकामी अप्पर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन, मंत्रालय, मुंबई यांना लेखी कळविणेत यावे.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक,सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.१०** **बेंगलुरु व चेन्नई येथील माहिती केंद्रात कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या कर्मचा-यांचे मुदतवाढ मिळणेबाबतचे अर्ज.**

**प्रस्ताव-** **(अ)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत बेंगलुरु व चेन्नई येथे साईभक्तांना सोईसुविधा उपलब्ध करुन देणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने माहिती केंद्र सुरु करण्यात आलेले आहे. दि.१३/११/२०१४ रोजीचे आदेशाने सदर ठिकाणी कार्यालयीन कामकाजासाठी संस्थानला कुशल/ अकुशल कर्मचारी पुरविणा-या ठेकेदारामार्फत दि.०३/११/२०१४ ते दि.०२/११/२०१५ अखेर (एक वर्षाकरीता) प्रतिमहा रु.१२,०००/- मात्र (मानधन) दराने कंत्राटी पध्दतीने प्रत्येकी ०१ कुशल कर्मचा-याची तात्पुरती नेमणूक करणेबाबत आदेशीत करण्यात आलेले होते. त्यासअनुसरुन सदर ठिकाणी यापुर्वी कार्यरत असलेल्या कर्मचा-यांची तात्पुरती नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर कर्मचा-यांची मुदत दि.०२/११/२०१५ अखेर संपत असल्याने त्यांनी दि.२६/०९/२०१५ व दि.३०/०९/२०१५ रोजीचे अर्जान्दारे मुदतवाढ मिळणेची विनंती केलेली आहे.

**(ब)** सध्या संस्थानचे चेन्नई कार्यालयात श्री.व्हि.कन्नन व बेंगलुरु कार्यालयात श्री.एस.कुष्णमुर्ती कार्यरत आहेत. सदर कार्यालये कार्यान्वीत झालेपासून सदर दोन्ही कर्मचा-यांना मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने सदर ठिकाणी मानधन तत्वावर कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात कामावर घेण्यात आलेले होते.

मागील वर्षी, मा.त्रिसदस्य समितीचे दि.२५/०९/२०१४ रोजीचे सभेतील निर्णयानुसार, संबधीत कर्मचा-यांना दि.१३/११/२०१४ रोजीचे आदेशाने सध्या संस्थानला कुशल/ अकुश कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या ठेकेदारामार्फत कंत्राटीपध्दतीने प्रतिमहा रु.१२,०००/- मात्रचे मानधनावर दि.०३/११/२०१४ पासून पुढे एक वर्षाकरीता तात्पुरती मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

**(क)** आता, संबधीत कर्मचा-यांनी विनंती अर्जामध्ये पुढील विनंती केलेली आहे. थोडक्यात, सदर माहितीकेंद्राकडून संस्थानचा मोठया प्रमाणात आर्थिक फायदा होत आहे. परंतु ठेकेदाराकडून आम्हाला प्रत्येक महिन्यास आदेशात नमूद केल्याप्रमाणे संपूर्ण मानधन अदा केले जात नाही. केवळ २६ दिवसांचे मानधन अदा केले जात आहे. आठवडा सुट्टीचे वेतन अदा केले जात नाही. त्यामुळे मिळणारे वेतन अत्यल्प असून त्यामध्ये उदरनिर्वाह करणे अवघड होत चालले आहे. त्यामुळे मा.कार्यकारी अधिकारी यांनी त्यामध्ये वाढ करून मुदतवाढ द्यावी, हि विनंती. सदर अर्जावर प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग यांनी वाढत्या महागाईचा विचार करता योग्य ती पगारवाढ देण्यास हरकत नसलेबाबतचा अभिप्राय नोंदविला आहे.

तरी बेंगलुरु व चेन्नई येथील कार्यालयात कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना मुदतवाढ देणेबाबतच्या प्रस्तावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५२८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, बेंगलुरु व चेन्नई येथील माहिती केंद्रात कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या प्रस्तावीत कर्मचा-यांच्या अर्जातील विनंती व प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग यांचा अभिप्राय विचारात घेता, त्यांना लगतच्या तारखेपासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने मुदतवाढ देण्यात यावी. परंतु त्यांच्या मानधनात तुर्त वाढ करणेत येऊ नये, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.११** **श्रींचे समाधीचे पट्टीला व पादुकांना सोन्याचा पत्रा देणगीबाबत.**

**प्रस्ताव-** साईभक्त श्री.के.व्ही.भास्कर रेड्डी, डायरेक्टर-फायनांस, हेटरो ग्रुप ऑफ कंपनीज, हैद्राबाद यांनी श्रींचे समाधी मंदिरातील समाधीचे व पादुकांचे बाजुला असलेल्या चांदीच्या पट्टीवर सोन्याचा पत्रा देणगीदाखल देणेबाबत इच्छा प्रदर्शित केली आहे.

श्रींचे समाधीचे पट्टीला व पादुकांना सध्या चांदीचा पत्रा बसविण्यात आलेला आहे. तसेच यापुर्वीही सदर चांदीच्या पट्टीवर देणगीदार श्री रेड्डी यांचेकडुन सन-२००७ मध्ये सोन्याचा पत्रा देणगी स्वरुपात बसविण्यात आला होता. परंतु, सफाई करतांना व साईभक्तांकडुन दर्शन घेतांना हा पत्रा निघुन आला, नंतर हा पत्रा पुर्णपणे काढुन घेण्यात आलेला असून तो पुन्हा वापरता आलेला नाही. त्यामुळे नव्याने घेण्यात येणारा सोन्याचा पत्रा हा जाड व मजबुत घ्यावा लागेल.

तरी देणगीदार यांचेकडुन श्रींचे समाधीचे व पादुकांचे बाजुला असलेल्या चांदीच्या पट्टीवर देणगीदाखल सोन्याचा पत्रा स्विकारणेस मान्यता असावी. याबाबत निर्णय व्हावा, ही विनंती.

**निर्णय क्र.५२९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्त श्री.के.व्ही.भास्कर रेड्डी, डायरेक्टर-फायनांस, हेटरो ग्रुप ऑफ कंपनीज, हैद्राबाद यांचेकडून श्रींचे समाधी मंदिरातील समाधीचे व पादुकांचे बाजुला असलेल्या चांदीच्या पट्टीवर देणगीदाखल सोन्याचा पत्रा बसवून घेण्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मंदिर विभाग)

---

**विषय नं.१२** **सहा.शिक्षक पुरुष व स्त्री शिक्षिका यांना गणवेश व साडया खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद** – सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**प्रास्ताविक**– शैक्षणिक संकुलाकडील श्री साईबाबा इंग्लिश मिडीमय स्कुल विभागाकडे खालीलप्रमाणे कायम सहा.शिक्षक (स्त्री व पुरुष) कार्यरत आहेत.

| **अ.नं.** | **विभाग** | **पुरुष शिक्षक** | **स्त्री शिक्षक** |
|---|---|---|---|
| ०१. | प्राचार्य | ०१ | ०० |
| ०२. | पुर्व प्राथमिक | ०० | ०२ |
| ०३. | प्राथमिक विभाग | ०५ | १९ |
| ०४. | माध्यमिक विभाग | ०४ | ०४ |
| **एकुण** | | **१०** | **२५** |

उपरोक्त सर्व शिक्षक यांना यापुर्वी आस्थापना विभागामार्फत गणवेश व साड्या दिल्या जात असत. मात्र दि.१० ऑगस्ट, २०१० पासून शाळेकडील आस्थापना विभागा इकडे वर्ग करण्यात आलेला आहे. तेव्हांपासून आजपावेतो शाळेकडील शिक्षक कर्मचारी यांना गणवेश देण्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे शिक्षक हे शाळेमध्ये ड्युटीवर येतांना वेगवेगळे रंगाचे, प्रकारचे गणवेश, साड्या परिधान करुन येत असतात. सदरची बाब ही शालेय तसेच संस्थान प्रशासनाचे दृष्टीने योग्य नाही. त्यामुळे शिस्तीचा एक भाग म्हणून श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकडील सहा.शिक्षक यांना संस्थानमार्फत गणवेश, साड्या देणे गरजेचे आहे.

**विभागाचा अभिप्राय-** गणवेश देतांना प्रती पुरुष शिक्षक कर्मचारी ०२ गणवेश तसेच प्रती स्त्री शिक्षक कर्मचारी यांना २ साड्या व परकर द्यावे लागतील. त्याकरिता खालीलप्रमाणे कापड व साड्या खरेदी कराव्या लागतील.

**अ) पुरुष शिक्षक कर्मचारी**

| **अ.नं.** | **तपशिल** | **कर्मचारी संख्या** | **गणवेश संख्या** | **पॅन्टसाठी आवश्यक कापड (प्रती गणवेश १.३० मी. प्रमाणे)** | **शर्टसाठी आवश्यक कापड (प्रती गणवेश २.५० मी. प्रमाणे)** |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | प्राचार्य | ०१ | ०२ | २.६० मीटर | ५ मीटर |
| ०२. | पुरुष कर्मचारी | ०९ | १८ | २३.४० मीटर | ४५ मीटर |
| | | | **एकुण** | **२६ मीटर** | **५० मीटर** |

**ब) स्त्री शिक्षक कर्मचारी**

| **अ.नं.** | **तपशिल** | **कर्मचारी संख्या** | **साडी संख्या** | **परकर संख्या** |
|---|---|---|---|---|
| ०१. | स्त्री कर्मचारी | २५ | ५० | ५० |

उपरोक्तप्रमाणे कापड व साडी खरेदीकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| **अ.नं.** | **तपशिल** | **वर्णन** | **परिमाण/ मागणी** | **अंदाजे दर प्रती मीटर/नग** | **अंदाजे एकुण रक्कम रुपये** |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | सुटींग कापड (पॅन्टसाठी) | रेमन्ड, एस.कुमार, सियाराम कंपनीचे | २६ मीटर | रु.५००/- | रु.१३,०००/- |
| ०२. | शर्टींग कापड (शर्ट साठी) | | ५० मीटर | रु.५००/- | रु.२५,०००/- |
| ०३. | साडी सहावार, प्रिंटेड, ब्लाऊजपीस सह | नामांकित कंपनीचे | ५० नग | रु.७००/- | रु.३५,०००/- |
| ०४. | परकर | | ५० नग | रु.१३०/- | रु.६,५००/- |
| ०५. | पुरुष कर्मचारी गणवेश शिलाई | १० कर्मचारी X २ गणवेश | २० नग | रु.५००/- | रु.१०,०००/- |
| ०६. | पुरुष कर्मचारी नेक टाय | चांगल्या प्रतीचे | २० नग | रु.२००/- | रु.४,०००/- |
| | | | | **एकुण रक्कम रुपये** | **रु. ९३,५००/-** |

उपरोक्त कापड, साडी व परकर खरेदीकामी अंदाजे रु.७९,५००/- मात्र, तसेच १० पुरुष कर्मचारी यांचे प्रत्येकी २ गणवेश याप्रमाणे २० गणवेश शिलाईकामी प्रती नग रु.५००/- या प्रमाणे रु.१०,०००/- व नेक टाय प्रती नग रु.२००/- याप्रमाणे रु.४,०००/- असे अंदाजे एकुण रक्कम रुपये रु.९३,५००/- (अक्षरी रुपये त्र्यान्नव हजार पाचशे) मात्र खर्च अपेक्षित आहे.

पुरुष कर्मचारी यांचे गणवेश खरेदीकामी मा.व्य.समितीचे मान्यतेनंतर प्रथम निविदेद्वारे दर व कापडाचे नमुने मागवून, वरिष्ठांचे मान्यतेने नमुना निवडून, कापड खरेदी करता येईल. त्यानंतर शिर्डी, राहाता, कोपरगांव येथील स्थानिक टेलरकडून दरपत्रके घेऊन शिलाई करुन घेता येईल. तसेच स्त्री कर्मचारी यांचे साडी व परकर खरेदीकामी मा.व्य.समितीचे मान्यतेनंतर निविदेद्वारे दर व नमुने मागणी करुन, शाळेकडील दोन जेष्ठतम शिक्षिकांमार्फत नमुना निवडून, साडी व परकर खरेदी करता येईल, असे नम्र मत आहे.

**मागणी–** तरी श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाकडील पुरुष व स्त्री शिक्षक कर्मचारी यांना गणवेश व साड्या खरेदी करणेकामी उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रु.९३,५००/- (अक्षरी रुपये त्र्यान्नव हजार पाचशे) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाकडील पुरुष/ स्त्री शिक्षक कर्मचारी यांना गणवेश/ साड्या खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.९३,५००/- मात्रचेखर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**विषय नं.१३** **श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकरीता संगणक/ लॅपटॉप खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद-** क्र.१७(१) व १७(२)(ध) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील. तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**प्रास्तविक-** श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील ११ वी विज्ञान शाखेच्या तीन तसेच इ.१२ वी विज्ञान शाखेच्या तीन तुकडया असून, विद्यार्थी संख्या ४८० आहे. विद्यार्थ्यांसाठी संगणक प्रयोगशाळेत संगणकावर प्रात्यक्षित करण्याचे शिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यांसाठी प्रात्यक्षित करणेकामी यापूर्वी खरेदी करण्यात आलेले २५ नग संगणक अपुरे पडत आहे. विद्यार्थी संख्या विचारात घेता संगणक किंवा लॅपटॉप खरेदी करणे आवश्यक आहे. सध्या मार्केटमध्ये संगणकाची किंमत जास्त आहे तर लॅपटॉपची किंमत कमी असते. लॅपटॉपसाठी फिटींगची आवश्यकता भासत नाही. संगणक मात्र एका जागेवरुन दुस-या जागेवर स्थलांतर करणेस मालावधी लागतो. त्यासाठी ज्याचे दर कमी येतील ते संगणक किंवा लॅपटॉप खरेदी करावयाचे आहेत. संगणक व लॅपटॉप यांचा तपशील एकच आहे.

**मागणी-** संगणक व लॅपटॉप यांचा तपशील खालीलप्रमाणे

**A) <u>All in One Desktop Specification:-</u>**

All in One Desktop (QTY-30 NOS.)

Processor:- Core i3 4th GEN. (3.3 GHZ, 4 MB Cache)/H81 Chipset/4GB DDR3 RAM/500 GB HDD/Bluetooth/Wireless Keyboard & Wireless Optical Mouse/Wi- Fi/ Media Grad Reader/DVD R-RW/RJ-45,Webcam/Win 8.1 SL 64 Bit/Screen Size 20 Inch LED TFT/ Warranty:- 3 Years Parts/3 Years Onsite.

**B) <u>Laptop Specification:-</u>**

Laptop– (QTY – 30NOS)

Processor:- Core i3 4th GEN (3.3 GHZ, 4MB Cache)/H81 Chipset/4 GB DDR3 RAM/500 GB HDD/Bluetooth/Wireless Keyboard & Wireless Optical Mouse/Wi- Fi/ Meida Grad Reader/DVD R-RW/RJ-45, Webcam/Win 8.1 SL 64 Bit/Screen size 15.6 Inch LED TFT/Warranty:- 3 Years Parts/3 Years Onsite.

वरील संगणक /लॅपटॉप खरेदी करणेकामी अंदाजे रुपये- ९,६०,०००/- (अक्षरी रुपये-नऊ लाख साठ हजार) मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन २०१५-१६ संगणक /लॅपटॉप खरेदी बजेट तरतूद रक्कम रु.१०,००,०००/- मधून करता येईल.

**संस्थान अधिनियम/ठराव या नुसार अनुमान-** खर्चाचा विषय आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत-** वरील संगणक/लॅपटॉप खरेदी ही संस्थानचे खरेदी विभागामार्फत ई-टेंडर मागवून खरेदी करणेस व संगणक/लॅपटॉप खरेदीकामी अंदाजे रुपये -९,६०,०००/- (अक्षरी रुपये नऊ लाख साठ हजार) मात्र खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५३१** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकरीता संगणक/ लॅपटॉप खरेदी करणेसाठी, संगणकाचा कि लॅपटॉपचा वापर महाविद्यालयास जास्त सोयीस्कर होईल तसेच त्यांचे आयुष्य किती असू शकेल व कोणत्या कंपनीचे घ्यावेत, त्यासाठी किती खर्च येईल या सर्व अनुषंगीक बाबींवर माहिती तंत्रज्ञान विभागाचा अभिप्राय घेण्यात येऊन, सविस्तर फेरप्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा.**

(कार्यवाही- प्र.प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय)

---

**विषय नं.१४** **नविन संगणक संच, लॅपटॉप, टॅबलेट व प्रिंटर्स खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-**

**अधिनियम-** सन २००४ महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ (भाग ४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम १७ (२ ड) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील, अशी तरतूद आहे.

**प्रास्ताविक-** आपले श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये सध्या खालील प्रमाणे ११ व्यवसायांच्या (ट्रेडच्या) २२ तुकडया कार्यरत आहेत. सदर ट्रेड हे केंद्र शासनाच्या कौशल्य विकास मंत्रालय अंतर्गत डायरेक्टोरेट जनरल ऑफ एम्प्लॉयमेंट ॲण्ड ट्रेनिंग DGE&T यांचे मान्यतेने व राज्य शासनाच्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या नियंत्रणाखाली चालविले जाते.

| अ.नं. | ट्रेड | प्रशिक्षण कालावधी | तुकडींची प्रशिक्षणार्थी संख्या | | एकूण प्रशिक्षणार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| | | | प्रथम वर्ष | व्दितीय वर्ष | |
| 01 | इलेक्ट्रीशियन | 2 वर्ष | 21 | 21 | 42 |
| 02 | फिटर | | 21 | 21 | 42 |
| 03 | टर्नर | | 16 | 16 | 32 |
| 04 | मोटर मेकॅनिक | | 21 | 21 | 42 |
| 05 | मेकॅ.रेफ्री.ॲण्ड एसी | | 26 | 26 | 52 |
| 06 | मशिनिष्ट ग्राईण्डर | | 16 | 16 | 32 |
| 07 | टुल ॲण्ड डायमेकर(जिग्ज ॲण्ड फिक्चर ) | | 21 | 21 | 42 |
| 08 | इन्फॉरमेशन ॲण्ड कम्न्युनिकेशन टेक्नॉलॉजी सिस्टीम मेंटनन्स (ICTSM) | | 18 | 21 | 39 |
| | | | प्रथम पाळी | व्दितीय पाळी | |
| 09 | कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामिग असिस्टंट COPA | 1 वर्ष | 20 | --- | 20 |
| 10 | वेल्डर | | 21 | 21 | 42 |
| 11 | ट्रॅक्टर मेकॅनिक | | 21 | 21 | 42 |
| एकूण | | | 222 | 205 | 427 |

वरील ट्रेड व्यतिरिक्त संस्थेमध्ये महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्या. (MKCL) यांचे MS-CIT हे संगणक अभ्यासक्रमाचे अभ्यासकेंद्र चालविले जाते. वरील ITI व्यवसायांमध्ये अ.क्र.८ व ९ हे व्यवसाय संगणकाशीथेट संबधित अभ्यासक्रम आहेत. वरील सर्व अभ्यासक्रमासाठी सध्या संस्थेकडे असलेल्या संगणक संचाची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | संगणक तपशील/मेक | संख्या | खरेदी/देणगी तारीख | सध्या स्थिती | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | चालू व वापरात | बंद व वापरात येऊ शकत नसलेले | |
| 01 | Wipro | 01 | खरेदी 2004 | --- | 01 | |
| 02 | L.G. | 06 | देणगी 2005 | --- | 06 | |
| 03 | Compaq | 03 | देणगी 2006 | --- | 03 | |
| 04 | Compaq | 07 | देणगी 2007 | --- | 07 | |
| 05 | H.C.L. | 23 | खरेदी 2007 | 14 | 09 | |
| 06 | I.B.M. (Lenova) | 01 | खरेदी 2007 | 01 | --- | |
| | एकूण | 41 | | 15 | 26 | |

वरिल प्रमाणे एकूण ४१ संगणकापैकी १५ संगणक सध्या कार्यरत असले तरी त्यांची क्षमता व स्पेसिफिकेशन सध्या नव्याने आलेल्या कार्यप्रणाली (Operating System) या सध्याच्या उपलब्ध जुन्या संगणकावर Match होत नाहीत किंवा Support करत नाहीत. त्यामुळे नव्याने सम◌ाविष्ट झालेले किंवा नविन कार्यप्रणालीनंतरचे संगणक प्रशिक्षण आपण प्रशिक्षणार्थ्यांना देणे अशक्य होत आहे.तसेच सध्याच्या वरिल संगणकाचे Standard Life सहा वर्ष संपल्याने ते कालबाहयही झालेले आहेत.

ऑगस्ट २०१४ सत्रापासून डी.जी.ई.टी, नवी दिल्ली यांनीसंस्थेतील सर्व व्यवसायांच्या एम्प्लॉयबिलीटी स्किल हा अनिवार्य विषय सुधारित अभ्यासक्रमानुसार निश्चित केलेली आहे. त्यासाठी सर्व व्यवसायांच्या प्रशिक्षणार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देणे कामी लेटेस्ट कॉन्फीग्रेशचे १० संगणक संचासह एक संगणक लॅबोरेटरी बनविणे अनिवार्य केलेले आहे. तसेच २०१४ च्या सुधारीत अभ्यासक्रमासनुसार कोपा ट्रेडसाठी १० संगणकव १ लॅपटॉप आय.सी.टी.एस.एम. ट्रेडसाठी १२ संगणक १ लॅपटॉप व २ टॅबलेट त्यांच्या त्यांच्या संगणक लॅबसाठी समाविष्ट केले आहेत. यांची व उपलब्ध साहित्याची एकत्रित स्थिती खालील प्रमाणे.

| अ.नं. | लॅब तपशिल | आवश्यक साहित्य व (उपलब्ध साहित्य) | | | | निव्वळ आवश्यक साहित्य | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संगणक | लॅपटॉप | टॅब | प्रिंटर | संगणक | लॅपटॉप | टॅबलेट | प्रिंटर |
| 1 | एम्प्लॉबिलिटी स्कील विषय व MS-CIT कक्ष एकत्रित | 10 (4) | 00 (00) | 00 (00) | 01 (01) | 10 | 00 | 00 | 01 |
| 2 | कॉम्प्युटर ऑपरेटर अ‍ॅण्ड प्रोग्रामिग असिस्टंट (COPA) ट्रेड | 10 (09) | 02 (00) | 00 (00) | 02 (02) | 10 | 02 | 00 | 02 |
| 3 | इन्फॉरमेंशन अ‍ॅण्ड कम्नयुनिकेशन टेक्नॉलॉजी सिस्टीम मेंटनन्स (ICTSM) | 12 (01) | 01 (00) | 02 (00) | 04 (03) | 12 | 01 | 02 | 04 |
| | | 32 (14) | 03 (0) | 02 (0) | 7 (0) | 32 | 03 | 02 | 07 |

वरीलप्रमाणे सध्या सुधारीत अभ्यासक्रम मानकानुसार एकूण ३२ संगणक, २ लॅपटॉप, २ टॅबलेटची तसेच ४ प्रिंटर्सची आवश्यकता आहे. सध्या संस्थेत असलेल्या संगणकापैकी १० संगणक पुढील एक वर्षापर्यंतवापरता येतील, उर्वरीतमध्ये २४ संगणक २ लॅपटॉप, २ टॅबलेट व ४ प्रिंटर्स खरेदी करावे लागेल, दोन संगणक – परीक्षा प्रवेश प्रक्रीयेसाठी तपशिल व अंदाजे खर्च खालीलप्रमाणे.

| Sr.No. | Description | Qty.Req. | Appx.Rate | Appx.Total Amt. |
|---|---|---|---|---|
| 01 | Any Brand/Reputed Company<br>Intel Core 13-Processor (Dual Core,3MB Cache,3.40GHz,w/HD 4400 Graphics)<br>Standard Power Supply,4GB (1x2GB) 1600MHz DDR3 Non –ECC.<br>500 GB,3Sinch Serial ATA (7.200 Rpm) Hard Drive<br>No Optical Drive,Intel Core 13 Label<br>19" Square Monitor with LED Back Light<br>Intel Intergrated Graphics, USB Optical Mouse and Keyboard.<br>Window 8.1 Pro 64 bit with paper Licence.<br>3 Yr Next Business Day Onsite Service. | 20 Set | 37000/- | 7,40,000.00 |
| 02 | Laptop<br>Microsoft Window 10 Professional class 64-Bit desktop with Microsoft Window 7 Pro 64-Bit or higher on system with paper Licence.<br>Intel Core 17-4712MQ (2.3GHz,6MB), Must support Virtualization.<br>8.0GB,1600MHz,with at least one (1) free slot for additional memory,expandable to 16.0GB.<br>Installed 512MB (non-shared memory)<br>15.4 Inch, WXGA.<br>1TB, 7200 RPM.<br>8X DVD +/-RW.<br>Four (4) USB v2.0 or v3.0 (**Minimum of one (1) of these ports must be USB v3.0).<br>One (1) HDMI v1.4 OR One (1) Display Port/Mini Display Port.<br>Integrated Gigabit Ethernet (10,100,1000), Wake | 02 Nos. | 40000/- | 80,000.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | on LAN.<br>1.0 Megapixels for Still Photos,9 Megapixies for Video Resolution, 30fps@720,Adobe, Flash compatible, Window 10/817 compatible,supports Skype for Business.<br>A/C adapter w/3' power cord.<br>Battery Life average 6 hrs.<br>3 Year,Next Business Day, On-Site Service. | | | |
| 03 | Tablet P.C.<br>10.1 Inch HD Multi-Touch Display.<br>NVIDIA Tegra 2 Dual Core Mobile Processor.<br>Android 3.0 Honeycomb.<br>NVIDIA GeForce GPU.<br>1GB DDR2 Memory.<br>32GB on board.<br>Micro SD memory card up to 32 GB.<br>802.11b/g/n Wireless(802.11n2.4GHz only)<br>Bluetooth 2.1+EDR.<br>Micro USB 2.0 Port,USB 2.0Pord,Micro HDMI Out (support Dual Display)<br>5MP Rear Facing Camera with Auto Focus and single LED flash 2MP Front Facing Camera.<br>Sensor:G-Sensor,E-Compass,L-Sensor, Gyro-meter.<br>Rechargeble Lithium-ion polymer Battery.<br>Up to 8-hours battery life. | 02 Nos. | 30000/- | 60,000.00 |
| 04 | **LCD Projector:-** LCD projector (1024x768) having minimum 2800 Lumens brighness,aspect ratio-4, Resolution-1024x768, Contrast ratio-3000:1, with all necessary accessaries & having DLP technology, make Sony VPL-EX275 | 02 Nos. | 40000/- | 80,000.00 |
| 05 | PassbookPrinter make HP/Canon/Epson/ Samsung/Ricoh | 01 No. | 8000/- | 8,000.00 |
| 06 | USB Harddisk 1 TB Memory make Sony/ Samsung/Seggate | 03 Nos. | 4000/- | 12,000.00 |
| | | | | **9,80,00.00** |

**मागणी:-** डी.जी.ई.टी. नवी दिल्ली यांच्या संकेत-स्थळावरील या व्यवसायाच्या नविन २०१४ च्या अभ्यासक्रम पुस्तिकेनुसार (Latest Revised Syllabus) ICTSM व COPA या व्यवसायाठी वरिलप्रमाणे संगणक संच, लॅपटॉप, टॅब व प्रिंटर खरेदी करावे लागतील.

**अनुमान** – वरील प्रमाणे कार्यवाही करता येईल.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत**– वरील नमुद केलेले संगणक संच व साहित्य खरेदी करणेस अंदाजे रु. ९,८०,०००/- (रुपये नऊ लाख ऐंशी हजार मात्र ) इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदरील संगणकसंच / साहित्य खरेदी विभागार्फत विहीत प्रचलित पध्दतीने खरेदी करणेस व येणा-या खर्चास निर्णयासाठी मा.त्रिसदस्य समिती समोर सादर

निर्णय क्र.५३२ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे नविन संगणक संच, लॅपटॉप, टॅबलेट व प्रिंटर्स खरेदी करणेसाठी त्यामधील तांत्रिक बाबींवर माहिती तंत्रज्ञान विभागाचा अभिप्राय घेण्यात येऊन, सविस्तर फेरप्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा.** (कार्यवाही- प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र)

---

विषय नं.१५ **श्री साईबाबा रुग्णालयामध्ये रुग्णांच्या बीलात देण्यात येणा-या सवलतींची नियमावली- २०११ श्री साईनाथ रुग्णालयास लागू करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये रुग्णांना दाखल झाल्यांनंतर तसेच ओ.पी.डी मध्ये उपचार घेतल्यानंतर बीलामध्ये सवलत देण्याबाबत मा. व्यवस्थापन समितीच्या दि. २४/०७/२०११ रोजीच्या सभेमध्ये नियमावली मंजुर बाबत

प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर सविस्तर चर्चा घेऊन मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र – ५१९ नुसार नियामावली श्री साईबाबा हॉस्पीटलसाठी मान्यता मिळालेली आहे.

संदर्भ क्र ०२ अन्वये दि २१/१०/२०१४ रोजीचे श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये रुग्णांच्या बिलात देण्यात येणा-या सवलतींची नियमावली – २०११ जसीच्या तशी श्री साईनाथ रुग्णालयास लागू करणे बाबातच्या टिपणीवर मा. उपकार्यकारी अधिकारी सो. यांनी दोन्ही रुग्णालयासाठी सर्व समावेषक नियमावली तयार करुन मा. त्रिसदस्य समितीसमोर सादर करता येईल त्यासाठी सर्व सबंधीतांची बैठक आयोजित करुन सर्व समावेषक चर्चा करुन निर्णय घेता येईल असे मत होते. " सदरहु सुधारीत नियमावलीची कार्यवाही वित्ताविभाग, श्री साईबाबा हॉस्पीटल यांच्या मार्फतसुरु आहे "

श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये रुग्णांच्या बिलात सवलती देण्याचे अधिकार, मा. वैद्यकीय संचालक, उपवैद्यकीय संचालक यांना प्रदान करण्यात आलेले आहे. परंतू श्री साईनाथ रुग्णालयामध्ये सदर पदे अस्तिवात नसल्याने लेखा परिक्षनाच्या दुष्टीने पुर्वलेक्षी प्रभावाने रुग्णांच्या बिलात सवलती देण्याचे अधिकार वैद्कीय अधिक्षक, कार्यलय अधिक्षक यांना प्रदान करण्यात यावी असे मत आहे.

उपरोक्त नियमानलीतील सर्व बाबी विचारात घेता श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पीटल हे दोन्ही रुग्णालय श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थे मार्फत चालविले जात आसल्याने श्री साईबाबा हॉस्पीटलसाठी सध्या रुग्णांच्या बिलात देण्यात येणा-या सवलतींची नियमावली जसीच्या तशी श्री साईनाथ रुग्णालयास लागू करणे बाबतचे प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५३३** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सेवांमध्ये तसेच आकारण्यात येणा-या सेवाआकारांमध्ये काय फरक आहे. याचा उल्लेख उपरोक्त प्रस्तावामध्ये दिसून येत नाही. करीता दोन्ही हॉस्पिटलमधील फरकांचा मुद्देसूद तक्ता तयार करणेत येऊन, त्यासह सदरहू प्रस्ताव फेरसादर करणेत यावा.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१६** **संस्थान रुग्णालयामधील व्हिजीटींग डॉक्टरांच्या मानधन नियमावलीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील समितीचा कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी कलम १३ (४) मध्ये प्रामुख्याने खालीलप्रमाणे तरतुद आहे.

समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यांव्यतिरिक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.

शासन निर्णय क्र. सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का. सोळा मंत्रालय मुंबई दि. ०७/०८/२००९ नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या आस्थापनेवरील पदांचा आकृतीबंध मंजूर आहे.

शासन मान्य आकृतीबंधातील अटी व शर्ती क्र. ३ – सदर पदांवर नव्याने नियुक्ती करताना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन सदर पदावंर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावीतसेच अटी व शर्ती क्र. ८ – समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी, जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही, असे नमूद केले आहे.

तसेच, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे दि. १६/१०/२०१२ रोजीचे आदेशातील अ. नं. ६ मधील D – मध्ये असे नमुद केले आहे की, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे पूर्व परवानगी शिवाय संस्थानमध्ये स्थायी पदावर कर्मचा-यांच्या नेमणूका करु नयेत.

श्री साईबाबा संस्थानचे रुग्णालयात व्हिजीटींग पद्धतीने सेवा देणेकामी वेळोवळी अर्ज येत असतात. आकृतीबंधानुसार मंजुर पदसंख्या, शैक्षणिक पात्रता, रिक्त पदे, भरलेली पदे व रुग्णसंख्या यानुसार व्हिजीटींग पद्धतीने नेमणूक देणेबाबत निर्णय घेण्यात येतो. सदर अर्जदाराची पात्रता, कोठून ये-जा करणार आहेत यावरुन त्यांना द्यावयाचा मोबदला ठरविला जातो. मात्र आता सर्व व्हिजीटींग डॉक्टरांसाठी एकच कायमस्वरुपी नियमावली बनविणे गरजेचे वाटते. सदरची नियमावली तयार करण्यापूर्वीच मा. त्रिसदस्य समितीचे दि. ०८/१०/२०१५ रोजीचे सभेत या विषयासंबंधीची तातडीची निकड लक्षात घेता आयत्या वेळेस या विषयावर चर्चा होऊन निर्णय क्र. ३७५ (५) खालीलप्रमाणे झालेला आहे.

"संस्थान रुग्णालयामध्ये व्हिजीटींग पद्धतीने सेवा करण्याची संधी मिळावी, यासाठी बरेचसे तज्ञ डॉक्टर्स संस्थानकडे अर्ज करतात व ते अर्ज सभेसमोर सादर करणेत येऊन, त्यांना परवानगी देण्यामध्ये बराचसा कालावधी जातो. याकरिता यापुढे व्हिजीटींग पद्धतीने सेवा करण्याची इच्छा व्यक्त करणारे अर्ज आल्यास निर्णय घेण्याचे अधिकार कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले."

उपरोक्त निर्णयानुसार मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांनी समक्ष निर्देश दिल्याप्रमाणे उपवैद्यकीय संचालक, श्री साईबाबा रुग्णालये यांनी दि. ०७/११/२०१५ रोजी शिर्डीचे जवळपास मोठ्या रुग्णालयात दूरध्वनीवरुन चौकशी केली असता, तेथे व्हिजीटींग डॉक्टरांना प्रोत्साहन भत्ता देण्यात येत असलेबद्दल माहिती घेतली आहे.

सबब, श्री साईबाबा संस्थानचे रुग्णालयासाठी व्हिजीटींग डॉक्टरांची शैक्षणिक पात्रता व स्पेशालिटी यावरुन पुढीलप्रमाणे नियमावली बनविता येईल.

| अ. नं. | स्पेशियालिटी | मानधन |
|---|---|---|
| ०१. | एमबीबीएस + डीप्लोमाधारक | ४,००० |
| ०२. | पोस्ट ग्रॅज्युएट (एमडी, एमएस) | ५,००० + प्रोत्साहन भत्ता |
| ०३. | कार्डीओलॉजिस्ट | संस्थान नियमानुसार फक्त प्रोत्साहन भत्ता |
| ०४. | सुपर सर्जिकल ब्रॅंच (सीव्हीटीएस + युरो + न्युरो + आर्थो + जनसर्जरी, प्लॅस्टिक सर्जरी, सर्जिकल गॅस्ट्रो (लेप्रोस्कोपी) इ.) | संस्थान नियमानुसार फक्त प्रोत्साहन भत्ता |
| ०५. | इंटरव्हेंशनल (रेडिओ, न्युरो) | ५,००० + प्रोत्साहन भत्ता |
| ०६. | मेडिकल ब्रॅंच (ओपीडी) (मेडिसीन, नेफ्रो, रुमॅटोलॉजी, गॅस्ट्रो इ.) | ५,००० + प्रोत्साहन भत्ता |
| ०७. | श्री साईनाथ रुग्णालयासाठी प्रोत्साहन भत्ता लागू नसल्याने तेथील व्हिजीटींग पदविकाधारकांना रु. ४,००० तर पदविकाधारकांना रु. ५,००० मानधन देता येईल. | |

श्री साईबाबा संस्थानचे दोन्ही रुग्णालयामध्ये कार्यरत असलेल्या व येथुन पुढे नव्याने नेमणुक होणा-या व्हिजीटींग डॉक्टरांना उपरोक्त प्रमाणे मानधनाची नियमावली लागु करणेस मान्यता असावी.

निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.५३४ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थान रुग्णालयामधील व्हिजीटींग डॉक्टरांच्या मानधनाची नियमावली ठरविणे अगोदर आजरोजी संस्थान रुग्णालयांमध्ये किती व्हिजीटींग डॉक्टर आहेत, त्यांना सध्या किती मानधन देण्यात येते व किती मानधन द्यावयाचे आहे, याच्या संपुर्ण तपशीलासह सदरहू प्रस्ताव विभागनिहाय फेरसादर करणेत यावा.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.१७ **श्री साईबाबा रुग्णालयात Ad-Hoc basis पध्दतीने न्यूरोसर्जनची नेमणूक करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १३(४) नुसार समितीचा कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी याबाबत खालीलप्रमाणे तरतुद आहे.

समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यांव्यतिरिक्त) कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.

तसेच शासन निर्णय क्र. सासंवि-२००९/४३३/(३७/९) का. सोळा. मंत्रालय मुंबई ४०००३२ दि. ०७/०८/२००९ नुसार श्री साईबाबा रुग्णालयाकडील नवीन आकृतीबंधास मान्यता मिळालेली आहे. सदर आकृतीबंधातील अट व शर्त क्र.०८ मध्ये समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंव कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही, असे नमुद आहे. मा. उच्च न्यायालयाचे पुर्व परवानगी शिवाय कोणतीही नोकर भरती करु नये असे मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांनी दि. १६/१०/२०१२ रोजीचे आदेशात म्हटले आहे.

मा.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशानुसार रुग्णालयासाठी २९ प्रकारची पदे (न्युरोसर्जन सहित– २) भरणेकामी उमेदवारांकडून अर्ज मागविणेसाठी संस्थान वेबसाईटवर वर्तमानपत्रांमध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली होती. सदर जाहिरातीमार्फत एका न्युरोसर्जनची नेमणूक झाली असुन एक पद रिक्त आहे.

तथापि, जाहिरातीद्वारे पदे भरणेच्या प्रक्रियेस काहीसा कालावधी लागणार असल्याने न्युरोसर्जन, सोनोलॉजिस्ट, आरएमओ व बीटीओ या पदावर Ad hoc basis वर वैद्यकीय अधिकारी नेमणूक करणेबाबत मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचेसमोर सिव्हील ॲप्लीकेशन क्र. २८७/२०१५ दाखल करणेत आले होते. सदर ॲप्लीकेशनवर दि. १२/०१/२०१५ रोजीचे आदेशाने न्युरोसर्जन (२), सोनोलॉजिस्ट(१), आरएमओ (१५) व बीटीओ (१) पदांचे Ad hoc basis वर नेमणूका करणेस मान्यता देणेत आलेली आहे.

डॉ. अंकुर भूपेन्द्रकुमार पाचानी, गुजरात, एमसीएच (न्युरो) यांनी न्युरोसर्जन या पदावर श्री साईबाबा रुग्णालयामध्ये सेवा देणेकामी अर्ज केलेला आहे.

जाहिरातीमार्फत न्युरोसर्जनचे स्थायी स्वरुपात फक्त १ पद भरणेत आल्याने १ पद रिक्त आहे. सध्या श्री साईबाबा हॉस्पिटलमधील रुग्णांची संख्या बघता त्याप्रमाणात न्युरोसर्जनची आवश्यकता भासत आहे.

तथापि, न्युरोसर्जनचे रिक्त पदावर जाहिरातीमार्फत कायमस्वरुपी पदभरती होईपर्यंत किंवा १ वर्ष कालावधीसाठी यापैकी जे अगोदर घडेलत्या कालावधीसाठी डॉ. अंकुर भुपेन्द्रकुमार पाचानी, एमसीएच (न्युरो) यांची Adhoc Basis वर नेमणूक करुन त्यांना दि. २०/११/२०१४ रोजीच्या मा. त्रिसदस्य समिती निर्णय क्र. १०१६ नुसार त्याच पदावर स्थायी स्वरुपात काम करणा-या कर्मचा-यांचे सुरूवातीचे वेतनाइतके म्हणजेच ६१०००/-एकत्रित मानधन देता येईल तसेच प्रचलित पध्दतीने प्रोत्साहन भत्ता देता येईल त्यास मान्यता असावी.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.५३५** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा रुग्णालयात Ad-Hoc basis पध्दतीने ज्या न्यूरोसर्जनची नेमणूक करावयाची आहे, त्यांच्या शैक्षणिक पात्रतेची पडताळणी केलेबाबतचा उल्लेख उपरोक्त प्रस्तावामध्ये दिसून येत नाही. सबब शैक्षणिक पात्रतेची पडताळणीचा अहवाल व अनुभवासह सर्वसमावेशक प्रस्ताव फेरसादर करणेत यावा.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१८** **कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या आरएमओ यांचे पगारात सुधारणा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थान रुग्णालयामध्ये तज्ञ वैद्यकीय अधिकारी, कनिष्ठ वैद्यकीय अधिकारी, आरएमओ / सीएमओ व इतर पदावंर संस्थानमार्फत ११ महिने कालावधीसाठी किंवा कंत्राटी पद्धतीने नेमणूका करण्यात आलेल्या कर्मचा-यांचे वेतनात सुधारणा करणेच्या निर्णयास्तव मा. त्रिसदस्यीय समितीचे दि. २०/११/२०१४ रोजीचे सभेमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये निर्णय क्र. १०१६ खालीलप्रमाणे झाला आहे.

"प्रस्तावित तज्ञ वैद्यकीय अधिकारी, कनिष्ठ वैद्यकीय अधिकारी, आरएमओ व इतर यांना त्याच पदावर काम करणा-या स्थायी कर्मचा-यांच्या वेतनाचे जवळपासचे वेतन देणेसमान्यता देण्यात आली. मात्र या निर्णयाची अंमलबजावणी करणेपूर्वी अशा संपूर्ण पदांचा अढावा व प्रत्यक्ष द्यावयाचे वेतन यासह सविस्तर प्रस्ताव सादर करणेत येऊन, मा. त्रिसदस्य समितीची मान्यता घेण्यात यावी असे ठरले".

जाहिरातीमार्फत स्थायी पदांवर नेमणूका होईपर्यंत रुग्णांचे सेवेसाठी वैद्यकीय अधिका-यांचे कमतरतेअभावी रुग्णालयाचे आवश्यकतेनुसार मा.उच्च न्यायालयाचे परवानगीने तज्ञ वैद्यकीय अधिकारी (उदा.फिजीशियन, कार्डीओलॉजीस्ट) यांची तात्पुरत्या स्वरुपात Ad hoc basic वर नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच त्यांना उपरोक्त निर्णयानुसार सध्या कायम स्वरुपी कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिका-यांइतका पगार देण्यात येत आहे.

सध्या दोन्ही रुग्णालयांकडे रुग्णांच्या संख्येचा विचार करता आरएमओंची संख्या फारच कमी आहे. जाहिरातीद्वारे पदे भरणेच्या प्रक्रियेस काहीसा कालावधी लागणार असल्याने न्युरोसर्जन, सोनोलॉजिस्ट, आरएमओ व बीटीओ या पदावर Ad hoc basic वर वैद्यकीय अधिकारी नेमणूका करणेबाबत मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचेसमोर सिव्हील ॲप्लीकेशन क्र. २८७/२०१५ दाखल करणेत आले होते. सदर ॲप्लीकेशनवर दि. १२/०१/२०१५ रोजीचे आदेशाने न्युरोसर्जन (२), सोनोलॉजिस्ट (१), आरएमओ (१५), व बीटीओ (१) पदांचे Ad hoc basic वर नेमणूका करणेस मान्यता देणेत आलेली आहे. तथापि, मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशामध्ये वेतन, मानधन किंवा प्रोत्साहन भत्ता याबाबत कुठेही उल्लेख केलेला नाही.

मा. न्यायालयाचे आदेशानुसार Ad hoc basic वर तात्पुरत्या स्वरुपात आरएमओंची नेमणूक करणेची प्रक्रिया सध्या चालु आहे. सध्या Ad hoc basic वर फक्त दोन आरएमओ साईबाबा हॉस्पिटलध्ये कार्यरत आहेत. त्यांना दि. ०९/०८/२००९ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत ठरलेप्रमाणे रक्कम रु. २७,०००/- फिक्स पे म्हणून देण्यात येत आहे. उपरोक्त निर्णय सन २००९ साली झालेला असुन त्यास ६ वर्ष उलटून गेलेली आहेत.

परंतु सध्या देण्यात येत असलेल्या पगार फारच कमी असल्याने आरएमओ उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे रुग्णसेवेवर वेळोवेळी परिणाम होतो याकरिता सदर डॉक्टरांना निर्णय क्र.१०१६ नुसार वेतन दिल्यास आरएमओ दीर्घ कालावधीसाठी रुग्णालयासाठी उपलब्ध होतील असे मत आहे.

तरी सध्या Ad hoc basic वर कंत्राटी पद्धतीने कार्यरत असलेल्या व येथुन पुढे घेण्यात येणा-या आरएमओ यांना स्थायी स्वरुपात काम करणा-या आरएमओचे जवळपास म्हणजेच रु.५०,०००/- मानधन देता येईल, असे नम्र मत आहे.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.५३६** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कंत्राटी पध्दतीने Ad hoc basic वर कार्यरत असलेल्या आरएमओ यांना द्यावयाची रु.५०,०००/- मात्र मानधनाची रक्कम कशाच्या आधारे ठरविण्यात आली, याचा उल्लेख उपरोक्त प्रस्तावामध्ये दिसून येत नाही. शासन धोरणानुसार कंत्राटी आरएमओंना रु.४५,०००/- मात्र मानधन दिले जाते, त्याप्रमाणे रु.४५,०००/- मात्र मानधन देण्यास हरकत नाही. तसेच संस्थान रुग्णालयांमध्ये असे किती आर.एम.ओ. आहेत व त्यांच्या मानधनामध्ये वाढ करावयाची झाल्यास संस्थानवर किती आर्थिक बोजा पडेल याचा सर्वांगीन अभ्यास करणेत येऊन, या खर्चास मान्यता घेण्यासाठी संस्थान वकिलामार्फत मा.उच्च न्यायालयामध्ये सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेत यावे.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.१९** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छता कामाकरीता ई-निविदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे स्वच्छतेच्या कामासाठी ई निविदेची जाहिरात देऊन ई निविदा मागविणेस दि.१५/३/२०१४ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.२०१ अन्वये मान्यता मिळाली आहे. श्री साईबाबा हॉस्पीटल करीता ६८ व श्री साईनाथ रुग्णालया करीता ५७ असे एकुण १२५ कर्मचारी पॉईंटवर काम करत आहे. परंतु सध्या दोन्ही रुग्णालयाकरीता अतिरिक्त मनुष्य बळ आवश्यक आहे. त्यानुसार श्री साईबाबा हॉस्पटील करीता ६८+२२ – ९० व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता ५७+६- ६३ असे दोन्ही रुग्णालयाकरीता एकुण

१५३ कर्मचारी पॉईन्टची आवश्यकता असल्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. व त्यास दि.१०/१२/२०१४ च्या टिपणीअन्वये मान्यता मिळालेली आहे.

सध्या दोन्ही रुग्णालयाकरीता १२५ कर्मचारी पॉईन्टसह स्वच्छतेकामी आवश्यक असणारे केमीकल्स् व आवश्यक साहित्यासह निम्नतम दर धारक कंत्राटदारास् प्रती महिना रक्कम रुपये १२,२२,८२०/- अक्षरी रुपये बारा लाख बाबीस हजार आठशे वीस मात्र अदा करण्यात येत आहे.

उपरोक्त नविन २८ कर्मचारी पॉईंटकरीता रु.२,७३,९१२/- अक्षरी रुपये दोन लाख त्र्याहत्तर हजार नऊशे बारा मात्र अतिरिक्त खर्च अपेक्षित आहे.

तरी दोन्ही रुग्णालयाचे यांत्रिकरणासह स्वच्छतेकामी प्रसिध्द करावयाच्या निविदेमध्ये सुधारीत मनुष्यबळ संख्येचा समावेश करुन ई निविदा मागविणेकामी संस्थानचे जनसंपर्क विभागामार्फत दैनिक वृत्तामध्ये जाहीरात देणेस व याकामी येणा-या खर्चास तसेच संस्थान व महारारूट्र राज्याच्या संकेत स्थळावर जाहिरात देणेकामी सदर प्रस्तावावर मा.त्रिसदस्य समितीचे सभेमध्ये चर्चा होऊन निर्णय होणेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.५३७** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाच्या स्वच्छतेचे काम यांत्रिकीकरणासह आऊटसोर्स पध्दतीने देणेकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.२०** **बी ब्रॉन सिरींज पंप करीता Universal Pole Clamp खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील विविध कार्डीयाक रिकव्हरी वॉर्ड, आय.सी.सी.यु., जी.आय.सी.यु. तसेच विविध ऑपरेशन थिएटर विभागांत रुग्णांना काही विशीष्ट प्रकारची औषधे ठरावीक प्रमाणात सिरींजद्वारे सतत देण्यासाठी विविध पुरवठा आदेशान्वये एकुण 77 नग सिरींज पंप खरेदी करण्यात आले आहे व 25 नग सिरींज पंप देणगी स्वरूपात प्राप्त झालेले आहेत. सदर सिरींज पंप करीता कंपनीने दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी संपलेला असुन सर्व सिरींज पंप श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये नियमीत वापरात आहे. सदर सिरींज पंपची दुरुस्ती व देखभाल करणेसाठी कंपनीकडे दि. 01/04/2015 ते 31/03/2016 या कालावधीकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) करणेत येत आहे. AMC कालावधीत दुरूस्तीसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व स्पेअर पार्टची व कन्झ्युमेबलची किंमत संस्थानला वेगळी अदा करावयाची आहे.

सध्या उपरोक्त सिरींज पंप पैकी सी.आर.यु.-I, विभागात 22 नग सिरींज पंप वापरात असुन त्यापैकी 9 सिरींज पंपचे Pole Clamp हे पार्ट खराब झाल्याचे सदर विभागाने त्यांचे पत्रान्वये कळविले आहे. त्यानुसार सदर Pole Clamp ची तपासणी केली असता Pole Clamp दुरूस्त होउ शकत नसल्यामुळे सदर Pole Clamp नवीन खरेदी करणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यासाठी मे. बी ब्रॉन मेडीकल इंडिया प्रा.ली. मुंबई यांचे अधिकृत सर्व्हिस डीलर मे. सर्व्हिस वन, ठाणे त्यांचे पत्र क्र. SER1/QUO/085, दि. 24/08/2015 अन्वये सर्व करांसहीत एकुण रू. 46,350/- (अक्षरी रु. शेहेचाळीस हजार तीनशे पन्नास मात्र) इतका खर्च येणार असुन सदर रकमेची कंपनीने आगाउ मागणी केलेली आहे. परंतु कंपनी प्रतिनिधीसोबत झालेल्या चर्चेअंती वरील Pole Clamp श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये प्राप्त झालेनंतर सदर रक्कम अदा होणेस कंपनीने स्वीकृती दर्शविली आहे. सदर बी ब्रॉन सिरींज पंप चे स्पेअर पार्ट करीता मे. बी ब्रॉन मेडीकल इंडिया प्रा.ली. मुंबई यांचे अधिकृत सर्व्हिस डीलर मे. सर्व्हिस वन, ठाणे हे एकमेव पुरवठाधारक आहेत व त्यांचेकडेच सदर बी ब्रॉन सिरींज पंप चे स्पेअर पार्ट उपलब्ध असतात.

तरी मे. सर्व्हिस वन, ठाणे यांचेकडुन सिरींज पंप करीता Universal Pole Clamp- 9 नग खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रू. 46,350/- च्या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५३८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणा-या रु.४६,३५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२१** **श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस.ओ.टी.नं.२ या विभागाकरीता Needle Holder (Curved Handle 10") मंजूर दराने खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी. २ या विभागाने दि.२२/०४/२०१५ रोजीचे मागणी पत्रकान्वये Scanlan कंपनीच्या Needle Holder (Curved Golden Handle 10") ०२ नगांची मागणी केलेली आहे. (औषध भांडार विभाग प्राप्त दि. १२/०५/२०१५) सदर विभागाकडे Needle Holder नसल्यामुळे त्यांनी नवीन मागणी केलेली आहे. कारण सदरचे Needle Holder घेतल्यामुळे ऑपरेशन नंतर करावयाचे Sutures हे लवकर होतील शिवाय सदर Sutures मुळे Tissue Damage होणार नाही, त्यामुळे रुग्ण लवकरात लवकर बरा होण्यास मदत होईल.

यापूर्वी सदर श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी. I या विभागाकरीता मा. त्रिसदस्य समिती सभा दि.०९/१२/२०१४ निर्णय क्र. १०२१ (०८) अन्वये M/s. B. L. Lifescience Pvt. Ltd., New Delhi यांचेकडुन इकडील पत्र क्र.३६३२ दि.२०/०१/२०१५ अन्वये Scanlan कंपनीच्या Needle Holder (Curved Golden Handle 10") ०२ नगांचा प्रती नग रक्कम रु.८१०७०/- या प्रमाणे रक्कम रु.१६२१४०/- इतक्या रक्कमेचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. त्यानुसार M/s. B. L. Lifescience Pvt. Ltd., New Delhi यांचेकडून

दूरध्वनीद्वारे दराबाबत विचारणा केली असता त्यांनी त्याच मंजूर दराने सदर Needle Holder (Curved Golden Handle 10") देण्यास तयार असल्याचे कळविले आहे.

तरी वरीलप्रमाणे सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. 2 या विभागाकरीता लागणारे Scanlan कंपनीच्या ०२ नग Needle Holder (Curved Golden Handle 10") हे M/s. B. L. Lifescience Pvt. Ltd., New Delhi यांचेकडुन मागील मंजूर दराने करुन घेण्यास व याकामी येणाऱ्या रक्कम रु.१६२१४०/- चे खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.५३९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस.ओ.टी.नं.२ या विभागाकरीता आवश्यक असलेले ०२ नग Needle Holder (Curved Handle 10") मागील मंजूर दराने खरेदी करणेऐवजी त्याकामी कोटेशन्सची मागणी करणेत यावी, असे ठरले. तसेच याकामी येणा-या अंदाजे रु.१,६२,१४०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२२** **तातडीने केलेल्या औषधांचे खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणेबाबत (माहे– ऑगस्ट २०१५).**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद** – १७ (२) ण

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –**

१) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २६/०३/२०११ निर्णय क्र. २५४ अन्वये वैद्यकीय संचालक यांना दरमहा रु. १,५०,०००/- पर्यंत तातडीचे औषधे खरेदी करुन बिले अदा करणेत यावी व रु. १,५०,०००/- पेक्षा जास्त रक्कम झाल्यास त्याचे खरेदी करुन बिले अदा करुन नोंद घेण्यासाठी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवावे असे ठरले आहे.

२) मा. त्रिसदस्य समिती सभा दि. १७/०४/२०१३ निर्णय क्र. ३४१ अन्वये राजीव गांधी जीवनदायी योजनेतंर्गत अंतरुग्ण व बाह्यरुग्ण विभागात उपचार घेणा-या रुग्णांसाठी उपलब्ध नसलेली औषधे संस्थान मार्फत स्थानिक विक्रेत्यांकडून खरेदीकरुन द्यावे असे ठरले आहे.

३) मा. व्यवस्थापन समिती सभा, दि. २६/०३/२०११ निर्णय क्र. २५४ अन्वये वैद्यकीय संचालक यांना दरमहा रु. १,५०,०००/- पर्यंत तातडीचे औषधे खरेदी करुन बिले अदा करणेत यावी व रु. १,५०,०००/- पेक्षा जास्त रक्कम झाल्यास त्याचे खरेदी करुन बिले अदा करुन नोंद घेण्यासाठी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवावे असे ठरले आहे.

४) मा. त्रिसदस्य समिती सभा, दि. १७/०४/२०१५ निर्णय क्र. ३४१ अन्वये राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गत अंर्तरुग्ण व बाह्यरुग्ण विभागात उपचार घेणा-या रुग्णासाठी उपलब्ध नसलेली औषधे संस्थान मार्फत स्थानिक विक्रेत्यांकडून खरेदी करुन द्यावे असे ठरले आहे.

५) मा. त्रिसदस्य समिती सभा, दि. ०९/१२/२०१४ निर्णय क्र. १०२१ अन्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरिता वैद्यकीय संचालक यांना असलेल्या दरमहा तातडीचे औषधे / सर्जिकल साहित्य खरेदी रक्कम रु. १,५०,०००/- मात्र ऐवजी रु. ३,००,०००/- मात्र करणेस मान्यता देण्यात आली.

**प्रास्ताविक –** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे ऑपरेशन थिएटर विभाग, प्रयोगशाळा विभाग इत्यादी विभागाकरिता सर्जिकल मटेरियल, औषधे, केमिकल्स इत्यादीची तातडीने आवश्यकता होती. सदर मटेरियल औरंगाबाद येथून खरेदी केलेली आहेत. सदर औषधे / केमिकल्स / सर्जिकल साहित्य आपणाकडे उपलब्ध नसल्यामुळे ती तातडीने खेदी करणे गरजेचे होते त्यासाठी रु. २४६१२/- मात्र खर्च आलेला आहे. सदर खरेदी ही माहे ऑगस्ट मध्ये केलेली आहे.

सदरची खरेदी ही वैद्यकीय संचालक यांना दरमहा रु. ३,००,०००/- चे तरतुदी व्यतिरिक्त रक्कम रु. ३४४०८/- इतक्या रक्कमेची आतापर्यंत खरेदी झालेली आहे.

**मागणी :-**

| Sr. No. | Name of Party | Bill No. | Date | Total Amt. in Rs | Requirment |
|---|---|---|---|---|---|
| 01 | M/s. Apollo Pharmacy, Shirdi | 1363 | 29/08/2015 | 3412.00 | RGJY Dept |
| 02 | M/s. S. S. Health Services Rahata | 694 | 19/08/2015 | 3649.00 | FGW Ward |
| 03 | M/s. Surgilink, Shrirampur | 300 | 28/08/2015 | 17551.00 | Sub store Cardiac |
| | | | **Total Amt. in Rs.** | **24612.00** | |

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:–** राजीव गांधी योजनेतंर्गत असलेल्या रुग्णांना लागणारी सर्व औषधे संस्थान रुग्णालयातून पुरवली जातात त्यांना बाहेरील औषध दुकानातून औषधे लिहून दिली जात नाही. तसेच तातडीच्या प्रसंगी उपलब्ध नसलेली औषधे देखील स्थानिक विक्रेत्यांकडून खरेदी करावी लागतात. त्यानुसार सदर खरेदी केलेली असून बिले अदा करावयाची आहे. तरी नोंद घेण्यासाठी सविनय सादर

**निर्णय क्र.५४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे माहे ऑगष्ट- २०१५ मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलकडे तातडीने केलेल्या औषधांचे खरेदीची नोंद घेण्यात येऊन, संबंधीतांची बीले अदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवारी- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२३** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता दुस-या टप्प्यातील वार्षिक (सन २०१५-१६) या वर्षाकरीता लागणारी औषधे व सर्जिकल साहित्य (Part- A) तसेच On Consignment Basis (Part- B) वरील साहित्य खरेदीकामी पुरवठा आदेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे दैनंदिन वापरासाठी सन २०१५- १६ या वर्षाकरीता लागणारे औषधे/ सर्जिकल साहित्य खरेदी कामी (Part A) करीता एकूण १२३८ आयटम करीता एकूण रक्कम रु. १६७५७२९४७.४४ इतक्या रक्कमेचे व On Consignment Basis (Part - B) करीता प्राप्त दरानूसार अंदाजे रु. ४०५१४२८७/- इतका खर्च अपेक्षित धरुन दि.२८/०७/२०१५ रोजी २०८०८७२३४.४४ इतक्या रक्कमेचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. मागील वर्षाच्या दराचा व सदरच्या खरेदीचा तुलनात्मक दृष्ट्या विचार करता रु.७,६५,४१,६३६.३४ इतक्या रक्कमेची प्राथमिकदृष्ट्या बचत झालेली दिसते.

दि.२७/१०/२०१५ रोजीच्या मा. त्रिसदस्य समिती सभेमध्ये दुस-या टप्यातील औषधे / सर्जिकल साहित्य खरेदीकामी प्रस्ताव ठेवला असता त्यावर चर्चा होऊन असे ठरले की, दुस-या टप्प्यातील औषधे खरेदीकामी महाराष्ट्र राज्याच्या वैद्यकिय शिक्षण आणि संशोधन (DMER) मुंबई यांच्या कार्यालयाला भेट देऊन तेथील औषधे खरेदीची कार्यपध्दती व त्यांना प्राप्त झालेले दर याचा तपशील व याबाबतची सविस्तर माहिती घेण्यात येऊन प्रस्ताव ठेवावा

त्यानूसार दि.२८/१०/२०१५ रोजी उपवैद्यकिय संचालक, परचेस मॅनेजर व कर्मचारी यांनी वैद्यकिय शिक्षण आणि संशोधन (DMER) मुंबई कार्यालयास भेट दिली असता, DMER Director Shri. Pravin Shingare व Purchase Director यांचेशी चर्चा झाली. त्यानुसार डायग्नोस्टिक / सर्जिकल ड्रग्ज/ नॉन सर्जिकल ड्रग्ज/ सुचर्स मटेरीयल इ. निविदेतील बाबींचा नमूना तपासणी करुन डॉक्टरांचा अभिप्राय घेतला जातो. इंजेक्शन टॅब्लेट्स/ कॅप्सूल्स् लिक्विड ओरलर्स इ. निविदेतील बाबींकरीता नमूना तपासण्याची आवश्यकता नसून ते मटेरीयल खरेदीकामी निविदेतील प्राप्त निम्नतम दरानुसार पुरवठा आदेश देण्यात येतो. तसेच DMER मध्ये मटेरियल प्राप्त झाल्यानंतर पुरवठा धारकांचे पेमेंटसाठी आपल्यापेक्षा जास्त कालावधी लागत असल्यामुळे त्यांना प्राप्त होणारे दर हे बरेच ठिकाणी आपल्या पेक्षा जास्त आढळून आलेले आहे. त्यानूसार खालीलप्रमाणे खरेदीचा प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे.

अ) Tablet, Injection, Drop, Syrup, Ointment, Ayurvedic इ. करीता प्राप्त निम्नतम दरानूसार पुरवठा आदेश देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

आ) OT & Other Surgical Material, Suture, Lab Chemicals, X-ray, Neuro, Dialysis, Cardiac Material, Miscellaneous, Consignment Basis Item याकरीता नमुना तपासणी केल्यानंतर वापर करणा-या डॉक्टरांचा Remark समाधान कारक आल्या नंतर सदर मटेरीयलची निवड करण्यात आली आहे. तसेच काही ठिकाणी Demo प्राप्त न झाल्याने मागील वर्षाचा अनूभव पाहता तेथे त्या मटेरीयलची निवड करण्यात आलेली आहे आणि काही ठिकाणी तूटवडा भासू नये म्हणून निम्नतम दर स्विकारण्यात आलेले आहे. तसेच काही ठिकाणी प्राप्त दर एकाच निविदाधारकाचे असल्याने तेथे Monopoly Item म्हणून त्याची शिफारस करणेत आलेली आहे.

Suture मध्ये काही ठिकाणी वर्ष भरासाठी मागणी केलेले Suture मटेरीयल मागील वर्षाचा खप पाहता फारच कमी असल्याने तेथे मागणी वाढविण्यात आली असूनकाही ठिकाणी मागणी केलेले सूचर्स हे मागील वर्षी वापरण्यात न आल्याने अथवा त्याची मागणी सुध्दा न केल्याने तेथे ती मागणी कमी करण्यात आलेली आहे.

तसेच प्रथम टप्प्यात काही सूचर्स कामी मे. जॉन्सन अॅन्ड जॉन्सन, मुंबई यांना वैद्यकिय शिक्षण आणि संशोधन (DMER) मुंबई यांचे दराने पूरवठा आदेश देण्यात आला होता. परंतु सदर वैद्यकिय शिक्षण आणि संशोधन (DMER) मुंबई यांचे दराची मूदत मे. २०१५ मध्ये संपल्याने मे. जॉन्सन अॅन्ड जॉन्सन, मुंबई यांनीसदर सूचर्स हे निविदेतील दरानेच पुरवठा आदेश देण्याची मागणी केलेली आहे. तेंव्हा वैद्यकिय शिक्षण आणि संशोधन (**DMER**) मुंबई यांचे दरांचा विचार न करता त्यांचा प्रथम टप्प्यातील पुरवठा आदेश रद्द करुन त्यांना नविन निविदेत दिलेल्या दरानूसार पुरवठा आदेश देण्याची शिफारस केलेली आहे.

दैनंदिन वापरासाठी लागणारे I/V Fluids मध्ये प्रथम टप्प्यात RL व DNS करीता M/s. Denis कंपनीकरीता पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. परंतू सदर I/V Fluids बाबत श्री साईनाथ रुग्णालयातील काही वार्ड/ विभागातून लेखी स्वरुपात तक्रार आलेल्या असून त्यावर M/s. Denis कंपनीचे प्रतीनिधी यांनी त्रूटी निवारण्यासाठी आले होते परंतू त्यांचेकडून सदर तक्रारीचे निवारण झालेले नाही. त्यामुळे प्रथम टप्प्यात दिलेल्या **RL** व DNS या I/V Fluids चापुरवठा आदेश रद्द करुन त्यांनतरप्राप्तनिम्नतम दराने Amanta Healthcare Limited यांना पुरवठा आदेश देणेस व याकामी येणा-या रु. ७,५५,४३८/- जास्तीच्या खर्चास तसेच उर्वरीत I/V Fluids कामी M/s. Denis कंपनीचे दर निम्नतम असुन परंतू त्याकंपनीच्या I/V Fluids ची तक्रार असल्याने त्यानंतर प्राप्त निम्नतम दराच्या निवीदाधारकांना पुरवठा आदेश देण्याची शिफारस केलेली आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील प्रयोगशाळा या विभागाकरिता लागणारे केमिकल्स व किट्सकामी नमुना तपासणी नंतर दोन महिन्यांसाठी प्रायोगिक तत्त्वावर काही मटेरियलचा पुरवठा आदेश देण्यात आला होता परंतु, दोन

महिन्यांनंतर प्रायोगिक तत्त्वावर वापरलेल्या मटेरियलचा रिझल्ट योग्य न आल्यामुळे त्यांनी मागणी केलेल्या केमिकल्स व किट्स घेण्याची शिफारस केलेली आहे. त्यामध्ये Konelab कंपनीच्या Amylase व HDL Cholesterol साठी त्यांनी दिलेले दर हे Erba कंपनीच्या केमिकल्समध्ये दिलेले असल्यामुळे तेथे त्यांची नग संख्या वाढविण्यात येऊन ते घेण्याची शिफारस केलेली आहे. डेंग्यु किटकामी श्री साईनाथ प्रयोगशाळेसाठी निवडण्यात आलेले दर कमी असल्यामुळे त्याच दराने त्याच कंपनीचे डेंग्यु किट श्री साईबाबा प्रयोगशाळेसाठी घेण्याचे शिफारस केलेली आहे.

तसेच On Consignment Part B मधील I.A.B.P. Balloon कामी शिफारसीअन्वये पुरवठा आदेश देण्यात येत आहे.

तसेच रक्तातील साखरेचे प्रमाण तपासणेकामी वापरण्यात येणा-या ग्युकोमीटरसाठी ५० Strips व १०० Strips साठी दर आलेले होते परंतु, सदरकामी १०० Strips ऐवजी फक्त ५० Strips ची मागणी वाढवून आपल्या Demo शिफारशीअन्वये Nipro व Accucheck कंपनीस ५०% विभागणी करुन पुरवठा आदेश देणेबाबत शिफारस केलेली आहे.

कार्डीयाक ओ. टी. मध्ये दैनंदिन होणा-या सर्जरीकरिता लागणा-या Oxygenator व Tubing Pack खरेदीकामी तसेच सदरच्या मटेरियलची भविष्यात पुरवठा आदेश दिल्यानंतर होणा-या तुटवडा भासू नये म्हणून तीनही प्रकारच्या Oxygenator व दोन प्रकारच्या Tubing Pack साठी शिफारसीअन्वये दोन पुरवठाधारकांना पुरवठा आदेश विभागून दिलेला आहे तसेच Cautery pad व Cautery pencil साठी Valley Lab कंपनीचे दर प्राप्त न झाल्याने सदर खरेदी फेर निविदा काढण्यात येऊन सध्या त्याचा तुटवडा भासू नये म्हणून कमीत कमी २ महिने पुरु शकेल इतका साठा मागील वर्षाच्या कंपनीचा तात्पुरत्या स्वरुपात पुरवठा आदेश देण्याची शिफारस करण्यात आलेली आहे.

दि. २८/०७/२०१५ रोजीचे पुरवठा आदेशान्वये Octopus हया कार्डीयाक साहित्याचा पुरवठा आदेश देण्यात आला होता परंतु, त्यानंतर प्राप्त Terumo कंपनीच्या Octopus चा Demo Report चांगला आल्याने व त्यांचे दर निम्नतम असल्याने M/s. Kanchan Drugs, Pune यांना दिलेले Octopus चा

पुरवठा आदेशाची संख्या कमी करुन M/s. Visionary Healthcare, Ahmedabad यांनी भरलेले Tissue Stabilizer चे निम्नतम दर स्वीकारण्यात येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्याची शिफारस केलेली आहे.

ऑपरेशन थिएटरमध्ये लागणा-या सर्जिकल Item मध्ये Demo रिपोर्टनुसार अथवा काही ठिकाणी Demo न प्राप्त झाल्याने मागील वर्षाचा अनुभव पाहता तेथे त्या साहित्याचा तसेच काही ठिकाणी L१ चा पुरवठा आदेश देण्यात आलेला असून तसेच

१) Liq. Benzalkonium Chloride Solution ४.५% V/V ५ Ltr. कामी प्राप्त दरामध्ये M/s. Kanchan Drugs, Pune यांनी १ लीटरचे दर रु. ११९/- इतके दिलेले होते परंतु, सदरकामी चर्चा करतांनी M/s. Kanchan Drugs, Pune यांनी ५ लीटरसाठी प्रती नग दर रु. ३००/- या दराने देण्याचे मान्य केले. तेथे M/s. Kanchan Drugs, Pune यांचे १ लीटर ऐवजी ५ लीटरचे त्यांनी देऊ केलेल्या रु. ३००/- या दराने पुरवठा आदेश देण्याची शिफारस केलेली आहे.

२) निविदेमधील अ. नं. २४४ (हात धुण्याचे लिक्वीड) करिता मागणी केलेल्या १०,००० नगासाठी प्राप्त झालेल्या दरामध्ये मागील वर्षाचा अनुभव पाहता सर्व वॉर्ड / विभागातील दैनंदिन वापरासाठी लागणारे हात धुण्याच्या लिक्वीडसाठी Liq. Sterimil चा पुरवठा ८०% पुरवठा आदेश व कार्डीयाक ओटीसाठी त्यांचे शिफारसीन्वये Microshield handrub २० पुरवठा आदेश विभागून देण्याची शिफारस करण्यात आलेली आहे.

३) I. V. Set साठी Demo दिल्यानंतर देखील कोणाचीही शिफारस प्राप्त न झाल्याने सध्या दैनंदिन वापरासाठी JMS कंपनीचे मागील वर्षात वापरत असलेल्या मटेरियलची २०,००० नगाचा पुरवठा आदेश देण्यात येऊन उर्वरित ६०,०००/- नगासाठी फेर निविदा करण्यात येत आहे.

४) Clip Application हे आपण ज्या कंपनीला हे आपण ज्या कंपनीला SLS Clip चा पुरवठा आदेश देणार आहोत त्याच कंपनीकडून मोफत वापरण्यास देण्यास तयार आहे.

ब्लड बँकेचे लागणारे केमिकल्ससाठी त्यांनी निवड केलेले केमिकल्सची शिफारस करण्यात आलेली आहे. तसेच ब्लड बँकेच्या शिफारसीअन्वये रक्त साठवून ठेवण्यासाठी लागणा-या पिशव्यासाठी Terumo Penpol कंपनीचा पुरवठा आदेश देण्याची शिफारस केलेली आहे.

कार्डीयाक ओटीसाठी लागणारे Micro Vessel Clip (Yellow) Bulldog साठी वार्षिक मागणी केलेल्या १५० नगांपैकी सदर मटेरियलची गरज पाहता ३० नगांचा प्राप्त निविदाधारकांचे दरानुसार स्वीकारण्यात येऊन उर्वरित १२० नगांसाठी फेरनिविदा मागविण्यात येत आहे.

१) श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागासाठी लागणारे Micro Biology विभागासाठी लागणारे Agar, Culture Bottle व इतर मटेरियल कामी निविदा प्राप्त न झाल्याने सदर मटेरियल नसल्यामुळे सदर विभागात दैनंदिन तपासणीत ब-याच अडचणी येत आहे. त्यामुळे सदर मटेरियलकामी फेर निविदा करण्यात येत असून मटेरियल उपलब्ध होण्यास अजून ३ ते ४ महिने लागणार आहे. तेंव्हा उपरोक्त मटेरियलची तातडी पाहता सदर मटेरियल स्थानिक पुरवठा धारकांकडे उपलब्ध नसते व ते बनविण्यास कमीत कमी १५ दिवस लागतात त्यामुळे सदर मटेरियल तातडीने बाजार भावाने खरेदी करण्यास शिफारस केलेली आहे.

२) वार्षिक औषधे खरेदीमध्ये साबण, निरमा, बॅटरी सेल व Shaving Blade, प्लॅस्टीक रोल, ETO Paper & Cartilage साठी कुणाचेही दर प्राप्त न तसेच खरेदीकामी सदर स्थानिक पुरवठा धारकांकडून कोटेशन्स मागवून खरेदी करण्यात यावे असे अशी शिफारस केलेली आहे.

३) श्री साईबाबा रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजना दि. १६/११/२०१३ रोजी कार्यान्वित झालेली आहे. सदर योजना नवीनच असल्याने खरेदी ब-याच औषधांची मागणी केलेली नसल्यामुळे तसेच नवीन डॉक्टर रुजू झाल्यानंतर ते नवीन औषधे लिहितात सदर नवीन दिलेल्या औषधांची सुध्दा वार्षिक मागणीमध्ये मागणी नसल्यामुळे त्या औषधांची सुध्दा आपणास राजीव गांधी जीवनदायी योजनेसाठी तसेच दैनंदिन वापरासाठी देण्यास तुटवडा भासतो तेंव्हा अशा औषधांसाठी वार्षिक मागणी नसल्यास नवीन औषधांची स्थानिक बाजारातून तात्पुरत्यास्वरुपात तातडीने घेण्यास शिफारस केलेली आहे. तसेच ब-याच औषधांचा पुरवठा आदेश गेल्यानंतर देखील आपणास कधी कधी लवकर प्राप्त होत नाही अशा औषधांचा तुटवडा भासू नये म्हणून त्यासाठी स्थानिक बाजारातून तातडीने तात्पुरत्यास्वरुपात खरेदीस शिफारस केलेली आहे.

४) डेंटल मटेरियलसाठी निविदा प्राप्त न झाल्याने सदरचे मटेरियल तातडीने गरजेपुरते खरेदीची शिफारस केलेली आहे.

दि. २८/०७/२०१५ रोजीचे पुरवठा आदेशामध्ये खालील प्रमाणे बदल करुन मिळणेबाबत शिफारस केलेली आहे.

१) साईनाथ रक्तपेढीसाठी लागणा-या Coombs Card व Gel Groop Card साठीच्या मागणीमध्ये किट ऐवजी चुकून Strip चे दर घेण्यात आलेले आहे. तेथे किट प्रमाणे दर घेण्यास शिफारस केलेली आहे, त्याकामी जास्तीच्या खर्चास रु. २,४०,२३४.२८/- इतका येणार आहे.

२) न्युरो ओ. टी.साठी Dura Patch १० x १२ साठी M/s. Critical Care, Pune यांना पुरवठा आदेश देण्यात आला होता परंतु, सदरकामी M/s. Kanchan Drugs, Pune यांचे दर निवडण्यात आले होते त्यामुळे M/s. Critical Care, Pune यांचा पुरवठा आदेश रद्द करुन M/s. Kanchan Drugs, Pune यांचेकडून Dura Patch १० x १२ घेणेबाबत शिफारस केलेली आहे.

३) M/s. Critical Care, Pune यांना Tissue Stabilizer SUV चा पुरवठा आदेश देण्यात आला आहे परंतु, सदरकामी Tissue Stabilizer Acrobat I ची शिफारस करण्यात आली आहे. तेंव्हा तेथे Tissue Stabilizer SUV चा पुरवठा आदेश रद्द करुन Acrobat I चा पुरवठा आदेश देण्याची शिफारस केलेली आहे.

४) सुचर्समध्ये M/s. Critical Care, Pune यांनी Covidion कंपनीच्या सुचर्ससाठी Per foil दर दिल्यामुळे त्यांना दिलेल्या पुरवठा आदेशात काही ठिकाणी १२ foil प्रमाणे बॉक्सचे दर घेतलेले आहे परंतु, त्यांची पॅकींग ३६ foil/Box असते तेव्हा ज्या ठिकाणी १२ foil/Box प्रमाणे दर घेतलेले असेल त्या ठिकाणी पुरवठा आदेशात ३६ foil/Box प्रमाणे पॅकींग टाकण्यासाठी शिफारस केलेली आहे आणि Suture India, Mumbai यांचे पुरवठा आदेशात त्यांचे दर ३६ foil box प्रमाणे घेण्यात आलेले आहे. परंतु, प्रत्यक्षात त्यांचे पॅकींग १२ Foil / Box प्रमाणे असते तेंव्हा सदर ठिकाणी त्यांचे १२ foil / Box प्रमाणे दर घेण्याची शिफारस केलेली आहे.

५) आयुर्वेदीक औषधामध्ये मे. श्री. जी. एजन्सी, श्रीरामपूर यांना दिलेल्या पुरवठा आदेशात त्यांना चुकीने Vastalya कंपनीचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. परंतु, त्यांनी निविदेमध्ये Vastal कंपनीचे दर दिलेले होते तेंव्हा त्यांचे पुरवठा आदेशात Vastalya ऐवजी Vastal कंपनीचा पुरवठा आदेश देण्याची शिफारस केलेली आहे.

६) Suture मध्ये Sugicell Fibrillar 1"x2" & 2"x4" करिता foil प्रमाणे दर घेण्यात आले होते. त्यानुसार foil प्रमाण पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. परंतु, प्रत्याक्षात तेथे Box ची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार Box प्रमाणे दर घेतल्यास Sugicell Fibrillar 1"x2" करिता

रु. १७,३२०/- प्रती Box व 2"x4" करिता रु. ३४,६४०/- प्रती Box प्रमाणे पुरवठा आदेश दिल्यास जास्तीचा खर्च रु ९३,५२८/- इतका येणार आहे. तेथे Box प्रमाणे दर घेण्यात येऊन त्याप्रमाणे पुरवठा आदेश देण्याची शिफारस केलेली आहे.

७) Tablet मध्ये दैनंदिन वापरासाठी लागणा-या वेदनाशामक Tab. Ibuprofen + Paracetamol कामी M/s. Getwell, Nashik यांना पुरवठा आदेश देण्यात आला होता. परंतु, त्यांनी दिलेले दर हे चुकून Tab. Diclofenac + Paracetamol चे असल्याने ते घेता येणार नाही. त्यामुळे तेथे त्यांनंतर प्राप्त निम्नतम दर मे. स्नेहल फार्मा. नागपूर यांचे प्रती नग रु. ०.४३७८ स्वीकारल्यास रु. ५३,२२०/- इतका जास्तीचा खर्च येणार आहे. त्याप्रमाणे मे. स्नेहल फार्मा नागपूर यांचेकडून प्रती नग रु. ०.४३७८ प्रमाणे Tab. Ibuprofen + Paracetamol घेण्याची शिफारस केलेली आहे.

आपण दिलेल्या पुरवठा आदेश हा पुरवठाधारकांनी भरलेल्या निविदेप्रमाणे असतो परंतु, सदर निविदा ऑनलाईन भरण्यात येत असल्यामुळे तसेच निविदा कालावधी पुरेसा नसल्यामुळे पुरवठा धारकांकडून निविदा भरतांनी त्या औषधांची कंपनी, पॅकींग, Brand Name यात काही प्रमाणात Spelling mistake झाल्यामुळे सुध्दा प्राप्त मटेरियल बाजूला ठेवण्यात येत आहे. त्याबाबत पुरवठा धारकांशी चर्चा करुन त्यांचे दुरुस्ती बाबतचे लेखी पत्र मागवून ते मटेरियल घेण्याबाबत शिफारस केलेली आहे तसेच मटेरियल बाबत शंका निरसण होत नसेल तर त्याबाबत

वापरणारे डॉक्टर / तंत्रज्ञ त्यांचा अभिप्राय घेऊन सदर मटेरियल आवक घेता येईल त्याबाबत स्टोअर विभागाने पाठपुरावा करण्याची शिफारस केलेली आहे.

वार्षिक औषधे खरेदीचे वेळेस झालेल्या चर्चेनुसार ब-याच ठिकाणी आपण काढलेल्या निविदेचे औषधे सर्जिकल साहित्यासाठी दिलेले Specification मध्ये त्रूटीं आढळून आल्याने तसेच प्राप्त मटेरियलमध्ये पुरवठा आदेशात दिलेले Packing, Strength मध्ये फरक आढळतो त्यामुळे ते मटेरियल स्वीकारले जात नाही तेंव्हा सदरकामी पुढील वर्षीच्या निविदेमध्ये औषधे सर्जिकल साहित्याचे Specification दुरुस्त करुन निविदा काढण्यात येणेबाबत शिफारस केलेली असून व सध्या दिलेल्या औषधे सर्जिकल साहित्याकामी दिलेल्या पुरवठा आदेशाप्रमाणे प्राप्त मटेरियलचे Specification, Packing, Strength यांची नोंद घेण्यात येऊन नोंद घेतल्याप्रमाणेच मटेरियल सन २०१५ – २०१६ वार्षिक औषधांमध्ये पुरवठा आदेशांची मुदत संपेपर्यंत घेण्यात यावे त्यामुळे दिलेल्या पुरवठा आदेशांची मुदत संपेपर्यंत घेण्यात यावे त्यामुळे दिलेल्या पुरवठा आदेश व प्राप्त मटेरियलमध्ये त्या वर्षातील वार्षिक पुरवठामध्ये बदल त्रूटीं आढळणार नाही, याची नोंद घ्यावी. तसेच बरेच आयुर्वेदिक औषधे, सर्जिकल साहित्य व कन्झुमेंबल साहित्यांचे बॅच नंबर व मुदत बाह्यता दिलेली नसते परंतु, आपले संगणकांत नोंद घेतांनी बॅच नंबर मुदतबाह्यता आवश्यक असते तेंव्हा सदर औषधे / साहित्याकामी स्टोअर विभागाने विशिष्ट बॅच नंबर व मुदतबाह्यता ठरवून घेऊन संगणकात नोंद घेण्यास अडचण येणार नाही याची शिफारस केलेली आहे.

वार्षिक पुरवठा आदेशात बरेच वेळेस असे आढळून येते की, मागणी केलेली औषधे वार्षिक संख्या जास्त असते परंतु, वर्षभरात त्यांची गरज फारच कमी असते त्यामुळेआपले अटीशर्तीनुसार संस्थानचे मागणी केलेल्या औषधांची ५% सुरक्षा रक्कम आपणाकडे १ वर्षाभरासाठी ठेवावी लागते त्यामुळे पुरवठाधारक त्याबाबत तक्रार करत असतात तेंव्हा अशा वेळी वैद्यकीय संचालक यांची सदर बाबत व्यवस्थीतपणे मागणी पुरवठा यांचा वापर आपण ठेवलेली सुरक्षा रक्कम यांची नोंद व सत्य परिस्थितीची दाखवून त्याबाबत त्यांचे आदेशान्वये ५% सुरक्षा रक्कम वसूल करणे किंवा न करणे यांची वैद्यकीय संचालक यांचेमार्फत मंजूरी घेण्याबाबतचा निर्णय घेण्याची शिफारस केलेली आहे.

उपरोक्त प्रमाणे एकूण ८११ आयटमची शिफारसीन्वये पुरवठा आदेश देण्यात येऊन उर्वरित ५२७ आयटमकरिता फेर निविदा मागविण्याची शिफारस केलेली आहे.

तेंव्हा वरील प्रमाणे एकूण ८११ Item साठी Part A करिता एकूण रक्कम रु. १६३६५५५०८.२७ इतका खर्च अपेक्षित आहे तसेच Part B 1 Item साठी मागील वर्षाचा वापर पाहाता व सध्याचे प्राप्त दराने अंदाजे रु. ३२८८६०/- इतका खर्च अपेक्षित आहे, असे दोन्ही मिळून एकूण ८१२ Item साठी अंदाजे रु. १६६६८४३६८.२७ इतका पुरवठा आदेश देणेत येत आहे.

या औषधाचे मागील वर्षीचे प्राप्त दरानुसार एकूण किंमत तसेच यावर्षी निविदेव्दारे प्राप्त प्रस्तावित दरानुसार होणारी एकूण किंमत यांची माहिती देणारे विभाग निहाय विवरणपत्र सोबत अवलोकनार्थ सादर केले आहे. तेंव्हा दुस-या टप्प्याच्या औषधे / सर्जिकल साहित्य खरेदीकामी अंदाजे रु. १६६६८४३६८.२७ इतका खर्च अपेक्षित आहे. मागील वर्षीचे दर व या वर्षाचे दर यांचा विचार करता या खरेदीवरील बचतीची रक्कम रु.७१०१२२२.८२ इतकी आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे पुरवठाधारकांना वार्षिक पुरवठा आदेश देणेचा प्रस्ताव मा त्रिसदस्य समिती सभेपुढे ठेवण्यास मान्यता असावी.

(प्रस्तावित वैद्यकीय साहित्याचे निविदेव्दारे प्राप्त दर व कारणामीमांसे सह दर्शविणारे विभाग निहाय तक्ते सोबत ठेवण्यात आले आहेत.)

तरी उपरोक्तप्रमाणे पुरवठाधारकांना वार्षिक पुरवठा आदेश देणेचा प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, प्रस्तावीत पुरवठा आदेश द्यावयाची औषधे/ सर्जिकल साहित्य खरेदी करणेकामी मा.उच्च न्यायालयाची मान्यता आहे व त्याकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दर हे पूर्वीच्या दरांपेक्षा कमी आहेत तसेच निविदेतील अटी/ शर्तीप्रमाणे दर्जा असल्याकारणाने सदरहू प्रस्तावास चक्रिय पध्दतीने समितीची मान्यता घेण्यात येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. त्याची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२४** **श्री साईनाथ रुग्णालयातील ENT O.P.D. व Opthal O.T. करीता Vacuum Pump खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील ENT O.P.D व Opthal O. T. या विभागाने दि. २१/०७/२०१५ (औषध भांडार प्राप्त दि. ३१/०७/२०१५) रोजीचे मागणी पत्रान्वये Vaccum Pump ची मागणी केलेली आहे.

सदर ऑपरेशन थिएटरमध्ये Instrument, Gauze piece, लिननचे Autoclave केल्यानंतर सदर मटेरियल हे Dry करण्यासाठी Vaccum Pump चा वापर होतो. सदर खरेदीकामी M/s. M.Shah & Co, Mumbai यांचेकडून अंदाजे खर्चासाठी दरपत्रक मागविण्यात आले असून, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Qty. | Unit perice in Rs. | Total Amt in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01. | "Mediquip" Monoblock 1 HP Vaccum Pump with Stand., Single phase with all necessary connections & accessories | 01 | 49500.00 | 49500.00 |
| | **Total Amt. in Rs.** | | | **49500.00** |

सदर Vaccum Pump खरेदीकामी प्रती नग रु. ४९५००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी –** श्री साईबाबा रुग्णालयातील ENT O.P.D व Opthal O. T. या विभागाने दि. २१/०७/२०१५ (औषध भांडार प्राप्त दि. ३१/०७/२०१५) रोजीचे मागणी पत्र.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान–** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** तरी सदर Vaccum Pump हे कोटेशन मागवून विहीत पध्दतीने खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. ४९,५००/- चे खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.५४२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील ENT O.P.D. तसेच Opthal O.T. करीता आवश्यक असलेला Vacuum Pump खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.४९,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.२५ **Fully Automatic Elisa System मशिनचे दुरुस्तीबाबत.**

प्रस्ताव- श्री साईनाथ रूग्णालयामधील ब्लड बॅक विभागाकरीता पुरवठा आदेश क्र. 3566, दि.11/10/2011 अन्वये M/s. Abbott Healthcare Pvt. Ltd. Mumbai यांचेकडुन Fully Automatic Elisa System मशिन (Model-Architect i 1000SR) एकुण रू.22,78,500/- इतक्या रकमेत खरेदी करणेत आले आहे. सदर मशिन दि. 03/12/2012 रोजी कार्यान्वीत करण्यात आले असुन मशिन करीता दिलेला दोन वर्षांचा वॉरंटी कालावधी संपला असुन सध्या मशिनची दुरूस्ती व देखभाल बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागामार्फत येथेच केली जात आहे. परंतु दुरूस्ती करीता आवश्यक असणारे स्पेअर पार्ट पुरवठाधारक कंपनीकडुन खरेदी केली जातात.

सध्या मशिन व्यवस्थीत काम देत नसल्याचे सदर विभागाने त्यांचे पत्र दि. 29/08/2015 अन्वये कळविले आहे. त्यासाठी कंपनी इंजिनीअर मशिनचे दुरूस्ती करीता आले असता मशिनची तपासणी करून Wash Zone Motor हा पार्ट खराब झाल्याचे तसेच Valve Monifold Kit व PM Kit बदलण्याची गरज असल्याचे त्यांचे सर्व्हीस रिपोर्ट नं.1, दि. 16/10/2015 अन्वये कळविले आहे. सदर मशिन नियमीत वापरात असल्याने तातडीने दुरूस्त करणे आवश्यक आहे. त्यासाठी कंपनीचे पत्र ई मेल- दि. 16/10/2015 (रूग्णालये प्राप्त दि. 19/10/2015) अन्वये कोटेशन पाठविले आहे. M/s. Abbott Healthcare Pvt. Ltd. Mumbai, यांचेकडुन Fully Automatic Elisa System मशिनचे स्पेअर पार्ट बदलणेकामी सर्व करांसहीत एकुण रू. 2,68,040/- (अक्षरी रु. दोन लाख अडोसष्ट हजार चाळीस मात्र) इतका खर्च येणार आहे. उपरोक्त स्पेअर पार्ट करीता कंपनी तीन महिन्यांची वॉरंटी देत आहे. सदर स्पेअर पार्ट हे विशिष्ट रचना व स्पेसीफिकेशन असलेली असतात. त्यामुळे इतर पुरवठाधारक कंपनीकडे उपलब्ध होत नाही. सदर Fully Automatic Elisa System मशिन श्री साईनाथ रूग्णालयाचे ब्लड बँक विभागात नियमीत वापरात असुन तातडीने दुरूस्त करणे आवश्यक आहे.

तरी M/s. Abbott Healthcare Pvt. Ltd. Mumbai, यांचेकडुन Fully Automatic Elisa System मशिनचे स्पेअर पार्ट बदलणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रू. 2,68,040/- चे खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.५४३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे M/s. Abbott Healthcare Pvt. Ltd., Mumbai यांचेकडुन श्री साईनाथ रुग्णालयातील Fully Automatic Elisa System मशिनची दुरुस्ती करुन घेणेस व त्याकामी येणा-या रु.२,६८,०४०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.२६ **जादा वैद्यकिय बीलाचा परतावा अदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.–** १) जा. नं. एसएसएस-वशी रुणालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०८/०२/२००९ निर्णय क्र. ७५ अन्वये रु. १०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रास्ताविक –** खालील संस्थान कर्मचा-यांची रु. १०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. १०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

**मागणी –**

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ- संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात उपचार घेतलेले.** | | | | | | | |
| १ | सुर्वे वैशाली वसंतराव, विभाग- साईबाबा हॉस्पिटल, हुद्दा- परिचारीका | आई | Diabeties, | डॉ.इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | १५३९३९.०० | ७८९६.०० | सदर औषधे ही औषध भांडारात उपलब्ध नव्हती. बाहेरुन विकत घेतली. |
| २ | श्री.साबळे गोरख दादा विभाग- प्रसादालय, हुद्दा- मदतनीस | स्वतः | Cardiac Treatment | डॉ.शिंदे | श्री साईबाबा हॉस्पिटल | ३४३४२. | ३४१६९.०० | सदर औषधे ही औषध भांडारात उपलब्ध नव्हती. बाहेरुन विकत घेतली. |
| ३ | बकरे सतिष गंगाधर विभाग-बांधकाम हुद्दा- वरिष्ठ लिपीक | पत्नी | Hypertenti on | डॉ.भागवत | श्री साईबाबा हॉस्पिटल | ७६३९.०० | ७१९४.०० | सदर औषधे ही औषध भांडारात उपलब्ध नव्हती. बाहेरुन विकत घेतली. |
| ४ | वर्पे सविता चांगदेव विभाग- साईबाबा हॉस्पिटल हुद्दा - परिचारिका | आई | Daibetis | डॉ.इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | ४१९६.०० | ४१९६.०० | सदर औषधे ही औषध भांडारात उपलब्ध नव्हती. बाहेरुन विकत घेतली. |
| | | | | | एकुण - | ६२११६.०० | ५३४५५.०० | |
| | **ब- संस्थान मान्य सादीतील हॉस्पिटलमध्ये रेफर केले होते** | | | | | | | |
| ५ | श्री.नवनाथ बन्सी जाधव विभाग-प्रसादालय, हुद्दा- मदतनीस | स्वतः | Eye Operation | डॉ.सोनटक्के | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | ४६८७७.०० | ३८४३०.०० | सदर रुग्ण रुबी हॉल येथे पाठविले असता तेथील डॉक्टर अचानक सुट्टीवर गेले. रुग्णाची परिस्थिती पहाता त्यांनी लगेच बाहेरील हॉस्पिटलमध्येजाण्यास सांगितले. तसेच रुग्णास अंधत्व आले. |
| ६ | डॉ.रविंद्र गणपत अंत्रे, विभाग- साईनाथ हॉस्पिटल हुद्दा- सी.एम.ओ. | पत्नी | Irritable Bowel Syndrome | डॉ.शुभा मेहरोत्रा | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | २४३२५.०० | २४३२५.०० | रुग्णाचे वास्तव्य बाहेरगावी असल्यामुळे संस्थान नियमाप्रमाणे ८०% रक्कम देता येईल |
| ७ | चौधरी सचिन लक्ष्मण विभाग- लेखाशाखा हुद्दा- मदतनीस | वडील | Asthama with Cushing syndrome | डॉ.इंगळे | जहांगीर हॉस्पिटल,पुणे | ९२८५१.०० | ८७६११.०० | संस्थान रुग्णालयात उपचार होत नसल्यामुळे त्यांना संस्थानच्या मान्य यादीत पाठविले |
| ८ | शकीला सलीम शेख विभाग-साईनाथ हॉस्पिटल हुद्दा- आया | पती | Carcinoma / Ca | डॉ.राम नाईक | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | ३५६१७५.०० | ३५२६५५.०० | संस्थान रुग्णालयात Cancer उपचार होत नसल्यामुळे त्यांना संस्थानच्या मान्य यादीत पाठविले |

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | श्री.डांगे विलास सोपान विभाग-संरक्षण हुद्दा-वॉचमन | स्वतः | Ca | डॉ.राम नाईक | टाटा मेमोरीयल सेंटर, मुंबई | ५४५४२.०० | ४८७४८.०० | कॅन्सर उपचार संस्थान रुग्णालयात उपचार होत नसल्यामुळे त्यांना संस्थानच्या मान्य यादीत पाठविले |
| १० | सुभाष गंगाधर कुलकर्णी विभाग- भक्तनिवासस्थान हुद्दा- मदतनीस | पत्नी | Renal Failure | डॉ.शुभा मेहेरोत्रा | सह्याद्री हॉस्पिटल, नाशिक | १७६९५२.०० | १७६९५२/- | संस्थान रुग्णालयात उपचार होत नसल्यामुळे त्यांना संस्थानच्या मान्य यादीत पाठविले |
| ११ | योगेश त्र्यंबक साळवी विभाग- लेखाशाखा हुद्दा-मदतनीस | स्वतः | Ca | डॉ.किरण खांदे | नामको हॉस्पिटल, नाशिक | १२९३१३.०० | १२७०५३/- | सदर रुग्णास टाटा मेमोरियल हॉस्पिटलमध्ये पाठविले असता तेथील डॉक्टरांनी त्यांना नामको हॉस्पिटल मध्ये पाठविले. ८०% रक्कम देता येईल |
| | | | | | एकुण - | ८८१०३५.०० | ८५५७७४/- | |
| **ब.संस्थानचे मान्य यादीत नसलेले परंतू रेफर केलेले हॉस्पिटल** | | | | | | | | |
| १२ | श्री.डांगे विजय बबन विभाग- संरक्षण हुद्दा-मदतनीस | वडील | Eye Operation | डॉ.सोनटक्के | आनंद ऋषीजी हॉस्पिटल, अहमदनगर व दृष्टी आय हॉस्पिटल | २६२५२.०० | २०८७४.०० | सदर रुग्ण आनंदऋषी हॉस्पिटल येथे पाठविले असता तेथे उपचार होऊ न शकल्यामुळे त्यांनी खाजगी रुग्णालय येथे जाऊन तात्काळ उपचार केले. |
| १३ | श्री.ज्ञानेश्वर बबन पुंड विभाग-बगीचा हुद्दा-मदतनीस | स्वतः | Psychiatric Treatment | डॉ.राम नाईक | डॉ.सुनिल उंडे हॉस्पिटल, श्रीरामपुर | १९०४७.०० | ११८९४.०० | निकडीच्या प्रसंगी नियमानुसार तसेच संस्थान रुग्णालयात उपचार होत नसल्यामुळे ८०% रक्कम देता येईल. |
| १४ | कमल थॉमस कदम विभाग- साईनाथ हॉस्पिटल हुद्दा-परिचारीका | स्वतः | Lab Test | डॉ.राम नाईक | लोटस डायग्नोस्टिक , नाशिक | १५८००.०० | १३२००.०० | सदर संस्थान रुग्णालयात उपचार होत नसल्यामुळे ८०% रक्कम देता येईल. |
| १५ | सुरेखा राजू गायकवाड विभाग- साईनाथ हॉस्पीटल हुद्दा-परिचारीका | पती | Ca | डॉ.राम नाईक | श्री के.व्ही.ओ.जैन मानव सेवा केंद्र, दहीसर | ८९९६२.०० | ६७८०९.०० | सदर रुग्णास टाटा मेमोरियल हॉस्पिटल येथे पाठविले असता |

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | तेथे ऑपरेशनची तारीख उशिराची दिलेली असल्यामुळे त्यांना रुग्णाचे परिस्थितीअंतती खाजगी रुग्णालयात जाऊन उपचार केले. |
| | | | | | एकुण - | १५१०६१.०० | ११३७७७/- | |
| **ड.संस्थानचे मान्य यादीत नसलेले परंतू रेफर न केलेले हॉस्पिटल** | | | | | | | | |
| १६ | श्री.दिपक पुंडलीक गाढे, विभाग-संरक्षण हुद्दा- वॉचमन | स्वतः | Accident | डॉ.कोठारी/ डॉ.खांदे | कोठारी हॉस्पिटल, कोपरगांव | ६५७१.०० | ५०३३.०० | ड्युटीवर येतांना बाहेरगांवी अपघात झाला. |
| १७ | डॉ.शुभा मेहरोत्रा, विभाग-साईबाबा हॉस्पिटल, हुद्दा- फिजिशियन | आई | Breast Cancer | | | १७५३०.०० | १२९२०.०० | सदर रुग्णाचे वास्तव्य बाहेर गावी असल्यामुळे उपचार हे तेथेच केले. |
| १८ | रामचंद्र बाबु दर्गे , विभाग- मुंबई कार्यालय, हुद्दा- कार्यालय अधिक्षक | पत्नी | Arthoscopy | डॉ.नागराज शेट्टी | श्री के.व्ही.ओ.जैन मानव सेवा केंद्र, दहीसर | २०९१२.०० | १६१५४.०० | सदर कर्मचारी मुंबई कार्यालयात काम करीत असून ८०% रक्कम देता येईल. |
| १९ | शिंदे आप्पासाहेब छगनराव, विभाग- प्रशासकीय कार्या. हुद्दा- उपकार्यकारी अधिकारी | स्वतः | Eye Operation | डॉ.शबीर इंदौरवाला | इंदौरवाला ई.एन.टी. हॉस्पिटल, नाशिक | ४००००.०० | ३२०००.00 | निकडीच्या प्रसंगी तसेच सदर उपचार संस्थानच्या रुग्णालयात होत नसल्यामुळे असून ८०% रक्कम देता येईल. |
| | | | | | एकुण - | ८५०१३.०० | ६६१०७.०० | |
| | | | | | अ+ब+क+ड एकुण- | ११७९२२५/- | १०८९११३/- | |

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम १०,८९,११३/- इतकी आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** नियमावली प्रमाणे छाननी केली असून, काही औषधे औषध भांडार विभागात उपलब्ध नव्हती. तसेच संस्थान रुग्णालयात उपचार होत नसल्यामुळे रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरिता पाठविण्यात आले. तसेच निकडीच्या प्रसंगी उपचार घेतले. सदरचा प्रस्ताव मा. त्रिसदसीय समितीची पुर्वमान्यता घेऊन समितीने मान्य केलेली देय होणारी रक्कम अदा करणेस हरकत नाही, असे मत आहे.

**निर्णय क्र.५४४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या तक्त्यामध्ये दर्शविलेप्रमाणे संस्थान कायम कर्मचा-यांच्या नावासमोरील देय असलेली रक्कम त्यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२७** **मुलाच्या किडणी ट्रान्सफर शस्त्रक्रियेसाठी आगाऊ रक्कम मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.सुभाष मल्हारी बंदावणे यांचा मुलगा चि.महेश सुभाष बंदावणे यांना किडणी विकाराने त्रस्त असून त्यांना श्री साईबाबा हॉस्पिटलमधील डॉ.प्रीती देसाई (फिजीशियन) यांना प्रथम दाखविले होते. तसेच त्यांना ब-याच दिवसापासून किडणी विकाराचा त्रास (CRF) आहे. श्री.सुभाष मल्हारी बंदावणे यांच्या मुलाच्या दोन्ही किडण्या

खराब झालेल्या असून त्यांना श्री साईबाबा हॉस्पिटलमधील डॉ.प्रिती देसाई (फिजीशियन) यांनी पुढील उपचाराकरीता संस्थानचे मान्य यादीतील रुबी हॉल क्लिनिक, पुणे येथे पाठविले होते.

सदर किडणी ट्रान्सफर शस्त्रक्रियेसाठी रुबी हॉल क्लिनिक, पुणे यांनी त्यांचे दि.०८.०८.२०१५ रोजीचे पत्रान्वये रु.७,००,०००/- (अक्षरी रु.सात लाख) मात्र इतका खर्च कळविला आहे.

श्री.सुभाष मल्हारी बंदावणे यांनी त्यांच्या दिलेल्या अर्जामध्ये यापुर्वी उपचारावर माझा बराच खर्च झालेला आहे. तसेच माझी एवढी मोठी रक्कम भरण्याची परिस्थिती नाही. त्यामुळे मला माझ्या मुलाच्या उपचारासाठी संस्थानकडून रु.७,००,०००/- इतकी आगाऊ रक्कम मिळणेकामी दि.१८.०८.२०१५ च्या अर्जाव्दारे रुबी हॉल क्लिनिक,पुणे यांच्या नावावर खर्चापोटी जमा करावे अशी विनंती केलेली आहे. रुबी हॉल क्लिनिक, पुणे हे संस्थानच्या मान्य यादीत आहे.

संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ नियम क्र.१४ अन्वये संस्थान कर्मचा-यांना हृदय शस्त्रक्रिया, मुत्रपिंड रोपन शस्त्रक्रिया, ॲंजिओप्लास्टी शस्त्रक्रिया, कर्करोग आणि उपमार्गे सादक शस्त्रक्रिया यांच्याबाबतीत उपयंत्रे किंमती औषधे खरेदी करता येण्यासाठी संस्थान कर्मचा-यांना साह्य देणेसाठी रु.७५,०००/- एवढी आगाऊ रक्कम मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे अधिकारात देण्याची तरतूद आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१३-१४/०१/२०१२ रोजीचे सभेत निर्णय क्र.६७ अन्वये खालील निर्णय झालेला आहे कि, संस्थान कर्मचारी यांना येथून पुढे वैद्यकीय उपचारासाठी आगाऊ रक्कम मिळणेबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवणेत येऊ नये असे ठरले. त्यामुळे त्यांना सदरील नियमानुसार आगाऊ रक्कम देता येणार नाही.

परंतू विशेषबाब म्हणून द्यावयाची झाल्यास त्यास मा.त्रिसदस्य समितीची मान्यता घ्यावी लागेल. तथापी श्री.बंदावणे यांच्या मुलाला तातडीचा उपचार घेणे गरजेचे आहे. तेंव्हा मा.त्रिसदस्य समितीचे निर्णयास अधीन राहून तुर्तास रु.७,००,०००/- आगाऊ रक्कम दिल्यास, सदर उपचाराची बीले त्यांनी संस्थानमध्ये परतावा मिळणेकामी सादर केल्यानंतर बीलाची रक्कम संस्थान खाती जमा नांवे करता येईल.

सदरचा डी.डी. रुबी हॉल क्लिनिक,पुणे यांचे नांवे देता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर पुढील निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५४५** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, वैद्यकिय कारणास्तव एक विशेष बाब म्हणून अनुदान देणेबाबत शासन निर्णयाचा अभ्यास करुन सदरहू प्रस्ताव फेरसादर करणेत यावा.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२८** **जनहित याचीका क्र.२५/२०१२ मधील चौकशी अधिकारी श्री पी.एस.परांजपे साहेब यांचे चौकशीचे कामकाजाचे बीला संदर्भात ॲडव्होकेट आर.एन.धोर्डे यांचे मार्गदर्शन प्राप्त न झाल्याने उर्वरीत बील अदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे कोर्टात श्री संजय भा. काळे यांनी महाराष्ट्र शासन व इतर यांचे विरुध्द दाखल केलेल्या जनहित याचिका क्रमांक २५/२०१२ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. १०/१२/२०१४ रोजी दिलेल्या आदेशा नुसार चौकशी अधिकारी श्री पी.एस. परांजपे साहेब रिटायर्ड प्रिन्सीपल डिस्ट्रिक्ट जज्ज, यांची नेमणुक करण्यात आली होती.

श्री.ॲड. पी.एस. परांजपे साहेब, चौकशी अधिकारी यांनी दि.२४/०१/२०१५ पासून चौकशीचे कामकाजास सुरुवात केली. ते चौकशीकामी दि. २४/०१/२०१५ , दि. १४/०२/२०१५ व दि. ०८/०३/२०१५ रोजी उपस्थित होते. सदर चौकशीचे कामकाजाचे तीन बीले मा. श्री पी.एस. परांजपे साहेब यांनी दि.१०/०३/२०१५ रोजी संस्थानला सादर केली असुन त्याचा खालील प्रमाणे तपशिल आहे.

| अ.नं. | चौकशीकामी हजर दिनांक | बील / दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १) | दि. २४/०१/२०१५ | पीएसपी /१४-१५/५५<br>दि. १०/०३/२०१५ | २५,०००/- |
| २) | दि. १४/०२/२०१५ | पीएसपी /१४-१५/५७<br>दि. १०/०३/२०१५ | २५,०००/- |
| ३) | दि. ०८/०३/२०१५ | पीएसपी /१४-१५/६०<br>दि. १०/०३/२०१५ | २५,०००/- |
| ४) | इतर खर्च बील | पीएसपी /१४-१५/६२<br>दि. १०/०३/२०१५ | १५,०००/- |
| | | **एकुण रक्कम रुपये** | **९०,०००/-** |

चौकशी अधिकारी, मा. श्री पी.एस. परांजपे साहेब, यांनी मागणी केल्या प्रमाणे तीन तारखांची रक्कम रु.९०,०००/- दिले अदा करणेचे कार्यात्तर मंजूरीस सादर व पुढील येणारे बीले अदा करणेचे निर्णयार्थ सादर असा विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/०५/२०१५ रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र. १४४ अन्वये प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, " जनहित याचीका क्र. २५/२०१२ मधील चौकशीचे कामकाजाकामी चौकशी अधिकारी, मा.श्री.पी.एस.परांजपे साहेब यांना त्यांनी मागणी केल्या प्रमाणे तीन तारखांची रक्कम रु.

९०,०००/- मात्र फी सध्या अदा करण्यात यावी. तसेच चौकशी अधिकारी यांना प्रत्येक तारखेस किती फी द्यावी, याबाबत विधीज्ञाकडून मार्गदर्शन घेण्यात येवून फी निश्चीत करण्यात यावी, अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली असल्याचा निर्णय झालेला आहे."

प्रस्तुत ठरावास अनुसरुन दि.०६/०६/२०१५ रोजीचे मंजूर टिपणीने व जा.क्र. एसएसएस वशी-विधी/ २१६९/ २०१५ दि.२०/०७/२०१५ चे पत्राने कोपरगांव येथील ॲडव्होकेट श्री एस.एम.वाघ, कोपरगांव यांना मा.श्री.पी.एस.परांजपे, चौकशी अधिकारी यांना जनहित याचीका क्र. २५/२०१२ मध्ये चौकशी कामकाजाकामी अदा करावयाचे फी बाबत मार्गदर्शन करणेबाबत विनंती करण्यात आली होती. त्यांनी दि. १४/०८/२०१५ रोजीचे पत्राने खालील प्रमाणे कळविले आहे.

".. श्री परांजपे साहेब यांनी काय कामकाज केले व किती कामकाज केले तसेच मा. हायकोर्टाचे बीलाबाबत काही आदेश होते किंवा काय याबाबत व्यक्तीशा माहिति नसल्याने त्यांच्या कामकाजाची फी किती मंजूर करावी याबाबत मत प्रदर्शन करणे अशक्य आहे.

तथापी संसूथानचे पॅनलवरील ना. हायकोर्टातील वकीलाकडून अथवा याचीका क्रमांक २५/२०१२ मधील संबंधीत आपले पॅनलवरील वकीलाकडून बीलाबाबत मत घेणे योग्य व संयुक्तीक राहील." असे कळविले आहे.

ॲडव्होकेट श्री. एस.एम.वाघ यांनी कळविल्यानुसार पी.आय.एल. २५/२०१२ मध्ये संस्थानचे वतीने कामकाज पाहीलेले, ॲडव्होकेट श्री आर.एन.धोर्डे यांचे वकिलपत्र दिलेले होते. त्यांचेकडून पी.आय.एल. २५/२०१२ मधील चौकशी अधिकारी मा. श्री पी.एस.परांजपे साहेब यांना किती फी द्यावी याबाबत त्यांचे लेखी ओपिनिअन / मार्गदर्शन घेणेचे मान्यतेसाठी व ॲडव्होकेट श्री आर.एन.धोर्डे औरंगाबाद यांना द्यावयाचे पत्रावर स्वाक्षरी होणेसाठी दि.०४/०९/२०१५ रोजी टिपणी सादर करण्यात आली होती. सदरचे मंजूर टिपणी अन्वये जा.क्र. एसएसएस वशी-विधी/ ३३८१/२०१५ दि. १५/०९/२०१५ रोजीचे पत्र ॲडव्होकेट श्री आर.एन.धोर्डे यांना पाठविली होते.

प्रस्तुत पत्राचे अनुशंगाने विधी विभागाचे लिपीक टंकलेखक सालकर यांनी दि.१०/१०/२०१५ रोजी औरंगाबाद येथे ॲडव्होकेट श्री आर.एन.धोर्डे यांची समक्ष भेट घेऊन चर्चा केली असता . त्यांनी असे सांगितले की, श्री पी.एस.परांजपे चौकशी अधिकारी यांना जनहितयाचिका क्रमांक २५/१०१२ मध्ये चौकशीचे कामकाजामध्ये किती फी अदा करावयाची, याबाबत प्रत्येक वकीलांचे वेगवेगळे मत असू शकते. मी एखादी ठरावीक रक्कम सांगितल्यानंतर कोणी हरकत घेण्याची शक्यता नाकाराता येत नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी कोणत्याही प्रकारचे लेखी मार्गदर्शन मी करु शकत नाही, असे ॲड श्री आर एन धोर्डे यांनी तोंडी सांगितले आहे, लेखी दिलेले नाही.

श्री ॲड.पी.एस.परांजपे साहेब चौकशी अधिकारी यांनी दि.१५/६/२०१५ रोजी संस्थानला चार बिले सादर केली असून, त्याचा तपशिल खालील प्रमाणेआहे.

| अ.नं. | चौकशीकामी हजर दिनांक | बील / दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १) | १२/०४/२०१५ | पीएसपी /१५-१६/००१ दि.०१/०६/२०१५ | २५,०००/- |
| २) | १३/०५/२०१५ | पीएसपी /१५-१६/००२ दि.०४/०६/२०१५ | २५,०००/- |
| ३) | १४/०५/२०१५ | पीएसपी /१५-१६/००३ दि.०४/०६/२०१५ | २५,०००/- |
| ४) | १४/०६/२०१५ | पीएसपी /१५-१६/००४ दि.१५/०६/२०१५ | २५,०००/- |
| ५) | इतर खर्च बील | पीएसपी /१५-१६/००५ दि.१५/०६/२०१५ | २०,०००/- |
| | | **एकुण रक्कम रुपये** | १,२०,०००/- |

दि.१५/०६/२०१५ रोजीचे बीलानुसार दि. ३०/०७/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीने श्री पी.एस. परांजपे यांना निम्मी रक्कम रु.६०,०००/- अदा करणेत आलेली आहे. उर्वरीत रक्कम रु.६०,०००/- विधीज्ञाचे मार्गदर्शन मिळाल्यानंतर अदा करावयाची आहे. आतापर्यंत श्री पी.एस.परांजपे यांना रक्कम रु.९०,०००/- + ६०,०००/- = १,५०,०००/- (अक्षरी एक लाख पन्नास हजार मात्र ) रक्कम अदा केलेली आहे.

उपरोक्त परिस्थीतीत श्री.पी.एस.परांजपे, चौकशी अधिकारी यांनी मागणी केलेली चौकशीच्या कामकाजाची उर्वरीत फी रु. ६०,०००/- व यापुढे मागणी केलेली रक्कम अदायीबाबतचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५४६** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, मा.श्री.पी.एस. परांजपे साहेब रिटायर्ड प्रिन्सीपल डिस्ट्रिक्ट जज्ज, यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणुक करतेवेळेस किती फी ठरलेली होती तसेच त्यांनी काय काम केलेले आहे, चौकशी पूर्ण झालेली आहे काय व त्याप्रमाणे मा.उच्च न्यायालयमध्ये अहवाल सादर केलेला आहे काय, यासह सदरहू प्रस्ताव फेरसादर करणेत यावा.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.२९** **M/s Vistas Digital Media Pvt.Ltd., Mumbai यांना द्यावयाची नोटीस वृत्तपत्रातुन प्रसिध्द करणेकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१३/२/२०११ रोजीचे सभेतील विषय नं.५७, निर्णय क्र.५७ नुसार Vistaas Digital Media Pvt Ltd., Mumbai यांना मोबाईलवर श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधा उपलब्ध करुन देणेस व त्याबदल्यात सदर सुविधा पुरविणे बाबत कार्यादेश दिला आहे. परंतु Vistaas Digital Media Pvt Ltd., Mumbai यांना १५ दिवस मुदत देऊनही रक्कम अदा न केल्याने करारनाम्यानुसार Vistas Digital Media Pvt Ltd., Mumbai यांना ॲड.आर.एस. जपे कोपरगांव यांचेमार्फत दि.१/४/२०१५, दि.८/५/२०१५, व दि.१६/६/२०१५ रोजी नोटीस संस्थानने पाठविली असता, सदर नोटीसचे पाकीट सदर कंपनी तो पत्ता सोडुन दुसरीकडे स्थलांतरीत झालेली आहे, त्यामुळे पोस्टाने नोटीस परत आलेल्या आहेत.

संस्थानने Vistas Digital Media Pvt Ltd., Mumbai दिलेल्या पत्यावर दोन वेळेस नोटीस पाठविलेली आहे, परंतु पत्ता चुकीचा /पत्यात बदल असल्याने किंवा नोटीस घेत नसल्याने नोटीसची बजावणी दोन्हीही वेळेस होऊ शकली नाही. ॲड. आर. एस. जपे यांनी दि.०३/०८/२०१५ रोजीचे पत्राने सदर कंपनीचा अचुक पत्ता संस्थांनला उपलब्ध होत नसेल, तर त्याच पत्यावर वर्तमान पत्रात जाहीर नोटीस देण्याची सोय उपलब्ध आहे, असे कळविले आहे.

ॲड. आर.एस जपे यांना जा.नं.एसएसएस/वशी-विधी/३३८३/दि.१५/९/२०१५ रोजीचे पत्राने वृत्तपत्रात जाहीर प्रसिध्द् करावयाचा नोटीसचा मसुदा तयार करुन देणेस विनंती केली, त्यांनी दि.२०/९/२०१५ रोजीचे पत्राने वृत्तपत्रात जाहीर करावयाचे नोटीसचा मसुदा तयार करुन दिलेला आहे. सदर नोटीस मुंबई येथील महाराष्ट्र टाईम्स्, लोकसत्ता या दैनिकांत प्रसिध्द् करणेत यावीत, असेही कळविलेले आहे.

तरी मुंबई येथील महाराष्ट्र टाईम्स्, लोकसत्ता या दैनिक वृत्तपत्रांत संस्थांनचे जनसंपर्क विभागामार्फत जाहिरात प्रसिध्द् करणेस व त्यापोटी येणारे खर्चास मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.५४७** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, M/s Vistas Digital Media Pvt.Ltd., Mumbai यांचेबरोबर झालेल्या कराराची प्रत संस्थान वकिलास दाखविणेत यावी व संस्थान वकिलाच्या अभिप्रायानुसार M/s Vistas Digital Media Pvt.Ltd., Mumbai यांचे बाबतीत संबंधीत मा.न्यायालयामध्ये दिवाणी दावा दाखल करणेत यावा.**

(कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.३०** **दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, राहाता रे.मु.नं.२२१/२०१५, रे.मु.नं.२२२/२०१५, रे.मु.नं.२२३/२०१५ व रे.मु.नं.२२४/ २०१५ मधील निकालाबाबत.**

**प्रस्ताव-** मा.उपविभागीय अधिकारी श्रीरामपुर भाग, श्रीरामपुर यांचे कडील आदेश क्र.एलएक्यु/एसआर/१/२००२ दि.३१/०८/२००५ अन्वये मौजे निमगाव को-हाळे हद्दीतील महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडील क्षेत्र ४५ हेक्टर ६४ आर जमिनीचा भुसंपादन निवाडा जाहीर झालेला आहे. त्यानुसार दि.१०/०१/२००६ रोजी भुसंपादित जमिनीपैकी ४५ हेक्टर ४३ आर जमिनीचा ताबा श्री साईबाबा संस्थान यांना देण्यात आलेला आहे.उर्वरित अतिक्रमित २१ आर क्षेत्राबाबत रे.मु.नं. ६०५/२००५ वादी श्री अशोक दत्तात्रय भालेराव व इतर विरुध्द प्रितवादी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ यांचे स्थावर व्यवस्थापक तसेच रे.मु.नं. १०/२००६ वादी इंदुबाई भाऊसाहेब गोंदकर व इतर विरुध्द प्रतिवादी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ यांचे तर्फे स्थावर व्यवस्थापक, हे दावे कोर्टात चालु असल्याने अतिक्रमित क्षेत्राचा ताबा भुसंपादन विभागास श्री साईबाबा संस्थानला देता आला नव्हता. रे.मु.नं. ६०५/२००५ व रे.मु.नं. १०/२००६ हे दोन्ही दावे मा.कोर्टाने अनुक्रमे दि.३०/०६/२०११ व दि.१०/०७/२०१४ रोजी मा.डिसमिस केलेले आहेत.

मा.तहसिलदार, राहाता यांनी दि.१२/०३/२०१५ रोजीचे पत्रान्वये कळविले की, मौजे निमगाव को-हाळे येथिल २१ आर क्षेत्राचा ताबा शेती महामंडळ लक्ष्मीवाडी यांचेकडुन घेऊन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना देणेकामी मंडलाधिकारी,शिर्डी यांना प्राधिकृत करणेत आलेले आहेत.

त्यानुसार दि.२८/०४/२०१५ रोजी श्री राहुल कोताडे, नायब तहसिलदार. श्री सावंत, मंडळाधिकारी,शिर्डी यांचे उपस्थितीत शिर्डी येथिल परिरक्षण भुमापक श्री पाटील यांनी मो.र.नं.४३३/२००३ दि.१४/०१/२००३ च्या मोजणी नकाशानुसार मौजे निमगाव को-हाळे गट नं.८०, ८५, ८७ व ८८ संस्थानच्या क्षेत्राच्या हद्दी/ खुणा दाखविल्या नुसार प्रत्यक्ष ताबा घेण्याची कार्यवाही बांधकाम विभागाने सुरु केली असता प्रस्तुत प्रकरणी खालील व्यक्तीनी दिवाणी कनिष्ठ स्तर न्यायालय, राहाता येथे दावे दाखल केलेले आहेत

१) रे.मु.नं. २२१/२०१५, श्री रविंद्र दिगंबर बिडवे, २) रे.मु.नं. २२२/२०१५, श्री अशोक दत्तात्रय भालेराव, ३) रे.मु.नं. २२३/२०१५, श्री सुरेश विष्णु वाडेकर, ४) रे.मु.नं. २२४/२०१५, सुरेश सोमनाथ दहिवाडकर, विरुध्द प्रतिवादी १) शिर्डी नगरपंचायत, शिर्डी. २) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी. ३) श्री दत्तात्रय शंकरराव गोंदकर असे अतिक्रमित क्षेत्राचा ताबा घेणेबाबत मनाई हुकुमाचा दावा दि. ०२/०५/२०१५ रोजी दाखल केलेला होता.

प्रस्तुत दाव्यात श्री साईबाबा संस्थानला प्रतिवादी नं.२ केलेले आहे. सदर दाव्यात श्री साईबाबा संस्थानने संस्थानचे पॅनलवरील ॲड.जे.के.गोंदकर यांचे वकील पत्र दाखल करुन भुसंपादनाबाबत संस्थानचे म्हणणे मांडले. परंतु

दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, राहाता कोर्ट नं.२ यांनी दि.०१/०८/२०१५ रोजी खालील प्रमाणे आदेश दिलेला आहेत.

१) दाव्याच्या गुणदोषावर निकाल होईपावेतो दावा मिळकतीवरील वादीच्या शांततामय कब्जे वहिवाटीस प्रतिवादीनी अगर एंजटा मार्फत व इतरांकरवी हरकत अडथळे करुन नये, बांधकाम पाडू नये, अतिक्रमण करु नये अशी तुर्तातुर्ता मनाई हुकुमाचा आदेश प्रतिवादी विरुध्द देण्यात येतो.

२) अर्जाचा खर्च कारणोपकारणे.

उपरोक्त आदेशाबाबत दि.१२/०९/२०१५ रोजीचे मंजुर टिपणी अन्वये संस्थान अॅड.श्रीजे.के.गोंदकर यांचे मार्फत दाव्यातील क्षेत्र मोजणीकामी मे.राहाता कोर्टात दि.२३/०९/२०१५ रोजी अर्ज दिलेला आहे व सदर आदेशाबाबत संस्थान तर्फे मे.अप्पर जिल्हा व सत्र न्यायालय, कोपरगाव येथे दि.२४/०९/२०१५ रोजी अपिल दाखल करणेत आले आहे.

तरी सदर दाव्यात मे. राहाता कोर्टात क्षेत्र मोजणीकामी व मे.अप्पर जिल्हा व सत्र न्यायालय, कोपरगाव यांचे कोर्टात दाखल केलेल्या अपिलकामी येणारे खर्चास व वकिल फी आदा करणेचे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.५४८ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, प्रस्तावितकामी वकीलास किती फी देता येईल व त्यासाठी किती खर्च येईल, याच्या तपशीलासह सदरहू प्रस्ताव फेरसादर करणेत यावा.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

विषय नं.३१ **श्रीमती सुधा किरण, नवी दिल्ली यांचे संस्थानला फ्लॅट देणेचे वील डीड बाबत.**

प्रस्ताव- श्रीमती सुधा किरण, रा. नवी दिल्ली यांनी त्यांचे स्वमालकीचा Sai Chawn, Super HIG Flat No. 179, D-2, Vasant Kunj, New Delhi-110070 येथील फ्लॅट त्यांचे मृत्युनंतर संस्थानने देणगी म्हणुन स्विकारणेबाबत तसेच याबाबत पुढील कायदेशीर प्रक्रिया पुर्ण करणे बाबत विनंती केलेली आहे.

श्रीमती सुधा किरण यांना दि.३१/७/२०१५ रोजी मा. अध्यक्ष महोदय यांनी वील डीड करुन पाठविणेबाबत सुचीत केले होते. त्यानुसार त्यांना मालमत्ता विभाग यांचेमार्फत जा.क्र.Ssst/ Estate/ 3140/ 2015, Dt.01/09/2015 अन्वये वील डीड करुन पाठविणे बाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार श्रीमती सुधा किरण, यांनी दि.२४/९/२०१५ रोजी Ombir Sangwan, Notary, Public Delhi यांचेसमोर केलेले वील डीड पाठविले आहे.

मालमत्ता विभागाने जा.नं. एसएसएस/मालमत्ता /१२५६/२०१५, दि.०६/१०/२०१५ रोजीचे पत्राने श्रीमती सुधा किरण यांचे वील डीड बाबत कायदेशीर बाबी योग्य आहे किंवा कसे? याबाबत विधी विभागाचा अभिप्राय देणे बाबत कळविलेले होते.

सदर पत्रास अनुसरुन जा.क्र. sss/Law/4289/2015, dt-31/10/2015 रोजीचे पत्राने श्रीमती सुधा किरण यांनी त्यांची मिळकत विल डीडने घेणे करीता आवश्यक असणारे खालील कागदपत्र संस्थानला पाठविणेबाबत कळविलेले होते.

1) The property mentioned in the will deed is whether self-acquired Or otherwise.
2) There is no mention about the Heirs of the testator.
3) The intention of the testator executing the will deed in favor of Sansthan.
4) Arrangement regarding Executers of will.
5) The Will Deed is not registered / executed before Registrar.
6) Subjected will deed property as a full owner and except sansthan nobody will have any right in the same.
7) City survey number/ card, sale deed Xerox copy, Heirs of property, search report for 30 years of your advocate, building construction approved plan. Building completion certificate, possession of flat certificate,
8) Details of court matter subjected property.

उपरोक्त पत्र श्रीमती सुधा किरण यांना प्राप्त झालेनंतर त्या शिर्डी येथे आल्या व त्यांनी उपरोक्त मागणी केलेल्या पत्रापैकी नोटीरी विल डीड अटेस्टेड कॉपी, पॅनकार्ड, फ्लॅट त्यांचे नावावर असलेबाबत कागदपत्र, बॅंक स्टेटमेंट सदर मिळकतीवर त्यांनी युनियन बॅंक यांचेकडुन काढलेले कर्जाबाबतचे पेपर, दिल्ली डेव्हलपमेंट अॅथोरेटी यांचे फ्लॅट खरेदी केल्याबाबतचे पत्र व मालकी हक्काचे पत्र ताबा पावती, फ्लॅट नंबर D-2 ऐवजी E-2 बदल केल्याबाबत Executive Engineer, SWD-5/DDA यांचे दि. २६/०४/२०११ चे पत्राची झेरॉक्स इ. कागदपत्र दिले आहे. सदर विलडीड चे Executor श्रीमती सुधा किरण यांचे पती त्यांचे कागदपत्र पॅनकार्ड, रेशनकार्ड, सेशनकार्ड, पत्ता अशी माहिती संस्थानला नंतर पाठवित असल्याचे त्यांनी दि.०९/११/२०१५ रोजी सांगितले.

श्रीमती सुधा किरण यांनी दिलेल्या दि. ०७/११/२०१५ रोजीचे युनियन बॅंकेचे स्टेटमेंट वरुन सदरचे फ्लॅटवर रु. ९,८०,०००/- चे कर्ज बाकी असल्याचे दिसून येते.

तसेच Executive Engineer, SWD-5/DDA यांनी Sh. Devinder Yadav, President. House No 270 Pkt-3 Sector "E" Vasant Kunj. New Delhi-110070 यांना खालील प्रमाणे पत्र दिले आहे.

Subject- Change of Address in Respect of Houses Scheme at Vasant Kunj Near Sultan Garhi.

It is intimated that above housing scheme has been re-designated for the purpose of address and other relative matter which is mentioned below :-

**DDA HOUSING SCHEME SECTOR "E" POCKET -2 VASANT KUNJ NEW DELHI 110070.**

It has been approved by the competent authority and same is communicated for information.

तरी श्रीमती सुधा किरण यांचे वील् डीड स्विकारणे/ न स्विकारणे बाबतचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५४९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीमती सुधा किरण, नवी दिल्ली या वील डीड करु शकतात परंतु त्या प्रॉपर्टीवर संस्थानला देखरेख करता येणे शक्य होणार नाही, याकरीता उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.३२** **श्री साईभक्तांसाठी Queue Management कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेकामी, तिरुपती देवस्थान येथील प्रणालीची पाहणी करणेकामी प्रत्यक्ष भेटीअंती झालेल्या खर्चाची बीले अदा होणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईटेक प्रकल्पाकामी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे बरोबर झालेल्या करारनाम्यानुसार साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करावयाची दर्शन पास (Queue Management- II) कार्यप्रणाली, कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी विकसीत केलेली आहे. सदरच्या कार्यप्रणालीचा मुख्य उद्देश मंदिर परिसरात होणाऱ्या श्री साईभक्तांच्या गर्दीचे व्यवस्थापन व श्री साईभक्तांचे वेळेचा सदुपयोग असा आहे. कार्यप्रणाली अंतर्गत शिर्डी येथे विविध ठिकाणी दर्शन पास वितरीत करण्याकरीता काऊंटर्स उपलब्ध करुन देणे प्रस्तावीत आहे. कार्यप्रणालीप्रमाणे दर्शनासाठी उपलब्ध वेळेची विविध भागांमध्ये विभागणी करण्यात येणार आहे. सदर वेळेमध्ये सद्यपरिस्थितीत दर्शन घेणाऱ्या श्री साईभक्तांच्या संख्येइतक्या साईभक्तांना पास वितरीत करण्यात येणार आहे. सदर वेळेचे व श्री साईभक्तांचे संख्येचे नियोजन परिस्थितीनुरुप बदलण्याची सुविधा कार्यप्रणालीमध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

परंतु मा. जिल्हाधिकारी सो., यांनी तिरुपती देवस्थान येथे दर्शन पास (Queue Management) प्रणाली विकसित केलेल्या मे.त्रिलोक सिक्युरीटी सिस्टीम्स इंडीया प्रा. लि. बैंगलोर यांना दर्शन पास (Queue Management) कार्यप्रणालीचे सादरीकरण करणेसाठी बोलविणेबाबत निर्देश दिले होते.त्यानुसार मा. व्यवस्थापन समितीचे दि. 20/08/2015 रोजीचे सभेत Queue Management कार्यप्रणालीचे सादरीकरणाच्या वेळी मे. त्रिलोक सिक्युरीटी सिस्टीम्स इंडीया प्रा. लि. बैंगलोर चे संचालक श्री श्रीनिवासराव हे उपस्थित होते. त्यांनी भारतातील तिरुपती देवस्थान, वैष्णोदेवी, बाबा अमरनाथ अशा अनेक देवस्थानच्या ठिकाणी ही कार्यप्रणाली विकसित केलेली असुन त्या धर्तीवर शिरडी येथे तयार करावयाच्या दर्शन पास प्रणालीचे सादरीकरण सभेस दाखविले, सभेने विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली. या प्रणालीमध्ये आवश्यक असलेले संगणक, प्रिंटर्स, प्रिंटर्ससाठी लागणारे कागद व इतर अनुषांगीक तांत्रिक संगणकीय साहित्य व मनुष्यबळ हे सर्व त्यांचेच राहील, असे सदर प्रतिनीधीने सभेस अवगत केले. साईभक्तांना देण्यात येणाऱ्या प्रत्येक कार्डमागे संबधीत कंपनी सरकारी योजनांची जाहिरात करणार आहे व त्यामागे त्यांना भारत सरकारकडुन त्याचा मोबदला मिळणार असल्याने सदरहु काम ते विनामुल्य करणार आहे. संस्थानमार्फत त्यांना फक्त जागा, विज व कनेक्टीव्हीटी उपलब्ध करुन द्यावी लागेल अशी माहिती त्यांनी सभेस दिली.

त्यानुसार सदर सभेत चर्चेअंती दर्शनपास कार्यप्रणालीमध्ये साईभक्तांना मिळणाऱ्या दर्शनपासवर दर्शनासाठी जाण्याची वेळ असणार आहे. त्यामुळे साईभक्त नेमुन दिलेल्या वेळेतच दर्शनासाठीच्या गेटवर जातील व अनावश्यक गर्दी होणार नाही, यामुळे साईभक्तांच्या वेळेची बचत होईल व गर्दीचेही व्यवस्थापन होऊ शकेल. याकरीता मे. त्रिलोक सिक्युरीटी सिस्टीम्स इंडीया प्रा. लि. बैंगलोर यांनी इतर देवस्थानच्या ठिकाणी बसविलेल्या दर्शनपास (Que Management) कार्यप्रणालीची प्रत्यक्ष पाहणी करावी व त्या देवस्थासोबत केलेल्या कराराचा अभ्यास करुन सविस्तर प्रस्ताव त्या करारासह सभेसमोर सादर करावा. तसेच दर्शन पास Queue Management कार्यप्रणाली राबविणेसाठी सदरहु कंपनीकडुन संस्थान परिसरातील वेगवेगळया ठिकाणी जागा, विज व कनेक्टीव्हीटी उपलब्ध करुन देणेबाबत व त्यांचे अधिकारी, कर्मचारी यांचे करीता निवास, भोजनाची विनामुल्य व्यवस्था करणेचाही उल्लेख सदरहु प्रस्तावामध्ये करण्यात यावा, असे ठरले.

त्यानुसार व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार दि. 28/10/2015 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये मा.कार्यकारी अधिकारी सो., मा.उप-कार्यकारी अधिकारी सो., उपकार्यकारी अभियंता श्री आहेर सो., बांधकाम विभाग व माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख श्री गवळी सो., यांनी तिरुपती देवस्थान येथे दि. 01/11/2015 ते दि. 03/11/2015 पर्यंत प्रत्यक्ष जाऊन मे.त्रिलोक सिक्युरीटी सिस्टीम्स इंडीया प्रा. लि. बैंगलोर यांनी तिरुपती देवस्थानच्या ठिकाणी बसविलेल्या दर्शनपास (Que Management) कार्यप्रणालीची पाहणी करण्यात आली आहे.

सदरकामी तिरुपती येथे जाणेसाठी पुणे ते चैन्नई व शिरडी येथे येणेसाठी चैन्नई ते पुणे असा प्रवास विमानाने केला असुन सदर प्रवास भाडया करीता एकुण रक्कम रुपये 34,000/- मात्र इतका खर्च झाला असुन दि. 28/10/2015 रोजीच्या बीलाची रक्कम Hasmukh Travel Agent (Pune) Pvt.Ltd., यांचे खात्यावर संस्थान नियाप्रमाणे लेखाशाखा विभागामार्फत चेक/डीडी किंवा RTGS व्दारे अदा करणेस तसेच प्रवासदरम्यान दि.

01/11/2015 व दि.03/11/2015 रोजी अन्वये जवणाचे बीलाकामी एकुण रक्कम रुपये 540/- मात्र श्री किशोर साहेबराव गवळी यांनी रोखीने भरलेले असुन त्यांना संस्थान नियमाप्रमाणे लेखाशाखा विभागामार्फत चेक/डीडी किंवा RTGS स्वरुपात अदा करणेचे मान्यतेस्तव प्रस्ताव दि. 06/11/2015 रोजी सादर करण्यात आला होता. परंतु सदर प्रस्तावावर मा. उपकार्यकारी अधिकारी सो., यांनी मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेनंतर अदा करणेस मान्यता असावी, असे निर्देश दिले आहे. त्यानुसार सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.५५०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईभक्तांसाठी Queue Management कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेकामी, तिरुपती देवस्थान येथील प्रणालीची पाहणी करणेकामी प्रत्यक्ष भेटीअंती झालेल्या खर्चाची बीले अदा करणेस मान्यता देण्यात आली. तसेच तिरुपती देवस्थान येथील भेटीबाबतच्या अहवालाच्या प्रती मा.अध्यक्ष व सदस्य यांना पुरविणेत याव्यात, असे ठरले.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.३३** **संस्थानचे दैनंदिन कामकाजासाठी प्रिंटर्स खरेदी प्रक्रिया होईपर्यंत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे SOW/ करारनाम्यानुसार Printech InfoTech services Pvt.Ltd. Pune यांचे प्रिंटर मासिक भाडेतत्वावर घेऊन बील अदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुद :** कलम 17(1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :** दि. 07/11/2009 रोजीचे सभेतील निर्णक क्र. 799.

**प्रस्ताविक:** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 07/11/2009 रोजीचे सभेतील निर्णय क्र.799 नुसार Saitech Project उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली असून, सदर कार्यवाहीसाठी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे. साईटेक प्रकल्पामध्ये एकुण 168 संगणक संच, 18 सर्व्हर, 20 युपीएस संस्थानने खरेदी केलेले आहे. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेशी करण्यात आलेल्या SOW व करारनाम्यानुसार साईटेक प्रोजेक्ट अंतर्गत कार्यालयीन वापरासाठी संगणके पुरविण्यात आलेली असून प्रिंटरसाठी त्यांचेमार्फत Printech infotech Services Pvt. Ltd., Pune कंपनीशी करारनामा करण्यात आलेला आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे एकूण 118 प्रिंटर Printech infotech Services Pvt. Ltd., Pune या कंपनीमार्फत संस्थानमध्ये सद्यस्थितीत उपलब्ध असुन कार्यरत आहे.

| Description | Model | Free Printouts / Month | Additional Printout Rates INR | Total Printer Quantity |
|---|---|---|---|---|
| DMP 80 Column | Wep 800 DX or Wep Bonti Or Wep LX 540 | Unlimited | 0.00 | 40 |
| DMP 132 Column | Wep LQDSI 5232 or Wep LQ 1050 | Unlimited | 0.00 | 2 |
| A4 Color Inkjet | HP Photosmart D7100/7200 or Canon 4760 | 500 | 5.00 | 2 |
| Line Printer with print server | Wep P500 | 20000 | 0.25 | 2 |
| A3 Printer Duplex & Network | Canon LBP 3500 or HP 5200 | 12000 | 0.70 | 4 |
| Darshan Pass Laserjet | Canon LBP 3310 or Canon or 2010 or HP 3005 | 10000 | 0.60 | 20 |
| Laserjet for Individual User | HP LJ P1007/1008 or Canon LBP 2900 | 1000 | 0.75 | 36 |
| Certificate Printing | HP LJ 100 P1007/1008 or Canon LBP 2900 | 1000 | 0.75 | 5 |
| MFD Printer + Scanner | HP LJ 1120N/1319N/1522N | 2500 | 0.70 | 7 |
| | | | Total Printers | 118 |

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांचे करारनाम्यातील अटी शर्तीमधील मुद्दा क्रं. 3.2 नुसार पहिल्या 05 वर्षाचे प्रिंटरचे मासिक भाडे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे हे अदा करणार आहेत. त्यामध्ये डॉट मॅट्रीक्स प्रिंटरला कुठल्याही प्रकारचे चार्जेस लागणार नसून लेजर प्रिंटरचे प्रकारानुसार मासिक ठरावीक मर्यादे पर्यंत चार्जेस पडणार नसून ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा जास्त वापर झाल्यास त्याचे चार्जेस संस्थानला अदा करावे लागणार असल्याचे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांचे SOW मध्ये नमूद आहे.

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांचे SOW नुसार माहे डिसेंबर 2015 अखेर एकुण 118 प्रिंटर्सपैकी 37 नग प्रिंटर्सचा 05 वर्षाचा आऊटसोर्स कालावधी खालील तपशिलात नमुद केलेनुसार संपुष्टात येत असल्याने Printech infotech Services Pvt. Ltd., Pune हे केव्हाही सदरचे प्रिंटर्सची सेवा बंद करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

| अ.नं. | माहे | मुदत संपुष्टात येत असलेल्या प्रिंटर्स | एकुण |
|---|---|---|---|
| 01 | ऑगष्ट -2015 | Epson LQ 300+ | 10 |
| 02 | सप्टेबंर-2015 | Epson LQ 300+ | 01 |
| 03 | ऑक्टोबंर -2015 | Epson LQ 300+ 18 नग<br>लेझर प्रिंटर P1007 05 नग<br>A-3 लेझर प्रिंटर 01 नग | 24 |
| 04 | नोव्हेबंर-2015 | Zebra Printer | 02 |
| | | **एकुण** | 37 |

Printech infotech Services Pvt. Ltd., Pune यांचेकडे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत देण्यात आलेल्या प्रिंटर्स आऊटसोर्समध्ये प्रिंटर्स पुरवीणे व त्याची दुरुस्ती देखभाल करणे, प्रिंटर्स रिबन बदलणे, प्रिंटर्स टोनर बदलणे, प्रिंटर्स हेड, केबल, बदलणे इत्यादी प्रिंटर्स संबधीत सर्व कामे कंपनीचे तांत्रिक प्रतिनिधींमार्फत ऑनसाईट केले जातात व प्रत्येक प्रिंटर्सचे मॉडेलनुसार कंपनीने मोफत पाने प्रिंट करण्याची सुविधा दिली आहे. तसेच कंपनीने दिलेली मोफत पाने प्रिंट झालेनंतर वाढीव पानांचे बील संस्थानला अदा करावे लागण्याची तरतुद करारनाम्यामध्ये नमुद आहे.

त्यानुसार संस्थानमध्ये विविध विभागांमध्ये सद्यस्थितीत वापरात आलेले आऊटसोर्स प्रिंटर्सचा कालावधी संपुष्टात येणेचे आत खालील तपशिलातील नमुद प्रिंटर्स नव्याने संस्थानचे विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रियेव्दारे खरेदी करणेकामी दि. 13/08/2015 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळालेनंतर खरेदी प्रक्रियेस संस्थानचे विहित पध्दतीने कार्यवाही होणेस विलंब लागु शकतो.

सदरबाब दि. 06/10/2015 रोजी मा. कार्यकारी अधिकारी सो., यंाचेशी निदर्शनास आणुन देऊन कंपनीचे प्रतिनिधीसमवेत समक्ष चर्चा करण्यात आली त्यानुसार प्रिंटर्स खरेदी प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत अत्यावश्यक सेवेचा विचार करता कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे करारत ठरलेल्या दरानुसार संबधीत कंपनीस प्रिंटर्सचे मासिक बील अदा करणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा, असे सुचविले आहे. त्यानुसार Printech infotech Services Pvt. Ltd., Pune यांनी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे करारात ठरल्यापेक्षाही संस्थानला कमी दर देऊ केले असुन त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

**Commercial Proposal**

| Models | कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी चार्जेस | प्रिटेक सोल्युशन चार्जेस | फ्रि A-4 पाने | वाढीव प्रत्येक पान | आवश्यक प्रिंटर्स | दरमहा खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| Epson LQ300+ | 2000 | 1800 | Unlimited | N.A | 30 | 54,000 |
| A3-Canon LBP 3500 | 10000 | 9000 | 12000 | 0.70 | 01 | 9000 |
| HP LJ P1007/ HP LJ 1020/ Brother2361 DW | 900 | 900 | 1000 | 0.75 | 08 | 7200 |
| Line Printer | 5000 | 4000 | 20000 | 0.25 | | |
| Canon LBP 3300 | 5600 | 5000 | 10000 | 0.60 | | |
| HP LJ M1005 MFP Brother 2541 DW | 3000 | 2500 | 2500 | 0.70 | | |
| LQ 1150 | 3000 | 2500 | Unlimited | N.A | | |
| HP Ink Advantage 5525 | 3500 | 3500 | 500 | 5.00 | | |
| Zebra Printer | 900 | 900 | Unlimited | | | |
| एकुण | | | | | | 70,200/- |
| वाढीव पाने चार्जेस | | | | | | 30,000/- |
| सर्व्हीस टॅक्स 14% | | | | | | 14,000/- |
| एकुण पुर्णांकीत रक्कम | | | | | | **1,14,200/-** |

मा.कार्यकारी अधिकारी सो., यांचे निर्देशानुसार प्रिंटर्स खरेदी प्रक्रिया संस्थानचे विहित पध्दतीने पुर्ण होईपर्यंत अत्यावश्यक सेवेचा विचार करता कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे करारत ठरलेल्या दरापेक्षाही Printech infotech Services Pvt. Ltd., Pune यांनी संस्थानला यांनी दि. 12/10/2015 रोजीचे ई-मेल प्रस्तावामध्ये कमी दर देऊ केले असल्याने त्यांचेकडुन उपरोक्त नमुद तपशिलातील प्रिंटर्स भाडेतत्वावर घेता यईल.

**मागणी :** उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे नविन प्रिंटर्स संस्थानचे विहित पध्दतीने खरेदी प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत अत्यावश्यक सेवेचा विचार करता कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे करारत ठरलेल्या दरापेक्षाही Printech infotech Services Pvt. Ltd., Pune यांनी संस्थानला कमी दर देऊ केले असल्याने त्यांचेकडुन उपरोक्त नमुद तपशिलातील प्रिंटर्स त्यांचेकडुन भाडेतत्वावर घेणेस व त्याकामी त्यांना त्यांचे मासिक बील अदा करणेकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 1,25,000/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यता घेणेकामी सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** तांत्रिक, अर्थिक व प्रशासकीय.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** उपरोक्त प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे नविन प्रिंटर्स संस्थानचे विहित पध्दतीने खरेदी प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत अत्यावश्यक सेवेचा विचार करता कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे करारत ठरलेल्या दरापेक्षाही Printech infotech Services Pvt. Ltd., Pune यांनी संस्थानला कमी दर देऊ केले असल्याने त्यांचेकडुन उपरोक्त नमुद तपशिलातील प्रिंटर्स त्यांचेकडुन भाडेतत्वावर घेणेस व त्याकामी त्यांना त्यांचे मासिक बील अदा करणेकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 1,25,000/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.५५१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणा-या अंदाजे रु.१,२५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.३४** **साईटेक प्रकल्पाअंतर्गत IRINN या संस्थेकडून 256 statice IP व AS Number या सुविधेचे रजिस्टेशन व अनुषंगीक कामे पाहणेसाठी श्री.राहुल कुरकुरे-होस्ट-ईन सर्व्हिसेस प्रा.लि.पुणे यांनी कुठल्याही प्रकारचे मानधन व देता त्यांचेकडून मार्गदर्शन घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** **मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र :** दिनांक 05/06/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 398.

**प्रास्ताविक :** श्री साईभक्तांना online.sai.org.in या वेबसाईटवर अद्यायावत सेवा, सुविधा पुरविणेकामी BSNL व Airtel यांची इंटरनेट सुरु करण्यात आलेली आहेत. बीएसएनएल यांचेकडून 10 एमबीपीएस ची इंटरनेट लिंक काही तांत्रिक अडचणीमुळे बंद पडल्यास, सदर वेबसाईट वरील सेवा सुविधा अखंडीतपणे चालू राहणेसाठी Airtel यांची इंटनेट लिंक ऑटोमेटीक (स्वयंचलितपणे) चालू राहणेसाठी APNIC या संस्थेकडून 256 Statice IP व AS Number घेणेसाठीचे प्रत्यक्ष खर्चास, तसेच सदर सुविधेचे रेजिस्ट्रेशन श्री राहुल कुरकुरे यांचेमार्फत (कुठल्याही प्रकारचे मानधन न देता) करणेस मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 06/04/2012 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 351 नुसार मान्यता देण्यात आली होती.

APNIC या संस्थेकडून 32 Statice IP व AS Number घेणेसाठीचे रजिस्ट्रेशन व अनुषंगीक कामे करणेसाठी श्री राहुल कुरकुरे- होस्ट-ईन सर्व्हीसेस् प्रा. लि. यांची कुठल्याही प्रकारचे मानधन न देता त्यांची सदरकामी जा.नं. एसएसएसटी/आयटी/ ९०६/२०१२ दिनांक ३०/०५/२०१२ रोजीचे कार्यादेशाअन्वये कन्सलटंन्ट म्हणुन एक वर्षाचे कालावधीकरीता नेमणूक करण्यात आलेली होती. त्यानुसार 256 Statice IP व AS Number दिनांक 04/09/2012 रोजी घेण्यात आलेले असून, दिनांक 30/09/2013 रोजी त्याची मुदत संपली होती. त्यावेळी सदर कामी भारतात सेवा देणारी कोणतीही संस्था कार्यरत नव्हती.

परंतु यावर्षी IRINN नावाची कंपनीने सदर सुविधा पुरविणेस सुरवात केलेली असलेबाबत श्री कुरकुरे यांनी, सुचविले होते. त्यानुसार IRINN कडून सदर सुविधेबाबत मा. श्री. रमणी सो यांना कळविले असता, दि. 19/09/2013 व दि.25/09/2013 रोजीचे ई-मेलव्दारे त्यांनी सदर सुविधा घेणेबाबत कळविलेले होते. त्यास अनुसरुन श्री राहुल कुरकुरे यांना दिनांक 05/06/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 398 नुसार दि. 01/10/2014 ते दि. 30/09/2015 पर्यंत नेमणुक कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदर कालावधीत त्यांनी विनामोबदला मार्गदर्शन केले असुन त्यांचा कालावधी दि. 30/09/2015 रोजी संपुष्टात आला असल्याने त्यांनी दिनांक 16/10/2015 रोजीचा ई-मेल अन्वये या पुढेही कुठल्याही प्रकारचे मानधन न घेता मार्गदर्शन करणेकामी कळविलेले आहे. त्यानुसार त्यांना पुढील तिन वर्षांसाठी कुठल्याही प्रकारचे मानधन न देता त्यांचेकडुन उपरोक्त नमुद कामासंबंधी त्यांचे मार्गदर्शन, सहकार्य घेणेकामी त्यांना पत्र देणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल.

**मागणी:** उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे IRINN या संस्थेकडून 256 Statice IP व AS Number या सुविधेचे रेजिस्ट्रेशन व अनुषंगीक कामे पहाणेसाठी श्री राहुल कुरकुरे होस्ट-ईन सर्व्हीसेस् प्रा. लि. पुणे यांना दिनांक ०५/०६/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ३९८ नुसार दि. २०/०८/२०१४ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला होता. सदरचा कालावधी दि. 30/09/2015 रोजी संपुष्टात आला असल्याने त्यांना पुढील तिन वर्षांसाठी कुठल्याही प्रकारचे मानधन न देता त्यांचेकडुन उपरोक्त नमुद कामासंबंधी त्यांचे मार्गदर्शन, सहकार्य घेणेकामी त्यांना पत्र देणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** तांत्रिक व प्रशासकीय.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:** उपरोक्त प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे IRINN या संस्थेकडून 256 Statice IP व AS Number या सुविधेचे रेजिस्ट्रेशन व अनुषंगीक कामे पहाणेसाठी श्री राहुल

कुरकुरे होस्ट-ईन सर्व्हीसेस् प्रा. लि. पुणे यांना दिनांक ०५/०६/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ३९८ नुसार दि. 20/08/2014 अन्वये कार्यादेश देण्यात आलेला होता. सदरचा कालावधी दि. 30/09/2015 रोजी संपुष्टात आला असल्याने त्यांना पुढील तिन वर्षांसाठी कुठल्याही प्रकारचे मानधन न देता त्यांचेकडुन उपरोक्त नमुद कामासंबंधी त्यांचे मार्गदर्शन, सहकार्य घेणेकामी त्यांना पत्र देणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

निर्णय क्र.५५२ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, साईटेक प्रकल्पाअंतर्गत IRINN या संस्थेकडून 256 statice IP व AS Number या सुविधेचे रजिस्टेशन व अनुषंगीक कामे पाहणेसाठी व त्यासंबंधी मार्गदर्शन घेणेसाठी श्री.राहुल कुरकुरे, होस्ट-ईन सर्व्हीसेस प्रा.लि., पुणे यांची नेमणूक करणेऐवजी याकामी वर्तमान पत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, अर्जांची मागणी करणेत यावी. तसेच श्री.राहुल कुरकुरे, होस्ट-ईन सर्व्हीसेस प्रा.लि., पुणे यांनाही सदरहू जाहिरातीस अनुसरुन अर्ज करावा, असे कळविणेत यावे.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

विषय नं.३५ **संस्थानचे वेबसाईटसाठी स्वतंत्र भाडेतत्वावर घेणेत आलेल्या वेब सर्व्हर जागेचे (Web Space) नुतनीकरण करणे व पुढील खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम 2004 मधील तरतुद** : कलम 17 (2) झ नुसार.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.**: मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 06/04/2012 रोजीचे सभेतील निर्णय क्र.352. 2) मा. व्यवस्थापन समितीचे दि.12/06/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.507.

**प्रास्ताविक**: श्री साईभक्तांना संस्थान विषयी माहिती-सेवा उपलब्ध करुन देणेसाठी संस्थानची स्वत:ची अधिकृत वेबसाईट (website) url :- www.shrisaibabasansthan. org या नावाने दिनांक 21 नोव्हेबर, 1998 पासून सुरु केलेली आहे. या वेबसाईटसाठी आवश्यक असणाऱ्या वेबसर्व्हर होस्टींगचे काम Institute of Advanced Studies, Nagpur ही संस्था पुर्वीपासुन पाहत आहे.

उपरोक्त वेबसाईटवर श्री साईबाबा संस्थान संदर्भात सर्व साहित्य Live Darshan, Donation, Sailila, RTI इत्यादी माहिती साईभक्तांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.12/06/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.507 मध्ये नमुद केलेनुसार Institute of Advanced Studies, Nagpur यांनी जास्त क्षमता असलेला सर्व्हर संस्थानचे वेबसाईट होस्टींग करीता वापरण्यास सुरुवात केली आहे. सदर सर्व्हरचे Configuration खालील प्रमाणे.

| **Configuration** | |
|---|---|
| Processor :- | Core 2 duo 2.6 ghz x 2 |
| Storage :- | Dual Hard drive, Secondary for Backup-250 GB x 2 |
| Operating System: - | Windows 2008 Server OS 64 Bit. |
| Ram:- | 4 GB Memary |
| Network: - | 100 MBPS Network Port. |
| Bandwidth: - | 750 GB Monthly Bandwidth |

संस्थानचे वेबसाईटवर विविध बँकेमार्फत पेमेंट गेटवेव्दारे देणगी स्विकारणेची सुविधा, श्री साईभक्तांसाठी वेबसाईटवर ऑनलाईन दर्शन सुविधा, तसेच संस्थानची विविध माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. या सर्व्हरव्दारे श्री साईभक्तांसाठीच्या सर्व सुविधा अतिशय सुरळीत चालू आहे. संस्थानचे वेबसाईटच्या Hosting ची मुदत दिनांक 31 मार्च, 2015 अखेर संपुष्टात आली असुन दि. 28/09/2015 रोजीचे बील इकडील विभागास प्राप्त झाले आहे. संस्थानची वेबसाईट व पेमेंट गेटवे इत्यादी सुविधा श्री साईभक्तांसाठी सुरळीत चालू ठेवणेकामी सदर जागेचे नूतनीकरण करणे अत्यावश्यक आहे.

**मागणी**: प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे Institute of Advanced Studies, Nagpur या संस्थेमार्फत People Connect Managed Servers या कंपनीकडून उपरोक्त वेबसर्व्हरवर घेण्यात आलेल्या जागेचे दिनांक 01/04/2015 ते दिनांक 31/03/2016 या एक वर्षाचे कालावधीसाठी नूतनिकरण करणेसाठीचे दरपत्रक दि. 28/09/2015 रोजी प्राप्त झाले असून, त्यानुसार त्यांना एक वर्षासाठी रक्कम रुपये 95,000/- (सर्व करांसहीत) मात्र तसेच पुढील दि. 01/04/2016 ते दि. 31/03/2017 या एक वर्षाकरीता नुतनिकरण करणेकामी अंदाजे रक्कम रुपये 1,50,000/- (सर्व करांसहीत) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान** : तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत**: प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे Institute of Advanced Studies, Nagpur या संस्थेमार्फत People Connect Managed Servers या कंपनीकडून उपरोक्त वेबसर्व्हरवर घेण्यात आलेल्या जागेचे दिनांक 01/04/2015 ते दिनांक 31/03/2016 या एक वर्षाचे कालावधीसाठी नूतनिकरण करणेसाठीचे दरपत्रक दि. 28/09/2015 रोजी प्राप्त झाले असून, त्यानुसार त्यांना एक वर्षासाठी रक्कम रुपये 95,000/- (सर्व करांसहीत) मात्र तसेच पुढील दि. 01/04/2016 ते दि. 31/03/2017 या एक वर्षाकरीता

नुतनिकरण करणेकामी अंदाजे रक्कम रुपये 1,50,000/- (सर्व करांसहीत) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.५५३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे वेबसाईटसाठी स्वतंत्र भाडेतत्वावर घेणेत आलेल्या वेब सर्व्हर जागेचे (Web Space) नुतनीकरण करणेकामीच्या उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.३६** **श्री.के.व्ही.रमणी अध्यक्ष, आयटी कमीटी यांनी संस्थानचे साईटेक प्रकल्पावर सल्लागार व मार्गदर्शन विनामोबदला केल्याने त्यांना आभारपत्र देणेस व त्यांनी दिलेल्या निवेदनाची तसेच प्रकल्पावर केलेल्या कामकाजाची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद :** कलम १७ (१) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं. :** १) दि. ०६/०९/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ७३४.
२) दि.१७/०९/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ७०५.

**प्रास्ताविक:** मा व्यवस्थापन समीतीचे दि. ०६/०९/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ७३४ अन्वये, आय टी कमीटी अध्यक्ष- श्री के.व्ही.रमणी यांची नेमणुक पाच वर्षासाठी केलेली होती. साईटेक प्रकल्पाचे काम बाकी असल्याने मा. व्यवस्थापन समीतीचे दि. १७/०९/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ७०५ अन्वये श्री. के.व्ही.रमणी यांना त्यांची मुदत संपुष्टात आलेपासुन पुढील दोन वर्षाकरीता त्याच अटी शर्तीवर दि. ३०/०९/२०१५ अखेर मुदतवाढ देण्यात आलेली होती. त्यानुसार दि.३०/०९/२०१५ रोजी त्यांची मुदत संपुष्टात आली आहे. सदर सात वर्षाच्या कालावधीमध्ये आयटी कमिटीने केलेल्या कामाचा सविस्तर गोषवारा संबंधीचा प्रस्ताव श्री के.व्ही. रमणी यांनी संदर्भ क्रं.०१ चे निवेदनाव्दारे मा. अध्यक्ष सो., यांना पाठविला होता. सदर निवेदनावर मा. अध्यक्ष सो., व मा. कार्यकारी अधिकारी सो., यांनी सदर निवेदनाची नोंद घेणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेबाबत सुचविलेले आहे.

त्यानुसार श्री के.व्ही. रमणी यांनी संदर्भीय निवेदनात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, व्यवस्थापन, अधिकारी, आयटी विभाग आणि पुरवठाधारक यांना खालीलप्रमाणे मार्गदर्शनपर मुद्दे विशद केले आहे.

१. संस्थानचे सर्व विभागाची कार्यक्षमता तसेच विभागांमध्ये कामकाजाची गतीमानता यावी. तसेच श्री साईभक्तांना उत्कृष्ट सेवा तत्परतेने प्रदान करण्याचे दृष्टीने साईटेक प्रकल्पाची निर्मीती करण्यात आली आहे.

२. साईटेक प्रकल्पाचे Designed Statement of work हे BOT तत्वावर करण्यात आले आहे. सदरकामी संस्थानचे विहित पध्दतीने कार्यवाही करण्यात येऊन मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार साईटेक प्रकल्प BOT तत्वानुसार कामकाज करणेकामी एकुण ६९ महिन्यांकरीता कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना याकामी कार्यादेश देण्यात आला आहे.

३. साईटेक प्रकल्पातील सर्व ३७ कार्यप्रणाली आणि अतिरिक्त ऑनलाइन कार्यप्रणाली कार्यान्वीत करण्यात आल्या असुन त्या यशस्वीपणे मागील काही वर्षापासुन सुरळीतपणे चालु आहे.

४. साईटेक प्रकल्प कार्यान्वीत झाल्यापासुन त्याचे दैनंदिन कामकाजासंबधीचे रिपोर्टस् आठवडयातील Status Report तसेच आठवडयातील Conference call आणि Monthly Report चा सखोल परिक्षण करुन सर्व कार्यप्रणाली सुरळीत सद्यस्थितीत कार्यान्वीत आहेत.

५. साईटेक प्रकल्पातील सर्व ३७ आणि ऑनलाइन कार्यप्रणालीचे खालील संस्थांनी लेखापरीक्षण करुन सर्व System Approved केलेल्या आहेत.

  a. महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रसंचनालय विभाग.
  b. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी नियुक्त केलेल्या Oracle Certified ERP System Auditor.
  c. संस्थानचे लेखाशाखा विभागाने नियुक्त केलेल्या Chartered Accountant Auditor.
  d. उपरोक्त तिनही लेखापरीक्षण एजन्सीने सुचविलेल्या सुधारणा System मध्ये करण्यात आलेल्या आहेत.
  e. सर्वांनी साईटेक System तपासल्या असुन त्यातील Processes and Application Implementation हे Approved केले आहे.

६. साईटेक प्रकल्पाच्या System मध्ये करावयाचे बदल, सुधारणा, दोष तसेच अतिरिक्त आवश्यकतेनुसार नविन Requirement हे Eventum System या कार्यप्रणाली मध्ये LOG IN केल्या जातात. सदर LOG IN केलेल्या त्रुटी हया दैनंदिन स्वरुपात तपासण्यात येऊन त्याची लवकरात-लवकर अंमलबजावणी करण्यात येऊन त्रुटींचे निरसण झाल्याची खात्री झालेनंतरच Eventum System मधुन सदर कॉल पुर्ण केला जातो.

७. साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत असलेले IT Hardware, LAN, WAN Infrastructure इत्यादी संबंधी काही त्रुटी असल्यास त्या OTRS (Open source Ticket Request System) मध्ये LOG IN केल्या जातात. सदर LOG IN केलेल्या त्रुटी हया दैनंदिन स्वरुपात तपासण्यात येऊन, त्याची लवकरात लवकर अंमलबजावणी करण्यात येऊन त्रुटींचे निरसण झाल्याची खात्री झालेनंतरच त्या OTRS (Open source Ticket Request System) मधुन सदर कॉल पुर्ण केला जातो.

८. साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या सर्व महत्वाचे System मधुन दि. २८/०९/२०१५ अखेर संस्थानला खालीलप्रमाणे फायदे झालेले आहेत.

A)

| No | Activity | No of transactions | No of devotees | Income to Sansthan Rs. In Crores |
|---|---|---|---|---|
| 1 | Online bookings | 12,91,572 | 42,32,904 | 94.38 |
| 2 | Info centers in 4 cities | 29,746 | 1,48,390 | 3.59 |
| 3 | **Total new income to Sansthan** | **13,21,318** | **43,81,294** | **97.97** |
| 4 | Income from existing systems in Shirdi | 1,68,76,755 | 3,55,14,554 | 380.23 |
| 5 | **Total income to Sansthan from SaiTech** | **1,81,98,073** | **3,98,95,848** | **478.21** |

**B)** एकुण कार्यप्रणालीतील बदल, नविन मागण्या आणि दोषासंबधी Eventum System मध्ये Track झालेले मुद्दे.
एकुण मुद्दे होते :- 3389, निराकरण : 3389, प्रलंबित : शुन्य
वरील मुद्दे निराकरण करणेसाठी लागलेला सरासरी वेळ : 1.75 दिवस.

**C)** IT Hardware, LAN, WAN Infrastructure इत्यादी संबधी OTRS (Open source Ticket Request System) मध्ये Track झालेले मुद्दे.
एकुण मुद्दे होते -: १४३८१, निराकरण : १४३८१ प्रलंबित : शुन्य
वरील मुद्दे निराकरण करणेसाठी लागलेला सरासरी वेळ : २२० मिनिट

**D)** ऑपरेशन आणि कार्यक्षमता

१. संस्थानचे सर्व विभागांचे संगणकीकरण करण्यात येऊन त्यामुळे अंगमेहनतीचे काम कमी होऊन, कामकाजात गती निर्माण होऊन त्रुटीचे प्रमाण कमी होणेस मदत झालेली आहे.

२. ईआरपी कार्यप्रणाली ही संस्थानचे लेखाशाखा, Inventory आणि इतर विभागामध्ये कार्यान्वीत असुन त्याव्दारे Resulting in automation of ordering, inventory, Payment, Cheque printing and reconciliation of account process मध्ये कामकाजात गतीमानता निर्माण झालेली आहे.

३. साईटेक प्रणाली प्रभावीपणे व गतीशील होणे कामी प्रत्येक विभागाने ई-मेल आयडी व Work flow System चा वापर केल्यास दोन्ही विभागातील संभाषण तसेच कमी कागदपत्रामध्ये कामकाज त्वरीत होण्यास मदत होऊ शकते.

४. संस्थान व्यवस्थापनाच्या दृष्टीने महत्वाचे विभाग निहाय Reports माहिती अहवाल कार्यप्रणालीव्दारे त्वरीत मिळण्यास मदत होते.

**E)** श्री साईभक्त साईटेक प्रणालीमुळे ऑनलाइन आरती, दर्शन, खोल्या, देणगी, प्रकाशने, जीवन सदस्यत्व इ, इंटरनेटच्या सहाय्याने संगणकाव्दारे Mobile, Browsing center द्वारे सर्व ऑनलाइन सुविधा घेऊन, तो राखीव करू शकत असल्याने, श्री साईभक्त शिरडीत आल्यावर त्यास इतर कुठल्याही अडचणींचा सामना करावा लागत नाही.

साईटेक प्रकल्पाच्या ऑनलाइन सुविधेबाबत श्री साईभक्तांनी खालीलप्रमाणे आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत.

अप्रतिम – ८७% समाधानकारक – ८ % असमाधानकारक – ५ %

९. वरीलप्रमाणे त्यावर आधारित स्पष्ट होते की,

**a)** सर्व साईटेक प्रकल्पातील कार्यप्रणाली सुरळीत सुरू झालेली आहे.

**b)** साईटेक कार्यप्रणाली मुळे संस्थानच्या कामकाजात सुरळीतपणा जाणवतो.

**c)** साईटेक कार्यप्रणाली मुळे संस्थानचे उत्पन्न वाढलेले आहे.

**d)** साईटेक कार्यप्रणाली मुळे संस्थानचा दैनंदिन कार्यरत खर्च कमी झालेला आहे.

**e)** साईटेक कार्यप्रणाली मुळे श्री साईभक्तांना देण्यात येणा-या सुविधा सुधारण्यास मदत झाली आहे .

१०. आयटी कमिटीचे मुख्य उद्दिष्ट असे होते की, संस्थान व्यवस्थापनाने दिलेली जबाबदारी श्री साईबाबांच्या आशिर्वादामुळे पुर्ण केली असुन, त्यात संस्थानचे आयटी विभाग, विभागांचे User, कॉग्नीझंट आणि टेलिकॉम सर्व्हिस पुरविणा-या पुरवठाधारकांचे याकामी सहकार्य लाभले आहे.

११. आयटी कमीटी साईबाबा संस्थानचे व्यवस्थापनाला सुचित करु इच्छिते की, आयटी कमीटीस व्यवस्थापनाने दिलेली जबाबदारी यशस्वी रित्या पार पाडलेली आहे.

१२. दि.३०/०९/२०१५ रोजी साईटेक प्रणालीव्दारे संस्थानला मिळालेले फायदे संदर्भ क्रं. ०१ चे निवेदनातील परिशिष्ट – १ मध्ये नमुद केलेले आहे.

१३. Operational Performance Metrics and Information संदर्भ क्रं. ०१ चे निवेदनातील परिशिष्ट – 2 मध्ये नमुद केले आहे.

१४. Future areas of improvement आणि संस्थान Action Items संदर्भ क्रं. ०१ चे निवेदनातील परिशिष्ट – 3 मध्ये नमुद केले आहे.

१५. मा. पदमश्री, पद्मभुषण मा.डॉ.विजय भटकर भारताचे नामांकीत संगणक शास्त्रज्ञ, सुपर कॉम्पुटरचे निर्माते तसेच सिडॅकचे कार्यकारी संचालक यांनी दि. २६/०९/२०१५ रोजी माहिती तंत्रज्ञान विभागास भेट दिली असता, साईटेक प्रकल्पाचे कौतुक केले असुन, त्यांनी आपला अभिप्राय संदर्भ क्रं. ०१ चे निवेदनातील परिशिष्ट - ४ मध्ये नमुद केला आहे .

१६. दिर्घकालीन योजना व पुढील तीन वर्षांचा साईटेक प्रकल्प व आयटी व्यवस्थापन प्रणालीबाबत संदर्भ क्रं. ०१ चे निवेदनातील परिशिष्ट – ५ मध्ये सविस्तररित्या नमुद करण्यात आलेले आहे.

मा.आयटी कमिटीने साईटेक कार्यप्रणाली यशस्वीरीत्या पुर्ण केली असुन, सदर प्रकल्पाची जबाबदारी दि.३०/०९/२०१५ रोजी सुपूर्द करु इच्छित असल्याचे नमुद केले आहे. मागील सात वर्षाच्या सहभागातुन काही वैयक्तिक कारणास्तव आयटी कमिटी पुढील कालावधीसाठी संस्थानचे आयटी System ला मार्गदर्शन, दिशा व व्यवस्थापन करु शकत नाहीत. आयटी कमिटीला भविष्यात कोणतीही वाढीव मुदत तसेच जबाबदारी स्विकारणेस इच्छुक नसुन संस्थानला आवश्यक वाटल्यास, भविष्यात आयटी कमिटी सभासद कधीही सल्ला देण्यासाठी उपलब्ध असल्याचे देखील त्यांनी नमुद केले आहे.

महाराष्ट शासनाकडे अनेक पारितोषिक विजेते माहिती तंत्रज्ञान विभाग असुन ते शासकीय विभागांना व इतर संस्थांना सुविधा पुरवितात. मागील दोन वर्षापासुन आयटी कमिटीने महाराष्ट्र शासनाशी संलग्न अनुभवी तांत्रिक अधिकारी संस्थानच्या कामकाजासाठी नेमलेला असुन, त्यांचा सल्ला, मार्गदर्शन व त्यांच्या अनुभवाचा फायदा संस्थानचे आयटी System Implementation साठी घेण्यात यावा.

तसेच आयटी कमीटीने संस्थानचे आयटी विभागास सल्ला तसेच पर्यवेक्षण करणेकामी खालीलप्रमाणे आपला अभिप्राय दिला आहे.

"Sansthan to appoint MH Govt.IT department as the supervising and advisory agency for the implementation of all IT System and Technology solutions in Sansthan in the future."

महाराष्ट्र शासनाचे आयटी मधील सर्व कामकाज हे ई-गव्हर्नर होते, त्यानुसार साईबाबा संस्थानला मार्गदर्शन व सल्ला मिळणेकामी महाराष्ट्र शासनाच्या आयटी विभागाचे अभिप्राय वेळोवेळी घेणेत यावे.

आम्ही दि. ३०/०९/२०१५ पासुन आयटी कमिटीची जबाबदारी संस्थानकडे देत असल्याचे तसेच श्री साईबाबा संस्थान यापुढे ती जबाबदारी महाराष्ट्र शासनाच्या आयटी विभागाकडे देणेकामी त्यांनी प्रस्तावित केले आहे.

आपण दिलेल्या संधीबद्दल आयटी कमिटीचे सर्व सभासद श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीला प्रामाणिकपणे आणि आदरपुर्वक धन्यवाद देऊन, संस्थानला यापुढे कोणताही सल्ला किंवा सुचना आवश्यक असेल तेव्हा ते प्रदान करतांना आम्हाला आनंद होईल. श्री साईबाबा व संस्थानचे पुनःश्च प्रामाणिक व आदरयुक्त धन्यवाद त्यांनी त्यांचे संदर्भीय निवेदनात नमुद केले आहे.

**मागणी:** वरील प्रास्ताविकेतील सर्व नमुद बाबींचा सारासार विचार करता, श्री के.व्ही. रमणी यांनी साईटेक प्रकल्प उभारणीपासुन सलग सात वर्ष विनामोबदला आयटी कमीटी अध्यक्ष म्हणुन वेळोवेळी मार्गदर्शन तसेच सल्लागार म्हणुन काम केले असुन, त्यांनी उपरोक्त प्रस्तावात नमुद काही मुद्दयाचे मार्गदर्शन संस्थानचे आयटी विभागास हितावह ठरेल. तसेच साईटेक प्रकल्पातील तांत्रिक साहित्याच्या बाबींसाठी तसेच संस्थानचे विविध विभागांमधील कामकाजासाठी मोठया प्रमाणात त्यांनी देणगी दिलेली आहे. साईटेक प्रकल्पावर त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामकाजाबद्दल त्यांना संस्थानचे वतीने आभारपत्र देणेस तसेच त्यांनी दिलेल्या संदर्भीय प्रस्तावाची नोंद घेणेकामी सदरहु विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** उपरोक्त प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे श्री के.व्ही. रमणी यांनी साईटेक प्रकल्प उभारणीपासुन सलग सात वर्ष विनामोबदला आयटी कमीटी अध्यक्ष म्हणुन वेळोवेळी मार्गदर्शन तसेच सल्लागार म्हणुन काम केले असुन, त्यांनी उपरोक्त प्रस्तावात नमुद काही मुद्दयाचे मार्गदर्शन संस्थानचे आयटी विभागास हितावह ठरेल. तसेच साईटेक प्रकल्पातील तांत्रिक साहित्याच्या बाबींसाठी तसेच संस्थानचे विविध विभागांमधील कामकाजासाठी मोठया प्रमाणात त्यांनी देणगी दिलेली आहे. साईटेक प्रकल्पावर त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामकाजाबद्दल त्यांना संस्थानचे वतीने आभारपत्र देणेस तसेच त्यांनी दिलेल्या संदर्भीय प्रस्तावाची नोंद घेणेकामी सदरहु विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.५५४ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.३७ श्री साईसच्चरीत- मराठी ग्रंथ (५० % सुट देवून) कमी दरात मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** साई निर्माण ग्रुप, शिर्डी यांनी दि.२२.१०.२०१५ चे पत्रात महाराष्ट्रासह इतर राज्यात गाव तेथे साई सतचरित पारायण सोहळा अभियान राबवत असलेबाबत कळविले आहे. गेल्या वर्षापासून आजपर्यंत ७१० गावांमध्ये पारायण संपन्न झाले असलेबाबत नमुद करुन सदर कार्यक्रमासाठी २ लाख साई सतचरित ग्रंथाचे वाटप करण्यात आले आहे. सदर अभियानासाठी होणार खर्च साई निर्माण ग्रुपच्या व्यवसायाच्या ११% रक्कमेतून करण्यात येतो. सदर उपक्रमासाठी पारायण वाचक म्हणून ५ महाराज कार्यरत आहे. साईबाबांच्या आशिर्वादाने आजपर्यंतचा सर्व खर्च साई निर्माण ग्रुप करते. ज्याप्रमाणे हज यात्रेकरिता जाणा-या यात्रेकरुंना तेथील ट्रस्ट मार्फत पवित्र कुराण हा ग्रंथ मोफत दिला जातो. त्याचप्रमाणे संपुर्ण भारतभर बाबांच्या शिकवणुकीचा प्रचार व प्रसार करण्यासाठी आणि बाबांचा आशिर्वाद प्रत्येक घरात पोहचण्यासाठी सदर ग्रंथ वाटप केला जातो.तो ग्रंथ १०० रु किंमतीत असून तो ग्रंथ ५०% सवलतीमध्ये उपलब्ध करुन द्यावा अशी विनंती केली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम नं.१७ ठ. मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

श्री साईबाबांचे जीवन व कार्याचा प्रचार – प्रसार होणेकामी संस्थान मार्फत कै. गोविंद रघुनाथ दाभोळकर लिखीत श्री साईसच्चरित- मराठी ग्रंथ प्रकाशित करण्यात आला आहे. सदर ग्रंथाची विक्री ना नफा ना नोटा या तत्वावर करण्यात येते.

बाहेरील मार्केटमध्ये विक्रीसाठी खाजगी प्रकाशने उपलब्ध असलेल्या श्री साईसच्चरित ग्रंथाची विक्री किंमत रु. २०० ते २५० रुपयापर्यंत केली जाते. बाहेरील मार्केटमधील पुस्तकांच्या किंमतीचा विचार केल्यास संस्थानमार्फत विक्री करण्यात येत असलेल्या पुस्तकांची विक्री किंमत ही अल्प दरात केली जाते. संस्थानमार्फत १०/- रुपयाचे पुढील किंमतीवर २०% डिस्काऊंट देण्यात येतो.

| अं.नं. | पुस्तकाचा तपशिल | छपाई दर रुपये. पैसे | २५% कर्मचारी पगार, विद्युत आकार वगैरे खर्च २०% धरुन विक्री किंमत | ग्रंथावरील विक्री किंमतीवर दिली जाणारी २०% सवलतीचा दर रुपये पैसे |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई सच्चरित पोथी– मराठी आवृत्ती क्र.३२ | ८१.५० | १२५.०० | १००.०० |

सदर ग्रंथ ५०% रकमेत विक्री करावयाचा झाल्यास खाजगी दुकानदार सदर ग्रंथ निम्या रकमेत घेऊन त्यांचेकडे बाहेरील राज्यातून मागणी करीत असलेल्या भक्तांना पुर्ण किंमतीला विकण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच इतर भाषिक साईभक्त साईचरित्रासाठी मराठी प्रमाणे इतर चरित्रासाठी ५०% सुट मागण्याची शक्याता नाकरता येत नाही संस्थानमार्फत रु.१० चे विक्रीचे पुढील किंमतीवर २०% सुट देण्यात येत असल्यामुळे सदर ग्रंथावर ५०% सुट देणे योग्य होणार नाही. असे नम्र मत आहे.

यापुर्वी जा.नं.एसणूएसएस/वशी/प्रकाशने/५३५१/२०१५ दि. २०.०१.२०१५ अन्वये श्री ताराचंद कोते व सर्व ३३ ग्रामस्थ, शिर्डी यांना याबाबत दिलगीरी पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

सबब सध्या चालू असलेली प्रचलीत दराने सदर ग्रंथाची विक्री चालू ठेवावी किंवा साई निर्माण ग्रुप शिर्डी यांनी ग्रंथावर ५०% सुट मिळणेबाबत केलेल्या मागणी प्रमाणे विक्री करावी याबाबत योग्य निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५५५** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे संस्थानमार्फत विक्री करण्यात येत असलेली संस्थान प्रकाशने साईभक्तांचे सोयीसाठी २०% कमी दरात उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. साई निर्माण ग्रुप शिर्डी यांची विनंती मान्य केल्यास इतर साईभक्तांनाही ग्रंथावर ५०% सुट द्यावी लागेल. तसेच यामुळे साईचरित्र ग्रंथाच्या विक्रीमध्ये खाजगी व्यावसायिक गैरप्रकारही करु शकतात. या सर्व बाबींचा विचार करता साई निर्माण ग्रुप शिर्डी यांनी ग्रंथावर ५०% सुट मिळणेबाबत केलेली विनंती अमान्य करणेत यावी.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.३८ सुका कच-यातील प्लास्टीक श्रेडींग करणे करीता शेड उभारणी कामी निधी उपलब्ध करणेबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम – २००४ मधिल तरतूद:-**

संस्थान अधिनियम २००४ मधील कलम २१ (२) नुसार " स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांचेमध्ये सुधारणा व वाढ होणेसाठी व परिणामी संस्थानचे सोयीमध्ये वाढ होणेसाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करणेसाठी विश्वस्त व्यवस्थेचा विनियोग करता येईल'' अशी तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-**

१) नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत विषयांकीत कामाचे चर्चेसाठी दि.२०/०८/२०१५ रोजीचे सभेत उपस्थीत होत्या. सदर कामाबाबत त्यांनी संदर्भिय क्र. १ अन्वये सभेपूढे प्रस्ताव सादर केला. सदरहू सभेत या विषयावर सविस्तर चर्चा होऊन विश्वस्थांचे सुचनेत निर्णय क्र.२८८ खालील प्रमाणे संमत झाला आहे.

*"यावर चर्चा होऊन सिंहस्थ कुंभमेळयाच्या कालावधीमध्ये शिर्डी येथे प्रचंड प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता आहे व त्यावेळेस प्लास्टीक कचराही मोठया प्रमाणात जमा होणार असून, त्यामुळे शिर्डीतील नागरीक व येणारे साईभक्त यांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर प्लास्टीक कचरा नष्ट करण्याचे प्रकल्प उभारणे जरुरीचे आहे. असे समितीचे मत झाले.*

*त्यामुळे सदरहू प्रकल्प उभारणेस मान्यता घेणेसाठी शासनास प्रस्ताव सादर करणेत यावा व मा. उच्च न्यायालयामध्ये सिव्हील अर्जही दाखल करण्यात यावा. तसेच या दरम्यान प्रस्तावीत कामी येणारा खर्च कोणी देणगीदार उचलणेस तयार आहे का, याची शहानिशा करण्यात यावी. "*

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३१४ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

*"यावर चर्चा होऊन, संस्थान परिसरातील व शिर्डी नगरपंचायत हद्दीतील प्लास्टीक वेस्टेज डिस्पोजल समस्या दुर करणेसाठी प्लास्टीक पुनःप्रक्रिया प्लान्टची उभारणी करणेकामी आवश्यक असणा-या मशिनरी देणगी स्वरुपात मिळाल्यास त्या स्विकारुन शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना देण्यात याव्यात असे ठरले."*

**प्रस्तावना:** शिर्डी नगरपंचायत यांनी त्यांचेकडील दि.२३/०९/२०१५ रोजीच्या पत्रान्वये त्यांचेमार्फत शिर्डी शहरातील घनकचरा व्यवस्थापन करणेकामी ओला व सुका कचरा वर्गीकरण करुन संकलीत करण्यात येत असल्याचे तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत सुक्या कच-यातील प्लास्टीक पासून ग्रान्युअल्स तयार करण्याच्या मशिनसाठी शेड उभारणी करणे कामासाठी अंदाजीत खर्च रु.९,९६,६४१/- इतका असून सदरचा निधी उपलब्ध करुन देणेबाबत विनंती केली आहे.

**प्रस्ताव:**– शिर्डी नगरपंचायत यांनी उपरोक्त कामासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत दि.२३/०९/२०१५ रोजीचे पत्रान्वये विनंती केलेली आहे. तसेच दि.२०/०८/२०१५ रोजीचे त्रिससदस्य समितीचे सभेत सदरहू प्रकल्प उभाणेस मान्यता घेणेसाठी शासनाकडे प्रस्ताव व मा. उच्च न्यायालयामध्ये सिव्हील अर्ज दाखल करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच मा. त्रिसदस्य समितीचे दि.०८/०९/२०१५ रोजीचे सभेत संस्थान परिसरातील व शिर्डी नगरपंचायत हद्दीतील प्लास्टीक वेस्टेज डिस्पोजल समस्या दुर करणेसाठी प्लास्टीक पुनःप्रक्रिया प्लान्टची उभारणी करणेकामी आवश्यक असणा-या मशिनरी देणगी स्वरुपात मिळाल्यास उपलब्ध करुन देणेबाबत निर्णय झालेला आहे.

तथापी शिर्डी नगरपंचायत यांचे विषयांकीत कामाचे प्रस्तावांमध्ये सदरहू प्रकल्पात संस्थान परिसरात जमा होणा-या स्लास्टीक कच-याचे श्रेडींग करणेविषयी तसेच सदरहू प्रकल्प उभारणीनंतर त्याची दैनंदिन देखभाल दुरुस्ती व मनुष्यबळ इत्यादी व्यवस्था शिर्डी नगरपंचायत यांचे मार्फत करणेबाबत उल्लेख केलेला नाही. याबाबत शिर्डी नगरपंचायत यांचे सभेत ठराव झालेला दिसून येत नाही. त्यामुळे याबाबत शिर्डी नगरपंचायत यांचे सभेत ठराव करुन, त्यांचेकडून हमीपत्र घेणे आवश्यक आहे. त्यासाठी शिर्डी नगरपंचायत यांना पत्र देण्यात येत आहे.

तरी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना प्लास्टीक पासून ग्रान्युअल्स तयार करणेकामी मशिनसाठी शेड उभारणीकरीता संस्थानमार्फत रक्कम रु.९,९६,६४१/- मात्रचा निधी उपलब्ध करुन देणेस व याकामी शासनाकडे प्रस्ताव व मा. उच्च न्यायालयामध्ये सिव्हील अर्ज दाखल करणेस मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.५५६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना सुका कच-यातील प्लास्टीक पासून ग्रान्युअल्स तयार करणेकामीच्या मशिनसाठी शेड उभारणीकरीता संस्थानमार्फत रु.९,९६,६४१/- मात्रचा निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. मात्र तत्पुर्वी याकामी शासन मान्यता घेण्यात यावी व शासन मान्यता मिळाल्यानंतर संस्थान वकिलामार्फत मा.उच्च न्यायालयामध्ये सिव्हील अर्ज दाखल करणेत यावा.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.३९** **श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल मधील ०५ वर्ग खोल्यांना जिप्सम सिलींग करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:**

अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम (१) च्या खंड (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल व्यवस्थापन व प्रशासन करणे," अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना:** श्री साईबाबा इंग्लिश मिडियम स्कूल इमारतीचे दक्षिण बाजूस के.जी क्लासकरीता ०५ वर्ग खोल्यांचे बांधकाम सन-२०११-१२ मध्ये करण्यात आलेले असुन, सदर वर्ग खोल्यांचे सिलींगला टाटा ब्ल्यु स्कोपचे कलर कोटेड शिटचे रुफिंग करण्यात आलेले आहे. उन्हाळयाचे कालावधीत सदर रुफिंग शिट तापत असल्याने विद्यार्थ्यांना वर्गामध्ये गरम होते. याकरीता सदर शिटवर ग्रीन नेट बसविणेबाबत मा. प्राचार्य यांनी दि.१५/०४/२०१५ रोजीचे पत्रान्वये इकडिल विभागास कळविले आहे. ग्रीन नेट बसविणे हा एक तात्पुरता पर्याय आहे. या ०५ वर्ग खोल्यांमध्ये गरम होण्याची तीव्रता कमी करणेसाठी या ठिकाणी कायमस्वरुपी उपाय म्हणून २' x २' आकाराची जिप्सम् बोर्ड सिलींग करता येईल.

**प्रस्ताव:** उपरोक्त विषयांकितकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| Sr. No. | Description | Qty. | Unit | Approx. Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01) | **2'x2' Grid Gypsum Ceiling:** Providing & fixing suspended false ceiling of 12.5mm thk. of 2'x2' | 165.00 | Sqm | 968/- | 1,59,720/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | approved celotex fine fissured board & tegular square edge tiles for effective sound absorption, with all the required 16mm thk. powder coated grid with G. I. sections suspended with L angle suspender for perimeter, intermediate channels, G. I. hangers for ceiling section, necessary clips dry wall screws required including framing, jointing, finishing filling joints, drilling holes complete and to the entire satisfaction of Sansthan with all necessary fittings & fixtures. (Gypsum Board - India Gypsum (Gyproc), Armstrong).<br>**No. of Rooms: 05.**<br>**Room Size: 6.0m X 5.50m.** | | | | |
| | **Total:** | | | | **1,59,720/-.** |
| | **Add Contingencies @ 5%:** | | | | **7986/-.** |
| | **Total Amount Rs.:** | | | | **1,67,706/-.** |

तरी उपरोक्त तपशिलानुसार विषयाकिंतकामी रु.१,६७,७०६/- मात्रचा खर्च अपेक्षीत आहे. तरी याकामी येणारे खर्चास व सदरकामी विहीत पध्दतीने वर्तमानपत्रातील जाहीरातीव्दारे निविदा मागविणेकामी सदरहु प्रस्ताव मा. त्री-सदस्य समिती सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.५५७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल मधील ०५ वर्ग खोल्यांना जिप्सम सिलींग करणेसाठी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.१,६७,७०६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.४०** **शिर्डी येथे विमानतळ उभारणेकामी अर्थसहाय्य करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम 2004 मधील तरतुद:** (2004 चा महा. 14) याच्या कलम 21 च्या पोट-कलम (1क) अन्वये, भक्तांच्या सोयीसाठी बस, वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा यासारख्या पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडळांना, शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :**

१. निर्णय क्रमांक 130, दिनांक 17 फेब्रुवारी, 2007 अन्वये "..मौजे काकडी (शिर्डी) विमानतळ विकसीत करणेसाठी अर्थसहाय्य करणेचे प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, MADC ज्या ठिकाणी विमानतळाची जागा निश्चित करेल त्या ठिकाणी विमानतळ प्रकल्प उभारणीसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत विहीत पध्दतीने शासनाची मान्यता घेऊन योग्य ती आर्थिक मदत करण्यात येईल असे कळविण्यात यावे, असे ठरले. "

२. निर्णय क्रमांक 23, दिनांक 03 जानेवारी, 2009 अन्वये "..मौजे काकडी (शिर्डी) विमानतळ विकसीत करणेसाठी अर्थसहाय्य देणेचे प्रस्तावास तत्वत: मान्यता देण्यात आली. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना शिर्डी येथील विमानतळ विकसित करणेसाठी रक्कम रुपये 50 कोटी मात्र इतका निधी उपलब्ध करुन देण्यासाठी काय अटी असतील तसेच कोणत्या पध्दतीने निधी उपलब्ध करुन द्यावा याबाबत मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेशी चर्चा करुन अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले."

३. निर्णय क्रमांक 309, दिनांक 23 मे, 2014 अन्वये "..शिर्डी येथे विमानतळ उभारणेकामी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना उर्वरीत रु.५ कोटी मात्र रक्कम देणेसाठी संस्थान वकीलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाची मान्यता प्राप्त झालेनंतर त्यांना अर्थसहाय्य करावे, असे ठरले. "

**प्रस्ताविक:** उपरोक्त प्रमाणे झालेले निर्णयानुसार शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत आला. त्यास अनुसरुन महाराष्ट्र शासनाने उपरोक्त अधिनियम 2004 चे तरतुदी नुसार विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्ययांचेकडील No.SSV-011/C.R.44/ Desk- XVI . दि.24 जून, 2011 रोजीचे आदेशान्वये, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना पुढील अटी व शर्तींच्या अधिनतेने रु.50 कोटी (रु.50 कोटी) इतक्या मर्यादेपर्यंत सहाय्यक अनुदार देण्यास, श्री साईबाबा संस्थान विश्‍वस्तव्यवस्थेला प्राधिकार व परवानगी दिली आहे.

१. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित मंजूर रकमेचा विनियोग केवळ शिर्डी येथील विमानतळ विकसित करण्यासाठी करील.

२. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित अशा अनुदानाचा स्वतंत्र हिशोब ठेवील आणि त्याचा वापर इतर कोणत्याही प्रयोजनांसाठी करणार नाही.

३. उक्त कंपनी, सहाय्यक अनुदानाचा विनियोग केल्यापासून तीन महिन्यांच्या आत, राज्य शासनाला आणि विश्‍वस्तव्यवस्थेला, विनियोग प्रमाणपत्र तीन प्रतीत सादर करील.

४. शासनमान्य लेखापरिक्षकांचा, अनुदानाच्या विनियोगाबाबतचा लेखापरिक्षण अहवाल राज्य शासनाला आणि विश्वस्तव्यवस्थेला सादर करण्यात येईल.

५. विमानतळाचा विकास केल्यानंतर, उक्त कंपनी, किमान 1,000 चौरस फुट इतकी जागा माहितीकेंद्र, प्रसिध्दी केंद्र, इत्यादी उभारण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेला मोफत देईल.

६. राज्य शासन वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा इतर अटी व शर्ती, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मर्यादित यांना व विश्वस्तव्यवस्थेला बंधनकारक असतील.

उपरोक्त शासन आदेशानुसार महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना आजअखेर एकुण रुपये 45 कोटी इतके सहाय्यक अनुदान देण्यात आले आहे. उर्वरीत रु.5 कोटी निधी देणेबाबत मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे विधी विभागामार्फत सिव्हील ॲप्लीकेशन नं. 6852/2015 अन्वये प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. तसेच वरील अट क्र. 05 नुसार 1,000 चौरस फुट इतकी जागा घेणेबाबत पाठपुरावा करणेत येत आहे.

**प्रस्ताव:** आता, डॉ.पी.एस.मिना, अतिरीक्त मुख्य सचिव, नागरी विमान वाहतूक, मंत्रालय, मुंबई यांनी दि.14/10/2015 रोजी मा.अध्यक्ष सो यांना अग्रेषित केलेले पत्रामध्ये महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई शिर्डीजवळ काकडी येथे ग्रीनफिल्ड एयरपोर्ट विकसित करीत असुन सदरचे काम टप्प्याटप्प्याने करणेत येत आहे. तसेच सुरुवातील प्रायव्हेट ॲण्ड नॉन शेडयुल्ड ऑपरेशनसाठी विमानतळ विकसित करणेत आले असुन संस्थानने सदरहु विमानतळासाठी Fire & rescue services देणेबाबत सहमती दर्शविली असल्याचे तसेच Commercial Use साठी दुस-या टप्प्यातील कामासाठी स्ट्रॅटेजिक पार्टनरची निवड सुरु असल्याचे कळवून खालील प्रमाणे मागणी केलेली आहे.

यापूर्वी संस्थानमार्फत देण्यात आलेल्या 45 कोटी अनुदान रकमे व्यतिरिक्त हॉटेल, लॉजिंग, बोर्डींग सह अतिरीक्त सुविधा व 100 हेक्टर जमिन भूसंपादन करण्यासाठी रु.110 कोटीचा अतिरीक्त निधी मिळणेबाबत तसेच विमानतळाची सुरक्षा हि महत्वाची बाब असल्याने साईबाबा संस्थानने त्यांचेकडील सुरक्षा व्यवस्था शिर्डी विमानतळासाठीही पुरवावी असे कळविले आहे.

श्री क्षेत्र शिर्डी येथे येणारे साईभक्तांचे सोयीसाठी संस्थानमार्फत पुरेशी निवासस्थानांची व भोजन व्यवस्थेची सोय उपलब्ध आहे. तसेच भक्तांचे गरजेनुसार संस्थानमार्फत आवश्यक नियोजन करण्यात येते.

तरी उपरोक्तप्रमाणे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांचे वाढीव रु.110 कोटी निधी मागणीबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५५८** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबांची महासमाधी शताब्दी वर्ष साजरे करण्यासाठी संस्थानलाच निधी कमी पडत असून त्याकामी शासनाकडून संस्थानला निधी मिळणेसाठी सहकार्याची अपेक्षा आहे, असे समितीचे मत झाले व या बाबीचा विचार करता उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.४१** **टेलिफोन विभागातील अद्ययावत दुरध्वनी (EPABX) यंत्रणेसाठी तांत्रिक सल्लागार (Technical Consultant) यांची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचे विविध विभागांना अंतर्गत व बाहेरील दुरध्वनी संपर्कासाठी शांतीनिवास इमारतीमध्ये सिमेंस कंपनीची दुरध्वनी यंत्रणा बसविण्यात आलेली आहे.या मुख्य दुरध्वनी यंत्रणेतुन ओएफसी केबलव्दारे (१) समाधी मंदिर परीसर (२) श्री साईबाबा हॉस्पिटल,श्री साईनाथ रुग्णालय,साईनगर स्टॉफ क्वार्टर्स व व्दारावती निवासस्थान (३) श्री साईबाबा भक्तनिवासस्थान ५०० रुम्स,शैक्षणिक संकुल,अधिकारी व डॉक्टर्स क्वार्टर्स (४) नविन प्रसादालय या चार ठिकाणी सिमेंस कंपनीच्या दुरध्वनी यंत्रणा बसविण्यात आलेल्या आहेत. तसेच साई आश्रम १ व साई धर्मशाळा या दोन्ही ठिकाणी अंतर्गत व बाहेरील संपर्कासाठी मॅट्रीक्स कंपनीच्या दुरध्वनी यंत्रणा बसविण्यात आलेल्या असुन एकुण सहा दुरध्वनी यंत्रणा बसविणेत आलेल्या आहेत.या सहाही दुरध्वनी यंत्रणेतुन जवळपास १००० दुरध्वनी नंबर विविध विभागांना देण्यात आलेले आहेत. साधारणपणे प्रतिदिन ३००० इनकमिंग कॉल्स,१०००आऊटगोईंग कॉल व इतर फॅक्स असतात.

सिमेंस कंपनीच्या Hipath 4300 ही दुरध्वनी यंत्रणा सन २००४ साली कार्यान्वित केलेली असुन सदरचे मशिनरीस जवळपास ११ वर्ष झालेले आहेत. नविन तंत्रज्ञानाच्या आधारे दुरध्वनी यंत्रणा अद्ययावत होणे आवश्यक आहे सध्याच्या यंत्रणेत ऑपरेटर कंसोलचे प्रॉब्लेम सिस्टीम सॉफटवेअर अपग्रेड होत नाही शिवाय अद्ययावत सुविधा जसे एक्स्टेंशन कॉल वेटींग,सीयुजी इंटरनल ग्रुप क्रिएशन, ब्रॉड कास्टीग मेसेज, रिमोट मॉनीटरींग ॲंड मेंटेनंस, वाय फाय कनेक्टिव्हीटी, आयव्हीआरएस इत्यादींचा समावेश करणे आवश्यक आहे.

यासाठी नुतनीकृत दुरध्वनी यंत्रणा विकसीत करणेकामी तांत्रिक सल्लागार **(Technical Consultant)** यांची नेमणूक करणे आवश्यक आहे.

**सदर तांत्रिक सल्लागाराचे कामाचे स्वरूप खालील प्रमाणे राहील.**

- Study the present setup of all locations.
- Study additional requirement & future features – requirements of SSST
- Create DPR with power point presentation.

- Present the demo HOD & senior management of SSST.
- On the basis review of presentation & demo, create a detail tender for new EPABX System as per sansthan rules (online etc.)
- After floating tender, evolution of technical bids of vendors along with technical Remarks T1, T2 etc.
- In case, it is needed the evolution of commercial bid.
- After selection of final vendor, creating LOI & agreements for work schedule & AMC.
- Monitoring & evolution of each stage of projects. any issue raised during the Implementation project, it needs to be resolve with vendor by consultant.
- Each stages of project, bills of vendor's approval for payment by consultant.
- If required, issuing of notice or penalty for non-Performa or non-up-to standard of Implementation.
- During AMC period, every three months consultant should visit shirdi for Assessment of each site & provides actual assessment report to SSST for Recommendations or Guidelines to vendor or SSST.

उपरोक्त प्रमाणे सन २०१८ सालच्या संभाव्य गर्दी व नियोजन यासाठी सदरचे दुरध्वनी वर येणारा कामाचा ताण व सध्याच्या सिस्टीम मधिल तांत्रिक अडचणी, अद्‌यावतीकरण याबाबतचा सारासार विचार करीता,नुतनीकृत व अद्‌यावत दुरध्वनी यंत्रणा विकसीत करावी असे नम्र मत आहे. सदर यंत्रणा विकसीत करणे कामी तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करणे व सदर कामासाठी एकत्रित अंदाजे रक्कम रु.९,५०,०००/- (रु.नऊ लाख पन्नास हजार मात्र ) अपेक्षित आहे.

तरी टेलीफोन विभागातील अद्‌यावत दुरध्वनी यंत्रणेसाठी तांत्रिक सल्लागार यांची नेमणूक करणे व यासाठी एकत्रित अंदाजे रकक्म रु.९,५०,०००/- (रु.नऊ लाख पन्नास हजार मात्र) चे येणा-या खर्चाचे मान्यतेसाठी सदरचा विषय मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सविनय सादर.

निर्णय क्र.५५९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, टेलिफोन विभागातील अद्ययावत दुरध्वनी (EPABX) यंत्रणा उभारणेसाठी तांत्रिक सल्लागार (Technical Consultant) यांची नेमणूक करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणा-या एकत्रित अंदाजे रु.९,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- ध्वनिक्षेपण विभागप्रमुख)

---

विषय नं.४२ **बी.जे. वैद्यकिय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे यांना एक्स-रे मशीन देणेबाबत.**

प्रस्ताव- अधिष्ठाता, बी.जे. वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे यांनी जा.क्र.बीजेजीएमसी/डीन ऑफीसर/ ४८६/ २०१५, दि.३.१०.२०१५ या पत्रान्वये डिजीटल रोडिओग्राफी मशीनची मागणी केली आहे. सदर मशीन ससून जनरल हॉस्पिटल पुणे येथे रुग्णांना वैद्यकिय सेवा देण्यासाठी आवश्यक असल्याचे त्यांनी नमुद केले आहे. सदर पत्रासोबत त्यांनी फ्युजिफिल्म या कंपनीच्या डिजीटल रोडिओग्राफी मशीनचा प्रस्ताव जोडला आहे. त्याची किंमत रु.2,41,25,000/- इतकी आहे. ससून रुग्णालयामध्ये गोर-गरीब रुग्णांवर वैद्यकिय उपचार केले जातात व या ठिकाणी वार्षीक तपासण्यांची व वैद्यकीय उपचार घेणा-या रुग्णांची संख्या मोठयाप्रमाणावर आहे. त्यासाठी या मशीनची त्यांना आवश्यकता असल्याचे त्यांनी पत्रात नमुद केले आहे.

अशाप्रकारे संस्थानमार्फत अनुदान देण्याबाबत संस्थान अधिनियमात खालीलप्रमाणे तरतुद आहे :-

१) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल." अशी तरतुद आहे.

२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम २१ (२) पोट-कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल:-

(एक) राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिक दृष्टया विकलांग व्यक्तीसांठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अनुदान देण्याची तरतुद आहे."

तसेच मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद पीआयएल क्र.१८/२०११ दि.१६/११/२०१२ मध्ये अ.नं. 6 मधील (C) Shall not take any major financial decision of whatsoever nature. असे नमुद केलेले आहे. त्यास अनुसरुन मा.व्य.स. निर्णय क्र.८६२/ दि.०८.११.२०१२ अन्वये रु.१० लाख किंवा त्यापुढील खर्चासाठी मा.व्य.स. च्या पूर्व मान्यतेने मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेऊन, त्यानंतरच बीले पारीत करणेत यावीत, असा ठराव संमत झाला आहे.

तरी उपरोक्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ मधील तरतुदी, पीआयएल क्र.१८/२०११ दि.१६.११.२०१२ व रु.१० लाखांचे पुढील खर्चाबाबत मा.व्य.स.चा निर्णय यास अनुसरुन बी.जे.वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे यांना साधारणता रु.२,४१,२५,०००/- किंमतीचे डिजीटल रोडिओग्राफी एक्स-रे मशीन द्यावयाचे असल्यास सदर प्रस्तावास मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद व मा.विधी व न्याय विभाग मुंबई यांची मान्यता घ्यावी लागेल.

तरी सदर प्रस्ताव मा.त्रिसदसिय समितीच्या सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ मधील तरतुदी, मा.उच्च न्यायालयामधील पीआयएल क्र.१८/२०११ दि.१६.११.२०१२ तसेच रु.१० लाखांचे पुढील खर्चाची समितीला असलेली मर्यादा या सर्व बाबींचा विचार करता बी.जे.वैद्यकिय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे यांना एक्स-रे मशीन देणेबाबतचा उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- लेखाशाखा, अनुदान विभाग)

---

**विषय नं.४३** **सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेऊन लेखापरिक्षीत लेख्यांसह शासनास सादर करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र राज्य शासनाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम-२००४ संस्थानसाठी लागु केला असुन, त्या अनुसार संस्थानचे कामकाज सुरु आहे. अधिनियम-२००४ मध्ये कलम १७(२)(ग) मधील तरतुदीनुसार, "विश्वस्तव्यवस्थेच्या हिशोबाची, राज्यशासन निर्देश देईल अशा व्यक्तीकडून पुढील लगतवर्षातील अशा तारखेपर्यत वार्षिक लेखापरिक्षा करण्याची व्यवस्था करील. व कलम २९(१) मधील तरतुदीनुसार समिती, त्या विश्वस्तव्यवस्थेची आर्थिक स्थिती व जमा खर्चाचा तपशिल दर्शविणारा, दिनांक ३१ मार्च रोजी संपणाऱ्या प्रत्येक वित्तीय वर्षाचा लेखापरिक्षणाचा अहवाल, तसेच ज्यांना विश्वस्तव्यवस्थेकडून आर्थिक साहाय्य देण्यात आले अशा देणगी स्वीकारणाऱ्या संस्थांची (संपुर्ण पत्त्यासह) तपशिलवार यादी व असे आर्थिक साहाय्य मागण्यामागील उददेश व सहाय्याची रक्कम याबाबतची माहिती सोबत जोडलेल्या छाननी समितीचा अहवाल, यांसह वार्षिक अहवाल तयार करवुन घेईल आणि त्या अहवालाची एक प्रत राज्य शासनाला व एक प्रत धर्मदाय आयुक्ताला, त्या वर्षाच्या ३० जुनच्या आत सादर करील " अशी तरतुद आहे.

त्यास अनुसरुन राज्यशासन, विधी व न्याय विभाग यांनी क्र.लेखाप-२०१५/१२२/प्र.क्र.२६/का.सोळा. दि.२८.०९.२०१५ अन्वये मे.शिंदे चव्हाण गांधी अॅन्ड कं. चार्टर्ड अकौटंट्स लातुर, यांचेकडून वैधानिक लेखापरिक्षण करुन घेण्याचे निर्देश दिले होते, त्यांनी वैधानिक लेखापरिक्षण पुर्ण करुन वैधानिक त्याचा अहवाल दि.३१.१०.२०१५ रोजी संस्थानला सादर केला आहे. सदर अहवालाची एक प्रत राज्य शासनाला व एक प्रत धर्मदाय आयुक्तांना सादर केल्यानंतर त्यामधील दोष दुरूस्ती बाबतचा अहवाल तयार करण्याची कार्यवाही हाती घेण्यात येईल.

तरी संस्थान अधिनियम-२००४ मधील कलम २९(२) अनुसार प्राप्त झालेल्या अहवालाची प्रत शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळासमोर ठेवील, या तरतुदीस अनुसरुन मे.शिंदे चव्हाण गांधी अॅन्ड कं. चार्टर्ड अकौटंट्स यांनी सादर केलेला वैधानिक लेखापरिक्षण अहवाल (प्रशासकीय अहवाल व लेखापरिक्षण अहवाल) नागपुर येथे होणा-या हिवाळी अधिवेशनात विधीमंडळाच्या सभागृहाच्या पटलावर ठेवणे कामी प्राप्त झालेल्या अहवालाचे अवलोकन होवुन त्यांची नोंद घेण्यासाठी व त्यानंतर अहवालाच्या ५०० प्रती छपाई व ९०० CD तयार करण्यास व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे ९०,०००/- (नव्वद हजार) खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.त्रिसदस्सीय समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.५६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेऊन लेखापरिक्षीत लेख्यांसह शासनास सादर करणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.४४** **आर्थिक वर्ष २०१५- १६ व २०१६- १७ करिता संस्थान कर सल्लागार यांची मुदतवाढ/ नेमणुकीबाबत प्रस्ताव फेरसादर.**

**प्रस्ताव-** संस्थानमध्ये दैनंदिन कामकाजाचा व्याप दिवसेंदिवस वाढत आहे. त्या अनुषंगाने आर्थिक व्यवहारात व कामकाजातही मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. तसेच आर्थिक व्यवहारां संबंधीत केंद्र व राज्य शासनाकडुन विविध आर्थिक, आयकर, सेवाकर, व्हॅट इ. विषयक कायदे पारित होतात. या कायद्यातील नव-नविन तरतुदींचा प्रभाव दैनंदिन आर्थिक कामकाजात पडत असतो. वैधानिक लेखापरिक्षणामध्ये आक्षेपांचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीने व आर्थिक व्यवहारांत पारदर्शकता येऊन वेळीच त्याच्यात सुधारणा करुन तात्काळ कार्यवाही करण्यासाठी व अंतर्गत नियंत्रण सक्षम राहण्याच्यादृष्टीने कर सल्लागार, वार्षिक आयकर विवरण व छाननी सल्लागार यांच्या नेमणुका करण्यात

येतात. या नेमणुकांची मुदत संपुष्टात येत असल्याने पुढील कालावधीकरिता त्यांना मुदतवाढ तथा नेमणुक आदेश देणे आवश्यक आहे. संबधीत कर सल्लागार संस्थांना मुदतवाढ तथा नेमणुक आदेश देणेस मान्यता मिळणेकामी दि.०८.१०.२०१५ रोजीचे मा.व्य.स. चे सभेत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र.३५७ अन्वये प्रस्ताव सर्वसामावेशक माहितीसह फेर सादर करण्यात यावा असे ठरले होते.

त्यास अनुसरुन फी/मानधन निश्चितीबाबत The Institute of Chartered Accountants of India या मान्यता प्राप्त संस्थेच्या निर्देशानुसार ब वर्ग शहरांसाठी साधाणतः कामाच्या स्वरुपानुसार देय होणारी फी व यापुर्वीच्या प्रस्तावात नमुद केलेली फी याचा थोडक्यात तुलनात्मक तक्ता अवलोकनार्थ खालील प्रमाणे सादर केला आहे.

| अ.नं | करसल्लागार संस्थेचे नांव | कामाचे स्वरुप | प्रस्तावीत फी/मानधन (प्रती वर्ष) रु. | ICAI संस्थेप्रमाणे देय फी/मानधन |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.एस.जी.अंदाणी अॅन्ड कं. (चार्टर्ड अकौंटंटस्) अहमदनगर | कर सल्लागार (Tax Consultant) | २,००,०००/- + सेवाकर | ४,२५,०००/- + सेवाकर |
| ०२ | श्री.राहूल केळकर असो. मुंबई (चार्टर्ड अकौंटंटस्) | वार्षिक आयकर विवरणपत्र व आयकर कर निर्धारण व छाननी | ७०,०००/- + सेवाकर | १,१७,०००/- + सेवाकर & Above |

मा.व्य.स. निर्णय क्र.५५१/दि.२६.०६.२०१४ अन्वये मे.शंकर अंदाणी, चार्टर्ड अकौंटंटस् व मा.व्य.स. निर्णय क्र.४१६/.२७.०४.२०१३ अन्वये मे.राहुल केळकर, चार्टर्ड अकौंटंटस्, मुंबई यांची नियुक्ती करण्यात आली होती. तसेच मा.व्य.स. निर्णय क्र.८४२/१८.१०.२०१३ अन्वये सेवाकर सल्लागाराची उचित मानधन देवुन नेमणुक करण्यास मान्यता मिळाली होती. मे.श्रेणिक गांधी अॅन्ड कं. चार्टर्ड अकौंटंटस्, पुणे हे सुरवातीपासुन सेवाकरा संबधीत कामकाज पाहत असुन, सेवाकर कार्यालय औरंगाबाद, नासिक व वित्त मंत्रालय नवी दिल्ली येथे त्यांचे सल्ल्याने पत्रव्यवहार चालू आहे. त्यासाठी त्यांनी कोणतेही मानधन घेतलेले नाही. आणि श्री.ए.एल.कुलकर्णी, करसल्लागार कोपरगांव हे संस्थानला सुरुवातीपासुन विक्रीकर, व्हॅट, लक्झरीअस टॅक्स इ. बाबत विनामोबदला सल्ला देण्याचे काम करीत आहेत.

अशा प्रकारे सदर कर सल्लागाराच्या पुर्वीच्या नेमणुका, चार्टर्ड अकौंटंट असोसिएशनचे निर्देशानुसार साधारणः फी, त्यांचे संस्थानमधील यापुर्वीचे समाधानकारक कामकाज इ. सर्व बाबींचा विचार करुन खालीलप्रमाणे अवलोकनार्थ सादर करत आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | अंतर्गत लेखा-परिक्षण कालावधी | पूर्वीचे मानधन/ फी / देय फी | (ICAI) संस्थेच्या निर्देशाप्रमाणे फी | प्रस्तावीत फी व कामाचा अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.एस.जी.अंदाणी अॅन्ड कं. (चार्टर्ड अकौंटंटस्) अहमदनगर कर सल्लागार (Tax Consultant) | दि.०१/०४/२०१५ ते दि.३१/०३/२०१६ | २,००,०००/- + सेवाकर | ४,२५,०००/- + सेवाकर प्रति वर्ष *(रु.१५०० * १प्रतिनिधी * २८५ दिवस)* | १.रु.२,००,०००+ सेवाकर प्रति वर्ष<br>२. गत ६ वर्षापासुन संस्थानचे कर विषयक कामकाज पाहत आहेत.<br>३.त्यांचे कामकाज समाधानकारक आहे. |
| | | दि.०१/०४/२०१६ ते दि.३१/०३/२०१७ | २,००,०००/- + सेवाकर | | |
| २ | श्री.राहूल केळकर असो. मुंबई (चार्टर्ड अकौंटंटस्) वार्षिक आयकर विवरणपत्र व आयकर कर निर्धारण व छाननी | दि.०१/०४/२०१५ ते दि.३१/०३/२०१६ | ७०,०००/- + सेवाकर | **१,१७,०००/- + सेवाकर & Above** *(रु.३००० *१ सनदी लेखापाल * २४ दिवस)* | १.रु.७०,०००/- + सेवाकर प्रति वर्ष<br>२. गत २ वर्ष संस्थानचे आयकराचे कामकाज पाहत आहे.<br>३. त्यांचे कामकाज समाधानकारक आहे. |
| | | दि.०१/०४/२०१६ ते दि.३१/०३/२०१७ | ७०,०००/- + सेवाकर | | |
| | मे.श्रेणिक गांधी अॅन्ड कं. चार्टर्ड अकौंटंट, पुणे सेवाकर सल्लागार | आर्थिक वर्ष २०१५-१६ २०१६-१७ | निरंक | - | १. मानधन स्विकारत नाही<br>२. गत २ वर्ष संस्थानचे सेवाकराचे कामकाज पाहत आहे.<br>३. त्यांचे कामकाज अत्यंत समाधानकारक आहे. |
| | श्री.ए.एल.कुलकर्णी, कोपरगांव विक्रीकर, व्हॅट, लक्झरीअस टॅक्स इ | आर्थिक वर्ष २०१५-१६ २०१६-१७ | निरंक | - | १. मानधन स्विकारत नाही<br>२. गत २ वर्ष संस्थानचे व्हॅट, विक्रीकर, लक्झरीअस टॅक्स<br>३. त्यांचे कामकाज अत्यंत समाधानकारक आहे. |

अशाप्रकारे मा.व्य.स. निर्णय क्र.५५१/दि.२६.०६.२०१४ अन्वये मे.शंकर अंदाणी, चार्टर्ड अकौंटंटस् व मा.व्य.स. निर्णय क्र.४१६/.२७.०४.२०१३ अन्वये मे.राहुल केळकर, चार्टर्ड अकौंटंटस्, मुंबई व श्री.ए.एल.कुलकर्णी, कोपरगांव (कर सल्लागार) आणि निर्णय क्र.८४२/१८.१०.२०१३ अन्वये सेवाकर सल्लागार मे.श्रेणिक गांधी अॅन्ड कं. चार्टर्ड अकौंटंटस्, पुणे यांची निवड करण्यात आलेली आहे. तसेच चार्टर्ड अकौटंट असोसिएशच्या निर्देशाप्रमाणे देय फी, सध्या देत असलेली फी, मागील वर्षाचा कामाचा अभिप्राय, यासर्व बाबी विचारात घेता, आर्थिक वर्ष २०१५-१६ व २०१६-१७ करीता प्रस्तावित केले प्रमाणे नेमणुक करणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्य.समितीचे सभेपुढे निर्णयार्थ फेरसादर.

**निर्णय क्र.५६२** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थानकरीता एकाच कर सल्लागारांची नेमणूक करणेत यावी. याकरीता उपरोक्त नमुद केलेल्या कर सल्लागारांचे पुर्वीचे काम व प्रस्तावित केलेले मानधन याचा विचार करता आर्थिक वर्ष २०१५- १६ व २०१६- १७ करिता श्री.एस.जी. अंदाणी ॲण्ड कं., अहमदनगर यांची संस्थान कर सल्लागार म्हणून एकत्रित रु.२,००,०००/- + सेवाकर मात्र या दरावर नेमणूक करणेत यावी. तसेच प्रस्तावामधील तक्त्यामध्ये नमुद केलेले अ.नं.०३ व ०४ चे कर सल्लागार विनामुल्य सेवा देणार आहेत याकरीता त्यांचीही सेवा घेण्यात यावी.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.४५** **आर्थिक वर्ष २०१५- १६ व २०१६- १७ करिता अंतर्गत लेखापरिक्षक (Internal Auditor) यांची मुदतवाढ/ नेमणुकीबाबत प्रस्ताव फेरसादर.**

**प्रस्ताव-** संस्थानमध्ये दैनंदिन कामकाजाचा व्याप दिवसेंदिवस वाढत आहे. त्या अनुषंगाने आर्थिक व्यवहारात व कामकाजातही मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. तसेच आर्थिक व्यवहारां संबंधीत केंद्र व राज्य शासनाकडुन विविध आर्थिक, आयकर, सेवाकर, व्हॅट इ. विषयक कायदे पारित होतात. या कायद्यातील नव-नविन तरतुदींचा प्रभाव दैनंदिन आर्थिक कामकाजात पडत असतो. वैधानिक लेखापरिक्षणामध्ये आक्षेपांचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीने व आर्थिक व्यवहारांत पारदर्शकता येऊन वेळीच त्याच्यात सुधारणा करुन तात्काळ कार्यवाही करण्यासाठी व अंतर्गत नियंत्रण सक्षम राहण्यासाठी पुर्व लेखापरीक्षक, अंतर्गत लेखापरिक्षक व करसल्लागार यांच्या नेमणुका करण्यात येतात. अशाप्रकारे संस्थान, रुग्णालये विभाग, माहिती व सुविधा केंद्रे याकरिता अंतर्गत लेखापरिक्षक यांच्या नेमणुका करण्यात आल्या होत्या, त्यांची मुदत ३१ जुलै,२०१५ रोजी संपत असल्याने पुढील मुदतवाढ तथा नेमणुक आदेश देणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव दि.०८.१०.२०१५ रोजीचे मा.व्य.स.चे सभेत सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र.३५६ अन्वये अंतर्गत लेखापरिक्षकांची निवड कशाच्या आधारे करण्यात आलेली आहे. लेखापरिक्षकांचे मागील वर्षीचे मानधन कीती व सध्याचे दर कीती आहेत. तसेच त्यांच्या कामाचे ठिकाण यासह चार्टर्ड अकौटंट असोसिएशनकडून मानधनाची माहिती घेण्यात येवुन सविस्तर सर्वसामावेशक तुलनात्मक असा प्रस्ताव फेर सादर करण्यात यावे असे ठरले.

त्यास अनुसरुन फी निश्चितीबाबत The Institute of Chartered Accountants of India, New Delhi (ICAI) या मान्यताप्राप्त संस्थेच्या निर्देशानुसार व ब वर्ग शहरांसाठी कामाच्या स्वरुपानुसार देय होणारी फी, मागील वर्षाचे लेखा परिक्षक व त्यांची फी, त्यांचे कामाचे ठिकाण/स्वरुप यासह तुलनात्मक माहिती अवलोकनार्थ खालीलप्रमाणे सादर केला आहे.

1. मा.व्य.स निर्णय क्र.४८१/दि.२१.०६.२०१३ अन्वये दि.३१.०७.२०१४ अखेर अंतर्गत लेखापरिक्षकांच्या नेमणुका करण्यात येवुन त्यांचे मानधन निश्चित करण्यात आले होते. निर्णय क्र.५५१/दि.२६.०६.२०१४ अन्वये दि.०१.०८.२०१४ पासुन पुढील आदेश होईपर्यंत पुर्वीच्याच अटी शर्तींवर मुदतवाढ देण्यात आली होती.

2. तथापी लेखापरिक्षण फी कमी असल्याने रुग्णालय विभागाच्या अंतर्गत लेखापरिक्षकांनी पुढील आदेशानुसार काम सुरु केलेले नाही. तर संस्थानच्या अंतर्गत लेखापरिक्षकांनी दि.३१ मार्च,२०१५ अखेरच पुर्वीच्या फी वर काम करुन फी वाढी अभावी काम बंद केलेले आहे. तथापी माहिती सुविधा केंद्राचे अंतर्गत लेखापरिक्षकांनी मात्र आदेशाप्रमाणे काम पुर्ण केलेले आहे.

3. पुर्वीच्या अंतर्गत लेखापरिक्षकांच्या कामाचे ठिकाण/स्वरुप, पुर्वीचे मानधन, नियुक्ती कालावधी, त्यांची वाढीव फी मागणी अपेक्षा, व ICAI या मान्यता प्राप्त संस्थेनुसार साधारणतः देय होणारी फी खालीलप्रमाणे-

| अ. नं. | अंतर्गत लेखापरिक्षण संस्था व ठिकाण | कामाचा कालावधी निर्णक क्र.५५१ अन्वये | ठरलेले मानधन/फी रु. | कामाची सद्यस्थिती | सुधारीत फी मागणी | ICAI प्रमाणे साधारणतः देय फी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे.एसएसएएम ॲण्ड कंपनी, पुणे. संस्थान अंतर्गत लेखापरिक्षक | १.०८.२०१४ ते पुढील आदेश होईपर्यंत | २,४०,०००/- + सेवाकर | फी वाढी अभावी दि.०१.०४.२०१५ पासून काम स्थगित | ५,००,०००/- + सेवाकर | रु.५,४०,०००+ सेवाकर |
| | श्री.एस.एल. कुलकर्णी, कोपरगांव. रुग्णालये विभाग अंतर्गत लेखापरिक्षक | १.०८.२०१४ ते पुढील आदेश होईपर्यंत | २,१०,०००/- | फी वाढी अभावी काम करण्यास असमर्थता | असमर्थ | रु. ५,४०,०००+ सेवाकर |
| २ | मे.एन.पी.रेडीज, चार्टर्ड अकौटंटस मुंबई. परकीय चलन व मुंबई कार्यालय | दि.०१.०८.२०१४ ते दि.३१.०७.२०१५ | २५,०००/-/ प्रत्यक्ष खर्च पैकी कमी | कामकाज समाधानकारक चालू आहे. | मागील वर्षाप्रमाणे मान्य | रु.४५,०००+ सेवाकर |
| ३ | मे.अमोल.सी.दातार ॲन्ड असो.चार्टर्ड अकौटंट पुणे माहिती व सुविधा केंद्र हैद्राबाद, चेन्नई, | दि.०१.०८.२०१४ ते दि.३१.०७.२०१५ | ५०,०००/- + सेवाकर | कामकाज समाधानकारक चालू आहे. | मागील वर्षाप्रमाणे मान्य | ५०,०००/- + सेवाकर |

मा.व्य.स. निर्णय क्र.५५१/दि.२६.०६.२०१४ अन्वये पुढील आदेश होईपर्यंत अंतर्गत लेखापरिक्षकांना पुढील नेमणुक आदेश देण्यात आला होता. तथापी संस्थान व रुग्णालय विभागाच्या अंतर्गत लेखापरिक्षण संस्थांनी फी वाढी अभावी कामकाज स्थगित केले आहे.

मा.व्य.स.निर्णय क्र.१०००/दि.२०.११.२०१४ अन्वये पुर्व लेखापरिक्षक नियुक्तीचेवेळी विहीत पध्दतीने वर्तमानपत्रात सक्षम लेखापरिक्षण संस्थांकडुन निविदा/दरपत्रके मागवुन एका लेखापरिक्षण संस्थेची नेमणुक करण्यात येऊन उर्वरीत पाच लेखापरिक्षण संस्थांचे पॅनल तयार करण्यात आले आहे. अंतर्गत लेखापरिक्षणाकरिता त्यातील अ.क्र.१ व २ यांना त्यांनी दिलेल्या फीवरती अंतर्गत लेखापरिक्षण करण्याकरिता तयार असलेबाबत विचारणा केली होती. या दोन्ही लेखापरिक्षण संस्थेचे प्रतिनिधी प्रत्यक्ष भेटीसाठी येवुन कामाचा आढावा घेतला. पैकी अ.क्र.१ मे.ए.डी.अंजीकर ॲन्ड असो. चार्टर्ड अकौंटंट, मुंबई यांनी लेखापरिक्षण कालावधीत लेखापरिक्षकाची राहण्याची व प्रसाद भोजनाची सोय संस्थानमार्फत होणार नसल्यास पुर्वी नमुद केलेल्या रु.१,८०,०००/- फी मध्ये वाढ करुन ती रु.२,९६,०००/-+सेवाकर इतकी करण्याची मागणी केली. तर मे.के.के. चाणाणी ॲन्ड असो. चार्टर्ड अकौंटंट, मुंबई यांनी रु.२,९७,५४०/-+सेवाकर या पुर्वी दिलेल्या लेखापरिक्षण फीची मागणी कायम ठेवली. यावेळी पुर्वीचे अंतर्गत लेखापरिक्षक मे.एसएसएएम ॲण्ड कंपनी, पुणे यांनीही पुर्वीचीच रु.५,४७,२००/- इतकी ची मागणी कायम ठेवली.

या सर्वांचा सारासार विचार करता पुर्वीच्या अंतर्गत लेखापरिक्षकांची फी रु.५,४७,२००/- ही तुलनात्मक दृष्टया पॅनलवरील या दोन लेखापरिक्षकांपेक्षा जास्त असल्याने व लेखापरिक्षण संस्थांच्या कामाचा अनुभव, त्यांचे कंपन्यांना असलेले ISO गुणवत्ता सर्टिफिकेट याचा विचार करता व पुर्वीच्या लेखापरिक्षकांकडे यापुर्वी अनेक वर्ष काम असल्याने त्यामध्ये बदल होण्यास अनुसरुन याबाबींचा विचार करुन पॅनलवरील अनुक्रमे १ व २ यांची फी साधारणः समान असल्याने व त्याच फी मध्ये संस्थान व रुग्णालये विभाग यांचे अंतर्गत लेखापरिक्षण करण्यासाठी विभागून एक ऐवजी दोन लेखापरिक्षण संस्था मिळण्यास अनुसरुन अनुक्रमे मे.ए.डी.अंजीकर ॲन्ड असो. चार्टर्ड अकौंटंट, मुंबई व मे.के.के. चाणाणी ॲन्ड असो. चार्टर्ड अकौंटंट, मुंबई यांना प्रत्येकी रु.१,३०,०००/-+ सेवाकर एकत्रित वार्षिक फीवर अंतर्गत लेखापरिक्षक म्हणुन प्रस्तावीत करत आहे. तसेच चालु आर्थिक वर्ष संपत आल्याने सदर नेमणुक पुढील आर्थिक वर्ष २०१६-१७ पर्यंत नेमणुक आदेश देता येईल. त्यास अनुसरुन अवलोकनार्थ खालीलप्रमाणे प्रस्तावीत केले आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | अंतर्गत लेखा-परिक्षण कालावधी | मागणी केलेले मानधन/ फी रु. | (ICAI) संस्थेचे मानधन निर्देश | प्रस्तावीत |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे.के.के.चाणाणी ॲन्ड असो.चार्टर्ड अकौटंटस मुंबई.<br>**संस्थानकरिता** | दि.०१/०४/२०१५ ते दि.३१/०३/२०१६<br>दि.०१/०४/२०१६ ते दि.३१/०३/२०१७ | १,३०,०००/-+ सेवाकर<br>१,३०,०००/-+ सेवाकर | ५,४०,०००+ सेवाकर प्रति वर्ष<br>*(रु.१५०० *३ प्रतिनिधी * ४ महिने)* | रु.१,३०,०००+ सेवाकर प्रति वर्ष<br>१. पुर्वीपेक्षा सदर फी कमी आहे.<br>२. ISO गुणवत्ता प्रमाणपत्र<br>३. कामाचा अनुभव व फर्म मोठी |
| २ | मे.ए.डी.अंजीकर ॲन्ड असो. चार्टर्ड अकौटंटस, मुंबई.<br>**रुग्णालये विभाग** | दि.०१/०४/२०१५ ते दि.३१/०३/२०१६<br>दि.०१/०४/२०१६ ते दि.३१/०३/२०१७ | १,३०,०००/-+ सेवाकर<br>१,३०,०००/-+ सेवाकर | ५,४०,०००+ सेवाकर प्रति वर्ष<br>*(रु.१५०० *३ प्रतिनिधी * ४ महिने)* | रु.१,३०,०००+ सेवाकर प्रति वर्ष<br>१. पुर्वीपेक्षा सदर फी कमी आहे.<br>२. ISO गुणवत्ता प्रमाणपत्र<br>३. कामाचा अनुभव व फर्म मोठी |
| ३ | मे.एन.पी.रेडीज, चार्टर्ड अकौटंटस मुंबई परकीय चलन व मुंबई कार्यालय | दि.०१/०४/२०१५ ते दि.३१/०३/२०१६<br>दि.०१/०४/२०१६ ते दि.३१/०३/२०१७ | २५,०००/- / प्रत्यक्ष खर्च यापैकी जे कमी असेल ते | ४५,०००+सेवाकर (१५००*३० दिवस) | रु.२५,००० प्रति वर्ष<br>१. पुर्वीइतकीच फी आहे.<br>२. कामाचा अनुभव व फर्म मोठी<br>३. सदर बाबत स्वतंत्र रिपोर्ट FCRA दिल्ली येथे सादर करावा लागतो.<br>४. त्यांचे काम समाधानकारक आहे. |
| ४ | मे.अमोल.सी.दातार ॲन्ड असो.चार्टर्ड अकौटंट पुणे माहिती व सुविधा केंद्र हैद्राबाद, चेन्नई, सिकंदराबाद | दि.०१/०४/२०१५ ते दि.३१/०३/२०१६<br>दि.०१/०४/२०१६ ते दि.३१/०३/२०१७ | रु. ५०,०००/- प्रति वर्ष<br>रु. ५०,०००/- प्रति वर्ष | ५०,०००+सेवाकर (१५००*३० दिवस+ रेल्वे तिकीट) | रु.५०,००० प्रति वर्ष<br>१.पुर्वीइतकीच फी आहे.<br>२.तिन्ही माहिती व सुविधा केंद्राच्या ठिकाणी जावुन प्रत्यक्ष लेखा-परिक्षणाचे कामकाज करावे लागते.<br>३. त्यांचे काम समाधानकारक आहे. |

अशा प्रकारे लेखापरिक्षक नेमणुकी करीता मा.व्य.स. निर्णय क्र.५५१/दि.२६.०६.२०१४ अन्वये वृत्तपत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करुन आलेल्या अर्जामधुन त्यांच्या कामाचा अनुभव व त्यांनी नमुद केलेली लेखापरिक्षण फी यानुसार अनुक्रमे पाच लेखापरिक्षण संस्थांचा पॅनल तयार करण्यात आला होता. त्यापैकी व काही लेखापरिक्षक यांचे मागील लेखापरिक्षण कामकाज समाधानकारक असल्याने व मा.व्य.स.निर्णय क्र.३५६/ ०८.१०.२०१५ अन्वये चार्टर्ड अकौंटंट असोसिएशन चे फी संबधीत निर्देश या सर्व बाबींचा विचार करुन प्रस्ताव सादर केलेला आहे. तरी संस्थान, रुग्णालये विभाग, माहिती सुविधा केंद्रे यांचे २०१५-१६ व २०१६-१७ या दोन आर्थिक वर्षाचे अंतर्गत लेखापरिक्षण करण्याकरिता लेखापरिक्षण संस्थांची नियुक्ती होणेकामी सदरचा प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे फेरसादर.

**निर्णय क्र.५६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, आर्थिक वर्ष २०१५- १६ व २०१६- १७ करिता संस्थानसाठी अंतर्गत लेखापरिक्षकाची (Internal Auditor) नेमणूक करणेकामी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात येऊन, नामांकित** (साधारणतः रु.५०० कोटींचे वर वार्षिक उलाढाल असलेल्या संस्था/ कंपन्यांचे लेखापरीक्षण करण्याचा अनूभव असलेल्या) **अंतर्गत लेखापरिक्षकांना बंद पाकिटामध्ये त्यांचे फीसह अर्ज करणेसाठी आवाहन करणेत यावे. तसेच मुदतीमध्ये आलेल्या अर्जांची उपसमिती सभेसमोर छाननी करणेत येऊन, त्यामधील पात्र लेखापरिक्षकांच्या फीचा तुलनात्मक तक्ता निर्णयार्थ त्रीसदस्य समिती सभेसमोर सादर करणेत यावा.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.४६** **श्री साईबाबा हॉस्पिटल मेडीकल स्टोअर व भांडार विभागासंबंधीत सर्जिकल साहित्य, औषधे व इतर खरेदीचे विशेष लेखापरिक्षक नेमणूकीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलित श्री साईबाबा हॉस्पीटलमधील मेडीकल स्टोअर व भांडार विभागाशी संबंधीत सर्जिकल साहित्य, औषधे इ. खरेदीमध्ये कार्यकारी अधिकारी यांना गंभीर उणीवा आढळुन आल्या होत्या. त्यावर मा.कार्यकारी अधिकारी यांनी प्राथमिक चौकशी अहवाल तयार करुन संबंधीतांवर प्राथमिक कार्यवाही केली आहे. संबंधीत गैरव्यवहाराचे थोडक्यात सर्वसाधारण स्वरुप –

१. आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा नसणे (आदेश एका कंपनीचा व माल वेगळया कंपनीचा)

२. निविदेमध्ये औषधांचे प्रत्यक्षात अस्तित्वात नसलेले परिमाण (उदा. ७५० ml Spirit ची बाटली बाजारात अस्तित्वात नाही. परंतु निविदेत ते परिणाम ठेवले. परिणामी Competition झाली नाही. त्यामुळे एकाच पुरवठादाराला आदेश द्यावा लागले की जो पुरवठादार ६५० ml चीच बाटली वर्षानुवर्षे देत होता.)

३. Spirit च्या वाहतुकीसाठी Tender term & Condition मध्ये तरतुद नसतांना संस्थान वाहनांचा वापर करण्यात आला.

वरील प्रकार गेली ६ ते ७ वर्षांपासुन चालू असण्याचा अंदाज असल्याने लेखापरिक्षणाचा आवाका खूप मोठा आहे. सदरील लेखापरिक्षण नेहमीच्या लेखापरिक्षकांकडुन करुन घेण्यापेक्षा शासनाच्या रुग्णालयांच्या लेखापरिक्षणाचा अनुभव असलेला राज्य शासनाच्या स्थानिक निधी लेखापरिक्षण विभाग (Local Fund) यांचेकडुन करुन घेण्याचे निश्चित केले होते. जा.क्र.एसएसएस/वशी-लेखा/१२६/१५ दि.०८ एप्रिल, २०१५ अन्वये त्यांचेकडे मागणी करण्यात आली होती. तथापि क्र.स्था.१८/ब/श्री साईबाबा संस्थान शिर्डी/विलेप/अेअे-३/६८८ दि.२९.०४.२०१५ चे पत्रानुसार लेखापरिक्षण करता येणार नाही अशा आशयाचे पत्र स्थानिक निधी लेखापरिक्षण विभागाने दिले होते.

तद्नंतर सदरील विभागाशी पुनःश्च दुरध्वनीवरुन चर्चा केली असता त्यांनी ऑगस्ट नंतर लेखापरिक्षण करण्याचे मान्य केले. त्यासाठी त्यांनी आणखी सविस्तर प्राथमिक चौकशी अहवालाची मागणी केली. यावर मा.कार्यकारी अधिकारी यांचेकडे शासनाला स्मरणपत्र पाठविणेसाठी टिपणी सादर केली असता कार्यकारी अधिकारी व मुख्यलेखाधिकारी यांची चर्चा झाली. सदरील चर्चेमध्ये सध्या शासनाने नेमलेले वैधानिक लेखापरिक्षक तयार असतील तर त्यांचेकडुन विशेष लेखापरिक्षण करुन घेण्यास हरकत नाही. शासन नियुक्त वैधानिक लेखापरिक्षक मे.शिंदे चव्हाण गांधी अॅण्ड कं., चार्टर्ड अकौंटंटस् यांचेशी चर्चा केली असता त्यांनी लेखापरिक्षण करण्याची तयारी दर्शविली आहे.

शासनाने वैधानिक लेखापरिक्षणाकरिता रु.१ लाख वार्षिक फी निश्चित केली होती. सदर विशेष लेखापरिक्षणाकरिता चार्टर्ड अकौंटंटस् असोसिएशनच्या निर्देशानुसार व ब-वर्ग शहर गृहीत धरता साधारणतः मॅडेजप्रमाणे १ सीए व एक सेमीक्वालिफाईड मदतनीस गृहीत धरल्यास (२००००+ ५०००*१५ दिवस) रु.३,७५,०००/- इतकी फी होते. तथापि त्यांचेशी दुरध्वनीवरुन चर्चा झाली असता साधारणतः रु.१,८५,०००/- (सर्व करांसह) फी मध्ये त्यांचेकडुन २००७-०८ ते २०१३-१४ या सात वर्षांचे विशेष लेखापरिक्षण करुन घेता येईल. हॉस्पीटलमधील मेडीकल स्टोअर व भांडार विभागाशी संबंधीत सर्जिकल साहित्य, औषधे इ. चे विशेष लेखापरिक्षण/ तपासणी करणे आवश्यक आहे.

तरी मा.विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी नियुक्त केलेले वैधानिक लेखापरिक्षक मे. शिंदे चव्हाण गांधी अॅण्ड कं., चार्टर्ड अकौंटंटस् यांचेकडुन हॉस्पीटलमधील मेडीकल स्टोअर व भांडार विभागाचे २००७-०८ ते २०१३-१४ या सात वर्षांचे विशेष लेखापरिक्षण/तपासणी करुन घेण्यासाठी रु.१,८५,०००/- इतक्या रक्कमेस मान्यता देणेस व त्या रक्कमेमध्ये मे.शिंदे चव्हाण गांधी अॅण्ड कं.,चार्टर्ड अकौंटंटस् यांची नेमणुक करणेकामी सदरचा प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीपुढे निर्णयार्थ सादर करण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५६४** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, उपरोक्त प्रस्तावावरुन सदरहू विशेष लेखापरिक्षणामधील कामाचे स्वरुप कसे राहील, लेखापरिक्षक किती कर्मचारी पुरविणार व किती दिवसात काम पुर्ण होणार याबद्दलची माहिती दिसून येत नाही. करीता या सर्व बाबींचा समावेश करणेत येऊन, सविस्तर प्रस्ताव सभेसमोर फेरसादर करणेत यावा.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.४७** **काजू, खिसमिस व मेथी या किराणा मालाची मागणी पुर्ण झाल्याने वार्षिक मागणीच्या २५ टक्के मालाची खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानने सन २०१५-१६ सालासाठी किराणा माल खरेदीकामी मालाचे पुरवठा आदेश दिले होते. त्यातील काही वस्तूंची वार्षिक मागणी पूर्ण झालेली आहे.

संस्थानने पुरवठा आदेश दिलेल्या किराणा मालाची वार्षिक मागणी विहित वेळेपूर्वी पूर्ण झाल्यास, संस्थानने संबंधित पुरवठाधारकांशी केलेल्या करारनाम्यातील अटी व शर्ती क्रमांक ८ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे. "प्रसंगी निविदा कालावधीत व तदनंतरही नमुद केलेल्या मालापेक्षा २५% इतका जादा माल मंजुर दरानेच पुरविणे बंधनकारक राहील."

उर्वरित कालावधीसाठी हा माल आवश्यकतेप्रमाणे खरेदी करणे गरजेचे आहे. तूर्त वार्षिक मागणीच्या २५ टक्के हा माल खरेदी करता येईल.

किराणा मालाची वार्षिक मागणी, २५ टक्के मागणी, येणारा खर्च याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | मालाचा तपशिल | वार्षिक मागणी क्विंटल | २५% जादा मागणी क्विंटल | मंजुर दर प्रती क्विंटल | २५% जादा खरेदीकामी येणारा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | काजू पाकळी | १५० | ३७.५० | ५४,४००/- | २०,४०,०००/- |
| २ | खिसमीस | १०० | २५.०० | १९,४००/- | ४,८५,०००/- |
| ३ | मेथी | २ | ०.५० | ७,०००/- | ३,५००/- |
| | | | | **एकुण खर्च रु.** | **२५,२८,५००/-** |

उपरोक्त तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे वार्षिक मागणीपेक्षा २५% इतका जादा किराणा माल खरेदीकामी एकुण रक्कम रु.२५,२८,५००/- (अक्षरी रुपये पंचवीस लाख अठ्ठावीस हजार पाचशे मात्र) एवढा खर्च येईल.

संस्थानने सन २०१५-१६ करीता वार्षिक किराणा माल खरेदीकामी (गावरान तुप वगळता) अंदाजे रक्कम रु.४९,२२,००,०००/- चे खर्चाला मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेतलेली आहे. यातून आतापर्यंत वार्षिक किराणा माल खरेदीकामी रक्कम रु.३४,९१,५०,१५२/- मात्रचे पुरवठा आदेश दिलेले आहेत. तसेच पुनर्निविदा करावयाचे किराणामालासाठी जुन-२०१५ ते ऑक्टोबर-२०१५ अखेर रु.१,६६,००,१४५/- मात्र खर्च झालेला आहे. यातील पुढील नोव्हेंबर-२०१५ ते मार्च-२०१६ या कालावधीसाठी हा किराणामाल व गहू खरेदीकामी मिळून अंदाजे रक्कम रु.२,२५,००,०००/- मात्रपर्यंत खर्च येईल. ही एकूण रक्कम रु.३८,८२,५०,२९७/- इतकी होत आहे. तरीही उर्वरित रक्कम रु.१०,३९,४९,७०३/- मात्र शिल्लक असल्यामुळे या रकमेतून वरील खर्च करता येईल, असे वाटते.

तरी काजू, खिसमिस, व मेथी या मालाच्या एकूण वार्षिक मागणीच्या २५% इतका जादा माल करारनाम्यातील अटी-शर्तीनुसार मंजूर दराने वरील तकत्यात नमूद केल्याप्रमाणे खरेदी करणेस व याकामी येणारे एकूण रक्कम रु.२५,२८,५००/- (अक्षरी रुपये पंचवीस लाख अठ्ठावीस हजार पाचशे) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कुंभमेळयाच्या कालावधीमध्ये जास्त खपत झाल्यामुळे काजू, खिसमिस व मेथी या किराणा मालाची मागणी पुर्ण झाल्याने वार्षिक मागणीच्या २५ टक्के जादा मालाची खरेदी करणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावाचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.४८** **संस्थानचे भुसंपादनाने घेतलेल्या जमिनीमध्ये भाजीपाला उत्पादन करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थान मार्फत निमगांव कोऱ्हाळे, कनकुरी, शिर्डी व नांदुर्खी परिसरात शेती महामंडळाकडुन जमिन खरेदी करण्यात आलेल्या आहेत. खरेदी करण्यात आलेल्या जमिनीचे वेगवेगळया ठिकाणी क्षेत्र आहे.

दि.16/10/2015 शुक्रवार रोजी मा.कार्यकारी अधिकारी यांच्या समोर बगीचा विभागाचे कामाचे सादरीकरण सादर केले असता, संस्थानने भुसंपादनाने घेतलेल्या जमीनीमध्ये पाण्याची सोय असलेल्या क्षेत्रामध्ये भाजीपाल्याचे उत्पादन घेऊन सदरचा भाजीपाला श्री साईप्रसादलयात देणेकामी निर्देश देण्यात आले.

संस्थानने भुसंपादनाने केलेल्या जमीनीमधील खालील गट नंबर मध्ये हंगामी पाण्याची सोय असल्यामुळे भाजीपाला उत्पादीत करता येईल.

| अं.नं. | गट नं. | क्षेत्र | गाव |
|---|---|---|---|
| ०१ | १२१ | ४ एकर | कनकुरी |
| ०२ | १८२ | ६ एकर | निमगाव |
| ०३ | २३५ | ६ एकर | निमगाव |
| ०४ | २३८ | २७ आर. | निमगाव |
| ०५ | ९७ | ४ एकर | कोऱ्हाळे |
| ०६ | ५४/५५ | ७ एकर | शिर्डी |

उपरोक्त केलेल्या गट नं. मध्ये (गहु, कांदा, वांगे, बटाटा,भेपळा) इ. भाजीपाल्याचे उत्पादन करता येईल. यासाठी परिसरातील शेतकऱ्यांकडुन ठेके पध्दतीने भाजीपाला उत्पादीत करुन घेता येईल. भाजीपाल्याचे उत्पादन घेणेसाठी संस्थानला सदर जमिनीमध्ये पाणी,लाईट व,मोटार इ. सोय उपलब्ध करुन द्यावी लागणार आहे.

भाजीपाल्याचे उत्पादन घेणेसाठी शेतकऱ्यांनी नांगरण,मशागत,बिज,खते-औषधे वापरुन सदरचा भाजीपाला पिकवायचा आहे. पिकवलेल्या भाजीपाल्यामध्ये निम्मा वाटा संस्थानला देऊन उर्वरीत निम्मा वाटा हा स्वत: ठेवावा किंवा परत बाजारभावाने संस्थानला विक्री द्यावयाचा आहे. त्यामुळे सदर जमिनीत पिकणारा भाजीपाला संस्थानच्या प्रसादलयात वापरता येईल. तसेच संस्थानला उर्वरीत भाजीपाला हा त्याच शेतकऱ्यांकडुन बाजारभावाप्रमाणे विकत घेता येईल. व त्यामुळे शेतकऱ्याला हमीभाव सुध्दा मिळेल व त्याच्या मालाची विक्री होईल.

तरी शेतीमहामंडळातील गट नं. मध्ये शेतकऱ्यांना भाजीपाल्याचे उत्पादन घेणेसाठी निम्म्या वाटपाच्या पध्दतीने दिली असता सदर जमिनीची मशागत करणे, बिज,खते-औषधे इ. कामे सदर शेतकऱ्यांकडुन करुन घेता येईल. त्यामुळे सदर जमिनी पडीत न राहता वापरात येतील. व संस्थानला भाजीपाल्याचे उत्पन्न ही मिळेल. यामध्ये कामगारांची आवश्यकता राहणार नाही. ज्या शेतकऱ्याचे क्षेत्र फारच कमी आहे व खरच गरजु होतकरु शेतकरी यांना 2 ते 3 एकर क्षेत्र आकरा महिन्याच्या करारनाम्यानुसार कसविण्यासाठी (पिकविण्यासाठी) देऊन शेतीचा वापर चालु करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे भुसंपादनाने घेतलेल्या जमिनीमध्ये भाजीपाला उत्पादन करणेसाठी कामाचे स्वरुपानुसार बाहेरील मजुर लावून मजुरीने सदरहू काम करुन घेण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.४९** **दि.०१-०४-२०१६ ते दि.३१-०३-२०१७ या कालावधीकरीता एअर सर्कीट ब्रेकर्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (AMC) देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा नियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

श्री साईबाबा संस्थानचे मंदिर परीसर, साईनगर, श्री साईबाबा हॉस्पीटल, श्री साईनाथ रुग्णालय + व्दारावती भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवासस्थान, श्री साई प्रसादालय, साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा याठिकाणीच्या इमारतींना वीजपुरवठयाकरीता स्वतंत्र आठ ठिकाणी सबस्टेशन उभारुन विद्युतपुरवठा करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा खंडीत झाल्यानंतर करावयाच्या तातडीच्या वीजपुरवठयासाठी प्रत्येक ठिकाणी जनरेटरसेट बसविण्यात आलेले आहेत. सदरचे जनरेटर सेट ऑपरेटींग करणेकरीता स्वतंत्र ए.एम.एफ. पॅनेल बसविण्यात आलेले आहे. प्रत्येक सबस्टेशन मध्ये महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा व जनरेटरच्या ए.एम.एफ.पॅनेलमार्फत येणारा वीजपुरवठा वरील इमारतींना पुरविणेकरिता मेन डिस्ट्रिब्युशन पॅनेल बसविण्यात आलेले आहेत. संस्थानमध्ये आजपर्यंत विविध ठिकाणच्या ए.एम.एफ.पॅनेल व मेन डिस्ट्रिब्युशन पॅनेलमध्ये ८०० ॲम्पीअर ते २००० ॲम्पीअर कॅपॅसिटीचे एल.अँड.टी.कंपनीचे व सिमेन्स कंपनीचे प्रत्येकी रु. १,३०,०००/- ते रु. ४,५०,०००/- किंमतीचे एकुण ९२ नग एअर सर्कीट ब्रेकर बसविण्यात आलेले आहेत.

जनरेटरच्या ए.एम.एफ.पॅनेलमधील एअर सर्कीट ब्रेकर हे वीजपुरवठा चालू बंद होण्याच्या वेळेस म्हणजेच जनरेटर सेट चालू बंद होण्याच्या वेळेस कंट्रोल सर्किटव्दारे ऑटोमॅटीक ON/ OFF होतात. त्याचप्रमाणे मेन डिस्ट्रिब्युशन पॅनेलमधील एअर सर्किट ब्रेकर हे Mannually ON/ OFF करावे लागतात. सततच्या ON/ OFF होण्याच्या क्रियेमुळे कॉन्टॅक्ट ब्रेकरचे स्क्रू, नट, बोल्ट, कनेक्टर स्प्रिंग हे लूज होत असतात. तसेच ब्रेकर ज्याठिकाणी सप्लायला जोडला जातो त्याठिकाणी स्पार्किंग होऊन कॉन्टॅक्टवर कार्बन जमा होत असतो. त्यामुळे कधी कधी ब्रेकर चालू / बंद होण्यास व सप्लाय त्यामधून पास होण्यास अडथळा येऊ शकतो. त्याचप्रमाणे एखादया मेन डिस्ट्रिब्युशन पॅनेल अथवा ए.एम.एफ.पॅनेल मधील एअर सर्किट ब्रेकर पासून पुढे जोडलेला एखादा मेनस्वीच अथवा विद्युत उपकरण अथवा मेनस्वीच भूसंपर्कित झाल्यास ज्या एअर सर्कीट ब्रेकर मधून क्षमतेपेक्षा जास्त वीज प्रवाह वाहुन पुढील हानी व धोका टळण्यासाठी एअर सर्कीट ब्रेकरमधील Over current & Earth fault सेंन्सर कार्यान्वित होऊन वीजपुरवठा खंडीत होतो. त्यामुळे पुढील हानी अथवा धोका टळत असतो. संस्थानमधील काही ठिकाणचे एअर सर्किट ब्रेकर हे २२ वर्षापुर्वी बसविलेले आहेत. वरील सर्व कारणांमुळे एअर सर्किट ब्रेकरमार्फत वीजपुरवठा करण्यास काही अडथळा येऊन नये. याकरीता सदरच्या एअर सर्किट ब्रेकरची नियमित सर्व्हिसिंग करावी लागते. सर्व्हिसिंगचे वेळेस खराब झालेले कॉन्टॅक्ट व ब्रेकरच्या आतील मेकॅनिझमचे सदोष पार्ट बदलून एअर सर्किट ब्रेकरची सर्व्हिसिंग करण्यात येते.

संस्थानचे विद्युत विभागाकडील विविध ठिकाणच्या ए.एम.एफ.पॅनेल व मेन डिस्ट्रिब्युशन पॅनेल मधील साधारणत: ९२ नग एअर सर्किट ब्रेकर्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) दि.०१-०४-२०१६ ते दि. ३१-०३-२०१७ या कालावधीसाठी देणेकामी अंदाजे रक्कम रुपये १३,८०,०००/- मात्र खर्च येणे अपेक्षित आहे. सदर कामास व येणा-या खर्चास मा.त्रिसदस्यीय समितीची व मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घ्यावी लागणार आहे.

| Sr.No. | ACB Rating | Qty. | Rate. | Amount |
|---|---|---|---|---|
| 01) | Regular preventive maintence of Low Voltage Air Circuit Breaker | 92 Nos. | Rs.15,000/- | Rs. 13,80,000/- |
| | | | **Total Amount :-** | **Rs. 13,80,000/-** |

उपरोक्तप्रमाणे एअर सर्किट ब्रेकर्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) दि.०१-०४-२०१६ ते दि. ३१-०३-२०१७ या कालावधीसाठी देणेकामी अंदाजे रक्कम रुपये १३,८०,०००/- मात्र इतक्या येणा-या खर्चास, कामास वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन निविदा बोलविणेस तसेच सदरहु खर्चास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.५६७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित एअर सर्किट ब्रेकर्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) करणेकामी विहीत पध्दतीने जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.१३,८०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. मात्र तत्पुर्वी याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.५०** **श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅंडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट करणेसाठी मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा नियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीच्या ०१).मंदिर परीसर,०२).साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम), ०३).श्री साईबाबा हॉस्पीटल + साईनगर,०४). व्दारावती भक्तनिवास + श्री साईनाथ रुग्णालय,०५).श्री साई प्रसादालय,०६). साईआश्रम भक्तनिवास ०७). साई धर्मशाळा, ०८). पाणीपुरवठा साठवण तलाव, ०९). रथपालखी जनरेटर या वेगवेगळया ठिकाणी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून वीजपुरवठा घेण्यात आलेला आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा पुरवठा काही कारणास्तव वेळोवेळी खंडीत होतो. काही वेळेस महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे दुरुस्तीचे मोठे काम चालू असल्यास २४ तास देखील वीजपुरवठा खंडीत केला जातो. अशा काळात संस्थानचे कामकाज सुरळीत चालावे, गर्दीत अंधारात काही अनुचीत घटना घडू नये याकरीता पर्यायी वीजपुरवठयासाठी ठिकठिकाणी जनरेटरसेट बसविण्यात आलेले आहे. हे सर्व जनरेटर सुस्थितीत कार्यान्वित असणे गरजेचे असल्याने त्याकरीता यासर्व जनरेटरची काही ठरावीक कालावधीत इंजिन आईल, डिझेल फिल्टर, ऑईल फिल्टर, बायपास फिल्टर, कुलंट फिल्टर बदली करुन बी चेक सर्व्हिसिंग करणे गरजेचे असते. तसेच काही फॉल्ट झाल्यास तातडीने दुरुस्त करुन जनरेटर कार्यान्वित करणे गरजेचे असते. ऑईल फिल्टर व इतर मटेरीअल हे जनरेटर उत्पादक कंपनीचे ओरीजिनल वापरणे फायदेशिर असते. हे सर्व मटेरीअल मार्केटमध्ये उपलब्ध होत नाही. म्हणून सदरच्या जनरेटर इंजिनची सर्व्हिसिंग हे जनरेटर इंजिनची उत्पादक कंपनीकडून करुन घेणे गरजेचे असते.

यापुर्वी संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅंडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेकरीता वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहीरात अपलोड करुन ई-निविदा बोलविण्यात येऊन त्यातील निम्नतम दर दिलेले मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स अॅण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांना दि.१-१०-२०१४ ते दि.३०-०९-२०१५ या कालावधीकरीता श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅंडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचा संस्थान जा.नं.एसएसएस / विद्युत / ३१५८/ २०१४ दि.३०-०९-२०१४ अन्वये रक्कम रु. ३३,००,०००/- मात्र रकमेचा कार्यादेश देण्यात आला होता. या सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टमध्ये त्यांनी समाधानकारक सर्व्हीस दिली असून सर्व जनसेट सुरळीत कार्यन्वीत आहेत. सदरच्या सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दि.३०-०९-२०१५ रोजी संपणार असल्याने पुढील सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टकरीता विद्युत विभागामार्फत दि.२१-०७-२०१५चे टिपणी अन्वये मा.त्रिसदस्य समितीची मान्यता घेण्याकरीता प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

मा.त्रिसदस्य समितीसमोर सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाला मान्यता मिळाल्यानंतर तो प्रस्ताव मा.मुबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेकरीता सादर करावा लागणार आहे. त्यास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता मिळाल्यानंतर वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई-निविदा बोलविणे या प्रक्रियेस व टेंडर आल्यानंतर ते मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणे याकामी साधारणत: तीन ते चार महिन्याचा कालावधी लागणार आहे. तोपर्यंत सदरचे जनरेटरसेट कार्यान्वित ठेवणे अत्यावश्यक असल्याने संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅंडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देण्याबाबतची कार्यवाही पुर्ण होईपर्यंत दि.०१-१०-२०१५ पासुन

पुढे मागील टेंडरच्या मंजुर दराप्रमाणे प्रतिमाह वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेकरीता विद्युत विभागामार्फत दि.१४-०८-२०१५ चे टिपणी अन्वये मा.त्रिसदस्य समितीची मान्यता घेणेकरीता प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. त्यास मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समितीच्या दिनांक ०८-१०-२०१५ चे सभेतील विषय क्र.१६ निर्णय क्र.३३५

अन्वये `` यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, प्रस्तावितकामी ई-निविदेची मागणी करणेत यावी. त्यासाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थान वकिलामार्फत अर्ज दाखल करावा. तसेच ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मागील टेंडरच्या दराने येणा-या प्रतिमाह रु. २,६७,६३९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.`` त्यानुसार मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांना संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेबाबतची पुढील कार्यवाही होईपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

यापुर्वी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे समोर C.A.NO.9219 OF 2014 IN PIL NO.18 OF 2011 दि.२६-०९-२०१४ अन्वये झालेल्या सुनावणीत `` वार्षिक मेंटेनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिस्क प्रोटेक्श टाईप सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट हे त्या त्या मशिनरीच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधित मशिनरीच्या उत्पादक कंपनीने निर्देशित केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हीस डिलरला पुर्वीच्या अटी व शर्तीवर देण्यात यावे`` असा आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने दिलेला आहे. सोबत मा.उच्च न्यायालयाचा आदेश जोडलेला आहे.

त्यानुसार-

०१). मा.व्यवस्थापन त्रीसदस्य समितीच्या दि.०८-१०-२०१५ चे सभेतील विषय क्र.१६ निर्णय क्र.३३५ अन्वये श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घ्यावी किंवा कसे ?

०२). तसेच जर मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाच्या उपरोक्त दि.२६-०९-२०१४ च्या निर्णयानुसार वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टबाबत कार्यवाही करावयाची झाल्यास विद्युत विभागामार्फत दि.२१-०७-२०१५ चे टिपणी अन्वये सन २०१५-२०१६ या कालावधीकरीता संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेकरीता येणा-या खर्चास तसेच कामास वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई-निविदा बोलविणेकरीता मा.त्रिसदस्यीय समितीसमोर सादर करण्यात आलेला प्रस्ताव रद्द करण्यात येऊन जनसेटची उत्पादक कंपनी मे.कमिन्स कंपनी यांचेशी पत्रव्यवहार करण्यात यावा किंवा कसे?

याकरीता वरीलपैकी (०१) अथवा (०२) यावर चर्चा होऊन योग्य तो निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, मा.औरंगाबाद खंडपीठाचा सिव्हील ॲप्लीकेशन नं.९२१९/२०१४ वरील दि.२६.०९.२०१४ रोजीचे आदेशास अनुसरुन श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे सन २०१५-२०१६ या कालावधीकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेबाबत यापुर्वी झालेला निर्णय रद्द करणेत येऊन, सदरहू जनसेटची उत्पादक कंपनी मे.कमिन्स कंपनी यांचेशी पत्रव्यवहार करण्यात यावा.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.५१** **अहमदनगर एज्युकेशन सोसायटी, विश्रामबाग, अहमदनगरचे श्री साईनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शिर्डी या इमारतीचे वायरींग कामाबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल:-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडुन सन १९६० साली अहमदनगर एज्युकेशन सोसायटी, विश्रामबाग, अहमदनगरचे श्री साईनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शिर्डी यांना सदर इमारत शालेय कामासाठी देण्यात आलेली आहे सदर इमारतीची लाईट फिटींग १९८२ साली करण्यात आलेली असल्यामुळे ती लाईट फिटींग कालबाह्य झालेली आहे. त्यामुळे विद्युत प्रवाह खंडीत होण्याचे प्रमाण वारंवार होत आहे. वायरींगचे काम करुन मिळणेकामी श्री साईनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शिर्डी यांनी विनंती अर्ज केलेला आहे. त्यानुसार सदर इमारतीमध्ये प्रत्यक्ष पाहणी केली असता २९ वर्ग व ०४ हॉल्स आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांचे वायरींग बदलणे गरजेचे आहे. श्री साईनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे इमारतीस रंगकाम करणे व संरक्षक भिंत बांधणेबाबत मा.व्यवस्थान समितीचे दि.२५-०८-२०१२ रोजीचे सभेतील विषय क्र.१३ निर्णय क्र.६६८ अन्वये मान्यता मिळालेली आलेली आहे. इमारतीचे नविन वायरींगचे काम करणेकामी येणा-या खर्चाचे इस्टीमेट खालीलप्रमाणे आहे.

| Sr.no. | C.S.R. | DESCRIPTION | Qty. | Rate | Amount. Rs |
|---|---|---|---|---|---|
| 01) | Non C.S.R. | Point wiring for Light / Fan in pvc pipe with 3 x 1.5 Sq.mm. FR Grade copper wire 3 Plate Celing rose, piano type switch and sunmica folding board with full size of brass hinges complete on PVC surface box. | 400 Nos. | 500.00 | Rs. 2,00,000.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 02) | Non C.S.R. | Supplying & erecting approved make 1 x 36/40W white stove enamelled / powder coated fluo.fitting with 40 W electronic ballast having pf>0.9 and 40 W tube bar fixed at ceiling or on wall as per specification No. FG-IDF/BFF | 275 Nos | 400.00 | Rs. 1,10,000.00 |
| 03) | Non C.S.R. | Supplying & erecting original 1.25 mm CRCA sheet metal enclosures with Door and locking system of 900mm x 750mm x 300mm size water proof Box. | 01 No. | 4500.00 | Rs. 0,04,500.00 |
| 04) | 1-2-8 | Supplying and erecting rigid PVC conduit 25mm. dia with PVC accessories on wall/ceiling as per specification No: WG-MA/CON, para no.1.1.1 | 1000Mtr. | 79.80 | Rs.0,79,800.00 |
| 05) | 1-3-6 | Supplying & erecting mains with 1x2.5 sq.mm F.R.L.S. stranded/solid copper PVC insulated wire for earth laid in provided conduit/trunking/inside pole/Bus bars or any other places. as per specification No: WG-MA/BW | 350 Mtr. | 28.35 | Rs. 0,09,922.50 |
| 06) | 1-3-8 | Supplying & erecting mains with 2x4 sq.mm F.R.L.S. stranded/solid copper PVC insulated wire laid in provided conduit/trunking/inside pole/Bus bars or any other places as per specification No: WG-MA/BW | 600 Mtr. | 80.85 | Rs. 0,48,510.00 |
| 07) | 1-3-14 | Supplying & erecting mains with 3x2.5 sq.mm F.R.L.S. stranded/solid copper PVC insulated wire laid in provided conduit/trunking/inside pole/Bus bars or any other places.as per specification No: WG-MA/BW | 1700 Mtr. | 81.90 | Rs. 1,39,230.00 |
| 08) | 1-8-6 | Supplying and erecting modular type switch one way 16 / 20 A, ISI mark, approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete with neon indicator. | 50 Nos. | 150.15 | Rs. 0,07,507.50 |
| 09) | 1-8-11 | Supplying and erecting modular type 3 pin 6 / 16A multi socket with safety shutter ISI mark approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete. | 50 Nos. | 164.85 | Rs. 0,08,242.50 |
| 10) | 2-12-10 | Supplying and erecting electronic type step regulator for ceiling fan 600/ 900/ 1200/ 1400 mm. sweep, complete erected on provided. | 130 Nos. | 211.05 | Rs.0,27,436.50 |
| 11) | 1-8-29 | Supplying and erecting PVC Surface modular switch box with double mounting plate for 3 module duly erected in an approved manner. | 10 Nos. | 154.35 | Rs.0,01,543.50 |
| 12) | 1-8-31 | Supplying and erecting PVC Surface modular switch box with double mounting plate for 6 module duly erected in an approved manner. | 20 Nos. | 245.70 | Rs.0,04,914.00 |
| 13) | 1-8-33 | Supplying and erecting PVC Surface modular switch box with double mounting plate for 12 module duly erected in an approved manner. | 02 Nos. | 395.85 | Rs. 0,00,791.70 |
| 14) | 2-2-13 | Supplying and erecting Ding Dong / electronic musical type call bell with heavy duty coil suitable to operate on 230V A.C. supply erected on polished double wooden block/sunmica block of suitable size. | 10 Nos. | 100.80 | Rs. 0,01,008.00 |
| 15) | 2-13-3 | Supplying and erecting regular/ standard model Ceiling fan of 1200 mm. sweep complete erected in position as per specifcation no. FG | 130 Nos | 1883.70 | Rs.2,44,881.00 |
| 16) | 5-3-3 | Supplying, Erecting and marking SPMCB 6A to 32A C-series.(for lighting) in provided distribution board as per specification No.SW-SWR/MCB | 74 Nos. | 170.10 | Rs.0,12,587.40 |
| 17) | 5-3-17 | Supplying, Erecting and marking FPMCB 40 A to 63 A in provided distribution board as per specification No.SW-SWR/MCB | 07 Nos. | 1460.55 | Rs.0,10,223.85 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 18) | 5-4-8 | Supplying and erecting triple and neutral distribution board (TPNDB) with door surface/flush mounted SPMCB of 8 ways (24 Poles) on iron frame/laminated board. (Horizontal type)as per specification No.SW-SWR/MCBDB | 03 Nos. | 3893. 40 | Rs.0,11,680.20 |
| 19) | 5-4-11 | Supplying and erecting triple and neutral distribution board (TPNDB) with door surface/flush mounted SP (24 Poles)/TP (8 Poles) MCB of 8 ways (24 Poles) on iron frame/laminated board as per specification No.SW-SWR/MCBDB | 01 No. | 6829. 20 | Rs.0,06,829.20 |
| 20) | 5-4-18 | Supplying and erecting single pole and neutral distribution board (SPNDB) with door surface/flush mounted with 2 ways for incoming and 8 ways for outgoing SP MCB's on iron frame/wooden board as per specification No. SWSWR/ MCBDB | 01 No. | 1351. 35 | Rs.0,01,351.35 |
| 21) | 5-6-5 | Providing, erecting & commissioning RCCB of electro magnetic type with 30/100/300 mA sensitivity and having capacity of 40A. 4 pole complete as per specification No. SWRCCB/RCCB | 01 No. | 2889. 60 | Rs.0,02,889.60 |
| 22) | 5-6-6 | Providing, erecting & commissioning RCCB of electro magnetic type with 30/100/300 mA sensitivity and having capacity of 63A. 4 pole complete as per specification No. SWRCCB/RCCB | 03 Nos. | 3222. 45 | Rs.0,09,667.35 |
| 23) | 5-6-7 | Providing, erecting & commissioning RCCB of electro magnetic type with 30/100/300 mA sensitivity and having capacity of 80A. 4 pole complete as per specification No. SWRCCB/RCCB | 01 No. | 4940. 25 | Rs.0,04,940.25 |
| 24) | 9-1-3 | Providing earthing with Galvanised cast iron earth plate size 60 x 60 x 0.6 cm with funnel with a wire mesh for watering and brick masonry block C.I. cover complete with all materials, testing & recording the results as per specification No. EA-EP | 02 Nos | 5495. 70 | Rs. 0,10,991.40 |
| 25) | 9-2-3 | Supplying and erecting copper strip of required size used for earthing on wall and/or any other purpose with necessary copper clamps fixed on wall painted with bituminous paint in an approved manner with joints required. as per specification No (EA-EP). | 20 Kgs. | 908.2 5 | Rs. 0,18,165.00 |
| 26) | 9-3-3 | Supplying & erecting conventional spike type air termination suitable to carry lightning stroke made up of heavy gauge 40 mm dia copper pipe of standard length with 5 Nos. copper spikes fixed on copper ball as air terminals duly threaded in copper pipe erected on provided foundation in an approved manner | 01 No. | 4588. 50 | Rs. 0,04,588.50 |
| | | **Total Amount :-** | | | **Rs. 9,82,201.30** |
| | | **Round Up Total Amount :-** | | | **Rs. 9,82,201.00** |

उपरोक्तप्रमाणे अहमदनगर एज्युकेशन सोसायटी, विश्रामबाग, अहमदनगरचे श्री साईनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शिर्डी या इमारतीचे वायरींग काम करणेकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. ९,८२,२०१/- इतक्या खर्चास मान्यता मिळणेस व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर ही जाहिरात अपलोड करुन ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५६९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे श्री साईनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शिर्डी या इमारतीचे वायरींग कामाबाबतचा उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.५२** **संस्थानचे अग्निशमन वाहनांचे कार्यक्षेत्र व दर निश्चित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानला देणगी स्वरुपात प्राप्त झालेले अग्निशमन वाहन (फोम टेंडर) व मिनी टेंडर हे संस्थान सेवेत दाखल झालेले आहे. संस्थानचे सर्व परीसरांतील अग्नि व जीवसंरक्षणासाठी सदर वाहनांचा उपयोग होणार आहे. शिर्डी परीसरासाठी

शिर्डी नगरपंचायतचे अग्निशमन वाहन उपलब्ध आहे परंतू मोठया स्वरुपाच्या आगीची घटना घडल्यास अतिरीक्त मदतीची आवश्यकता असलेस संबंधीतांमार्फत संस्थानचे अग्निशमन वाहन बोलविणेची शक्यता नाकारता येत नाही.

शिर्डी परीसर व पंचक्रोशित आगीची मोठी घटणा घडल्यास अतिरिक्त मदतीसाठी संबंधीत ठिकाणांहुन प्रतिष्ठित व्यक्ती, नागरीक अथवा परिसरातील फायर विभागांचे प्रमुख यांचे फोन फायर विभागाचे डयुटीवरील कर्मचारी यांना येतात. अशा वेळी डयुटीवरील कर्मचारी यांना सदरचे वाहन दयावयाचे किंवा नाही याबाबत निर्णय घेता येत नाही. अग्निशमन वाहनाची रात्री अपरात्री केव्हाही पोलिस स्टेशन, नागरीक यांचेकडुन मागणी झालेस अग्निशमन वाहन दयावयाचे किंवा कसे याबाबत निर्णय घेणे करीता वरीष्ठ अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. तसेच अग्निशमन वाहन दयावयाचे झालेस सशुल्क अथवा निशुल्क दयावयाचे याबाबत निर्णय झालेला नाही.

शिर्डी नगर पंचायत व परीसरातील कारखाने यांचे कार्यक्षेत्राबाहेरील अग्निशमन सेवा दर तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | सेवा पुरविणारे संस्थांचे नांव | दर/आकार |
|---|---|---|
| ०१ | सर्व नगरपालिका / महानगर पालिका | पहिले तिन तास रु.४०००/- त्यानंतर प्रती तास रु.१०००/- याप्रमाणे तसेच फोमचा वापर झालेवर खरेदी दराप्रमाणे. |
| ०२ | प्रवरानगर स.सा.का.लि. प्रवरानगर व इतर साखर कारखाने | धार्मिक कामासाठी गाडी फायर स्टेशनमधून निघालेपासून परत स्टेशनला जमा होईपर्यंत प्रतीतास २४०/- व फोमचा वापर झालेस प्रती लिटर ५०/- या प्रमाणे आहे, खाजगी कामासाठी १५००/- प्रतीतास याप्रमाणे आहे. तसेच रोड दुर्घटना मोफत सेवा याप्रमाणे आहे. तसेच सि.ओ.टू. व डि.सी.पी. सिलेंडरचा वापर झालेस त्यासाठी लागणारा रिफिलिंग व हॅंडलिंग चार्जसह. |

शिर्डी नगरपंचायत चे अग्निशमन वाहन हे त्यांचे कार्यक्षेत्रात मोफत पुरविले जाते व कार्यक्षेत्राबाहेर नियमाप्रमाणे चार्जची आकारणी केली जाते. सदरची सेवा मोफत दिलेस वाहनाचा खाजगी कामासाठी गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी संस्थानचे अग्निशमन वाहनाचे कार्यक्षेत्र, दर निश्चिती व अचानक वाहनाची बाहेरुन मागणी झालेस निर्णय घेणेस अधिकारी निश्चितीसाठी सदरचे विषय निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.५७०** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, अग्निशमन वाहन हे आपत्ती व्यवस्थापनाचा भाग असल्यामुळे इमर्जन्सीमध्ये सदरहू अग्निशमन वाहनाची बाहेरुन मागणी झालेस पाठविणेत यावे. तसेच वापरासाठी प्रत्यक्ष किती खर्च येतो यावरुन अग्निशमन सेवेचा आकार निश्चित करावा, त्यासाठी प्रत्यक्ष येणारा खर्च व आकारणेयोग्य सेवा आकार याच्या तक्त्यासह प्रस्ताव फेरसादर करणेत यावा.**

(कार्यवाही- फायर ॲण्ड सेफ्टी विभागप्रमुख)

---

**विषय नं.५३** **शिर्डी विमानतळावर सुसज्ज अग्निशमन सेवा पुरविणेबाबत.**

**प्रस्ताव-** राहाता नगरपरिषद यांचे दि.२०.११.२०१४ रोजीचे पत्रा नुसार नगरपरिषद राहाता यांना महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट लि.मुंबई यांचे क्र.एम.ए.डी.सी./शिर्डी/५१झेड/१२३५/ दि.०७ नोव्हेंबर २०१४ रोजीचे पत्रानुसार शिर्डी विमानतळ येथे अग्निशमन सेवा पुरविणेची मागणी केलेली होती. नगरपरिषद राहाता यांनी सदरची सेवा त्यांचे कार्यक्षत्राबाहेर येत असलेमुळे सदरची सेवा पुरविणेस असमर्थता दाखविलेली आहे. नगरपरीषद राहाता यांचे मते शिर्डी संस्थानकडे सुसज्ज अग्निशमन व सहाय्यक अधिकारी व इतर कर्मचारी उपलब्ध असलेमुळे सदरची शिर्डी विमानतळाची सेवा संस्थानमार्फत पुरविणेबाबत संस्थानला वरील संदर्भानुसार कळविलेले आहे. त्या पत्राची प्रत अवलोकनार्थ या सोबत जोडण्यात आलेली आहे.

तसेच महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कं.लि.यांचे दि.११.१२.२०१४ रोजीचे पत्र बांधकाम विभागामार्फत दि.२३.१२.२०१४ रोजी इकडील कार्यालयास प्राप्त झाले आहे. सदर पत्रात त्यांनी संस्थानकडे काकडी गावातील एअरपोर्ट करिता एअरपोर्ट वर प्रत्येक फ्लाईट येणे व जाणेचे वेळेत अग्निशमन सुविधा पुरविणेबाबत मागणी केलेली आहे. या पत्राची प्रत अवलोकनार्थ या सोबत जोडण्यात आलेली आहे.

याबाबत जा.नं.एसएसएस/ फायर ॲण्ड सेफ्टी/ ८०/ २०१४ दि.२१.०५.२०१४ रोजीचे मंजूर टिपणी नुसार संस्थानचे स्वत:चे नविन फोम टेंडर खरेदी करणेस मान्यता मिळालेनुसार सोलापूर येथील बॉडी बांधणीचे काम करणारे श्री.दिलीप राऊत यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी बॉडी बांधणीचे रु.१९,६०,०००/- खर्च देणगी स्वरुपात करणेची तयारी दर्शविलेने सदरचा विषय मा.व्य.समितीचे दि.११.०९.२०१४ रोजीचे सभेमध्ये विषय क्र.१४ नुसार मांडला होता त्यानुसार निर्णय क्र.७५७ नुसार मान्यता मिळालेली असल्याने दि.१६.०९.२०१४ रोजी वाहन विभागाकडील देणगी आयशर २०१६ चेसीस वाहन विभागामार्फत सोलापूर येथील देवी फायर यांचे कडे सुपुर्त करणेत आलेली आहे. सदर बॉडी बांधणीचे काम पुर्ण होऊन श्री पुण्यतिथी उत्सव २०१५ दि.२३.१०.२०१५ रोजी संस्थानकडे प्राप्त झालेले आहे.

संदर्भ क्र.०४ व ०५ अग्निशमन सेवा पुरविणेबाबत मा.का.अ.सो.यांचेशी दि.०८.०१.२०१५ रोजीचे टिपणीवरील झालेल्या चर्चेनुसार नुसार मा.व्हाईस चेअरमन महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कं.यांना सदरचे वाहन

संस्थानकडे प्राप्त झालेनंतर संस्थानचे पारित होणारे नियम व मागणी नुसार वेळोवेळी सदरची सेवा पुरविणेबाबतचे पत्र पाठविणेत आलेले आहे.

विमानतळावर वाहनासोबत पाठविणेत येणारे कर्मचारी यांना विमानाचे स्पेशल ट्रेनिंग बाबत **M.A.D.C.** यांचे कार्यालयाचा ई- मेल प्राप्त झालेला होता त्यानुसार फरीदाबाद दिल्ली येथे महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कं.यांचे मार्फत देणेत येणारे प्रशिक्षणासाठी फायर विभागाकडील ०७ कायम कर्मचा-यांची नावे कळविणेत आलेली आहेत. सदरचे ट्रेनिंग आयोजन M.A.D.C. कं. यांनी जानेवारी २०१६ मध्ये केलेले आहे.

M.A.D.C. यांनी संस्थानकडे ॲम्ब्युलन्स,हॉस्पिटल व इतर तातडीचे सेवेची मागणी केलेली होती त्यानुसार मा.व्यवस्थापन सभेच्या दि.२५.०९.२०१४ रोजीचे सभेत विषय नं.६४ शिर्डी एअरपोर्ट करिता ॲम्ब्युलन्स व इतर तातडीचे सेवेबाबत. या विषयामध्ये मा.चेअरमन महाराष्ट्र राज्य एअरपोर्ट डेव्हलपमेंट कं.लि,मुंबई यांनी शिर्डी एअरपोर्ट करीता ॲम्ब्युलन्स,हॉस्पिटल व इतर तातडीची सेवा M.A.D.C. यांचे कडून उपलब्ध होईपर्यंत सेवा पुरविणेची मागणीचा प्रस्ताव केलेला होता.

सदर विषयावर निर्णय क्र.८७२ नुसार तिऱ्हाईतांचा हितसंबंध (Third- Party Intrest) नव्याने तयार होत आहे. याकरिता संस्थान वकिल यांचे मार्फत अर्ज सादर करणेत येवून मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले आहे. विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई दि.२४ जून २०११ चे आदेशानुसार मा.उच्च न्यायालयाकडे दाखल केलेल्या CIVIL APPLICATION NO- 5067/ 2015 नुसार काकडी विमानतळावर विमानाचे लॅंडींग ची चाचणी घेतेवेळी तात्पुरतेस्वरुपात ॲम्ब्युलन्स व इतर तातडीची सेवा पुरवावी असे आदेश दिलेले आहे.सदर C.A. मध्ये अग्निशमन सेवेचा स्वतंत्र उल्लेख केलेला नाही.

सन २००४ चे महाराष्ट्र अधिनियम नं.१४ मधील कलम २१ चे सुधारणेनुसार बस वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा या सारख्या पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकिय विभागांना, शासकिय महामंडळांना,शासकिय कंपन्यांना किंवा शासकिय उपक्रमांना सहाय्यक अनुदान देता येईल असे नमुद आहे.त्यानुसार विधी व न्याय विभागाचे दि.२४.०६.२०११ चे आदेशान्वये शिर्डी विमानतळासाठी ५० कोटी रुपये देण्यास विधी व न्याय विभागाची मान्यता घेतली त्यानुसार संस्थानने मान्यतेपोटी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी यांना ३५ कोटी रुपये अदा केलेले आहे. सदरच्या अदा केलेल्या रकमेस जनहीत याचिका नं.२५/२०१२ मधील मुद्दा क्र.१० नुसार हरकत घेतलेली आहे.

M.A.D.C. यांचे दि.१४.१०.२०१५ रोजीचे ई-मेल नुसार खालील प्रमाणे मुदयांचा समावेश केलेला आहे.

| अ.नं. | M.A.D.C. यांचे पत्रातील मुद्दे | संस्थान मार्फत झालेली कार्यवाही |
|---|---|---|
| ०१ | संस्थानचे जा.नं.एसएसएस/फायर ॲण्ड सेफ्टी/ १३२७/२०१५ दि.०४ जून २०१५ नुसार संस्थानला देणगी स्वरुपात मिळणारे फोम टेंडर माहे ऑगष्ट २०१५ कळविलेली होती. बदललेली, फायर टेंडर प्राप्त होण्याची आणी संस्थानमध्ये पोहचण्याची अपेक्षित तारीख संस्थानमार्फत पुढील मेल व्दारे कळविली जाईल. संस्थानचे फायर टेंडर मध्ये वापरण्यात येणा-या फोमचा प्रकार कळवावा. | संस्थानचे सोलापूर येथील देवी फायर वर्क्स यांचे कडून देणगी स्वरुपात बॉडी बांधणीचे काम करुन घेणेसाठी आयशर २०१६ चेसी दिलेली आहे.सदर वाहनाचे बॉडी बांधणीचे काम पुर्ण झाले असून फायर पंप व पीटीओ फीटींगचे काम चालू आहे.श्री साईबाबा पुण्यतीथी उत्सव २०१५ पुर्वी काम पुर्ण होईल.<br>संस्थानचे फायर टेंडर मध्ये AFFF 3% (ॲक्वा फिल फार्मींग फोम) या फोम कंपाऊंडचा वापर केला जाणार आहे. |
| ०२ | संस्थानने मान्य केले प्रमाणे विमान येण्यापुर्वी आणी जाण्यापुर्वी फायर टेंडर पुरवावे आणि त्यानंतर फायर टेंडर संस्थानला परत केले जाईल. | यापुर्वी केलेल्या पत्रानुसार प्रत्येक फ्लाईटचे येणे पुर्वी आधी किमान एक तास कळविलेस सदरचे वाहन संस्थान कर्मचा-यांसह पाठविता येईल. |
| ०३ | I.C.A.O. (इंटरनॅशनल फायर सिव्हील ॲव्हीएशन आर्गेनायझेशन) चे नियमानुसार विमानतळावर नेहमी फायर सर्व्हिसेसचा स्टॉक उदा. फोम,ड्राय केमीकल पावडर सिलेंडर व कार्बनडाय ऑक्साईड सिलेंडर हे २०० % (गाडीतील साहीत्याचे दुप्पट) असावा जेणेकरुन सर्व वस्तु तात्काळ बदलल्या जातील. | फोम टेंडर साठी फोम ११०० लिटर्स, ड्राय केमिकल पावडर सिलेंडर ३० कि.क्षमतेचे ०४ नग व सि.ओ.टु. २२.५ कि.क्षमतेचे ०४ नग उपलब्ध ठेवलेस त्यासाठी अंदाजे रु.२,१५,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. |
| ०४ | विमानतळावर अग्निशमनासाठी नेहमी ठेवावे लागणारे सर्व साहीत्य संस्थान देणार अथवा नाही याबाबत कळवावे. | याबाबत येणा-या खर्चास मा.व्य.समितीचे सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. |

उपरोक्त परिशिष्टातील अ.नं.०१ व ०२ नुसार सदरचे वाहन हे महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कं.यांना देता येईल तसेच अ.नं. ०३ व ०४ बाबत I.C.A.O. ( इंटरनॅशनल फायर सिव्हील ॲव्हीएशन आर्गेनायझेशन) चे नियमानुसार विमानतळावर नेहमी फायर सर्व्हिसेसचा स्टॉक (गाडीतील साहीत्याचे दुप्पट) उदा. फोम,ड्राय केमीकल पावडर सिलेंडर व कार्बनडाय ऑक्साईड सिलेंडर हे २००% असावा जेणेकरुन सर्व वस्तु तात्काळ बदलल्या जातील. सदरचे साहीत्य एअरपोर्ट येथील फायर स्टेशनचे रुममध्ये संस्थानमार्फत उपलब्ध करुन आगीचे घटनेचेवेळी

गाडीतील साहीत्यांचा वापर झालेवर पुढील सुरक्षिततेसाठी किमान २० मिनीटांचे आत I.C.A.O.चे नियमानुसार रुम मधील साहीत्य फोम टेंडर मध्ये ठेवावे असे कळविलेले आहे.

संस्थानचे अग्निशमन वाहन (फोम टेंडर) दि.२२.१०.२०१५ रोजी संस्थानकडे प्राप्त झाले असून संस्थानमार्फत अग्निशमन सुविधा शिर्डी एअरपोर्ट करीता पुरविणेकामी खालील बाबतीत निर्णय होणेस विनंती.

अ. शिर्डी एअरपोर्ट करीता संस्थानचे अग्निशमन वाहन (फोम टेंडर) संस्थानचे कर्मचारी, इंधन व इतर आवश्यक बाबींसह सशुल्क अथवा निशुल्क पुरवावे.

ब. शिर्डी एअरपोर्टवर I.C.A.O.चे नियमानुसार संस्थानचे अग्निशमन वाहनातील उपलब्ध अग्नि सुरक्षा साहीत्यांचे २००% अतीरीक्त साहीत्य संस्थानमार्फत उपलब्ध करुन दयावयाचे किंवा कसे.

क. अग्निशमन वाहनातील उपलब्ध अग्निसुरक्षा साहीत्यांचे २००% राखीव साहीत्य उपलब्ध करुन दयावयाचे असलेस त्याकरीता येणा-या अंदाजे रु.२,१५,०००/- खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त **'अ'**, **'ब'** व **'क'** बाबत मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.५७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन ठरले की, महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट लि.मुंबई यांचे मागणीनुसार शिर्डी विमानतळावर सुसज्ज अग्निशमन सेवा पुरविणेसाठी संस्थानचे अग्निशमन वाहन सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावे. तसेच सदरहू वाहनासाठी लागणारे इंधन व मेंटेनन्ससहीत इतर अनुषंगीक साहित्याची व्यवस्था महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट लि.,मुंबई यांनी पहावी.** (कार्यवाही- फायर अॅण्ड सेफ्टी विभागप्रमुख)

---

**विषय नं.५४** **देणगी मालवाहतूक (SML ISUZU- SAMRAT) वाहनांचे RTO खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** वाहन विभागाकडील दि.२७/१०/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीनुसार, साईभक्त, श्री विकास अहिर व परिवार, सुरत यांनी दि.२२/१०/२०१५ रोजी एक SML ISUZU कंपनीचा मॉडेल- SAMRAT HD 19 BS III हे मालवाहतुक वाहन देणगी स्वरुपात दिलेला आहे. सदर वाहनाच्या टेम्परारी पसमिटची मुदत दि.२६/१०/२०१५ पर्यंत असलेने तातडीने RTO कार्यालय, श्रीरामपुर येथे फी रक्कम रोखीने आवश्यक असलेने सदर वाहनाचे OTT टॅक्स, रजिस्ट्रेशन, पासींग व परमिट फी ची रक्कम रोखीने भरणे कामी रु.५५,०००/- (अक्षरी रक्कम रु. पंच्चावण्ण हजार) मात्र ॲडव्हान्स रक्कम सहाय्यक अभियंता, श्री.अमृत गंगाधर जगताप यांचे नांवे घेण्यात आला होता. त्यानुसार सदर कामी झालेल्या खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | तपशिल | पावती नं/ दिनांक | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| ०१ | नवीन मालवाहतुक वाहनाचा OTT टॅक्स | ८०२०४१-२६/१०/२०१५ | ५३,५५०.०० |
| ०२ | नवीन मालवाहतुक वाहनाचा रजिस्ट्रेशन फी | ८०१४६३-२६/१०/२०१५ | १,४००.०० |
| | **एकुण रक्कम (रु.)** | | **५४,९५०.००** |

उपरोक्त प्रमाणे नवीन मालवाहतुक वाहनाचे OTT टॅक्स व रजिस्ट्रशन फीची रक्कम भरणे कामी एकुण रु.५४,९५०/- (अक्षरी रक्कम रु.चौपन्न हजार नऊशे पन्नास) मात्र रक्कम खर्च झालेली असुन शिल्लक रक्कम रु.५०/- मात्र लेखाशाखा पावती नं.८०१ दि.३१/१०/२०१५ ने जमा केलेली आहे. सदरचा खर्च मोटारकार कर व भाडे खर्च या अंदाजपत्रकातुन करता येईल.

तरी वरील प्रमाणे नवीन मालवाहतुक वाहनाचे OTT टॅक्स व रजिस्ट्रशन फी भरणे कामी झालेल्या एकुण रक्कम रु.५४,९५०/- (अक्षरी रक्कम रु.चौपन्न हजार नऊशे पन्नास) मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे देणगी मालवाहतुक वाहनाचे OTT टॅक्स व रजिस्ट्रेशन फी भरणेकामी झालेल्या एकूण रु.५४,९५०/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**विषय नं.५५** **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप, सोसायटी लि., शिर्डी यांना स्वागतकक्ष येथे चालविण्यास दिलेल्या क्लोकरुम व्यवसायाचे मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को.ऑप.सोसायटी साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी बसस्टॅन्ड समोरील संस्थान मालकीचे जुने स्वागतकक्षाचे जागेत क्लोकरुम चालवत असुन सदर क्लोकरुम चालविण्याची मुदत दि.२१/०१/२०१५ रोजी संपलेली असल्याने पुढील पाच वर्षासाठी क्लोकरुम चालविण्याची मुदतवाढ मिळणेस सोसायटीने दि.०५/१२/२०१४ रोजीचे पत्रान्वये विनंती केलेली होती.

त्यानुसार श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को-ऑप सो. लि.,शिर्डी स्वागतकक्षाजवळील चालवित असलेल्या क्लोकरुम वापराची मुदत संपुष्टात येऊन बराच कालावधी झालेला असल्याने व क्लोकरुम पुर्ववत सुरु असल्याने मुदतवाढीबाबत निर्णय होणेसाठी दि.२०/०८/२०१५ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेत प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. त्यावर मा. त्रिसदस्य समितीचे दि.२०/०८/२०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र.२७६ अन्वये "सदरहू प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविण्यात यावा, असे ठरले. तसेच श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी हे स्वागतकक्ष येथे चालवत असलेल्या क्लोकरुमला त्यांची मुदत संपलेपासुन पुढे एक वर्ष कालावधीसाठी अथवा शासन आदेश येईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत लिव्ह अॅन्ड लायसन्स तत्वावर

मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन व विदयुत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारण्यात येऊन मागील अटी शर्तीनुसार मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली."

प्रस्तुत ठरावास व मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे दि.२/५/२०१४ रोजीचे आदेशास अनुसरुन श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांना स्वागतकक्ष येथे क्लोकरुम चालविण्याच्या व्यवसायास मागील मासिक परवाना फी रु.८५७/- मध्ये १०% वाढ करुन (रु.८५७/- + १०% रक्कम रु.८६/- = रु.९४३/-) रु.९४३/- (अक्षरी रु.नऊशे त्रेचाळीस मात्र) व विदयुत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन दि.२२/०१/२०१५ ते दि.२१/०१/२०१६ या एक वर्षाचे कालावधीसाठी अथवा शासन आदेश होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत पुर्वीचेच अटी/शर्तीस अनुसरुन इकडील जा.क्र.एसएसएस/मालमत्ता/३७०५/२०१५ दि.०५/१०/२०१५ रोजीचे पत्रान्वये कार्यादेश देण्यात येऊन मुदतवाढ देण्यात आलेली असून दि.०९/१०/२०१५ रोजी करारनामा करुन घेण्यात आलेला आहे.

तसेच दि.२०/०८/२०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र.२७६ अन्वये झालेल्या ठरावानुसार सदरचा प्रस्ताव इकडील जा.क्र.एसएसएस/मालमत्ता/४४७१/२०१५ दि.०९/११/२०१५ रोजी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचेकडे शासन मान्यतेसाठी पाठविण्यात आलेला आहे.

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांना स्वागतकक्ष येथे क्लोकरुम चालविण्यास दिलेल्या व्यवसायाची मुदत दि.२१/०१/२०१६ रोजी संपत येत असल्याने त्यांनी जा.नं. श्रीसासंएक्रेसो/२३७/२०१५ दि.०४/११/२०१५ रोजीचे पत्रान्वये पुढील पाच वर्षाकरीता व्यवसाय चालविण्यास मुदतवाढ मिळावी अशी विनंती केलेली आहे. तसेच संस्था चालवत असलेल्या क्लोकरुममध्ये सामान ठेवणा-या साई भक्तांकडून सध्या प्रती बॅग रु.१/- असा नाममात्र सेवा आकार आकारला जात आहे, परंतु कर्मचारी पगार, स्टेशनरी, लाईट बील व मासिक परवाना फी इत्यादी खर्चात मोठया प्रमाणात वाढ झाली असून त्या तुलनेत साई भक्तांकडून सध्या आकारण्यात येत असलेला प्रती बॅग रु.१/- सेवा आकार हा अत्यंत नगण्य असल्याने व्यवस्थापन खर्चाचे तुलनेत क्लोकरुमचे माध्यमातून मिळणारे उत्पन्न अतिशय कमी आहे, तरी सध्याच्या वाढत्या महागाईचा विचार करुन सध्याच्या क्लोकरुम सेवा आकार प्रती बॅग रु.१/- ऐवजी प्रती बॅग रु.५/- अशी वाढ होऊन त्याप्रमाणे आकारणी करणेस मंजुरी मिळावी अशी विनंती केलेली आहे. तसेच मा.वैद्यकिय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल व मा.उपकार्यकारी अधिकारी साहेब, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी त्यांचे दि.०१/१२/२०१२ चे पत्राने रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांचे सेवेसाठी व सोईसाठी हॉस्पिटल परिसरात झेरॉक्स मशिन सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत कळविलेले आहे तरी संस्था श्री साईबाबा हॉस्पिटल लगत स्वागतकक्षाचे जागेत चालवत असलेल्या क्लोकरुममध्ये रुग्ण व त्यांचे नातेवाईकांचे सुविधेसाठी झेरॉक्स मशिन ठेवणेस मंजुरी मिळावी अशी विनंती केलेली आहे.

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांना स्वागतकक्ष येथे क्लोकरुम चालविण्यास दिलेल्या व्यवसायाची मुदत दि.२१/०१/२०१६ रोजी संपत येत असल्यामुळे शासनाची मान्यता येईपर्यंत श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांना

स्वागतकक्ष येथे क्लोकरुम चालविण्यास दिलेल्या व्यवसायाची मागील मासिक परवाना फी रु.९४३/- मध्ये १०% वाढ करुन (रु.९४३/- + १०% रक्कम रु.९४/- = रु.१०३७/-) रु.१०३७/- (अक्षरी रु. एक हजार सदोतीस मात्र) व विदयुत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन दि.२२/०१/२०१६ ते दि.२१/०१/२०१७ या एक वर्षाचे कालावधीसाठी अथवा शासन आदेश होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत पुर्वीचेच अटी/शर्तीस अनुसरुन मुदतवाढ देता येईल.

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांनी मागणी केल्याप्रमाणे सध्याच्या क्लोकरुम सेवा आकार प्रती बॅग रु.१/- ऐवजी प्रती बॅग रु.५/- अशी वाढ करणे तसेच सदरहू क्लोकरुममध्ये रुग्ण व त्यांचे नातेवाईकांचे सुविधेसाठी झेरॉक्स मशिन ठेवणेस मान्यत देणे तसेच सेवा आकारात वाढ केल्यास व झेरॉक्स मशिन ठेवण्यास मान्यता दिल्यास मासिक परवाना फी मध्ये वाढ करावी किंवा कसे इत्यादी बाबींवर निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५७३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप, सोसायटी लि., शिर्डी यांना स्वागतकक्ष येथे चालविण्यास दिलेल्या क्लोकरुमचे व्यवसायास मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ व विदयुत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन दि.२२/०१/२०१६ ते दि.२१/०१/२०१७ या एक वर्षाचे कालावधीसाठी अथवा शासन आदेश होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत पुर्वीचेच अटी/शर्तीस अनुसरुन मुदतवाढ देणेस व क्लोकरुम सेवाआकार प्रती बॅग रु.०२/- मात्र अशी वाढ करणेस मान्यता देण्यात आली. तसेच सदहू ठिकाणी झेरॉक्स मशिन ठेवणेबाबतची त्यांची विनंती अमान्य करणेत आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.५६** **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप, सोसायटी लि., शिर्डी यांना चालविण्यास दिलेल्या कियॉस्क/गाळे यांचे मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को-ऑप सोसायटी लि.,शिर्डी यांना मा.त्रिसदस्य समिती सभा दि.१४/११/२०१३ निर्णय क्र.९२८ अन्वये संस्थान परिसरात साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी क्लोकरुम, मोबाईल कॅमेरा क्लोकरुम,

पादत्राणे गृह, प्रसाद व नॉव्हेल्टी स्टोअर तसेच थंडपेय व दुग्धजन्य पदार्थ विक्रीचे स्टॉल चालविणेस व तात्पुरते व्यवसाय करणेसाठी खालील ठिकाणी चालविणेस दिलेले १४ कियॉस्क वापराची मुदत दि.६/१२/२०१४ रोजी संपलेली होती.

| अ.नं. | ठिकाण | कियॉस्क संख्या |
|---|---|---|
| १ | साईआश्रम भागपरिसर १- | ४ |
| २ | साईआश्रम भागपरिसर २- | १ |
| ३ | साई प्रसादालय परिसर | १ |
| ४ | व्दारावती निवासस्थान परिसर | २ |
| ५ | साईउद्यान परिसर | २ |
| ६ | साईप्रसाद निवासस्थान परिसर | १ |
| ७ | साईबाबा भक्तनिवासस्थान परिसर | ३ |
| | एकूण | १४ |

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को-ऑप सोसायटी लि. यांनी दि.०१/१०/२०१४ रोजीचे पत्रान्वये साईभक्तांचे सेवेसाठी व सोयीसाठी सदर व्यवसाय व कियॉस्क चालविणेसाठी पुढील पाच वर्षाकरीता मुदतवाढ मिळावी अशी विनंती केलेली होती.

त्यानुसार श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को-ऑप सोसायटी लि.,शिर्डी यांना वापरास दिलेले संस्थान परिसरातील १४ कियॉस्क चालविणेस मुदतवाढ देणेकामीचा प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीचे दि.२०/०८/२०१५ रोजीचे सभेत मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता, त्यावर निर्णय क्र.२७४ खालीलप्रमाणे झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविण्यात यावा, असे ठरले. तसेच श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांना चालविणेस दिलेले कियॉस्क / गाळे त्यांची मुदत संपलेपासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी अथवा शासन आदेश येईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन व विदयुत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारण्यात येऊन मागील अटी शर्तीनुसार मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली."

प्रस्तुतचे ठरावास अनुसरुन श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांना संस्थान परिसरात १४ कियॉस्क/गाळे प्रति कियॉस्ककरीता मागील मासिक परवाना फी रु.३,०००/- मध्ये १०% वाढ करुन (रु.३०००/- + १०% रक्कम रु.३००/- = रु.३३००/-) रु.३३००/- (अक्षरी रु.तीन हजार तीनशे मात्र) व विदयुत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन दि.०७/१२/२०१४ ते दि.०६/१२/२०१५ या एक वर्षाचे कालावधीसाठी अथवा शासन आदेश होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत पुर्वीचेच अटी/शर्तीस अनुसरुन इकडील जा.क्र.एसएसएस/ मालमत्ता/ ३७८८/२०१५ दि.०७/१०/२०१५ रोजीचे पत्रान्वये कार्यादेश देण्यात येऊन मुदतवाढ देण्यात आलेली असून दि.०९/१०/२०१५ रोजी करारनामा करुन घेण्यात आलेला आहे.

तसेच दि.२०/०८/२०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र.२७४ अन्वये झालेल्या ठरावानुसार सदरचा प्रस्ताव इकडील जा.क्र.एसएसएस/मालमत्ता/४४७२/२०१५ दि.०९/११/२०१५ रोजी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचेकडे शासन मान्यतेसाठी पाठविण्यात आलेला आहे.

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांना वापरास दिलेल्या १४ कियॉस्क वापराची मुदत दि.०६/१२/२०१५ रोजी पुर्ण होत असल्याने त्यांनी जा.नं.श्रीसासंएक्रेसो/ २३६/२०१५ दि.०४/११/२०१५ रोजीचे पत्रान्वये पुढील पाच वर्षाकरीता व्यवसाय चालविण्यास मुदतवाढ मिळावी अशी विनंती केलेली आहे.

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांना वापरास दिलेल्या १४ कियॉस्क वापराची मुदत दि.०६/१२/२०१५ रोजी पुर्ण होत असल्यामुळे शासनाची मान्यता येईपर्यंत श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांना संस्थान परिसरात वापरास दिलेल्या १४ कियॉस्क वापरासाठी मागील मासिक परवाना फी रु.३३००/- मध्ये १०% वाढ करुन (रु.३३००/- + १०% रक्कम रु.३३०/- = रु.३६३०/-) रु.३६३०/- (अक्षरी रु. तीन हजार सहाशे तीस मात्र) व विदयुत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन दि.०७/१२/२०१५ ते दि.०६/१२/२०१६ या एक वर्षाचे कालावधीसाठी अथवा शासन आदेश होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत पुर्वीचेच अटी/शर्तीस अनुसरुन मुदतवाढ देता येईल, असे नम्र मत आहे.

तरी उपरोक्त प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.५७४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप, सोसायटी लि., शिर्डी यांना चालविण्यास दिलेल्या १४ कियॉस्क वापरासाठी मागील मासिक परवाना फी १०% वाढ व विदयुत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन दि.०७/१२/२०१५ ते दि.०६/१२/२०१६ या एक वर्षाचे कालावधीसाठी अथवा शासन आदेश होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत पुर्वीचेच अटी/शर्तीस अनुसरुन मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

**विषय नं.५७ श्री.नरेश विठ्ठल रत्नाकर व श्रीमती शितल नरेश रत्नाकर, रा.इंदगाव, ता.अंबरनाथ, जि.ठाणे यांचे मालकीची जागा संस्थानला देणगी घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.नरेश विठ्ठल रत्नाकर व श्रीमती शितल नरेश रत्नाकर, रा.इंदगाव, ता.अंबरनाथ, जि.ठाणे यांनी दि.०३/१०/२०१४ रोजीचे अर्जान्वये त्यांचे स्वमालकीची खालीलप्रमाणे जागा संस्थानने देणगी स्विकारणेबाबत विनंती केलेली आहे.

| अ.नं. | जमीन मालकाचे नाव | गाव | गट नंबर | क्षेत्र हे.आर. |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. नरेश विठ्ठल रत्नाकर<br>श्रीमती शितल नरेश रत्नाकर | इंदगाव,<br>ता.अंबरनाथ, जि.ठाणे. | १३/६ | १.९४<br>पोटखराबा ०.२८ |

सदर प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/१२/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र.१०२३ खालीलप्रमाणे झालेला आहे.

उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.नरेश विठ्ठल रत्नाकर व श्रीमती शितल नरेश रत्नाकर रा.इंदगाव, ता.अंबरनाथ, जिल्हा ठाणे हे संस्थानला देणगी दाखल देत असलेल्या जागेची कार्यकारी अधिकारी यांनी पाहणी करावी व त्या जागेसंदर्भातील संपुर्ण कागदपत्रांची माहिती घेऊन, सविस्तर प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.

त्यानुसार देणगी देण्यात येणा-या जागेची दि.११/१२/२०१४ रोजी श्री. आर.बी.आहेर, उपकार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग व श्री. व्ही.एम.बर्गे, प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग यांनी प्रत्यक्ष पाहणी केली आहे.

१. सदरची जागा ठाणे जिल्हयात इंदगाव येथे आहे. एकुण क्षेत्र १ हेक्टर ९४ आर व पो.ख.२८आर आहे.
२. सदर जागेमध्ये श्री.नरेश विठ्ठल रत्नाकर यांचे वडील रत्नाकर महाराज यांची तळघरामध्ये समाधी सन २००२ मध्ये बांधण्यात आली असून त्यावर श्री साईबाबांचे मंदिर उभारण्यात आलेले असून त्यात साईबाबांचे मुर्तीची स्थापना सन २००३ मध्ये केलेली आहे.
३. या ठिकाणी दत्त मंदिर, मारुती मंदिर, दिपमाळ, यज्ञमंडप व स्टेज आहे.
४. या ठिकाणी भोजन प्रसाद व्यवस्था असून साधारणपणे ३०० ते ३५० भाविक एकाचवेळी भोजन प्रसाद घेऊ शकतात.
५. या ठिकाणी गोशाळा असून यामध्ये साधारणपणे ६८ गायी आहेत.
६. संपुर्ण जागेमध्ये सुमारे ५००० सागाची झाडे असून एक विहीर आहे.
७. दैनंदिन कामकाज व देखभालीसाठी ३ कर्मचारी असून एक पुजारी आहे.
८. सदर जमीनीला तारेचे कंपाऊंड केलेले आहे.

यावेळी चर्चे दरम्यान श्री.नरेश विठ्ठल रत्नाकर यांनी खालीलप्रमाणे माहिती दिली.

१. सदर जागेवर ट्रस्ट बनविलेले नाही. स्वमालकीची जागा आहे.
२. कर्मचारी दरमहा पगार रु.१८०००/-, लाईट बील दरमहा रु.३०००/-, चारा दरमहा रु.५५०००/-व डॉक्टर रु.४०००/- असा एकूण रु.८०,०००/- अंदाजे खर्च दरमहा येतो.
३. या ठिकाणी दानपेटी ठेवलेली नाही तसेच देणगी स्विकारली जात नाही.
४. मंदिरातील दैनंदिन कार्यक्रम काकड आरती,पुजा,नैवेद्य इ. नियमितपणे केले जातात.
५. दररोज अंदाजे ५० भक्त दर्शनासाठी येत असतात.गुरुवारी साधारणपणे १०० ते १५० भक्त येतात.
६. या ठिकाणी महाशिवरात्री, गोकुळाष्टमी, हनुमान जयंती, श्रीरामनवमी हे उत्सव साजरे केले जातात.

तसेच सदर जागा संस्थानने देणगी घेतल्यानंतर याठिकाणी होणारे मंदिरातील दैनंदिन कार्यक्रम व इतर कामकाज प्रचलित पध्दतीने सुरु ठेवण्यात यावे अशी अपेक्षा श्री. रत्नाकर यांनी व्यक्त केली आहे.

त्यानंतर श्री. रत्नाकर यांना इकडील जा.नं.एसएसएस/मालमत्ता/५१८५/२०१५ दि.२०/१/२०१५ रोजीचे पत्रान्वये, उपरोक्त प्रमाणे जमीन आपण संस्थानला देणगी देणार असलेबाबत स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहीर निवेदन प्रसिध्द करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

त्यास अनुसरुन श्री.रत्नाकर यांनी त्यांचे वकील ॲड.पांडूरंग एकनाथ चोरघे यांचे मार्फत दि.२१/२/२०१५ रोजी दैनिक पुण्यनगरी ठाणे आवृत्तीमध्ये, मौजे इंदगाव, ता.अंबरनाथ, जि.ठाणे येथील सर्व्हे नं.१३, हिस्सा नं.६, एकूण क्षेत्र २ हेक्टर २२ आर, प्रति आकार २ रु. ७० पै. या मिळकती पैकी बक्षिस पत्राव्दारे देण्यात येणारे क्षेत्र १ हेक्टर ९४ आर व त्यामधील यज्ञमंडप ५०x५० चौ.फुट,अन्नछत्र ४०x५० चौ.फुट,साई मंदिर (देऊळ) ४०x५० चौ.फुट, गोशाळा ३०x५० चौ.फुट, दिपस्तंभ या वास्तुसहित जशी आहे तशी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या संस्थेस बक्षिसपत्र (दानपत्र) व्दारे कायमस्वरुपी देण्याचे निश्चित केले आहे. त्याकामी नोंदणीकृत बक्षिसपत्र (दानपत्र) शिर्डी संस्थान, अहमदनगर यांचे नावे करण्याचे योजिले आहे. तत्पुर्वी प्रस्तुत मिळकती व उल्लेखीत वास्तुच्या मालकी हक्काविषयी अथवा अन्य कोणत्याही कारणामुळे सदर मिळकत व त्यावरील वास्तुसंदर्भात कोणाची कोणत्याही स्वरुपाची हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली हरकत लिखीत स्वरुपात सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे मुदतीमध्ये नोंदवाव्यात. मुदतीमध्ये कोणाची हरकत न आल्यास उल्लेखित मिळकत ही बक्षिसपत्र (दानपत्र) व्दारे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे नावे करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी, अशा आशयाचे जाहीर निवेदन प्रसिध्द केलेले आहे.

तसेच ॲड.पांडूरंग चोरघे यांनी दि.११/३/२०१५ रोजीचे पत्रान्वये श्री.रत्नाकर यांना सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर १५ दिवसाचे मुदतीमध्ये तथा आजपर्यंत कोणाचीही कोणत्याही स्वरुपाची हरकत प्राप्त झालेली नाही, असे कळविले आहे.

श्री.नरेश विठ्ठल रत्नाकर व श्रीमती शितल नरेश रत्नाकर यांचे मालकीची मौजे इंदगाव, ता.अंबरनाथ, जि.ठाणे येथील जमीन संस्थानने देणगी म्हणून स्विकारल्यास त्याठिकाणी सुरु असलेले मंदिरातील दैनंदिन कार्यक्रम व इतर कामकाज प्रचलित पध्दतीने सुरु ठेवणेकामी श्री. नरेश विठ्ठल रत्नाकर यांचेकडून इकडील पत्र क्र.एसएसएस/ मालमत्ता/ २९८०/२०१५ दि.२६/०८/२०१५ अन्वये मासिक खर्चाचे विवरण पत्र मागविण्यात आले होते.

श्री.नरेश विठ्ठल रत्नाकर यांनी दि.२३/०९/२०१५ रोजी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांची शिर्डी येथे समक्ष भेट घेवून चर्चा करतेवेळी साधारणतः मंदिरातील दैनंदिन कार्यक्रम व इतर कामकाज प्रचलित पध्दतीने सुरु ठेवणेकामी मासिक रु.५०,०००/- ते रु.६०,०००/- पर्यंत खर्च येत असतो असे तोंडी सांगितलेले आहे.

तसेच श्री.नरेश विठ्ठल रत्नाकर यांना इकडील जा.नं.एसएसएस/मालमत्ता/३५६५/२०१५ दि.२३/०९/२०१५ रोजीचे पत्रान्वये, देणगी देण्यात येणा-या जागेची कागदपत्रे पाठविणेबाबत कळविण्यात आलेले होते. त्यानुसार त्यांनी दि.०९/११/२०१५ रोजी खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर केलेली आहेत.

१) सन १९५५-५६ ते २०१५ पर्यंतचे ७/१२ उतारे
२) सदर मिळकतीचे सर्व फेरफार
३) दि.१६/१०/२०१५ रोजीचा सर्च रिपोर्ट
४) सर्व पक्के सिमेंटचे बांधकाम
५) साई मंदिर, प्रसादालय, यज्ञमंडप, गोशाळा तसेच जागेचा नकाशा इत्यादी.

श्री.नरेश विठ्ठल रत्नाकर व श्रीमती शितल नरेश रत्नाकर यांचे मालकीची मौजे इंदगाव, ता.अंबरनाथ, जि.ठाणे येथील गट नंबर १३/६ मधील क्षेत्र १ हेक्टर ९४ आर त्यावरील सर्व वास्तुंसह संस्थानने देणगी म्हणून स्विकारल्यास त्याठिकाणी सुरु असलेले मंदिरातील दैनंदिन कार्यक्रम व इतर कामकाज प्रचलित पध्दतीने सुरु ठेवणे क्रमप्राप्त आहे. त्यासाठी संस्थानमार्फत स्वतंत्र नियोजन करावे लागेल. तसेच शिर्डी व्यतिरीक्त इतर ठिकाणी असलेली श्री साईबाबांची मंदिरे ताब्यात घेणे त्या ठिकाणी पुजा-अर्चा इत्यादी व्यवस्था करणे अशा प्रकारची पध्दत/ परंपरा नाही. तसेच अशा प्रकारे मंदिर देणगी स्वरुपात घेतल्यास मंदिरातील दैनंदिन कार्यक्रम, पुजा-अर्चा, मंदिराचे पावित्र्य इत्यादी बाबींवर नियंत्रण ठेवावे लागेल, असे नम्र मत आहे.

तरी वरील सर्व बाबी विचारात घेऊन सदर जागा देणगी घेणेबाबतचा प्रस्ताव निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.५७५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी व्यतिरीक्त इतर ठिकाणी असलेली श्री साईबाबांची मंदिरे अथवा इतर देवी-देवतांची मंदिरे ताब्यात घेणे व त्या ठिकाणी पुजा-अर्चा इत्यादी व्यवस्था करणे अशा प्रकारची पध्दत/परंपरा नाही. सबब उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.५८** **श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयास मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२५/१ मधील वापरासाठी दिलेल्या जागेच्या करारनाम्याबाबत व भाडेपट्टयाची रक्कम ठरविणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.त्रिसदस्य समितीचे दि.०६/११/२०१४ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्र.९८६ नुसार व जा.नं.एसएसएस/वशी-०१/ ३८३८/ २०१४ दि.१९/११/२०१४ रोजीचे आदेशान्वये संस्थान आस्थापनेवर मालमत्ता विभाग नव्याने कार्यान्वित करण्यात आलेला आहे. बांधकाम विभागाकडील भूसंपादन कक्ष व विधी विभागाकडील संस्थानचे जमीनीविषयक कामे एकत्रित करुन मालमत्ता विभाग कार्यान्वित करण्यात आलेला आहे.

श्री साईनाथ माध्यमिक विदयालयास वापरासाठी दिलेल्या संस्थान मालकीच्या सर्व्हे नं.१२५/१ मधील इमारतीचे रंगकाम करणे व संरक्षण भिंतीचे बांधकाम करणेकामी बांधकाम विभागाकडून दि.१४/४/२०१५ रोजीची कार्यालयीन टिपणी सादर करण्यात आली होती. त्यावर तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी मालमत्ता विभागाने या इमारतीची मालकी / भाडेकरार इ.च्या तपशिलासह चर्चा करावी असे निर्देश दिलेले होते. प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचेशी चर्चा करणेकामी श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय यांचेशी जागा व इमारत वापराबाबत करण्यात आलेला भाडे करारनाम्यासंबधी फाईल मालमत्ता विभागाकडे पाठविणेकामी विधी विभागास इकडील जा.क्र.एसएसएस/मालमत्ता/४१/२०१५ दि.२३/०५/२०१५ रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आले होते. सदरहू पत्रास अनुसरुन विधी विभाग यांनी संस्थान व साईनाथ माध्यमिक विदयालय यांचेमध्ये सन १९७० मध्ये झालेल्या भाडेपट्टा करारनाम्याची छायांकित प्रत दिलेली आहे.

सदरहू फाईल प्राप्त न झाल्यामुळे पुन्हा इकडील जा.क्र.एसएसएस/मालमत्ता/१६८२/२०१५ दि.०३/०८/२०१५ रोजीचे पत्राने व इकडील जा.क्र.एसएसएस/मालमत्ता/२३०४/२०१५ दि.१५/०९/२०१५ रोजीचे स्मरणपत्राने संपुर्ण कागदपत्रे सादर करणेबाबत विधी विभागास कळविण्यात आले आहे.

त्यावर विधी विभागाने जा.क्र.एसएसएस/वशी-विधी/१५२/२०१५ दि.१६/०९/२०१५ रोजीचे पत्रान्वये लेखाशाखेकडील जा.क्र.एसएसएस/लेखा-कॅश/११९/२०१४ दि.२४/०५/२०१४ च्या पत्रान्वये, अहमदनगर एज्युकेशन सोसायटी यांचे वापरात असलेली श्री साईनाथ माध्यमिक विदयालय, शिर्डी या इमारतीचे जुनी इमारत रु.१२,६१०/- व नविन इमारत रु.४८,२४०/- असे मिळून रु.६०,८५०/- मात्र वार्षिक भाडे आकारले जात असल्याचे दिसून येत आहे तसेच संस्थानने अहमदनगर एज्युकेशन सोसायटीस सदर इमारत दि.१५/१०/१९६१ रोजी मासिक

भाडे रु.३१०/- मात्रने ठरवुन भाडयाने दिली. पाच वर्षाचा भाडेपट्टा दि.०१/०६/१९६२ ते दि.३१/०६/१९६७, त्यानंतर १० वर्षासाठी भाडेपट्टा दि.२८/०५/१९७० ते दि.२८/०५/१९८० पावेतोचा दि.२८/०५/१९७० रोजी झाला. त्यानंतरचा या इमारतीचा लेखी भाडेपट्टा पत्रव्यवहार करुनही झालेला नाही, असे विधी विभागाकडील कागदपत्रावरुन दिसून येते, असे कळविलेले आहे. तसेच लेखाशाखेकडील श्री साईनाथ माध्यमिक विदयालयाने सन २०१४ या वर्षाचे रक्कम रु.६०८५०/- भाडे भरल्याची छायांकित प्रत दिलेली आहे.

साईनाथ माध्यमिक विदयालयास वापरासाठी दिलेल्या मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२५/१ मधील जागेच्या मुदतवाढ व करारनाम्याबाबत पुढील कार्यवाही होणेसाठी विधी विभागास पुन्हा इकडील पत्र जा.नं.एसएसएस/ मालमत्ता/ २७२२/२०१५ दि.१७/१०/२०१५ अन्वये कळविण्यात आले होते. परंतु त्यावर विधी विभागाने जा.नं.एसएसएस/ वशी-विधी/१६९/२०१५ दि.२१/१०/२०१५ रोजीचे पत्रान्वये दि.२८/०५/१९७० ते दि.२८/०५/१९८० पर्यंतच्या करारनाम्यानंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व अहमदनगर एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर यांचेमध्ये तत्कालीन विधी अधिकारी यांनी करारनामा केल्याचे अढळ होत नाही, तरी करारनाम्याबाबतची आपले विभागामार्फत अहमदनगर एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर यांचेशी पत्रव्यवहार करुन कार्यवाही करावी असे कळविलेले आहे.

अहमदनगर एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर यांना श्री साईनाथ माध्यमिक विदयालयास मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२५/१ मधील अकृषीक क्षेत्र ३७ आर १७ चौ.मी. इतके वापरासाठी दिलेल्या जागेबाबतच्या प्रस्तुत प्रकरणी दि.२८/०५/१९८० नंतर कोणताही करारनामा झालेला असल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. तथापि सदयस्थितीत करारनामा करुन घेणे विधीग्राहय ठरेल, असे नम्र मत आहे. त्यासाठी प्रथमतः उक्त जागेच्या भाडेपट्टयाची रक्कम निश्चित करुन तद्नंतर मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी ठरवून दिलेप्रमाणे १ वर्षाच्या कालावधीसाठी प्रस्तुत संस्थेबरोबर करारनामा करणे उचित ठरेल असे इकडील नम्र मत आहे.

तरी सदर प्रस्ताव पुढील निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.५७६ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थानच्या शैक्षणिक संकुलास जागा अपुरी पडत असून सध्या कनिष्ठ महाविद्यालय साईआश्रम धर्मशाळा येथे चालू केलेले आहे. शैक्षणिक संकुलासाठी जागेची निकड पहाता श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयाची जागा संस्थानला परत घेणेसाठीची कार्यवाही चालू करावी. सबब श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयास मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२५/१ मधील वापरासाठी दिलेल्या जागेच्या करारनाम्याबाबत व भाडेपट्टयाची रक्कम ठरविणेबाबतचा प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

विषय नं.५९ **शिर्डी नगरपंचायत, शिर्डी विकास योजनेतील आरक्षण क्र.३१ बगीचा भू-संपादनासाठी नगरपंचायत, शिर्डी यांना अनुदान/ निधी मंजूर करणेबाबत.**

प्रस्ताव- **अ)** मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी शिर्डी विकास योजनेतील आरक्षण क्र.३१ बगीचाकरीता भूसंपादनापोटी त्यांचेकडे पुरेसा निधी नसल्याने रक्कम रुपये २८ कोटी ५६ लाख संस्थानने अनुदान द्यावे म्हणून त्यांचेकडील पत्र क्रमांक न.पं/बांध/कावि-५/८२/२०१३ दि.१४ मे, २०१३ रोजीच्या पत्राने विनंती केलेली आहे.

त्यांचे पत्रात नमुद केलेप्रमाणे त्याबाबत माहिती खालीलप्रमाणे आहे.

१) शिर्डी विकास आराखडयात आरक्षण क्रमांक ३१ बगीचासाठी आरक्षित आहे. त्याची संपादन करणारी संस्था शिर्डी नगरपंचायत, शिर्डी ही आहे.

२) शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी भूसंपादनाचा प्रस्ताव भूसंपादन शाखा,अहमदनगर यांचेकडे त्यांचेकडील पत्र जा.नं.न.पं/बांध/कावि-५/४४/२०१३ दि.१० एप्रिल २०१३ रोजी सादर केलेला आहे.

३) आरक्षण क्रमांक ३१ खाली ०२ हेक्टर ८० आर जमीन संपादीत होत आहे.सन २०१३ च्या रेडीरेकनर प्रमाणे भूसंपादनाची नुकसान भरपाईची रक्कम अंदाजे २८ कोटी ५६ लाख येत आहे. ती सध्य स्थितीत चालू मुल्यांक दरानुसार रक्कम वाढण्याची शक्यता आहे.

४) सदर आरक्षणातील जमीन मालक श्री.विश्वनाथ चंद्रभान गोंदकर यांनी शिर्डी नगरपंचायतीस महाराष्ट्र नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ खरेदीबाबत सुचना दिलेली आहे. त्यात त्यांनी प्रस्तुत जमीन सहा महिन्याच्या आत चालू बाजारभावाने नुकसान भरपाईची रक्कम देवून जमीन ताब्यात घ्यावी असे नमुद केले आहे.

५) अनुक्रमांक ४ मध्ये नमुद केलेल्या नोटीशीबाबत शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांच्या दि.०२ एप्रिल २०१३ रोजीच्या सभेत विषय क्रमांक ०७ मध्ये चर्चा होऊन त्यांत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

" तरी शिर्डी विकास योजनेतील आरक्षण क्रमांक ३१ बगीचा या आरक्षणाखालील बगीचासाठी आरक्षित असलेल्या संपुर्ण क्षेत्राचे भूसंपादन करणेचा प्रस्ताव विहीत मुदतीत दाखल करणे आणि त्यासाठी आवश्यक निधी राज्य शासनाच्या विविध योजनामधुन मागणी करणेबाबत त्याप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेकडून मागणी करणेबाबत संयुक्त मोजणी फी नगरपंचायतीमार्फत भरणे तसेच अनुषंगिक खर्च नगरपंचायतीने करावा तसेच भूसंपादन खर्च,आस्थापना खर्च नगरपंचायतीने उपलब्ध करण्यास व होणा-या खर्चास या ठरावान्वये सर्वानुमते मंजूर.. "

**ब)** मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी दि.१४ मे,२०१३ रोजीच्या पत्रात शेवटच्या परिच्छेदात "तरी सदरकामी शासन नगरविकास योजना ६ अ अथवा महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अथवा स्थानिक निधी अंतर्गत खालीलप्रमाणे निधी मंजूर करण्यास विनंती आहे" असे नमुद केलेले आहे.

संस्थान नगर विकास ६ अ अथवा महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना अथवा स्थानिक विकास अंतर्गत निधी मंजूर करत नाही याबाबत मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी शासनाकडे प्रस्ताव दाखल करणे आवश्यक आहे.

**क)** अनुदानाबाबतः

शिर्डी नगरपंचायतीचे दि.२७ एप्रिल २०१३ रोजीच्या सभेतील निर्णयानुसार मा.मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी प्रथमतः शासनाच्या संबंधीत खात्याशी संपर्क साधून अनुदान मिळविणे इष्ट राहील,असे नम्र मत आहे.

**ड)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद.

सदर अधिनियमातील कलम (२) दोन खालीलप्रमाणे आहे-

पोट कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनासाठी पुरेशी तरतुद केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेचा निधी शिल्लक राहिला असल्यास, अशा शिल्लक रक्कमेचा, विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणायोग्य उत्पन्नाच्या तीस टक्कयांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल.

(दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परीणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीस सहाय करणेसाठी.

प्रस्तुत आरक्षण ३१ हे बगीचासाठी आरक्षित आहे.हया ठिकाणी नगरपंचायतीने बगीचा तयार केला तर साईभक्तांना करमणूकीचे साधन होईल.

**इ)** मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी आरक्षण क्रमांक ३१ बगीचासाठी भूसंपादनासाठी रक्कम रुपये २८ कोटी ५६ लाख रकमेच्या अनुदानाची रकमेची अनुदानाची मागणी केली आहे.

शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांच्या दि.२७ एप्रिल २०१३ रोजीच्या सभेतील विषय क्रमांक ०७ बाबत निर्णय खालीलप्रमाणे आहे.

अ) त्यासाठी आवश्यक निधी राज्य शासनाच्या विविध योजनामधून मागणी करणेबाबत.

ब) त्याप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेकडून मागणी करणेत यावी.

खालील बाबतीत निर्णय होणेस विनंती आहे.

१. मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी आरक्षण क्रमांक ३१ बगीचाबाबत भुसंपादनासाठी लागणारी रक्कम रुपये २८ कोटी ५६ लाख हे प्रथमतः शासनाच्या विविध योजनेखाली मिळवावेत. ते शक्य झाले नाही तर संस्थानकडे फेर प्रस्ताव पाठवावा.

**किंवा**

२. मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना आरक्षण क्रमांक ३१ बगीचासाठी द्यावयाची नुकसान भरपाई रक्कम रुपये २८ कोटी ५६ लाखाचे अनुदान शासनाच्या व मा.उच्च न्यायालय,खंडपीठ, औरंगाबाद यांचे मंजुरीच्या आदेशास अधिन राहून देणेबाबत निर्णय घेणे उचित होईल, असे नम्र मत आहे.

तरी उपरोक्त प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५७७** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी विकास योजनेतील आरक्षण क्र.३१ मध्ये बगीचा भू-संपादनासाठी आवश्यक असलेली रु.५८.५६ कोटी मात्र रक्कम प्रथमतः शासनाच्या विविध योजनेखाली मिळविणेसाठी शासनाकडे वेगळी मागणी करणेबाबत नगरपंचायत, शिर्डीचे मुख्याधिकारी यांना कळविणेत यावे. या ठिकाणी बगीचा झाल्यास भक्तांच्या मनोरंजनासाठी संस्थानलाही त्याची आवश्यकता असल्यामुळे सदरहू अनुदान/ निधी शिर्डी नगरपंचायतीस देणेकामी मंजूरी मिळणेसाठी विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे पत्रव्यवहार करणेत यावा. तसेच संस्थान वकिलामार्फत मा.उच्च न्यायालयामध्ये सिव्हील अर्ज दाखल करणेत यावा.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.६०** **जागा देणगी घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.बालयोगी सुरजनाथजी यांनी दि.१०/११/२०१५ रोजीचे अर्जान्वये आडगाव रेपाळ, ता.येवला, जि.नाशिक येथील त्यांचे मालकीची जमीन गट नं.२३४ मधील क्षेत्र ११ गुंठे संस्थानला देणगी देणेबाबत तसेच सदरहू जमीन मिळकत ही माझे मालकी हक्काची व कब्जे उपभोगातील असून सदरचे मिळकतीवर मी २ गुंठे क्षेत्रावर श्री. गुरु गोरक्षनाथजी यांचे मंदिर व (निवासाची सोय म्हणून) तीन रुम, २ टॉयलेटस् सह बांधलेले आहे. सदरची मिळकत ही महाराष्ट्र शासनाने "क-वर्ग" तिर्थक्षेत्र म्हणून घोषित केले आहे. त्याबाबतचा शासकीय अद्यादेश या पत्रासोबत जोडला आहे. सदरची मिळकत ही श्री साईबाबांना म्हणजेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना दान करावयाची आहे, असे कळविलेले आहे.

तथापि, सदर क्षेत्रात श्री. गुरु गोरक्षनाथजी यांचे मंदिर असून सदरची मिळकत ही महाराष्ट्र शासनाने "क-वर्ग" तिथक्षेत्र म्हणून घोषित केलेले असलेचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येते. याशिवाय सदरहू मिळकत संस्थानने देणगी म्हणून स्विकारल्यास त्याठिकाणी सुरु असलेले मंदिरातील दैनंदिन कार्यक्रम व इतर कामकाज प्रचलित पध्दतीने सुरु ठेवणे क्रमप्राप्त होईल. त्यासाठी संस्थानमार्फत स्वतंत्र नियोजन करावे लागेल व मंदिरातील दैनंदिन कार्यक्रम पुजा-अर्चा, मंदिराचे पावित्र्य इत्यादी बाबींवर नियंत्रण ठेवावे लागेल. तसेच शिर्डी व्यतिरीक्त इतर ठिकाणी असलेली श्री साईबाबांची मंदिरे अथवा इतर मंदिरे ताब्यात घेणे त्या ठिकाणी पुजा-अर्चा इत्यादी व्यवस्था करणे अशा प्रकारची पध्दत/परंपरा नाही. अशा परिस्थितीत उक्त मिळकत दान घेणे उचित होणार नाही, असे नम्र मत आहे.

तरी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५७८** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, शिर्डी व्यतिरीक्त इतर ठिकाणी असलेली श्री साईबाबांची मंदिरे अथवा इतर देवी-देवतांची मंदिरे ताब्यात घेणे व त्या ठिकाणी पुजा-अर्चा इत्यादी व्यवस्था करणे अशा प्रकारची पध्दत/परंपरा नाही. सबब उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.६१** **एअर कुलर खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईभक्तांना सुलभ दर्शन व्हावे, यासाठी शांतीनिवास बिल्डींग येथे स्टेनलेस स्टीलचे रेलीगव्दारे दर्शनाची सोय करण्यात आलेली आहे. या दर्शन रांगेमध्ये श्रींचे दर्शनासाठी साईभक्तांमध्ये वयस्क स्त्री-पुरुष साईभक्त तथा लहान मुले व महिला यांचाही समावेश असतो. या साईभक्तांचे उष्णतेचा व दमट वातावरणाचा त्रास होऊ नाही याकरीता शांतीनिवास बिल्डींगच्या दर्शन रांगेत 28 जम्बो एअर कुलर बसविण्यात आलेले आहेत.

नव्याने जुने प्रसादालयात एम.एस. रेलीगव्दारे वाढीव दर्शन लाईनची सुविधा करण्यात आलेले आहे. तसेच गर्दीचे काळात मंदिराचे पूर्व बाजुस 16 गुंठे परिसरात वाढीव दर्शन व्यवस्था करण्यात आलेली आहे. सदर दर्शन रांगेत साईभक्तांचे उष्णतेपासून संरक्षण होणेकरीता एअर कुलर बसविणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक वर्षी संस्थानमार्फत श्री साई पारायण आयोजित करण्यात येते, सदर पारायण हॉलमध्ये भाडोत्री स्वरुपात कुलर बसविण्यात येते.

उपरोक्तप्रमाणे प्रस्तावीत जागेत फॅन लावून सुध्दा तापमान नियंत्रणात येत नसल्याने, तेथे एअर कुलर बसविणेची आवश्यक आहे. साईभक्तांचे उष्णतेपासून संरक्षण् व्हावे यासाठी जुने प्रसादालय व 16 गुंठे परिसरातील दर्शन रांगेत ठेवणेकामी तसेच पारायण मंडप हॉलमध्ये ठेवणेकामी कमीत कमी 15 एअर कुलरची आवश्यकता आहे. सदरील एअर कुलर खरेदीकामी खालील तपशीलाप्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षित आहे :

| अ.नं. | तपशील | कंपनी | मागणी नग | अंदाजे दर रुपये | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | एअर कुलर<br>कुलींग एरीया– 2500 ते 2000Sq.Ft. | कॅपसन (Kapsun)<br>अँटार्टिका मॉडेल | १५ | ५०,०००/- | ७,५०,०००/- |
| | | | | **एकूण रुपये :** | ७,५०,०००/- |

वरीलप्रमाणे जुने प्रसादालय व 16 गुंठे परिसरामधील दर्शन लाईनमध्ये श्री साईभक्तांना तसेच पारायण मंडप हॉलमध्ये पाराणार्थी यांचे उष्णतेपासून संरक्षण व्हावे यासाठी 15 एअर कुलर खरेदी करणेकामी वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करणेस, तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहीरात अपलोड करुन ई-निविदा बोलविणेस व याकामी येणा-या रुपये 7,50,000/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीची सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५७९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जुने प्रसादालय व १६ गुंठे परिसरामधील दर्शन लाईनमधील साईभक्तांचे तसेच पारायण मंडप हॉलमधील पाराणार्थींचे उष्णतेपासून संरक्षण व्हावे याकरीता आवश्यक असलेले १५ नग एअर कुलर खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने जाहीरात प्रसिध्द करणेत येऊन, ई-निविदांची मागणी करणेस व याकामी येणा-या रु.७,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.६२** **जुने प्रसादालय येथील लाडु किचनकरीता एल.पी.गॅस पाईप लाईन बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र. 14 (भाग 4) मध्ये महाराष्ट्र विधान मंडाळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयममधील 14(2-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम.

**प्रास्ताविक:-** संदर्भीय आदेशान्वये श्री साई प्रसादालयामध्ये असलेले मोतीचूर लाडू निर्मितीचे एक युनिट पुर्ववत जुन्या प्रसादालयामध्ये स्थलांतरीत करावयाची असलेने मेकॅनिकल विभागामार्फत गॅस पाईप लाईन करुन देणेबाबत कळविलेले आहे.

माहे जुलै, 2015 मध्ये कॅन्टीन व लाडू किचन नविन प्रसादालयात स्थलांतरीत करण्यात आले होते. तसेच सदरच्या ठिकाणी कुंभमेळा कालावधीत वाढीव दर्शनलाईन करावयाची असल्याने तेथील गॅसची पाईपलाईन काढून टाकण्यात आली आहे. सदरच्या चांगल्या पाईपाचा वापर नविन प्रसादालयात कॅन्टीन व पत्रा शेडमधे लाडू किचनसाठी करण्यात आलेला आहे.

संदर्भीय आदेशान्वये लाडू निर्मिती किचन करीता नविन गॅस पाईप लाईन तयार करावी लागणार असल्याने, त्यासाठी अंदाजे खालीलप्रमाणे मटेरीयलचा खर्च अपेक्षित आहे :

| Sr. No. | Description | QTY | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | MS Pipe sd 40 Seamless 1' | 140 | Feet | 60/- | 8400/- |
| 2 | Ball Valve 1' 150# F.E. | 2 | Nos. | 3750/- | 3750/- |
| 3 | Pressure Gauge "4" 4kg Capacity 3/8' | 1 | Nos | 725/- | 725/- |
| 4 | MS Socket Bend "1" Welded | 10 | nos. | 65/- | 650/- |
| 5 | 'M Clamp 1" | 20 | nos. | 45/- | 900/- |
| 6 | MS Pipe sd 40 Seamless ½' | 10 | feet | 40/- | 400/- |
| 7 | MS Socket Bend ½' Welded | 8 | Nos | 45/- | 360/- |
| 8 | 'M Clamp ½' | 20 | Nos | 35/- | 700/- |
| 9 | Needle Control Valve 3/8' | 8 | Nos | 225/- | 1800/- |
| 10 | MS Elbow 3/8' | 1 | Nos | 135/- | 135/- |
| 11 | MS Adaptor 3/8' | 8 | Nos | 45/- | 360/- |
| 12 | Copper Burner Pigtail 60" long 3/8' | 7 | Nos | 660/- | 4620/- |
| 13 | MS Flanges 1' 150# | 2 | Nos. | 325/- | 650/- |
| 14 | Copper Jumper | 8 | no | 215/- | 1720/- |
| 15 | Installation, Welding, Colorings, testing | 1 | Job | 19000/- | 19000/- |
| | Total | | | | 44170/- |

**मागणी**– उपरोक्तप्रमाणे पाईपलाईन तयार करणेकामी अंदाजे रक्कम रुपये 44,170/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे. सदरच्या खर्चास मा. त्रिसदस्यीय समितीची मान्यता घेऊन विहीत पध्दतीने एक्सप्लोझीव्ह विभागाचे मान्यता प्राप्त एजन्सी यांचेकडून निविदा मागविता येतील.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत**: तरी जुने प्रसादालयात लाडू किचन करीता एल.पी. गॅस पाईप लाईन विहीत पद्धतीने करुन घेणेस व त्याकामी येणा-या रक्कम रुपये 44,170/- (अक्षरी रुपये चव्वेचाळीस हजार एकशे सत्तर मात्र) पर्यंतच्या खर्चास मान्यता मिळणेकामी सदरील विषय मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.५८० **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे जुने प्रसादालय येथील लाडू किचनकरीता एल.पी.गॅस पाईप लाईन बनवून घेणेसाठी एक्सप्लोझीव्ह विभागाच्या मान्यता प्राप्त एजन्सींकडून विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.४४,१७०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

विषय नं.६३ **पिठाची गिरणी खरेदीबाबत.**

प्रस्ताव- **प्रास्ताविक** :- श्री साईप्रसादालयात दररोज सरासरी 40 हजार साईभक्त प्रसाद भोजन घेतात. तसेच सरासरी 10 हजार नाष्टा पाकीट तयार केली जातात. पुरी व चपातीसाठी दररोज अंदाजे 50 क्विंटल आटा तसेच प्रसाद लाडू व बुंदी तयार करणेसाठी लाडू प्रसाद निर्मिती विभागाकरीता 35 क्विंटल बेसन तयार करणेत येते. याकरीता 16 इंच साईजच्या तीन 18 इंच साईजच्या तीन अशा एकुण सहा गिरणी कार्यान्वित आहे. या गिरणीपैकी 16 इंच साईजच्या गिरणीमधून जास्त आऊटपुट मिळत नाही तसेच सततच्या वापराने सदर गिरणींना मेन्टेनंन्स जास्त आहे. सध्या रेडीमेड आटा वापर करणेत येत असल्याने 18 इंच साईजच्या गिरणीमध्ये डाळ दळणेत येते. मात्र आटाऐवजी गहु घेतलेनंतर गहु व दाळ एकाच वेळेस दळणेकामी अडचण येईल.

**मागणी**:- सध्या वापरात असलेल्या 18 इंच साईजच्या गिरणी हया सन 1993 व 2006 मध्ये देणगी घेण्यात आलेल्या आहे. तसेच 16 इंच साईजच्या गिरणी ऑन लाईन चक्की युनिट सोबत सन 2008 मध्ये खरेदी करणेत आलेल्या आहे. 16 इंच साईजच्या गिरणी ऐवजी 18 इंच साईजच्या तीन नविन गिरणी बसविणे आवश्यक आहे. त्याकरीता 10 HP (Crompton Graves मोटारसह) तीन गिरणी खरेदी करीता अंदाजे रक्कम रुपये 2,00,000/- (अक्षरी रक्कम रुपये दोन लाख ) मात्र पर्यंत खर्च अपेक्षित असनू, हा खर्च अंदाजपत्रक सन 2015-2016 मधील 'नविन मशीनरी खरेदी खर्च' या शिर्षातील शिल्लक रक्कम रुपये 9,44,06,710/- या खर्चातून करता येईल. सदरच्या खर्चास मा. त्रिसदस्यीय समितीची प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. प्रशासकीय मान्यतेनंतर विहीत पध्दतीने गिरणी खरेदी करता येईल.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत**:- तरी श्री साई प्रसादालय व लाडू प्रसाद निर्मिती विभागाकरीता 18 इंच साईजच्या 3 गिरणी विहीत पद्धतीने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रुपये 2,00,000/- पर्यंतच्या खर्चास प्रशासकीय मान्यतेसाठी मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.५८१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालय व लाडू प्रसाद निर्मिती विभागाकरीता आवश्यक असलेल्या १८ इंच साईजच्या ३ नग पिठाच्या गिरण्या विहीत पद्धतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु.२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.६४** **श्री साईबाबा हॉस्पिटल व साईनाथ रुग्णालय येथे नविन सेंट्रल ए.सी.प्लाट उभारणी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या विविध उपक्रमाअंतर्गत श्री साईबाबा हॉस्पीटल हे सन 2005 सालापासून कार्यान्वित आहे. या ठिकाणी विविध ऑपरेशन थिएटर्स तसेच रिकव्हरी वॉर्ड यामध्ये सेंट्रल ए.सी. प्लांट श्री साईबाबा हॉस्पीटल विभागामार्फतच बसविण्यात आलेले आहे. या सर्व प्लांटची दुरुस्ती व देखभाल मेकॅनिकल विभागामार्फत करण्यात येते. सन 2005 पासून सदरचे सर्व ए.सी. प्लांट अहोरात्र कार्यान्वित आहेत. तसेच सदर प्लांटला स्टॅंडबाय युनिटची व्यवस्था नाही. सदर प्लांट नामांकित कंपनीचे नाहीत. त्यामुळे त्याचे स्पेअर सध्या बाजारात मिळत नाही. शिवाय गेली 10 वर्ष सदर प्लांट जुने आहेत. तसेच अहोरात्र कार्यान्वित असल्याने त्यांचे सध्या वारंवार मेन्टेनंन्स करावे लागत आहे. त्यामुळे ब-याच वेळा प्लांट बंद राहील्याने आणि स्टॅंडबाय प्लांटची व्यवस्था नसल्याने शस्त्रक्रिया केलेल्या किंवा करतांना रुग्णांची गैरसोय होत आहे. रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून सर्व प्लांट बायबॅक करुन आणि उपलब्ध डक्टमध्ये दुरुस्तीसह सिलींग डक्ट डिफ्युझर बसवून नामांकित कंपनीचे (स्टॅंडबायसह) ए.सी. प्लांट बसविणे गरजेचे आहे.

तसेच श्री साईनाथ रुग्णालयातील विविध ऑपरेशन थिएटर्स तसेच रिकव्हरी वॉर्डमध्ये स्प्लिट ए.सी. बसविण्यात आलेले आहे. सदर स्प्लिट ए.सी. अहोरात्र कार्यान्वित आहेत बरेच वर्ष जुने आहेत. तसेच सदर ए.सी. ला स्टॅंडबाय युनिटची व्यवस्था नाही. अहोरात्र कार्यान्वित असल्याने त्यांचे सध्या वारंवार मेन्टेनंन्स करावे लागत आहे. त्यामुळे बऱ्याच वेळा ए.सी. बंद राहील्याने आणि स्टॅंडबाय ए.सी. ची व्यवस्था नसल्याने शस्त्रक्रिया केलेल्या किंवा करतांना रुग्णांची गैरसोय होत आहे. तसेच ऑपरेशन थिएटर व आयसीयु या ठिकाणी स्प्लिट ए.सी. चे आतील बाजूने इनडोअर युनिटचे मेन्टेनन्स करता येत नसल्याने सदरचे सर्व स्प्लिट ए.सी. ऐवजी नामांकित कंपनीचे सेंट्रल ए.सी. प्लॅंट (स्टॅंडबायसह) बसविणे गरजेचे आहे. तसेच साईनाथ रुग्णालयाकडून कन्सल्टंट डॉक्टरांचे ओपीडी केबीनकरीता ए.सी. बसविण्याची वारंवार मागणी करण्यात येत आहे. तसेच मा. कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली श्री साईबाबा हॉस्पीटल येथे दोन्ही रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांचे कामकाजाचा आढावा घेण्यासाठी झालेल्या सभेत दोन्ही रुग्णालयाची पहाणी करुन ए.सी. बसविणेबाबत आढावा घेऊन प्रस्ताव सादर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

वरीलप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटलचे जुने सेंट्रल ए.सी. प्लांट बायबॅक करुन नविन ए.सी. प्लांटची उभारणी करावी तसेच साईनाथ रुग्णालय येथे नविन सेट्रल ए.सी. प्लांट बसविणे याकरीता कन्सल्टंटमार्फत तांत्रिक आराखडा व अदांजे येणा-या खर्चाचा प्रस्ताव तयार करावा लागणार आहे.

उपरोक्तप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालय येथे नविन सेंट्रल ए.सी. प्लांट तसेच श्री साईबाबा हॉस्पीटलचे सेंट्रल ए.सी. प्लांट बायबॅक करुन नविन ए.सी. प्लांट उभारणी करणेकामी तांत्रिक आराखडा व अंदाजे खर्चाचा प्रस्ताव तयार करणेसाठी कन्सल्टंटची नेमणूक करणेचा प्रस्तावास मा. व्यवस्थापन समितीची सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालय येथे नविन सेंट्रल ए.सी. प्लांट तसेच श्री साईबाबा हॉस्पीटलचे सेंट्रल ए.सी. प्लांट बायबॅक करुन नविन ए.सी. प्लांट उभारणी करणेकामी तांत्रिक आराखडा व अंदाजे खर्चाचा प्रस्ताव तयार करणेसाठी जाहिरातीद्वारे कन्सल्टंटची नेमणूक करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.६५** **आर. ओ. प्लॅन्टकरीता मेबरन्स व फिल्टर खरेदीस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयात भक्तांना प्रसाद भोजन घेतांना पिण्यासाठी शुध्द पाणी देण्यात येते. त्यासाठी तासी 2000 लि. क्षमतेचे दोन आर. ओ. प्लॅन्ट कार्यान्वित करण्यात आलेले आहेत. दोन्ही प्लॅन्ट दररोज साधारण 12 तास अविरत चालू असतात. त्यापैकी एक प्लॅन्ट राजु वेगसना फाउंडेशन, हैद्राबाद यांनी देणगी दिलेला असून सदर प्लॅन्टचा मेन्टेनंन्स देणगीदार राजु वेगसना फाउंडेशन कंपनीच करत आहे. दुसरा प्लॅन्ट संस्थानने खरेदी केलेला असून तो ION EXCHANGE कंपनीचा आहे.

संस्थानने खरदी केलेला आर. ओ. प्लॅनसाठी CPA2-8040 साईजचे पाच मेंबरन्स असून सदरचे मेंबरन्स नोव्हेंबर २०१४ मध्ये बसविण्यात आलेले आहे. सध्या साठवण तलावाकडुन येणा-या पाण्याची गुणवत्ता खालावत असून मेबरन्स खराब झालेने पाण्याचा टि.डी.एस. वाढत आहे. तसेच प्लॅन्टसाठी वापरात असलेले कार्बन व सॅन्ड फिल्टर खराब झालेले आहे. सध्या साईभक्तांची गर्दी वाढणार असून शुद्ध पाणी देणे आवश्यक आहे.

**मागणी** – आर. ओ. प्लॅन्टची पाण्याची गुणवत्ता टिकवून भक्तांना पिण्यासाठी शुध्द पाणी देणेकरीता नविन मेबरन्स, कार्बन व सॅन्ड फिल्टर खरेदी करणे आवश्यक आहे. याकरीता खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | पार्टचा तपशील | संख्या | दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | CPA2-8040 मेबरन्स | 5 | 45,000.00 | 2,25,000.00 |
| 2. | कार्बन फिल्टर | 1 | 15,000.00 | 15,000.00 |
| 3. | सॅन्ड फिल्टर | 1 | 15,000.00 | 15,000.00 |
| | | | एकुण रक्कम | 2,55,000.00 |

उपरोक्त प्रमाणे मेबरन्स व फिल्टर खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.2,55,000/- पर्यंत खर्च अपेक्षित असुन मेकॅनिकल विभाग सन 2015-16 अंदाजपत्रकात मशिनरी दुरुस्ती व देखभाल करीता रक्कम रु.1,39,41,303/- मात्र शिल्लक आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** तरी श्री साई प्रसादालयातील आर.ओ.प्लॅन्ट करीता मेबरन्स व फिल्टर विहीत पद्धतीने खरेदी करणेकामी वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करणेस व याकामी येणा-या रक्कम रुपये 2,55,000/- मात्रच्या खर्चास प्रशासकीय मान्यतेसाठी मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर

**निर्णय क्र.५८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, तरी श्री साई प्रसादालयातील आर.ओ. प्लॅन्ट करीता मेबरन्स व फिल्टर खरेदी करणेकामी विहीत पद्धतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या रु.२,५५,०००/- मात्रच्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०१** **मा.विश्वस्तांच्या सूचनांबाबत.**

**निर्णय क्र.५८४** **मा.विश्वस्तांनी आजचे सभेत खालीलप्रमाणे सुचना केल्या, त्या मान्य करणेत आल्या.**

(१) पी.आय.एल.१८/ २०११, सिव्हील ॲप्लीकेशन नं.९२१९/ २०१४ वर मा.औरंगाबाद खंडपीठाने दि.२६.०९.२०१४ रोजी पुरवठाधारक कंपन्यांबरोबर त्याच अटी/ शर्तीवर AMC/ CMC कराराचे नुतनीकरण करावयाचे असल्यास मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही, याबाबत खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

**d.** In case the matter is with regard to renewal of agreement and more particularly with the companies, who have provided the said machineries or the products, applicant/ sansthan shall seek renewal of the agreement on the same terms and conditions.

यापुढे कोणत्याही मशिनरी/ साहित्याची AMC/ CMC करतेवेळी मा.उच्च न्यायालयाच्या वरील आदेशाप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने कार्यवाही करणेत यावी. त्यानुशंगाने AMC/ CMC बाबत पूर्वी झालेले निर्णय रद्द करणेसाठी समितीसमोर प्रस्ताव सादर करणेत यावेत.

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख/ मेकॅनिकल विभागप्रमुख/ वैद्यकिय संचालक)

---

वरील निर्णय क्र.५१९ ते ५८४ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर रात्रौ ०९.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (बाजीराव शिंदे) | (अनिल कवडे) | (श्रीकांत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी**